
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

# जगाला संदेश

## आणि इतर व्याख्यानें



REFBK-0012296

**स्वामी विवेकानंद**

श्रीरामकृष्ण आश्रम नागपूर

# बुद्धदेवांचा जगाला संदेश
## आणि
# इतर व्याख्यानें

REFBK-0012296

स्वामी विवेकानंद

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ९२२९९

श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर.

प्रकाशक
स्वामी भास्करेश्वरानंद
अध्यक्ष, श्रीरामकृष्ण आश्रम,
धंतोली, नागपूर-१.

अनुवादक
प्रा. श्री. मा. कुलकर्णी, एम्. ए.
नागपूर.

श्रीरामकृष्ण-शिवानंद-स्मृतिग्रंथमाला
पुष्प ४२वें

( सर्व अधिकार श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर द्वारा सुरक्षित )

मूल्य रु. २·२५ न. पै.

मुद्रक
श्री. प. वि. बेलवलकर
हरिहरेश्वर मुद्रणालय
महाल, नागपूर-२.

# प्रस्तावना

आमचें हें नवीन प्रकाशन वाचकांच्या हातीं देतांना आम्हांला आनंद होत आहे.

प्रस्तुत पुस्तक म्हणजे स्वामी विवेकानंदांनी अमेरिकेंत विभिन्न स्थानीं दिलेल्या कांही व्याख्यानांचा संग्रह आहे. धर्म म्हणजे काय, धर्मसाधना कोणत्या प्रकारची असते, वेदान्ताने जगाला कोणती शिकवण दिली, वेदान्त हा भावी जगाचा धर्म होऊं शकतो काय, बुद्धदेवांचा जगाला कोणता संदेश आहे, उपासनेचें खरें स्वरूप कोणतें आहे, इत्यादि विविध विषयांवरील स्वामीजींचे उद्‌बोधक व स्फूर्तिदायी विचार प्रस्तुत पुस्तकांत वाचावयास मिळतात. स्वामी विवेकानंदांनी जगांतील विभिन्न धर्मांचा तुलनात्मक अभ्यास केला होता. व निरनिराळ्या धर्मांतील तत्त्वांचें सखोल चिंतन व मनन करून ते विशिष्ट निष्कर्षांप्रत पोहोचले होते. या साऱ्या निष्कर्षांचें सार वाचकांना प्रस्तुत पुस्तकांत आढळेल व स्वामीजींच्या अलौकिक प्रतिभेचें त्यांना दर्शन घडेल.

प्रा. श्री. मा. कुलकर्णी, एम्. ए., नागपूर यांनी हा अनुवाद केला आहे, त्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोंत.

दि. १५ नोव्हेंबर १९६२ —प्रकाशक

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | बुद्धदेवांचा जगाला संदेश ... ... | १ |
| २. | शिष्यत्व ... ... ... | २१ |
| ३. | वेदान्त हा भावी जगाचा धर्म आहे काय ? | ४४ |
| ४. | धर्म : त्याच्या पद्धति आणि उद्देश ... | ७५ |
| ५. | आत्म्याचें स्वरूप व त्याचें अंतिम लक्ष्य | ९८ |
| ६. | मानसशास्त्राचें महत्त्व ... ... | ११२ |
| ७. | प्रकृति आणि मानव ... ... | ११९ |
| ८. | एकाग्रता आणि प्राणायाम ... ... | १२४ |
| ९. | ज्ञानयोगाची भूमिका ... ... | १३० |
| १०. | वेदान्त तत्त्वज्ञान आणि ख्रिस्ती धर्म ... | १३८ |
| ११. | उपासक आणि उपास्य ... ... | १४२ |
| १२. | उपासनेचें प्राथमिक स्वरूप ... | १५८ |
| १३. | दिव्य प्रेम ... ... ... | १७४ |



स्वामी बिवेकानन्द

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १२२९६

# बुद्धदेवांचा जगाला संदेश

(सॅन फ्रान्सिस्को येथे १८ मार्च १९०० रोजीं दिलेलें भाषण)

बौद्धधर्म हा ऐतिहासिक दृष्टया सर्वांत महत्त्वाचा धर्म आहे––ऐतिहासिक दृष्टचा, तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने नव्हे. कारण, जगाने पाहिलेलें असें तें एक सर्वांत मोठें धार्मिक आंदोलन होतें, मानवी समाजावर आदळलेली अत्यंत प्रचंड अशी ती आध्यात्मिक लाट होती. अशी एकहि सभ्यता नाही की जिला या ना त्या प्रकारें या लाटेचा परिणाम जाणवला नाही.

बुद्धदेवांचे अनुयायी हे अत्यंत उत्साही व पराकाष्ठेच्या प्रचारक वृत्तीचे होते. समस्त धर्मांच्या अनुयायांपैकी, स्वत:च्या धर्मभूमीच्या मर्यादित क्षेत्रांत संतुष्ट न राहणारे असे तेच पहिले होत. ते सर्वदूर पसरले. त्यांनी पूर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिण सर्वत्र प्रवास केला. ते घोर अंधकारमय अशा तिबेटांत पोहोचले, पर्शियांत व एशियामायनरमध्ये ते गेले; ते रशिया, पोलंड आणि इतर अनेक पाश्चिमात्य देशांत गेले. ब्रह्मदेश, सयाम, ईस्ट इंडीज येथे व त्याहिपलीकडे ते गेले. जेव्हा शिकंदराने आपल्या लष्करी विजयाने भूमध्य जगाचा भारताशीं संबंध आणला तेव्हा भारतीय ज्ञानाला आशिया व युरोप यांच्या विशाल भागावर पसरण्याचा मार्ग गवसला. बौद्ध भिक्षु भिन्न भिन्न राष्ट्रांत प्रचार करावयास गेले. त्यांनी उपदेश देण्यास सुरवात करतांच, सूर्यापुढे धुकें वितळावें त्याप्रमाणे लोकभ्रम व पुरोहितगिरी नाहीशी व्हायला लागली.

ज्याप्रमाणे ख्रिस्ती धर्म समजून घेण्यासाठी ख्रिस्तांच्या वेळच्या यहुदी समाजाच्या स्थितीचें तुम्हांला आकलन करून घेतलें पाहिजे, त्याप्रमाणे बौद्धधर्माचें हें आंदोलन नीट समजण्यासाठी बुद्धांच्या वेळची भारतांतील परिस्थिति तुम्हीं जाणून घेतली पाहिजे. ख्रिस्तांच्या ६०० वर्षें पूर्वीच्या भारतीय समाजाची तुम्हांला कल्पना असणें जरूर आहे. या काळापर्यंत भारतीय सभ्यतेने आपला विकास पूर्ण केला होता. भारतीय सभ्यतेचा अभ्यास करतांना तुमच्या हें ध्यानांत येईल की ती अनेक वेळां मृतप्राय झाली आहे व पुन्हा तिचें उज्जीवन झालें आहे. हें तिचें वैशिष्टय आहे. बहुतांश मानववंश एकदा वर चढतात व मग त्यांचा कायमचा ऱ्हास होतो. जगांत दोन प्रकारचे लोक असतात --ज्यांचा सतत विकास होत असतो ते व ज्यांचा विकास थांबतो ते. भारत व चीन यांच्यासारखीं शांतिप्रिय राष्ट्रें खाली पडतात पण पुन्हा उठतात. पण इतर राष्ट्रें एकदा खालीं गेलीं की पुन्हा वर येत नाहीत--तीं नष्ट होतात. "शांतिप्रस्थापक धन्य होत, कारण तेच पृथ्वीचा उपभोग घेतील."

बुद्धांच्या जन्मकाळीं, भारताला एका थोर आध्यात्मिक नेत्याची, एका द्रष्टयाची, एका प्रेषिताची आवश्यकता होती. पुरोहितांची एक शक्तिशाली संघटना अगोदरच अस्तित्वांत आली होती. यहुद्यांचा इतिहास जर तुम्हांला स्मरत असेल--पुरोहित आणि द्रष्टे वा प्रेषित असे दोन प्रकारचे धार्मिक नेते त्यांच्यांत कसे होते, आणि पुरोहितलोक जनतेला अज्ञानांत ठेवून तिच्या मनांत भ्रम कसे कोंबीत असत हें जर तुम्हांला स्मरत असेल तर तुम्हांला बुद्धांच्या वेळच्या परिस्थितीचें चांगलें आकलन होईल. पुरोहितांनी नेमून दिलेल्या पूजेच्या पद्धति म्हणजे लोकांवर वर्चस्व

गाजविण्याचें त्यांचें एक साधन होतें. बायबलच्या जुन्या संहितेंत सर्वत्र पुरोहितांच्या भ्रामक कल्पनांना 'प्रेषित' आव्हान देत असल्याचें तुम्हांला दिसेल. या लढ्याचा परिणाम प्रेषितांच्या विजयांत व पुरोहितांच्या पराभवांत झाला.

ईश्वर आहे यावर पुरोहितांचा विश्वास असतो, पण त्याच्यापर्यंत पोहोचण्यास किंवा त्याला जाणण्यास त्यांच्या मध्यस्थीचीच आवश्यकता आहे असें ते मानतात. पावित्र्यस्वरूप जो ईश्वर त्याच्यापर्यंत लोकांचा प्रवेश पुरोहितांच्या परवानगीनेच होऊं शकतो. तुम्ही त्यांना द्रव्य दिलें पाहिजे, त्यांची पूजा केली पाहिजे, सर्वकांही त्यांच्या हातीं सोपविलें पाहिजे. जगाच्या इतिहासांत सर्वत्र ही पुरोहिती वृत्ति पुनःपुनः डोकें वर काढतांना दिसते--सत्तेची ही भयंकर तृष्णा, हा दानवी सत्ताभिलाष मानवी प्रकृतीचाच एक भाग दिसतो. पुरोहित तुमच्यावर वर्चस्व गाजवितात, तुमच्यासाठी हजारो नियम घालून देतात. साधीं सरळ सत्यें ते आडवळणाने मांडतात. स्वतःच्या वरचढ भूमिकेला पोषक अशा कथा ते तुम्हांला सांगतात. या जगांत तुमचा उत्कर्ष व्हावा असें वाटत असेल अगर मृत्यूनंतर स्वर्गाला जाण्याची तुमची इच्छा असेल, तर तुम्हांला त्यांच्या मार्फतच गेलें पाहिजे. तुम्हांला सर्व प्रकारचे विधि, सर्व प्रकारचीं अनुष्ठानें केलीं पाहिजेत. या सर्वांमुळे जीवन इतकें गुंतागुंतीचें झालें आहे आणि बुद्धि इतकी गोंधळली आहे की मी तुम्हांला साध्या-सोप्या शब्दांत कांही सांगेन तर तुम्ही येथून असंतुष्टच घरीं परताल. तुम्ही पूर्णपणें भारली गेलां आहांत. तुम्हांला जितकें कमी समजेल तितकें तुम्हांला अधिक चांगलें वाटतें! पुरोहित व त्यांच्या भ्रामक कल्पना आणि त्यांचीं कारस्थानें यांच्याविरुद्ध प्रेषित सतत धोक्याचे इषारे देत

आले आहेत, पण सर्वसामान्य जनता या इषाऱ्यांकडे लक्ष देण्याला अद्याप शिकली नाही---शिक्षण त्यांच्यापर्यंत अद्याप पोहोचावयाचें आहे.

लोकांना शिक्षण मिळालेंच पाहिजे. अलीकडे लोकशाही व सर्व मानवांची समानता याविषयी बोलणें ऐकूं येतें. पण आपण सर्वांच्या समान आहोंत हें एखाद्याला कसें कळावें ? त्यासाठी तीव्र बुद्धि व वेडगळ कल्पनांपासून मुक्त असें भेदक मन असलें पाहिजे. मनावर पुटें चढविणाऱ्या भ्रामक कल्पनांना भेदून अंतःस्थ शुद्ध सत्यापर्यंत त्याला पोहोचतां आलें पाहिजे. तेव्हा त्याला कळून येईल की सर्व प्रकारची पूर्णता, सर्व शक्ति या आधीच्याच त्याच्यांत आहेत, त्या इतर कोणीं त्याला द्यावयाच्या नाहीत. जेव्हा त्याला याची साक्षात् अनुभूति होईल तेव्हा, त्या क्षणीं तो मुक्त होईल आणि तो समत्व प्राप्त करील. त्याला याचीहि प्रतीति येईल की, इतर प्रत्येकजणच त्याच्यासारखा पूर्ण आहे आणि त्याला आपल्या मानव बांधवांवर शारीरिक, मानसिक किंवा नैतिक अशी कोणतीहि सत्ता गाजवायची जरूर नाही. आपल्याहून खालच्या दर्जाचा असा कोणी मनुष्य आहे ही कल्पना मग तो सोडून देतो. तेव्हाच तो समानतेची भाषा बोलूं शकतो, तोंपर्यंत नाही.

असो. मी तुम्हांला सांगत होतों की यहुदी लोकांमधे पुरोहित आणि प्रेषित यांच्यांत सतत झगडा होता. सत्ता व ज्ञान यांची मिरासदारी आपल्याकडेच राहावी असा पुरोहितांचा प्रयत्न होता. अखेर त्यांच्याहि ठिकाणीं तीं दोन्हीं राहिलीं नाहीत, आणि ज्या शृंखला त्यांनी लोकांच्या पायांत घातल्या होत्या त्या त्यांच्याच पायांत पडल्या. मालक हे लवकरच गुलाम बनतात. या लढ्याचा

शेवट म्हणजे नाझरेथच्या येशूंचा विजय होय. हा विजय म्हणजे ख्रिस्ती धर्माचा इतिहास आहे. अखेर येशू ख्रिस्तांना ती सर्व पुरोहितगिरी उलथून टाकण्यांत यश आलें. या महान् प्रेषिताने पुरोहिती स्वार्थाच्या सर्पाला ठार मारलें व त्याच्या पकडींतून सत्याचें रत्न सोडविलें आणि तें सर्व जगाला दिलें. त्यामुळे, ज्याला तें बाळगण्याची इच्छा असेल त्याला तसें करण्याचें पूर्ण स्वातंत्र्य मिळालें; कोणाहि पुरोहिताच्या वा पुरोहिती संघटनेच्या मर्जीची वाट पाहण्याची त्याला आवश्यकता उरली नाही.

यहुदी ही केव्हाच मोठी तत्त्वज्ञानी जात नव्हती. भारतीय बुद्धीची कुशाग्रता त्यांच्या ठिकाणीं नव्हती आणि भारतीयांची मानसिक शक्ति देखील त्यांच्या ठायीं नव्हती. भारतांतील पुरोहितांच्या म्हणजे ब्राह्मणांच्या ठिकाणीं फार मोठी बौद्धिक व मानसिक शक्ति होती. भारताचा आध्यात्मिक विकास करण्याला त्यांनीच प्रारंभ केला आणि त्यांनी आश्चर्यकारक गोष्टी साध्य केल्या. पण एक काळ असा आला की विकासाच्या ज्या उन्मुक्त प्रवृत्तीने ब्राह्मणांना आधी कार्यप्रवृत्त केलें होतें ती नाहीशी झाली. सत्ता व विशेषाधिकार स्वतःकडे घेण्यास त्यांनी प्रारंभ केला. ब्राह्मणाने जर एखाद्या माणसाची हत्या केली तर त्याला शिक्षा दिली जात नसे. ब्राह्मण हा केवळ जन्मामुळेच विश्वाचा स्वामी आहे ! अत्यंत दुष्ट ब्राह्मणाची देखील पूजाच केली पाहिजे !

पण पुरोहितांची भरभराट होत असतांनाच कवि-द्रष्टेहि अस्तित्वांत होतेच--त्यांना 'संन्यासी' म्हणत. सर्व हिंदूंना, मग त्यांची जात कोणतीहि असो, आध्यात्मिकता प्राप्त करून घेण्यासाठी कर्मत्याग करून मृत्यूचें स्वागत करण्याची तयारी करणें आवश्यक

आहे. त्यानंतर त्यांना या जगाचें कसलेंहि आकर्षण उरतां कामा नये. त्यांनी संसार सोडून संन्यासी झालें पाहिजे. पुरोहितांनी शोधून काढलेल्या हजारो विधींशीं या संन्याशांना कांही कर्तव्य नसतें. 'कांही शब्दांचा उच्चार करा--दहा अक्षरी, वीस अक्षरी इ०'--या सर्व गोष्टी निरर्थक आहेत.

तर, या प्राचीन भारतीय क्रान्तदर्शी संन्याशांनी पुरोहितांच्या मार्गांचें खंडन करून शुद्ध सत्याचा उद्‌घोष केला. पुरोहितांची सत्ता मोडून काढण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आणि त्यांना कांहीसें यश आलें. पण दोन पिढ्यांतच त्यांचे शिष्य परत त्या भ्रामक कल्पना व पुरोहितांचे द्राविडी प्राणायामांचे मार्ग यांच्याकडे वळले --स्वतःच पुरोहित झाले. मग तेहि "आमच्या मार्फतच तुम्हांला सत्य मिळूं शकतें" असें म्हणावयास लागले. सत्य पुन्हा एका ठरीव साच्यांत पडून त्यावर पुटें चढूं लागलीं; तीं दूर करून सत्य मोकळें करण्यासाठी प्रेषित पुनः आविर्भूत झाले. आणि असें हें चालूंच राहिलें. होय, सदा सर्वकाळ अशा माणसांची--प्रेषितांची, सत्यद्रष्टयांची आवश्यकता आहे, एरव्ही मानवता नष्ट होईल.

पुरोहितांचे हे आडवळणाचे मार्ग असावेतच कां, याचें आश्चर्य वाटतें. आपण सत्याप्रत सरळ कां येऊं शकत नाही? ईश्वरी सत्याची तुम्हांला इतकी लाज वाटते का, की त्याला सर्व प्रकारच्या गुंतागुंतीच्या मंत्रतंत्रांच्या आणि अनुष्ठानांच्या मागे लपवावें लागतें? ईश्वराची तुम्हांला लाज वाटते का की जिच्यामुळे त्याच्याविषयीचें सत्य तुम्ही जगापुढे सांगूं शकत नाही? याला तुम्ही धार्मिकता व आध्यात्मिकता म्हणतां काय? पुरोहित लोक हेच सत्यग्रहणाला योग्य असे लोक आहेत! सामान्य लोक

त्याला योग्य नाहीत ! त्यांच्यासाठी सत्याला 'पातळ' केलें पाहिजे ! त्यांत थोडें पाणी मिसळलें पाहिजे !

टेकडीवरील उपदेश (Sermon on the mount) आणि गीता घ्या. हीं दोन्हीं किती सरळ, किती सोपीं आहेत ! रस्त्यावरचा माणूस देखील तीं समजूं शकतो, किती उत्तम ! त्यांमध्ये सत्य हें अत्यंत स्पष्टपणें व सोप्या रीतीने प्रकट केलें आहे. पण नाही, इतक्या सरळ रीतीने सत्य सापडूं शकतें ही गोष्ट पुरोहित मान्य करणार नाहीत. ते हजारो स्वर्ग आणि हजारो नरक यांच्या गोष्टी बोलतात. त्यांनी घालून दिलेले नियम जर लोक पाळतील तर ते स्वर्गाला जातील, ते जर पाळणार नाहीत तर नरकांत जातील !

पण लोक सत्य जाणतीलच. कांहीजणांना अशी भीति वाटते की संपूर्ण सत्य जर सर्वांना दिलें तर तें त्यांना बाधेल. त्यांना शुद्ध, निर्भेळ, निर्विशेष सत्य देऊं नये असें ते म्हणतात. परंतु सत्याशीं तडजोड केल्यामुळे जग कांही विशेष चांगलें झालें असें नाही. आहे त्यापेक्षा तें अधिक वाईट काय होणार आहे ? सत्य बाहेर आणा. तें जर खरोखरच सत्य असेल तर तें भलेंच करील. लोक जेव्हा याला विरोध करतात आणि अन्य मार्ग सुचवितात तेव्हा ते अवांच्छनीय आडमार्गाचेंच कसेंतरी समर्थन करीत असतात

बुद्धांच्या काळांत भारत या गोष्टींनी भरून गेला होता. खालच्या लोकांना सर्व ज्ञानापासून वंचित केलें होतें. वेदाचा एक शब्द देखील त्यांच्यांतील एखाद्याच्या कानीं पडला तरी त्याला घोर शिक्षा भोगावी लागत असे. प्राचीन हिंदूंनी शोधून काढलेलीं आध्यात्मिक सत्यें ज्या वेदांत साठविलीं आहेत त्या वेदांना

पुरोहितांनी गुप्त राखलें !

अखेर एका माणसाला हें सहन करणें अशक्य झालें. त्याच्या जवळ बुद्धि होती, शक्ति होती आणि हृदय होतें--विशाल आकाशाइतकें अमर्याद असें हृदय. सर्वसामान्य लोकांचें नेतृत्व पुरोहितांच्याकडे कसें आहे आणि आपल्या या सत्तेविषयी त्यांना कसा मोठेपणा वाटत आहे हें त्याला जाणवलें आणि या संबंधांत कांहीतरी करण्याची त्याला इच्छा झाली. कोणावरहि सत्ता गाजविण्याची त्याला इच्छा नव्हती. मानवाची मानसिक व आध्यात्मिक बंधनें तोडण्याची त्याची इच्छा होती. त्याचें हृदय विशाल होतें. आपल्यापैकी पुष्कळांना हृदय असतें आणि आपणहि इतरांना मदत करूं इच्छितों. पण आपल्या ठिकाणीं बुद्धि नसते, साहाय्य देण्याचीं साधनें व मार्ग आपल्याला माहीत नसतात. पण या महापुरुषाजवळ आत्म्याचीं बंधनें तोडण्याच्या साधनांचा शोध लावण्याची बुद्धि होती. माणसाला दुःख कां भोगावें लागतें हें त्यांनी जाणलें आणि त्या दुःखांतून बाहेर पडण्याचा मार्ग त्यांना सापडला. ते मोठे निपुण व गुणवान होते. त्यांनी ते सर्व प्रश्न नीट सोडविले. कोणताहि भेदभाव न करतां त्यांनी सर्वांना उपदेश दिला आणि ज्ञानानें लाभणाऱ्या शांतीची त्यांना प्राप्ति करून दिली. हे महापुरुष म्हणजे बुद्धदेव होत.

'आशियाचा धर्मदीप' (The light of Asia) या ॲर्नाल्डच्या कवितेवरून, बुद्धांचा जन्म राजघराण्यांत कसा झाला व त्यांच्यावर जगांतील दुःखाचा प्रबल आघात कसा झाला हें तुम्हांला माहीत असेलच. तसेंच, ऐषआरामांत व वैभवांत वाढले असूनहि वैयक्तिक सुखांत आणि सुरक्षिततेंत त्यांना समाधान कसें मिळूं शकलें नाही; आपली पत्नी व नुकताच जन्मलेला पुत्र

यांना सोडून देऊन त्यांनी जगाचा त्याग कसा केला; या गुरूकडून त्या गुरूकडे सत्याच्या शोधांत ते कसे भटकले; आणि शेवटीं त्यांनी बुद्धावस्था कशी प्राप्त करून घेतली हेंहि तुम्ही जाणतां. त्यांचें जीवितध्येय व तदनुसार दीर्घकाल त्यांनी केलेलें कार्य, त्यांचा शिष्य-समुदाय, त्यांचे संघ यांविषयी तुम्हांला माहिती आहे, त्या सर्व गोष्टी तुम्ही जाणतांच.

भारतांत पुरोहित आणि प्रेषित वा सत्यद्रष्टे यांच्यांत चालू असलेल्या लढ्यांतील विजयाचें मूर्तिमंत प्रतीक म्हणजेच बुद्धदेव होत. या भारतीय पुरोहितांच्या बाजूने एक गोष्ट मात्र सांगतां येते. ते धर्माच्या बाबतींत कधीच असहिष्णु नव्हते व नाहीत. त्यांनी धर्माच्या नांवाखाली कुणाचाहि छळ केला नाही. कोणालाहि त्यांच्या विरुद्ध प्रचार करण्याची मुभा होती. त्यांचा धर्म हा असा आहे. त्यांनी कोणालाहि त्याच्या धार्मिक मतांसाठी छळलें नाही. परंतु सर्वच पुरोहितांत आढळणारे कांही दोष त्यांच्यांतहि होते. त्यांनाहि सत्ता हवी होती. त्यांनीहि विधि व नियम रचले आणि धर्माला अकारण गुंतागुंतीचें स्वरूप दिलें, आणि अशा रीतीने आपल्या धर्मानुयायांच्या सामर्थ्याची त्यांनी खच्ची केली.

या सर्व अर्थहीन गुंतागुंतीचा बुद्धांनी छेद केला. त्यांनी प्रचंड शक्तिशाली सत्यांची शिकवण दिली. वैदिक तत्त्वज्ञानाचें मुख्य सारच त्यांनी सर्वांना भेदभाव न करतां शिकविलें. त्यांनी तें सर्व जगाला शिकविलें, कारण मानवाची समानता हा त्यांच्या महान् संदेशांपैकी एक संदेश होता. सर्व माणसें समान आहेत. याला कांही अपवाद नाही. बुद्ध हे समतेचे महान् उपदेशक होते. आध्यात्मिकता प्राप्त करून घेण्याचा प्रत्येक पुरुषाला व स्त्रीला

सारखाच हक्क आहे, ही त्यांची शिकवण होती. पुरोहित व इतर जाति यांच्यांतील भेद त्यांनी नाहीसा केला. अगदी खालच्यांतील खालच्या माणसाला देखील सर्वोच्च आध्यात्मिक अवस्था प्राप्त करून घेण्याचा अधिकार आहे. त्यांनी निर्वाणाचें द्वार सर्वांना खुलें केलें. भारताच्या दृष्टीनेहि त्यांची शिकवण धाष्टर्याची होती. कोणत्याहि आणि कितीहि प्रचाराने भारतीयांच्या मनाला कधी धक्का बसत नाही, पण बद्धांचा सिद्धान्त ग्रहण करणें भारताला देखील जड गेलें. मग तुम्हांला तें किती जड जाईल !

त्यांचा सिद्धान्त पुढीलप्रमाणे होता : आपल्या जीवनांत दुःख कां आहे ?––कारण आपण स्वार्थी आहोंत. आम्हांला स्वतःसाठी निरनिराळ्या गोष्टींची इच्छा असते. म्हणूनच जीवनांत दुःख आहे. यांतून सुटकेचा मार्ग कोणता ? स्वार्थत्याग हाच तो मार्ग आहे. 'स्व' हा अस्तित्वांत नाही. हें दृश्यमान जग, हें सर्व आपण जें अनुभवतों त्याचेंच काय तें अस्तित्व आहे. जन्म व मृत्यु यांच्या फेऱ्यांच्या पार्श्वभागीं आत्मा म्हणून कांहीहि नाही. विचारांचा एक प्रवाह आहे. एक विचार क्रमाने दुसऱ्या विचाराच्या मागोमाग येतो. प्रत्येक विचार अस्तित्वांत येतो आणि त्याच क्षणीं त्याचें अस्तित्व नष्ट होतें, येवढेंच. हे विचार करणारा असा आत्मा म्हणून कोणी नाही. शरीर हें सतत बदलत आहे. तसेंच मन वा जाणीवहि बदलत असते. म्हणून 'स्व' हा एक आभास आहे. या आभासमय 'स्व'ला धरून ठेवल्याने सर्व स्वार्थीपणा उत्पन्न होतो. 'स्व' म्हणून कांही नाही हें सत्य जर आपण जाणलें तर आपण सुखी होऊं आणि इतरांना सुखी करूं.

बुद्धांनी जें शिकविलें तें हेंच होय. आणि ते नुसतेंच बोलले नाहीत, जगासाठी स्वतःच्या जीवनाचा त्याग करण्याची त्यांची

तयारी होती. ते म्हणाले, "पशूंचें बलिदान जर चांगलें आहे तर माणसाचें बलिदान हें त्याहून चांगलें आहे." आणि त्यांनी स्वतः बळी जाण्याची तयारी दाखविली. ते म्हणाले, "पशूंचें बलिदान हा आणखी एक अंधविश्वास आहे. ईश्वर आणि आत्मा हे दोन मोठे भ्रम आहेत. ईश्वर हा पुरोहितांनी शोधून काढलेला केवळ एक भ्रम आहे. हे ब्राह्मण म्हणतात त्याप्रमाणे जर ईश्वर असेल तर जगांत इतकें दुःख कां असावें ? तो तुमच्या-आमच्यासारखाच कार्यकारणाच्या नियमांचा गुलाम आहे तो जर कार्यकारणाच्या नियमाने बांधलेला नसेल तर मग तो सृष्टि कां निर्माण करतो ? असा ईश्वर मुळीच समाधानकारक नाही. या विश्वाचा नियामक स्वर्गांत आहे आणि तो स्वेच्छेनुसार जगाचें नियमन करतो आणि आम्हांला दुःखांत मरण्यासाठी इथे सोडतो. एक क्षणभर देखील आमच्याकडे पाहण्याचा चांगुलपणा त्याच्यांत नाही. आमचें संपूर्ण जीवन सतत दुःखमय आहे. पण ही पुरेशी शिक्षा नाही, मृत्यूनंतर आम्हांला अशा ठिकाणीं जावें लागतें की जिथे आणखी इतर शिक्षा भोगाव्या लागतात. तरीहि आम्ही या जगाच्या निर्मात्याला खुष करण्यासाठी सर्व प्रकारचे विधि व अनुष्ठानें सतत करीत असतों !"

बुद्ध म्हणतात, "हे सर्व विधि चूक आहेत. जगांत फक्त एकच ध्येय आहे. सर्व भ्रम नष्ट करा. जें सत्य असेल तें टिकेल. अभ्र दूर होतांच सूर्य प्रकाशेल." 'स्व'ला कसें नष्ट करायचें ? पूर्णतः निःस्वार्थी बना---एखाद्या मुंगीसाठी देखील आपलें जीवन अर्पण करण्याची तयारी ठेवा. कोणत्याहि भ्रामक कल्पनेसाठी किंवा कोणत्याहि देवाला संतुष्ट करण्यासाठी अथवा कांही बक्षीस मिळविण्यासाठी कर्म करूं नका; तर 'स्व'चा नाश करून

स्वत:ला मुक्त करण्यासाठी कर्म करा. पूजा, प्रार्थना इत्यादि सर्व निरर्थक आहे. तुम्ही सर्व म्हणतां, 'हे ईश्वरा मी तुझा आभारी आहें.' पण तो आहे कुठे हें तुम्हांला माहीत नाही. आणि तरीहि तुम्ही सर्व त्याच्यासाठी वेडे होतां !

हिंदु लोक आपल्या ईश्वराशिवाय इतर सर्वकांही सोडूं शकतात. ईश्वराला नाकारणें म्हणजे भक्तीचा आधारच काढून घेण्यासारखें आहे. भक्ति व ईश्वर यांना हिंदु हा चिकटून राहणारच. तो यांना केव्हाहि सोडूं शकत नाही. आणि बुद्धांच्या शिकवणींत तर ईश्वर व आत्मा नाहीत, आहे फक्त कर्मच. आणि तें कशासाठी ? स्वत:साठी नव्हे, कारण 'स्व' हा एक भ्रम आहे. हा भ्रम जेव्हा दूर होईल तेव्हाच आपलें खरें स्वरूप प्रकट होईल. जगांत फार थोडे लोक असे आहेत की जे या उंचीपर्यंत चढूं शकतात आणि कर्मासाठी कर्म करूं शकतात.

तरी पण बुद्धांचा धर्म द्रुत गतीने पसरला याचें कारण, त्यांच्या विशाल हृदयांतून वाहणारें उत्कट, विलक्षण प्रेम. हें प्रेम मानवाच्याच नव्हे तर प्राणीमात्राच्या सेवेला वाहिलेलें होतें, त्यांना फक्त सर्व जीवांची दु:खापासून मुक्तता करण्याचा मार्ग शोधून काढण्याचीच चिंता होती, इतर कशाचीहि पर्वा नव्हती ! मानवाच्या इतिहासांत हें पहिल्याप्रथमच घडलें.

मनुष्य ईश्वरावर प्रेम करीत होता आणि आपल्या बांधवाला--मानवाला तो अजीबात विसरून गेला होता. जो मनुष्य ईश्वराच्या नांवावर आपले प्राणहि देऊं शकतो तो उलट ईश्वराच्या नांवावरच आपल्या मानव बांधवाला ठारहि मारूं शकतो. अशी जगाची परिस्थिति होती. माणसें ईश्वराच्या गौरवासाठी त्याच्या पुत्राचा--मानवाचा--बळी देतात, इतर

राष्ट्रांना लुटतात, हजारो प्राण्यांचा वध करतात किंवा ही भूमि रक्ताने भिजवितात--आणि हें सारें ते ईश्वराच्या गौरवासाठी करीत असतात. बुद्धांच्या वेळीं प्रथमच ते दुसऱ्या ईश्वराकडे--मानवाकडे वळले. प्रेम हें मनुष्यावर केलें पाहिजे. सर्व मानवांविषयीच्या उत्कट प्रेमाची ही पहिली लाट होती--खऱ्या अमिश्र अशा ज्ञानाची ही पहिली लाट होती. ती भारतापासून निघाली आणि सर्व दिशांना पसरून तिने क्रमशः देशामागून देश व्यापले.

सत्य हें जसेंच्या तसेंच प्रकाशावें अशी या आचार्यांची इच्छा होती. त्याची धार बोथट होणें नको; त्यांत तडजोड नको; पुरोहित, सत्ताधारी लोक किंवा राजे यांच्यासमोर त्याचें नमणें नको. भ्रामक रूढीच्या पुढे वाकणें नको, मग ती किती का जुनी असेना! केवळ फार प्राचीन काळापासून आलेले आहेत म्हणून कोणत्याहि ग्रंथाबद्दल किंवा अनुष्ठानाबद्दल आदर नको. त्यांनी सर्व धर्मग्रंथांचा, सर्व प्रकारच्या धार्मिक अनुष्ठानांचा त्याग केला --फार कशाला, ज्या भाषेंत भारतांत परंपरागत धर्माची शिकवण दिली जात असे त्या भाषेचा, संस्कृतचा त्यांनी त्याग केला. हेतु हा की आपल्या अनुयायांनी त्या भाषेशीं निगडित अशा भ्रामक कल्पना आत्मसात् करण्याचा कसलाहि संभव राहूं नये.

ज्या सत्याची आपण चर्चा करीत आहोंत त्याच्याकडे पाहण्याचा आणखी एक दृष्टिकोन आहे, आणि तो आहे हिंदूंचा दृष्टिकोन. आमचा असा दावा आहे की निःस्वार्थतेचा बुद्धांचा महान् सिद्धान्त आमच्या दृष्टिकोनांतून अधिक चांगल्या प्रकारें समजूं शकतो. उपनिषदांत आत्मा व ब्रह्म यांच्या विषयीचा महान् सिद्धान्त आधीच प्रतिपादिलेला आहे. आत्माच ब्रह्म आहे. जें कांही आहे तें सर्व आत्माच आहे. तेंच एकमेव सत्य आहे. माये-

मुळेच आपल्याला त्यांत भेद दिसत असतो. एकच आत्मा आहे, अनेक नाहीत. तो एकच आत्मा विविध रूपांनी प्रकट होतो. मनुष्य हा मनुष्याचा बंधु आहे, कारण सर्व मानव एकच आहेत. वेद म्हणतात की, मनुष्य हा केवळ माझा बंधु आहे इतकेंच नव्हे तर तो मीच आहें, विश्वाच्या कोणत्याहि अंशाचें अनिष्ट केल्यास तें माझेंच अनिष्ट होईल. मीच विश्व आहें. 'मी श्रीयुत अमुक अमुक' आहें असें मला वाटतें. भ्रम आहे तो हाच.

जसजसे तुम्ही आपल्या खऱ्या स्वरूपाकडे जाल तसतसा हा भ्रम नाहीसा होईल. सर्व प्रकारचे भेद आणि सर्व प्रकारचा पृथक्‌पणा जसजसा मावळेल तसतसें सर्वकांही एकच ईश्वरी तत्त्व आहे, सर्वकांही तें ब्रह्मच आहे याची तुम्हांला प्रतीति येईल. ईश्वर आहे, पण तो म्हणजे एखाद्या ढगावर बसलेला पुरुष नव्हे. तो शुद्ध चैतन्य आहे. तो कुठे राहतो? तुमच्या स्वतःपेक्षाहिं तुम्हांला तो अधिक जवळ आहे. तोच आत्मा आहे. तुमच्याहून निराळा व भिन्न अशा स्वरूपांत ईश्वराला तुम्ही कसें पाहूं शकाल? आपल्याहून भिन्न असा कोणीतरी तो आहे असें जेव्हा तुम्ही मानतां तेव्हा तुम्ही त्याला जाणत नाही. तो 'तुम्ही'च आहे--तोच तुमचें खरें स्वरूप आहे. भारतीय द्रष्टयांचा सिद्धान्त हा असा होता.

तुम्ही अमक्याला पाहतां आणि सर्व जग तुमच्याहून भिन्न आहे असें जें तुम्हांला वाटतें तें सर्व स्वार्थामुळे. माझ्याहून तुम्ही वेगळे आहांत अशी तुमची समजूत असते. तुम्ही माझा कांहीहि विचार करीत नाही. तुम्ही घरीं जातां, भोजन करतां आणि झोपतां. मी जरी मेलों तरी तुम्ही खातां, पितां आणि आनंदांत राहतां. परंतु बाकीचें जग दुःखी असतांना तुम्ही खऱ्या अर्थानें सुखी होऊं शकत नाही. आपण सर्व एक आहोंत. द्वैताचा भ्रमच

सर्व दुःखाचें मूळ आहे. आत्म्याशिवाय कांहीहि अस्तित्वांत नाही, दुसरें कांही नाहीच.

बुद्धांची शिकवण अशी आहे की, ईश्वर नाही, फक्त मनुष्यच आहे. ईश्वरविषयक प्रचलित कल्पनांच्या मुळाशीं असणाऱ्या मनोवृत्तीचा त्यांनी निषेध केला. ती मनुष्याला दुबळे व अंधविश्वासी बनविते असें त्यांना आढळून आलें. आपल्याला सर्वकांही देण्याची जर तुम्ही ईश्वराजवळ प्रार्थना कराल तर मग कोण स्वतः कर्म करील ? जे परिश्रम करतात, कार्यरत राहतात त्यांच्याकडेच ईश्वर येतो. जे स्वतःला साहाय्य करतात त्यांनाच ईश्वर साहाय्य करतो. याच्या विरुद्ध असणारी ईश्वराची कल्पना आपले ज्ञानतंतु दुर्बल करते, स्नायु ढिले बनविते आणि आपल्याला परावलंबी करून सोडते. जें जें स्वाधीन आहे तें तें सुखी असतें; जें परावलंबी आहे तें दुःखाचें असतें. मनुष्याच्या ठायीं अमर्याद शक्ति आहे आणि तिचें प्रत्यंतर त्याला येऊं शकतें--आपण म्हणजे एकमेव अनंत आत्मा आहोंत याची प्रतीति त्याला येऊं शकते. हें होऊं शकतें, पण तुमचा त्याच्यावर विश्वास बसत नाही. तुम्ही ईश्वराची प्रार्थना करा पण त्याबरोबच स्वतः कर्म करण्यासाठी देखील सदा तयार राहा.

बुद्धांनी याच्या उलट शिकविलें. माणसांना रडत बसूं देऊं नका. या प्रार्थना वगैरे मुळीच, नकोत. ईश्वराने कांही दुकान घातलें नाही. तुम्ही ईश्वरांतच वसत असल्यामुळे तुमचा प्रत्येक श्वास म्हणजे ईश्वराची प्रार्थनाच होय. मी बोलत आंहें, ही एक प्रार्थना आहे. तुम्ही ऐकत आहांत, तीहि प्रार्थनाच आहे. तुमची अशी कोणतीतरी शारीरिक वा मानसिक हालचाल आहे का, की जी करतांना तुम्ही त्या अनंत दैवी शक्तीच्या कार्यांत सहभागी

होत नसतां ? ही सारी अखंड प्रार्थनाच आहे. तुम्ही जर केवळ कांही ठरीव शब्दांनाच प्रार्थना म्हणत असाल, तर ती प्रार्थना वरवरची वा उथळच म्हटली पाहिजे. अशा प्रार्थना कांही फारशा चांगल्या नव्हेत; त्यांना क्वचितच कांही यथार्थ फळ प्राप्त होऊं शकतें.

प्रार्थना म्हणजे कांही जादूचें एखादें सूत्र--एखादा मंत्र आहे काय, की ज्याचा जप केल्याने, तुम्ही कांही परिश्रम केले नाहीत तरी तुम्हांला आश्चर्यकारक फळें प्राप्त होतील ? नाही. सर्वांनाच परिश्रम करावे लागतात. सर्वांनाच खोल आंत जाऊन ती अनंत शक्ति प्राप्त करून घ्यावी लागत असते. गरिबांच्या व श्रीमंताच्याहि पाठीशीं तीच अनंत शक्ति आहे. एखादा मनुष्य परिश्रम करतो आणि दुसरा केवळ कांही शब्दांचा जप केल्याने फळ प्राप्त करून घेतो, असें कांही नाही. हें विश्व म्हणजे एक अखंड प्रार्थना आहे. तुम्ही जर प्रार्थनेचा हा अर्थ घेत असाल तर मी तुमच्याशीं सहमत आहें. शब्द आवश्यक नाहीत, निःशब्द प्रार्थनाच श्रेष्ठ आहे.

बहुसंख्य लोकांना या सिद्धान्ताचा अर्थ कळत नाही. भारतांत आत्म्याच्या संबंधांत कांही तडजोड करणें याचा अर्थ हाच की पुरोहितांच्या हातांत सत्ता देणें आणि प्रेषितांची महान् शिकवण विसरणें. बुद्धांना हें माहीत होतें, म्हणून त्यांनी पुरोहितांचीं सर्व अनुष्ठानें व सिद्धान्त बाजूला सारले आणि मनुष्याला स्वतःच्या पायावर उभें केलें. लोकांना परिचित व त्यांच्या अंगवळणीं पडलेल्या मार्गाच्या विरुद्ध जाणें बुद्धांना आवश्यक होतें; त्यांना क्रांतिकारक बदल घडवून आणायचे होते. परिणामतः यज्ञयागाचा धर्म भारतांतून कायमचा नाहीसा झाला आणि त्याचें कधीहि

पुनरुज्जीवन झालें नाही.

वरवर पाहतां बौद्ध धर्म भारतांतून गेला आहे, पण वस्तुतः तो गेला नाही. बुद्धांच्या शिकवणींत एक धोक्याचा भाग होता --त्यांचा धर्म हा सुधारक धर्म होता. प्रचंड असा जो आध्यात्मिक बदल त्यांनी घडवून आणला त्यासाठी त्यांना पुष्कळशी निषेधात्मक शिकवण द्यावी लागली. पण एखादा धर्म जर निषेधात्मक बाजूवर अतिरेकी भर देईल तर त्याला विनाशाचा धोका संभवतो. कोणताहि सुधारक पंथ, तो जर केवळ सुधारकच असेल तर टिकूं शकत नाही; विधायक घटकच खरे प्रेरक असतात आणि तीं तत्त्वेंचचिरकाल टिकतात. एखादी सुधारणा घडवून आणल्यानंतर भावात्मक बाजूवर जोर दिला पाहिजे; इमारत बांधून झाल्यावर परांची काढून घेतली पाहिजे.

भारतांत असें घडलें की, जसजसा काळ गेला, तसतसा बुद्धांच्या अनुयायांनी त्यांच्या शिकवणींतील निषेधात्मक भागावर अतिरिक्त भर दिला आणि त्यामुळे स्वतःच्या धर्माच्या ऱ्हासाला ते कारणीभूत झाले. निषेधात्मक शक्तींनी सत्याच्या भावात्मक पैलूंना दडपून टाकलें आणि म्हणून भारताने बौद्ध धर्माच्या नांवाखाली पसरलेल्या विघातक प्रवृत्तींचा त्याग केला. भारताच्या राष्ट्रीय विचारप्रणालीने दिलेला तो निवाडा होता.

ईश्वर नाही व आत्मा नाही अशा प्रकारचे बौद्धधर्मांतील नकारात्मक घटक नष्ट झाले. मी असें म्हणतों की, ईश्वर हीच एकमेव सत्ता आहे. हें अत्यंत भावात्मक विधान आहे. तोच एकमेव सत्य आहे. बुद्ध म्हणतात की आत्मा नाही, तर मी म्हणतों, "हे मानवा, तूं विश्वाशीं एकरूप आहेस, तूंच सर्वकांही आहेस." किती भावात्मक विधान आहे हें ! बौद्धधर्माचा सुधारणात्मक

भाग नष्ट झाला, पण त्याचा विधायक भाग मात्र आतापर्यंत टिकला. बुद्धांनी खालच्या प्राण्यांविषयी दया शिकविली, आणि तेव्हापासून भारतांत असा एकहि पंथ राहिला नाही की ज्याने सर्व जीवांविषयी, पशूविषयीदेखील, दया शिकविली नाही. कोणत्याहि तत्त्वापेक्षा श्रेष्ठ अशी ही दया, ही करुणा, ही परोपकारबुद्धि या बौद्धधर्मापासून आम्हांला लाभली आहे.

बुद्धांच्या चरित्रांत एक विशेष आकर्षणशक्ति आहे. मला बुद्धांचें चरित्र नेहमीच आवडत आलें आहे, पण त्यांचीं तत्त्वें मात्र नाहीत. मला त्यांच्या चारित्र्याविषयी इतर कोणाच्याहि चारित्र्यापेक्षा अधिक आदर आहे——त्यांचें तें धैर्य, त्यांचा तो निर्भयपणा आणि त्यांचें तें अमर्याद प्रेम ! ते मानवाच्या कल्याणासाठी जन्मले होते. इतर लोक स्वत:साठी ईश्वराचा किंवा सत्याचा शोध करतील, पण त्यांनी मात्र स्वत:साठी सत्य जाणण्याची कधी पर्वा केली नाही. लोक दु:खांत होते, म्हणून त्यांनी सत्याचा शोध केला. लोकांना कसें साहाय्य करावें हीच काय ती त्यांना चिंता होती. संपूर्ण आयुष्यांत त्यांनी कधीहि स्वत:चा विचार केला नाही. अज्ञानी, स्वार्थी व संकुचित मनोवृत्तीचे असे जे आम्ही, ते या महापुरुषाचा मोठेपणा कसा जाणूं शकणार ?

आणि त्यांच्या विलक्षण बुद्धीचा विचार करा ! त्यांच्या ठिकाणीं भावनाप्रवणता नव्हती. त्यांची ती अतिकुशाग्र बुद्धि कधीच अंधविश्वासी नव्हती. एखादी जुनी पोथी सांगते म्हणून विश्वास ठेवूं नका, तुमच्या पूर्वजांकडून तें तुम्हांला मिळालें आहे म्हणूनहि त्यावर विश्वास ठेवूं नका, किंवा तुमचे मित्र सांगतात म्हणूनहि विश्वास ठेवूं नका; तर तुम्ही स्वत:च विचार करा, सत्याचा तुम्हीच शोध करा, स्वत:च त्याचा अनुभव घ्या. त्यानंतर तें

सर्वांना हितकारक आहे असें तुम्हांला आढळलें तरच तें लोकांना द्या. मठ्ठ बुद्धीचे, कमकुवत मनाचे आणि दुर्बल हृदयाचे लोक सत्यलाभ करून घेऊं शकत नाहीत. त्यासाठी मनुष्य स्वतंत्र आणि आकाशासारख्या विशाल मनाचा असला पाहिजे. त्याचें मन अत्यंत निर्मळ व शुद्ध असलें पाहिजे. तेव्हाच त्यांत सत्य प्रकाशूं शकतें. आपल्यामध्ये भ्रामक कल्पना कितीतरी भरल्या आहेत ! या तुमच्या देशांत जिथे तुम्ही स्वतःला अत्यंत सुशिक्षित समजतां तिथे-देखील तुमच्यांत कितीतरी संकुचितपणा व भ्रामक कल्पना भरल्या आहेत ! या देशांत तुम्ही सभ्यतेची एवढी बढाई मारतां आणि तरीहि एका प्रसंगीं मी हिंदु आहें म्हणूनच मला बसण्याला खुर्ची नाकारण्यांत आली. या गोष्टीचा विचार तर करून पाहा.

ख्रिस्तांच्या जन्माच्या सहाशे वर्षांपूर्वी, बुद्धांच्या काळांत भारतीय लोकांना आश्चर्यकारक शिक्षण मिळत असलें पाहिजे. ते अत्यंत स्वतंत्र मनाचे असले पाहिजेत. बहुसंख्य लोकांनी बुद्धांचें अनुसरण केलें. राजे लोकांनी सिंहासनांचा त्याग केला, राण्यांनी आपलीं सिंहासनें सोडलीं, आणि बुद्धांचें अनुसरण केलें. शतकानुशतकें पुरोहितांकडून लोकांना जें शिकविलें जात होतें त्याहून अत्यंत भिन्न, अत्यंत क्रांतिकारक अशी बुद्धांची शिकवण ते समजूं शकले व ग्रहण करूं शकले. त्यांचीं मनें असाधारणपणें स्वतंत्र व विशाल अशीं असत.

आणि बुद्धदेवांच्या मृत्यूचा विचार करा. त्यांचें जीवन जसें महान् होतें तसाच त्यांचा मृत्यूहि थोर होता. तुमच्या देशांतील रेड इंडियन्सप्रमाणे असलेल्या एका जातीच्या माणसानें दिलेलें अन्न त्यांनी खाल्लें. (तें अन्न खाऊन त्यांचा मृत्यु ओढवला.) या जातीचे लोक कांहीहि खातात म्हणून हिंदु लोक त्यांना शिवत

नाहीत. त्यांनी आपल्या शिष्यांना सांगितलें, "तुम्ही हें अन्न खाऊं नका, पण मी तें नाकारूं शकत नाहीं. त्या मनुष्याकडे जा आणि त्याला सांगा की त्याने माझी फार मोठी सेवा केली आहे ——त्याने मला शरीरापासून मुक्त केलें आहे." एक वृद्ध मनुष्य आला आणि त्यांच्याजवळ बसला——या महापुरुषाच्या दर्शनासाठी तो मैलचे मैल चालून आला होता; आणि बुद्धांनी त्याला उपदेश केला. आपला एक शिष्य रडतो आहे असें जेव्हा त्यांना आढळलें तेव्हा त्यांनी त्याची कानउघाडणी केली. ते त्याला म्हणाले, "हें काय ? माझ्या सर्व शिकवणीचा हाच परिणाम आहे काय ? खोटें बंधन नको, माझ्यावर अवलंबून असणें नको, या क्षणभंगुर व्यक्तित्वाचा व्यर्थ गौरव नको. बुद्ध ही एक व्यक्ति नाही; ती एक अनुभूति आहे. स्वतःची मुक्ति स्वतःच्या प्रयत्नांनीच प्राप्त करून घ्या."

मरतांना देखील त्यांनी स्वतःसाठी कांही वेगळेंपण राखून ठेवलें नाही. यासाठी मी त्यांना पूज्य मानतों. तुम्ही ज्यांना बुद्ध व ख्रिस्त म्हणतां तीं म्हणजे कांही विशिष्ट अनुभूतींचीं नांवें आहेत. आपण स्वावलंबी व्हावें, आत्मनिर्भरशील व्हावें या शिकवणुकीवर जगांतील सर्व आचार्यांपेक्षा बुद्धांनीच अधिक भर दिला. त्यांनीच आपल्याला खोट्या 'स्व'च्या बंधनांतून मुक्त केलें; एवढेंच नव्हे, तर ईश्वर किंवा देवदेवता यांसारख्या अदृश्य शक्तींवर अवलंबून राहण्यापासूनहि त्यांनी आपल्याला मुक्त केलें. जिला त्यांनी 'निर्वाण' म्हटलें ती मुक्तीची अवस्था प्राप्त करून घेण्यासाठी त्यांनी सर्वांना आवाहन केलें. कधी ना कधी ती सर्वांना प्राप्त होईलच आणि तिच्या प्राप्तींतच मानवजीवनाची परिपूर्णता आहे.

३४४६६ दि. १०/८/६१
१९३२३ नों दि २८-४२-६२

# शिष्यत्व

( सॅन् फ्रान्सिस्को येथे २९ मार्च १९०० रोजीं दिलेलें व्याख्यान )

माझा आजचा विषय 'शिष्यत्व' असा आहे. मी जें सांगणार आहें तें तुम्हांला कसें वाटेल ह्याची मला कल्पना नाही. तें मान्य करणें हें कदाचित् तुम्हांला कठीण जाईल, कारण गुरु व शिष्य यांचे या देशांतील आदर्श आमच्या देशांतील आदर्शांहून फार निराळे आहेत. एक जुनें भारतीय वचन मला आठवतें-- 'गुरु मिले लाख लाख चेला न मिले एक.' हें वचन खरें वाटतें. अध्यात्मलाभासाठी आवश्यक अशी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिष्यत्वाची वृत्ति होय. योग्य वृत्ति असेल तर ज्ञानप्राप्ति सुलभतेने होते.

सत्य ग्रहण करण्यासाठी शिष्याला कशाची आवश्यकता आहे ? थोर ऋषींचें म्हणणें आहे की सत्य प्राप्त करण्याला एक निमिषहि पुरा आहे--हा फक्त ज्ञान होण्याचाच काय तो प्रश्न आहे. स्वप्न भंगतें--किती वेळ लागतो त्याला ? एका क्षणांत स्वप्न नाहीसें होतें. जेव्हा एखादा आभास नाहीसा होतो, तेव्हा त्याला किती वेळ लागतो ? एक निमिष. जेव्हा मला सत्याचें ज्ञान होतें, तेव्हा असत्य नाहीसें होण्यापलीकडे कांहीच होत नाही. दोरीला मी साप समजलों होतों, आणि आता ती दोरी आहे असें मला दिसतें. क्षणार्धांत सर्वकांही होऊन जातें. तूं तें आहेस. तूं सत्यस्वरूप आहेस. हें जाणण्याला किती वेळ लागतो ? जर आपण

ईश्वर असूं--आणि आपण सदैव ईश्वरच आहोंत--तर हें न जाणणेंच फार आश्चर्यकारक आहे. हें जाणणें हीच काय ती स्वाभाविक गोष्ट आहे. जें आम्ही सदा होतों व आताहि आहोंत तें जाणण्याला दीर्घ काल लागूं नये.

तरीहि या स्वयंसिद्ध सत्याचें ज्ञान होणें कठीण वाटतें. त्याचें ओझरतें दर्शन लाभण्यालाहि युगें लोटावीं लागतात. ईश्वरच जीवन आहे, ईश्वरच सत्य आहे. आम्ही यासंबंधी लिहितों-बोलतों; ईश्वराखेरीज इतर सर्व असत् आहे--तें आज आहे तर उद्या नाही याची आमच्या अंतर्यामीं आम्हांला जाणीव असते, आणि तरीहि आमच्यापैकी बहुतेकजण आयुष्यभर जसेच्या तसेच राहतात. आम्ही असत्याला धरून बसतों आणि सत्याकडे पाठ फिरवितों. सत्याची प्राप्ति करून घेण्याची आम्हांला इच्छा नसते. कोणींहि आमचें स्वप्न भग्न करावें असें आम्हांला वाटत नाही. गुरूची कोणाला गरज भासत नाही. कोण शिकूं इच्छितो ? पण कोणाला जर सत्याचें ज्ञान करून घेऊन भ्रमाचें निरसन करावयाचें असेल, कोणाला जर गुरूकडून सत्य जाणून घ्यायचें असेल, तर त्याने खरा शिष्य बनलें पाहिजे.

शिष्य होणें हें सोपें नाही. त्यासाठी मोठ्या तयारीची आवश्यकता आहे. पुष्कळ अटी पूर्ण कराव्या लागतात. वेदान्त्यांनी शिष्य होण्यासाठी चार प्रमुख अटी सांगितल्या आहेत.

पहिली अट ही आहे की जो शिष्य सत्य जाणूं इच्छितो त्याने इहलोकीं वा परलोकीं फललाभाची वासना पूर्णपणें सोडली पाहिजे.

आम्ही जें पाहतों तें सत्य नाही. जोंपर्यंत मनांत वासना आहे तोंपर्यंत आम्ही जें पाहतों तें सत्य नाही. ईश्वर सत्य आहे

आणि जग मिथ्या आहे. जोंपर्यंत जगाविषयी यत्किंचितहि वासना मनांत आहे तोंपर्यंत सत्यलाभ होणार नाही. माझ्यादेखत जग नाहीसें झालें तरी मला पर्वा नाही. असेंच परलोकांविषयी. स्वर्गांत जाण्याची मला चिंता नाही. स्वर्ग काय आहे ? या जगाचीच पुनरावृत्ति. स्वर्ग जर नसता, या जगांतील मूढ जीवनाची पुनरावृत्ति जर नसती तर आमचीं मूर्खपणाचीं क्षुद्र स्वप्नें लवकर भंग पावलीं असतीं आणि आपण अधिक चांगलें झालों असनों. स्वर्गाला जाण्याने आम्ही केवळ दुःखकारक आभासांना अधिक लांबवीत असतों.

स्वर्गांत तुम्ही काय मिळवतां ? तुम्ही देवदेवता होतां, अमृताचें पान करतां आणि संधिवाताचें दुखणें प्राप्त करतां ! तेथे पृथ्वीवरल्यापेक्षा दुःख कमी आहे पण सत्यहि कमीच आहे. फार श्रीमंत लोकांना त्यांच्या मानाने गरीब असलेल्या लोकांपेक्षा सत्याचें आकलन कमी होतें. "उंटाला सुईच्या नाकांतून जातां येणें हें श्रीमंतांना ईश्वराच्या राज्यांत प्रवेश मिळण्याहून सोपें आहे." श्रीमंत मनुष्याला आपली सत्ता व संपत्ति, सुख व ऐष-आराम यांच्या पलीकडे कशाचाहि विचार करण्यास वेळ नसतो. श्रीमंत क्वचितच धार्मिक बनतात. कां ?––कारण त्यांना असें वाटतें की आपण जर धार्मिक होऊं तर जीवनांत मजा उरणार नाही. याचप्रमाणे स्वर्गांतहि अध्यात्मप्रवण होण्याचा संभव फार कमी असतो, तेथे अतिरिक्त सुख व चैन असते––स्वर्गांत राहणारे लोक आपली ही चैन सोडण्यास राजी नसतात.

स्वर्गांत रडावें लागणार नाही असें म्हणतात. जो मनुष्य कधीच रडत नाही त्याच्यावर माझा विश्वास नाही; त्याला हृदय नसतें, तर त्या जागीं भला मोठा पाषाण असतो. स्वर्गां-

तील लोकांच्या ठायीं फारशी सहानुभूति नसते हें स्पष्ट आहे. तिथे कितीतरी लोक आहेत, आणि आम्ही दुःखी जीव या भयंकर मर्त्यलोकांत खितपत पडलों आहोंत. ते आम्हां सर्वांना यांतून वर काढूं शकतात, पण ते तसें करीत नाहीत. ते रडत नाहीत, तेथे दुःख किंवा शोक नाही; म्हणून त्यांना कुणाच्या दुःखाची पर्वा नाही. ते आपलें अमृत पीत असतात, नृत्य करीत असतात, त्यांना सुंदर बायका असतात--तिथे सगळी चैन आहे.

या सर्वांच्या पलीकडे जाऊन शिष्याने म्हटलें पाहिजे, "या लोकांत कशाचीहि मला पर्वा नाही आणि असतील नसतील त्या सर्व स्वर्गांचीहि मला पर्वा नाही--त्यांपैकी एकांतहि जाण्याची मला इच्छा नाही. कोणत्याहि स्वरूपाचें वैषयिक जीवन मला नको आहे--हें देहतादात्म्य मला नको आहे. मला आज प्रतीत होतें की मी म्हणजे हें शरीर आहे--हा मांसाचा प्रचंड गोळा आहे. आज माझी जाणीव ही अशी आहे. पण यावर विश्वास ठेवण्याचें मी नाकारतों."

जग आणि सगळे स्वर्ग हे इंद्रियांशीं निगडित आहेत. तुम्हांला जर इंद्रियें नसतील तर तुम्ही या जगाची पर्वा करणार नाही. स्वर्ग देखील एक जगतच आहे. पृथ्वी, स्वर्ग आणि या दोहोंच्या मधे जें कांही असेल तें सर्व, यांना एकच नांव आहे--जगत्.

म्हणून भूत व वर्तमान जाणून व भविष्याचा विचार करून, तसेंच ऐश्वर्य म्हणजे काय, सुख म्हणजे काय हें जाणून शिष्य या सर्वांचा त्याग करतो आणि सत्य व केवळ सत्यच जाणण्याचा तो प्रयत्न करतो. ही पहिली अट आहे.

दुसरी अट ही की शिष्याला सर्व आंतर व बाह्य इंद्रियांचें

नियमन करतां आलें पाहिजे आणि आणखीहि कित्येक आध्यात्मिक गुण त्याच्या अंगीं बाणले पाहिजेत.

बाह्य इंद्रियें शरीराच्या निरनिराळ्या भागांत असून दृश्य आहेत. आंतर इंद्रियें अदृश्य आहेत. आपल्याला डोळे, कान, नाक इत्यादि बाह्य इंद्रियें आहेत, आणि त्या त्या बाह्य इंद्रियांशीं संबद्ध अशीं आंतर इंद्रियेंहि आहेत. या दोन्ही प्रकारच्या इंद्रियांच्या इषाऱ्यावरच आपण सतत नाचत असतों. त्या त्या इंद्रियांचे वेगवेगळे विषय असतात. एखादा विषय जर जवळपास असेल तर तो अनुभवण्यास इंद्रियें आपल्याला भाग पाडतात. आपल्याला या बाबतींत कांहीच स्वाधीनता नाही. हें मोठें नाक आहे, आणि जवळच थोडासा सुगंध आहे. मला त्याचें अवघ्राण करावेंच लागतें. जर दुर्गंध असेल तर मी स्वतःला म्हणतों की तो घेऊं नको. पण प्रकृति म्हणते--'घे.' आणि मी तो घेतों. आपली कशी दशा आहे याचा विचार करा! आपण स्वतःला बांधून घेतलें आहे. मला डोळे आहेत. चांगलें किंवा वाईट जें चाललें आहे तें मला पाहावेंच लागतें. श्रवणाच्या बाबतींतहि असेंच आहे. कुणी जर मला न आवडणारे शब्द बोलला तरी मला ते ऐकावेंच लागतात. माझें श्रवणेंद्रिय तसें करण्यास मला भाग पाडतें आणि मी किती कष्टी होतों! निंदा अथवा स्तुति जें कांही असेल तें मनुष्याला ऐकावेच लागतें. पुष्कळसे बहिरे लोक मीं असे पाहिले आहेत की त्यांना सामान्यतः ऐकूं येत नाही. पण त्यांच्या स्वतःविषयी जर कांही असेल तर तें मात्र त्यांना नेहमीच ऐकूं येतें!

हीं सर्व बाह्य व आंतर इंद्रियें शिष्याच्या ताब्यांत असलीं पाहिजेत. खडतर साधनेने त्याने अशी अवस्था प्राप्त करून घेतली

पाहिजे की ज्या अवस्थेंत इंद्रियांच्या विरुद्ध, प्रकृतीच्या आज्ञे-विरुद्ध त्याला आपल्या मनाचा अधिकार चालवतां येईल. त्याला आपल्या मनाला असें सांगतां आलें पाहिजे की तूं माझें आहेस. मी तुला आज्ञा करतों की 'कांहीहि पाहूं अथवा ऐकूं नकोस', आणि मन कांहीहि पाहणार किंवा ऐकणार नाही——कोणत्याहि रूपाची अथवा ध्वनीची मनावर प्रतिक्रया होणार नाही. त्या अवस्थेंत मन हें इंद्रियांच्या वर्चस्वापासून मुक्त झालेलें असतें; त्यांच्यापासून वेगळें झालेलें असतें. मग तें इंद्रियें किंवा शरीर यांच्याशीं संबद्ध असें राहत नाही. बाह्य विषय मग मनाला आज्ञा करूं शकत नाहीत; मन स्वतःला त्यांच्याशीं निगडित करण्याचें नाकारतें. चांगला गंध आहे. पण शिष्य मनाला सांगतो, 'तूं तो घेऊं नकोस' आणि मन त्या गंधाकडे मुळीसुद्धा वळत नाही. जेव्हा तुम्ही या अवस्थेपर्यंत पोहोचतां तेव्हा शिष्य होण्याचा तो केवळ प्रारंभ असतो. असें असल्यामुळे, जेव्हा कुणीहि 'मी सत्य जाणतों' असें म्हणतो तेव्हा मी म्हणतो, 'तुम्ही जर सत्य जाणत असाल तर तुमच्या ठायीं आत्मसंयम असला पाहिजे; आणि तो जर असेल तर या इंद्रियांना ताब्यांत ठेवून तो दाखवा."

यानंतर म्हणजे मनाला स्थिर केलें पाहिजे. तें सारखें धावत असतें. मी ध्यानधारणेसाठी बसलों की जगांतील अत्यंत वाईट असे सर्व विषय मनांत येतात. हा सर्व प्रकार किळस आणणारा आहे. ज्या गोष्टींचा विचार करण्याची मी मनाई करतों त्यांचाच विचार मनाने कां करावा ? जणुकांही मी मनाचा गुलाम आहें. जोंपर्यंत मन चंचल आहे व त्याच्यावर नियंत्रण नाही तोंपर्यंत आध्यात्मिक ज्ञान होणें असंभव आहे. शिष्याने मनाचें नियंत्रण करण्यास शिकलें पाहिजे. विचार करणें हें मनाचें कार्य आहे हें

खरें, परंतु शिष्याची तशी इच्छा नसेल तर त्याच्या मनाने विचार करूं नये. तो जेव्हा आज्ञा करील तेव्हा मनाने विचार करण्याचें थांबवलें पाहिजे. शिष्याची योग्यता येण्यासाठी मनाची ही अवस्था अत्यंत आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे शिष्याच्या ठायीं फार मोठी तितिक्षा वा सहनशक्ति असावी लागते. जेव्हा तुमचें सर्वकांही सुरळीत चाल-लेलें असतें तेव्हा जीवन सुखकारक वाटतें आणि तुमचें मनहि चांगलें वागत असतें पण जर कांही बिघडलें तर मनाचा तोल सुटतो. हें चांगलें नाही. एकहि दुःखोद्गार न काढतां, दुःखाच्या प्रतिकाराचा, निवारणाचा अथवा सूडाचा एकहि विचार मनांत येऊं न देतां सर्व अनिष्ट व सर्व दुःख सहन करा. ही खरी सहन-शीलता आहे, आणि ती तुम्हीं साध्य केली पाहिजे.

जगांत नेहमीच चांगलें व वाईट असतें. पुष्कळसे लोक जगांत वाईट आहे हें विसरतात, निदान विसरण्याचा प्रयत्न करतात, आणि जेव्हा तें त्यांच्या वांटयाला येतें तेव्हा ते त्याने अभिभूत होतात आणि त्यांना दुःख होतें, क्लेश होतात. दुसरे कांहीजण असे आहेत की जे जगांत कांही वाईट आहे हेंच नाकारतात आणि प्रत्येकच गोष्ट चांगली मानतात. हा सुद्धा दुबळेपणाच आहे आणि तोहि वाइटाच्या भीतींतून उत्पन्न झाला आहे. एखादी वस्तु जर दुर्गंधयुक्त असेल तर तिच्यावर गुलाब-पाण्याचा शिडकाव करून तिला सुगंधित कां म्हणावें? होय, जगांत चांगलें व वाईट दोन्हीं आहेत--ईश्वराने जगांत वाईटहि ठेवलें आहे. ईश्वराचें हें कृत्य लपविण्याची तुम्हांला कांही आव-श्यकता नाही. जगांत वाईट कां आहे हा तुमचा प्रश्न नाही. कृपा करून ईश्वरावर विश्वास ठेवा आणि स्वस्थ राहा.

माझे गुरुदेव श्रीरामकृष्ण जेव्हा आजारी झाले तेव्हा एका पंडिताने त्यांना सुचविलें की त्यांनी आपल्या प्रचंड मानसिक शक्तीचा स्वत:ला बरें करण्यासाठी उपयोग करावा. त्याने म्हटलें की माझ्या गुरुदेवांनी शरीराच्या रोगग्रस्त भागावर आपलें मन नुसतें एकाग्र केलें तरी तो भाग रोगमुक्त होईल. श्रीरामकृष्ण उत्तरले, "काय! जें मन मीं ईश्वराला अर्पण केलें आहे तें खालीं या क्षुल्लक शरीराकडे आणूं?" शरीराचा व आजाराचा विचार करण्याचें त्यानी नाकारलें. त्यांच्या मनामधे निरंतर ईश्वराचा बोध वसत होता. तें ईश्वराला पूर्णपणें वाहिलेलें होतें ते त्याचा उपयोग इतर कोणत्याहि कामासाठी करण्यास तयार नव्हते.

आरोग्य, संपत्ति, दीर्घायुष्य आणि अशाच इतर गोष्टीं-विषयीची--तथाकथित चांगल्या गोष्टींविषयीची अभिलाषा म्हणजे केवळ भ्रम आहे. त्यांच्या प्राप्तीसाठी मन त्यांच्याकडे लावणें म्हणजे हा भ्रम दृढ करणेंच आहे. या जीवनांत हीं स्वप्नें व हे भ्रम आहेतच, आणि तेच अधिक प्रमाणांत पुढे येणाऱ्या जीवनांत--स्वर्गांत--प्राप्त व्हावेत अशी आपली इच्छा असते. जणु अधिकाधिक भ्रमांत आपण पडूं इच्छितों. दु:खाचा, वाइटाचा प्रतिकार करूं नका. त्याला तोंड द्या. तुम्ही त्याच्यापेक्षा श्रेष्ठ आहां.

जगांत हें दु:ख आहे--कोणालातरी तें भोगावेंच लागतें. कोणाचें तरी वाईट केल्याशिवाय तुम्ही कार्य करूं शकत नाही. जेव्हा तुम्ही ऐहिक सुखासाठी प्रयत्न करतां तेव्हा तुम्ही कोणतें-तरी अनिष्ट टाळतां आणि तें दुसऱ्या कोणालातरी भोगावें लागतें. प्रत्येकजण तें अनिष्ट दुसऱ्या कोणाच्यातरी शिरावर लादण्याचा प्रयत्न करीत असतो. शिष्य म्हणतो, "जगांतील दु:खें माझ्या

वांट्याला येऊं देत; मी तीं सहन करीन. इतर सारेजण त्यांपासून मुक्त राहोत."

क्रुसावरील त्या महापुरुषाचें तुम्हांला स्मरण आहे ना ? तो हजारो देवदूतांना जिंकू शकला असता, पण त्याने दु:खाचा प्रतिकार केला नाही. ज्यांनी त्याला क्रुसावर चढविलें त्यांची त्याने कीव केली. सर्व अपमान व यातना त्याने सहन केल्या. सर्वांचें ओझें त्याने आपल्या शिरावर घेतलें. तो म्हणाला, "श्रमांनी शिणलेल्यांनो आणि दु:खांनी वाकलेल्यांनो, तुम्ही सर्वजण माझ्याकडे या, मी तुम्हांला विश्रांति देईन, शांति देईन." खरी सहनशीलता ही अशी असते. तो या जीवनाच्या कितीतरी वर होता, इतका की आम्ही बद्ध जीव त्याला समजूं शकत नाहीं ! एखाद्याने माझ्या गालांत भडकावण्याचाच अवकाश, ताबडतोब माझा हात ताडकन् उसनें फेडतो ! त्या पूज्य विभूतीची थोरवी व आनंद मला कसा आकळावा ? त्याची श्रेष्ठता मला कशी दिसावी ?

पण मी आदर्शाला खाली ओढणार नाहीं. वाइटाचा प्रतिकार करणारें असें शरीर म्हणजे मी, असें मला वाटत असतें. माझें जर डोकें दुखत असलें तर तें बरें करण्यासाठी मी जगभर हिंडेन; औषधाच्या हजार दोन हजार बाटल्या मी पिऊन घेईन. ख्रिस्तासारख्या विभूतींचीं अद्भुत मनें मला कशीं कळावींत ? मला आदर्शाची जाणीव आहे, पण त्याच्या किती अंशाची ? ही शरीराची जाणीव, या क्षुद्र 'मी'ची जाणीव, त्याच्या सुखदु:खाची, लाभहानीची जाणीव--यांपैकी कांहीहि त्या आदर्श अवस्थेपर्यंत पोहोचूं शकत नाही. सतत मनाला जडांतून बाहेर काढून व केवळ आत्म्याचेंच चिंतन करून त्या आदर्शाचें ओझरतें दर्शन मला लाभूं शकतें. जडाचा विचार व इंद्रिय-जगतांतील नामरूपें यांना त्या

आदर्शांत कांही स्थान नाही. त्यांचा त्याग करा आणि मन आत्म्यावर केंद्रित करा. तुमचे जन्म-मृत्यु, तुमचीं सुख-दुःखें, तुमचा नांवलौकिक हें सर्व विसरा, व तुम्ही शरीर वा मन नसून शुद्ध आत्मा आहांत याचा साक्षात्कार करून घ्या.

मी जेव्हा 'मी' म्हणतों तेव्हा मला हा आत्मा अभिप्रेत असतो. डोळे झाका, आणि तुम्ही आपल्या 'मी'चा विचार करतां तेव्हा कोणतें चित्र तुमच्या समोर उभें राहतें तें पाहा. तें चित्र तुमच्या शरीराचें असतें की तुमच्या मनाचें ? असें असेल तर, अद्याप तुम्हांला तुमच्या खऱ्या 'मी'ची प्रतीति झाली नाही असेंच म्हणावें लागेल. पण असा समय येईल की ज्या वेळीं 'मी' म्हणतांच तुम्हांला तात्काळ समग्र विश्वाची, त्या अनंत सत्तेची अनुभूति होईल. त्या वेळीं तुम्हांला तुमच्या खऱ्या 'मी'ची प्रतीति आलेली असेल आणि आपण अनंत आहोंत हें तुम्हीं ओळखलेलें असेल. तेंच सत्य आहे--तुम्ही चैतन्य आहां, जड नाही. माया अथवा भ्रांति म्हणून कांही आहे--तिच्यामुळे एक वस्तु दुसरीच भासते, जड हें चैतन्य भासतें, शरीर हें आत्मा भासतें. ही मोठीच भ्रांति आहे. ती दूर झाली पाहिजे.

शिष्याचा आणखी एक गुण हा की गुरूवर त्याची श्रद्धा असली पाहिजे. पाश्चिमात्य देशांत शिक्षक हा केवळ बौद्धिक ज्ञान देतो, इतकेंच. गुरूशीं संबंध हाच जीवनांत सर्वांत महत्त्वाचा आहे. माझ्या जीवनांत सर्वांत जवळचा व जिव्हाळ्याचा नातलग म्हणजे माझा गुरु होय. त्यानंतर माता व मग पिता. माझ्या आदराचें प्रथम स्थान म्हणजे गुरु होय. माझ्या पित्याने म्हटलें, 'हें कर' व गुरूने सांगितलें, 'तें करूं नकोस', तर मी तें करणार नाहीं. गुरु माझ्या आत्म्याला मुक्त करतो. माता व पिता मला हें

शरीर देतात, पण गुरु मला नवीन आध्यात्मिक जन्म देतात.

आमच्या कांही विशिष्ट श्रद्धा आहेत. त्यांपैकी एक अशी की कांही थोडे अपवादात्मक आत्मे असे आहेत की जे स्वतः मुक्त असूनहि जगत्कल्याणासाठी, जगाला साहाय्य करण्यासाठी या पृथ्वीवर जन्म घेतात. ते अगोदरच मुक्त असतात, त्यांना स्वतःच्या मुक्तीची चिंता नसते; ते इतरांना मदत करूं इच्छितात. त्यांना कांहीहि शिकण्याची गरज नसते. बाळपणापासून त्यांना सर्व ज्ञान असतें; सहा महिन्याचें मूल असतांना देखील ते सर्वश्रेष्ठ सत्य सांगूं शकतात.

मानवजातीचा आध्यात्मिक विकास या मुक्तात्म्यांवर अवलंबून असतो. ज्याच्यापासून इतर दीप उजळले जावेत अशा प्रथम दीपाप्रमाणे ते असतात. प्रत्येक मनुष्यांत प्रकाश असतो हें खरें, पण अधिकांश मनुष्यांत तो झाकलेला असतो. हे महात्मे म्हणजे प्रारंभापासूनच प्रकाशमान असे दिवे आहेत. जे त्यांच्या सहवासांत येतात ते जणुकांही आपले दीप प्रज्वलित करून घेतात. यामुळे त्या पहिल्या दिव्याचें कांहीच कमी होत नाही; पण तरीहि तो आपला प्रकाश इतर दिव्यांना देतो. लाखो दिवे जरी लागले तरी तो पहिला दिवा पूर्वीच्याच प्रकाशाने तेवत असतो. तो पहिला दिवा म्हणजे गुरु, आणि त्याच्यावर लावलेला दिवा म्हणजे शिष्य. हा दुसरा दिवाहि पुढे गुरु होतो, आणि हें असेंच चालतें. ज्यांना आपण ईश्वराचे अवतार म्हणतों त्या ह्या महात्म्यांच्या ठायीं प्रचंड आध्यात्मिक सामर्थ्य वसत असतें. ते येतात आणि आपली शक्ति आपल्या शिष्यांमधे संचारित करून आणि या शिष्यांच्या द्वारा शिष्यांच्या पिढ्यांमागून पिढ्यांमध्ये संचारित करून एक प्रचंड आध्यात्मिक प्रवाह सुरू करतात.

ख्रिस्ती संप्रदायामधील बिशप पूर्वीच्या बिशपांकडून आपल्याला मिळालेली शक्ति हस्तस्पर्शाने इतरांत संचारित करण्याचा दावा करतो. तो म्हणतो, "ख्रिस्तांनी आपली शक्ति आपल्या शिष्यांमध्ये संचारित केली आणि त्यांनी ती इतरांना दिली आणि अशा रीतीने ख्रिस्तांची शक्ति माझ्यापर्यंत आली आहे." आमची अशी धारणा आहे की ही शक्ति केवळ बिशपांतच नव्हे तर आमच्यापैकी प्रत्येकांत असली पाहिजे. तुमच्यापैकी प्रत्येकजणच त्या प्रचंड आध्यात्मिक प्रवाहाचा वाहक कां होऊं नये याला कांही कारण नाही.

पण प्रथमतः तुम्हीं गुरूचा, खऱ्या गुरूचा शोध केला पाहिजे. आणि तुम्हीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे की असा गुरु म्हणजे केवळ एक मनुष्य नसतो. तुम्हांला गुरु हा शरीरांत असलेला दिसेल, पण खरा गुरु म्हणजे कांही शरीर नव्हे. तो पार्थिव मनुष्य नसतो. तुमच्या चर्मचक्षूंना जसा दिसतो तसा तो नसतो. हें शक्य आहे की गुरु मानवाच्या रूपाने तुमच्याकडे येईल आणि त्याच्याकडून तुम्हांला शक्ति लाभेल. कधी तो स्वप्नांत येईल आणि जगाला कांही गोष्टी देऊन जाईल. गुरूची शक्ति आपल्याकडे अनेक मार्गांनी येऊं शकते. पण आम्हां सामान्य मर्त्य जीवांसाठी गुरूचा लाभ होणें आवश्यक आहे, आणि तो होईपर्यंत आपली साधना चालूं राहिली पाहिजे.

आपण व्याख्यानें ऐकतों, पुस्तकें वाचतों आणि ईश्वर व आत्मा यांसंबंधी, तसेंच धर्म व मुक्ति यांसंबंधी चर्चा व युक्तिवाद करतों. या गोष्टी म्हणजे आध्यात्मिकता नव्हे, कारण आध्यात्मिकता ही पुस्तकांत, मतांत किंवा तत्त्वज्ञानांत असत नाही. ती अध्ययनांत किंवा युक्तिवादांत नसते, तर ती खऱ्याखुऱ्या आंतरिक

विकासांत असते. पोपट देखील पुष्कळशा गोष्टी पाठ करून त्यांचा पुनरुच्चार करूं शकतो. तुम्ही जर पंडित झालांत तर त्याचें काय मोठेसें ? गाढवें संपूर्ण ग्रंथालयें वाहून नेऊं शकतात. म्हणून जेव्हा खरा प्रकाश प्राप्त होतो, तेव्हा ग्रंथांपासून शिकण्याचें कांही उरत नाही--पुस्तकी पांडित्याला जागा उरत नाही. ज्या मनुष्याला स्वतःचें नांवहि लिहितां येत नाही तो पूर्णतः धार्मिक असूं शकतो, आणि जगांतील सर्व ग्रंथालयें ज्याच्या डोक्यांत भरलीं आहेत असा मनुष्य धार्मिक नसूं शकतो. विद्वत्ता ही आध्यात्मिक विकासासाठी आवश्यक नाही; पांडित्य ही त्यासाठी कांही अट नाही. गुरूचा स्पर्श, आध्यात्मिक शक्तीचें संचरण तुमचें हृदय जागृत करील आणि मग तुमच्या विकासाचा प्रारंभ होईल. हाच खरा बाप्तिस्मा होय. मग तुमची गति रोधली जाणार नाही, तुम्ही पुढे पुढे जात राहाल.

कांही वर्षांपूर्वी तुमच्या ख्रिस्ती धर्मगुरूंपैकी माझ्या एका मित्राने मला विचारलें, “तुमचा ख्रिस्तावर विश्वास आहे ?” मीं म्हटलें, “होय, आणि कदाचित् तुमच्यापेक्षा काकणभर अधिक आदरयुक्त.” “तर मग तुम्ही बाप्तिस्मा कां घेत नाही ?” मला बाप्तिस्मा कसा मिळेल ? कोण तो देईल ? खरा बाप्तिस्मा देऊं शकेल असा मनुष्य कुठे आहे ? बाप्तिस्मा म्हणजे काय ? मंत्र पुटपुटत तुमच्यावर केवळ थोडेसें पाणी शिंपडणें किंवा तुम्हांला पाण्यांत बुडविणें म्हणजे बाप्तिस्मा झाला काय ?

बाप्तिस्मा म्हणजे आध्यात्मिक जीवनांत साक्षात् प्रवेश. तुम्हांला जर खरा बाप्तिस्मा मिळेल तर तुम्ही जाणाल की तुम्ही शरीर नसून आत्मा आहांत. तुम्हांला शक्य असेल तर मला तसला बाप्तिस्मा द्या; नसेल तर तुम्ही खरे ख्रिस्ती नाही. तथा-

कथित बाप्तिस्मा मिळाल्यानंतरहि तुम्ही जसेच्या तसेच राहिलां आहां. ‘ख्रिस्ताच्या नांवाने आम्हीं बाप्तिस्मा घेतला आहे’ असें नुसतें म्हणण्यांत काय अर्थ आहे ? केवळ बडबड,––आपल्या वायफळ बडबडीने जगाला नेहमी त्रास देणें ! “सदैव अज्ञानांध:कारांत बुडालेले, पण तरी स्वत:ला शहाणे व विद्वान् समजणारे मूर्ख लोक, आंधळयाने आंधळयाचें मार्गदर्शन केलें असतां तो चाचपडत फिरावा त्याप्रमाणे चक्राकार फिरतच असतात.” म्हणून आम्ही ख्रिस्ती आहोंत असें म्हणूं नका, बाप्तिस्मा व तसल्या अन्य गोष्टींविषयी उगीच बढाई मारूं नका.

अर्थात् खरा बाप्तिस्माहि आहे. जेव्हा ख्रिस्त पृथ्वीवर अवतरले व त्यांनी उपदेश दिला तेव्हा, सुरवातीस खरा बाप्तिस्मा होता. वेळोवेळीं पृथ्वीवर येणारे जे ज्ञानी व साक्षात्कारी महात्मे असतात त्यांच्या ठायीं दुसऱ्यांनाहि साक्षात्कार प्राप्त करून देण्याची शक्ति असते. हा खरा बाप्तिस्मा होय. प्रत्येक धर्मांतील मंत्र-तंत्र व विधि यांच्या आधी सर्वव्यापक सत्याचें बीज अस्तित्वांत असतें. कालान्तराने या सत्याचा विसर पडतो; या विधींनी व अनुष्ठानांनी एकप्रकारें तें दडपलें जातें. बाह्य विधि शिल्लक राहतात––आंतील सत्य नाहीसें होऊन बाह्य आवरण शिल्लक असलेलें आपल्याला दिसतें. बाप्तिस्म्याचा विधि तुमच्यांत उरला आहे, पण त्यांतील सत्याची अनुभूति फारच थोडे लोक करवून देऊं शकतात. नुसता विधि पुरेसा नाही. जिवंत सत्याची जिवंत अनुभूति जर आपल्याला हवी असेल तर खऱ्या अर्थाने आपला त्यांत प्रवेश झाला पाहिजे. हा आहे आदर्श.

गुरूंनी मला उपदेश देऊन अनुभूतीच्या प्रकाशांत मला नेलें पाहिजे. ज्या शृंखलेंतील ते एक दुवा आहेत त्या शृंखलेंत

मलाहि त्यांनी एक दुवा बनविलें पाहिजे. कोणीहि सोम्या-गोम्या गुरु असल्याचा दावा करूं शकत नाही. गुरु असा असला पाहिजे की ज्याने सत्य जाणलें आहे, त्याची प्रत्यक्ष प्रतीति घेतली आहे आणि स्वतःच्या आत्मस्वरूपाचा साक्षात्कार करून घेतला आहे. केवळ बोलघेवडा माणूस गुरु होऊं शकत नाही. माझ्यासारखा बडबड करणारा मूर्ख पुष्कळ बोलूं शकतो, पण गुरु होऊं शकत नाही. खरा गुरु शिष्याला सांगेल, "जा आणि आता पाप करूं नको", आणि तो शिष्य पुन्हा पाप करूं शकणार नाही, त्याच्या ठिकाणीं पाप करण्याची शक्तिच उरणार नाही.

या जीवनांत मीं अशीं माणसें पाहिलीं आहेत. बायबल व त्यासारखे ग्रंथ मीं वाचले आहेत; ते फार सुंदर आहेत. पण जिवंत शक्ति तुम्हांला ग्रंथांत आढळत नाही. एका क्षणांत जीवन बदलूं शकणारी शक्ति ही फक्त जिवंत, साक्षात्कारी, सिद्ध महा-पुरुषांतच--आमच्यामध्ये वेळोवेळीं प्रकट होणाऱ्या त्या प्रकाश-मान दीपांतच आढळूं शकते. तेच केवळ गुरु होण्यास योग्य आहेत. तुम्ही व मी केवळ पोकळ बडबड करणारे आहोंत, गुरु नाहीं. आपण आपल्या बोलण्याने वाईट वातावरण उत्पन्न करून जगाला अधिक अस्वस्थ करीत आहोंत. आपण आशा व प्रार्थना करूं आणि प्रयत्न करूं; आणि एक दिवस असा येईल की जेव्हा आपण सत्याप्रत पोहोचूं आणि आपल्याला बोलण्याची आवश्यकता उरणार नाही.

"गुरु हा सोळा वर्षांचा कुमार होता; त्याने ऐंशी वर्षांच्या वृद्धाला शिकविलें. मौन ही गुरूची शिकविण्याची पद्धति होती आणि शिष्याचे सर्व संशय कायमचे दूर झाले."* गुरु हा असा

* दक्षिणामूर्तिस्तोत्र, १२ (थोडा फेरफार करून).

असतो. क्षणभर विचार करा की असा मनुष्य जर तुम्हांला आढळला, तर त्याच्याविषयी तुम्हांला किती श्रद्धा व प्रेम वाटायला पाहिजे! तो स्वतः ईश्वरच असतो, त्याहून कांहीच कमी नाही! म्हणूनच ख्रिस्तांच्या शिष्यांनी त्यांची ईश्वराप्रमाणेच पूजा केली. शिष्याने गुरूची उपासना ईश्वराप्रमाणेच केली पाहिजे. जोंपर्यंत मनुष्याला स्वतःला ईश्वराचा साक्षात्कार होत नाही तोंपर्यंत मनुष्य जास्तींत जास्त जिवंत ईश्वर, मानवदेहधारी ईश्वरच जाणूं शकतो. अन्य कोणत्या प्रकारें तो ईश्वराला जाणूं शकेल?

इथे अमेरिकेंत एक मनुष्य आहे--ख्रिस्तांनंतर १९०० वर्षांनी जन्मलेला. तो ख्रिस्तांच्या यहुदी वंशांतलाहि नाही. त्याने येशूंना किंवा त्यांच्या परिवारांतील कुणालाहि पाहिलें नाही. तो म्हणतो, "येशू देव होते. तुम्ही यावर विश्वास ठेवणार नाही तर तुम्ही नरकांत जाल." ख्रिस्त देव होते यावर त्यांच्या शिष्यांचा विश्वास होता हें आपण समजूं शकतों; ते त्यांचे गुरु होते व ते ईश्वर होते यावर त्यांचा विश्वास असेलच. पण या अमेरिकन माणसाचा त्या १९०० वर्षांपूर्वी जन्मलेल्या व्यक्तीशीं काय संबंध? हा तरुण मनुष्य मला म्हणतो की, "तुम्ही ख्रिस्तावर विश्वास ठेवीत नाही आणि म्हणून तुम्हांला नरकांत जावें लागेल." त्याला येशूबद्दल काय कळतें? तो एखाद्या वेडयाच्या इस्पितळांतच जाण्यास योग्य आहे. अशा प्रकारची श्रद्धा उपयोगाची नाही. प्रत्येकाने आपला गुरु शोधला पाहिजे.

येशू कदाचित् पुन्हा जन्म घेतील, तुमच्याकडे पुन्हा येतीलहि. तेव्हा जर तुम्ही ईश्वर म्हणून त्यांची पूजा कराल तर तें बरोबर होईल. आपण सर्वांनी गुरु लाभेपर्यंत वाट पाहिली पाहिजे, आणि गुरूची ईश्वर म्हणून उपासना केली पाहिजे. तो

ईश्वर आहे, ईश्वराहून कांहीच कमी नाही. तुम्ही जसजसें त्याच्यावर ध्यान करतां, तसतसा गुरु हळूहळू अदृश्य व्हायला लागतो, आणि मग तेथे काय उरतें ? गुरुरूप नाहीसें होऊन त्या ठिकाणीं स्वतः परमेश्वरच उभा राहतो. आपल्याकडे येण्यासाठी ईश्वराने धारण केलेला तेजस्वी मुखवटा म्हणजे गुरु होय. आपण निश्चलपणें पाहत राहूं तर हळूहळू मुखवटा गळून पडेल आणि ईश्वर प्रकट होईल.

"मी गुरूला नमन करतों. जो मूर्तिमंत दिव्य आनंद आहे, सर्वोच्च ज्ञानाची जो मूर्ति आहे, सर्वश्रेष्ठ सुखाचा जो प्रदाता आहे, जो शुद्ध, बुद्ध, पूर्ण, अद्वितीय, अनंत, सुखदुःखातीत, गुणातीत, विचारांच्या पलीकडे असणारा व सर्वातीत असा गुरु आहे त्याला मी नमन करतों." वास्तविकपणें गुरु हा असा आहे. म्हणून शिष्य जर त्याच्याकडे ईश्वर म्हणून पाहत असेल व त्याच्यावर विश्वास ठेवत असेल, त्याचा आदर ठेवीत असेल, त्याची आज्ञा पाळत असेल व निःशंकपणें त्याचें अनुसरण करीत असेल तर त्यांत आश्चर्य नाही. गुरु-शिष्यामधील संबंध हा असा असतो.

शिष्याने पूर्ण करावयाची यानंतरची अट म्हणजे मुमुक्षा होय. मुक्त होण्याची तीव्र इच्छा त्याच्या ठिकाणीं उत्पन्न झाली पाहिजे.

आपण पतंगासारखे आहोंत--ज्योत आपल्याला जाळील हें माहीत असूनहि ज्योतीवर झेप घेणाऱ्या पतंगासारखे आहोंत. विषय आपल्याला जाळतील हें माहीत असूनहि, ते वासना अधिकच प्रज्वलित करतात हें ठाऊक असूनहि आपण त्यांच्याकडे झेप घेतों. "वासना ही उपभोगाने कधीहि शमत नाही; अग्नींत तूप टाकल्याने तो अधिकच प्रज्वलित व्हावा त्याप्रमाणे उपभोगाने

वासना अधिकच भडकतात."* वासनेने वासना वाढते, हें सर्व माहीत असूनहि माणसें सर्वदा त्यांच्याकडे झेप घेत असतात. जन्मोजन्मीं ते विषयांच्या मागे धावत आहेत, परिणामत: अत्यंत कष्टी होत आहेत. पण तरीहि ते वासनांचा त्याग करूं शकत नाहीत. ज्या धर्माने या वासनेच्या भयंकर बंधनांतून त्यांना सोडविलें पाहिजे त्या धर्माला देखील त्यांनी वासनातृप्तीचें एक साधन केलें आहे. शरीराच्या व इंद्रियांच्या बंधनांतून व वासनां च्या दास्यांतून आपल्याला सोडविण्याची प्रार्थना ते ईश्वराजवळ- क्वचितच करतात. त्याऐवजी दीर्घायु, आरोग्य व ऐहिक उत्कर्ष यांसाठी ते त्याची प्रार्थना करतात--"हे ईश्वरा ! माझी डोके- दुखी नाहीशी कर, मला संपत्ति दे" इत्यादि.

आपली दृष्टि इतकी संकुचित झाली आहे,--इतकी अध:पतित, इतकी पाशवी झाली आहे ! या शरीरापलीकडे इतर कशाचीहि इच्छा कोणी करीत नाही. काय भयंकर अध:पतन हें ! किती खेदकारक गोष्ट ही ! मांसाचा गोळा, पांच इंद्रियें आणि पोट ! उदर व कामवासना या जोडीशिवाय जग आणखी काय आहे ? लक्षावधि स्त्री-पुरुषांच्याकडे पाहा--यासाठीच ते केवळ जगत आहेत. या गोष्टी त्यांच्यापासून काढून घ्या, आणि मग त्यांना आपलें जीवन रिकामें, निरर्थक व असह्य वाटेल. असें आहोंत आपण ! आणि असें आहे आपलें मन; क्षुधा आणि कामवासना तृप्त करण्याचे मार्ग शोधण्याच्या मागे तें सतत लागलेलें असतें. सर्वकाल हें असें चाललेलें असतें. तद्वतच, या जगांत दु:खें आहेत, त्यांना शेवट नाही; शरीराच्या या वासना क्षणिक सुख देतात, आणि अनंत दु:ख आपल्याबरोबर आणतात.

---

* भागवत, ९-१९-१४

एखाद्या पेल्यांतील पेयाचा वरचा थोडासा भाग अमृताचा असावा व खाली सर्व विष भरलेलें असावें--असें पेय प्राशन करण्यासारखें हें आहे. पण तरीहि या सर्व गोष्टींच्या मागे आपण धावत असतों.

यांतून सुटण्याचा मार्ग कोणता ? इंद्रियभोग आणि वासना यांचा त्याग हाच या दुःखांतून सुटण्याचा एकमेव मार्ग आहे. तुम्हांला आध्यात्मिक व्हावयाचें असेल तर तुम्हीं त्याग केला पाहिजे. हीच खरी कसोटी आहे. जगाचा त्याग करा--मूर्खपणें इंद्रियभोगांमागे धावणें सोडून द्या. एकच इच्छा खरी आहे आणि ती म्हणजे सत्य काय आहे हें जाणण्याची, धार्मिक होण्याची. हा जडवाद, हा अहंकार पुरें. मला धार्मिक झालें पाहिजे ही इच्छा तीव्र, उत्कट असली पाहिजे. हालचाल करतां येणार नाही अशा तऱ्हेने एखाद्या माणसाचे हातपाय बांधलेले असतांना त्याच्या शरीरावर जर एखादा निखारा ठेवला तर सर्व शक्ति एकवटून त्याला फेकून देण्याची तो धडपड करील. जेव्हा हें धगधगतें जग फेकून देण्याची अशी उत्कट इच्छा मला होईल, अशी अस्वस्थ धडपड मी करीन, तेव्हा त्या दिव्य सत्याचें दर्शन लाभण्याची वेळ आली आहे असें म्हणतां येईल.

माझ्याकडे पाहा. दोन-तीन रुपये असलेलें माझें लहानसें पाकीट हरवलें तरी तें शोधण्यासाठी सतरा वेळां मी घर धुंडाळतों. किती चिंता, किती काळजी, किती धडपड ! तुमच्यापैकी एखाद्याने मला दुरुत्तरें केलीं असलीं तर तें मी वीस वर्षं लक्षांत ठेवीन, क्षमा करणार नाहीं की विसरूं शकणार नाहीं. या क्षुद्र ऐंद्रिय विषयांसाठी माझी कोण धडपड ! पण ईश्वरासाठी अशी धडपड करणारा कोण आहे ? "मुलें आपल्या खेळाच्या नादांत

सर्वकांही विसरतात; तरुण लोक विषयोपभोगासाठी वेडे होतात, इतर कशाचीहि त्यांना पर्वा नसते; वृद्ध आपल्या केल्या कुकर्मांचा विचार करण्यांत सारखे मग्न असतात." (श्रीशंकराचार्य.) वृद्ध आपल्या गत सुखोपभोगाचें चिंतन करीत असतात--ते आता कोणताहि उपभोग घेऊं शकत नाहीत. रवंथ करणें--एवढेंच केवळ त्यांना शक्य असतें. लोक इंद्रियविषयांची जेवढ्या उत्कट-तेने कामना बाळगतात तेवढ्या उत्कटतेने कुणीहि ईश्वरलाभाची आकांक्षा बाळगीत नाही.

सर्वजण म्हणतात की, ईश्वरच सत्य आहे, तोच सत् अशी एकमेव वस्तु आहे, आत्म्याचेंच केवळ अस्तित्व आहे, जडाचें नाही. तरीहि ईश्वराला ज्या वस्तु ते मागतात त्या क्वचितच आध्यात्मिक स्वरूपाच्या असतात. ते नेहमी भौतिक वस्तूंचीच मागणी करीत असतात. त्यांच्या प्रार्थनांमध्ये आत्मा हा जडापासून वेगळा केलेला नसतो. धर्माचें केवढें अध:पतन झालें आहे ! धर्माचें आता केवळ सोंग उरलें आहे. वर्षांमागून वर्षें जात आहेत आणि आध्यात्मिक असें कांहीहि प्राप्त होत नाही. पण मनुष्याला एकाच वस्तूची--आत्म्याची--भूक लागली पाहिजे, कारण आत्माच केवळ सत् आहे. तेंच ध्येय आहे. तें जर तुम्हांला सध्या प्राप्त होऊं शकत नसेल तर म्हणा की, "मी तें प्राप्त करूं शकत नाहीं; तें ध्येय आहे हें मी जाणतों, पण मी अद्याप त्याला अनुसरूं शकत नाहीं." पण हें आपण करीत नाहीं. आपण धर्माला आपल्या खालच्या पातळीवर ओढतों आणि आत्म्याच्या नांवाखाली जडाच्या मागे लागतों. आपण सर्व नास्तिक आहोंत. आपण इंद्रियां-शिवाय कशाचाच विश्वास धरीत नाहीं. "अमक्याने अमुक अमुक करा म्हणून सांगितलें--त्याच्यापासून कदाचित् कांही

फायदा होईल. आपण प्रयत्न करूं व गंमत बघूं. कदाचित् कांही लाभ होईल. कदाचित् माझा तुटलेला पाय बरा होईल."

रोगी माणसें दुःखी असतात; ते ईश्वराचे मोठे उपासक असतात, कारण त्यांना आशा वाटते की आपण त्याची प्रार्थना केली तर तो आपल्याला बरें करील. हें अगदीच वाईट आहे असें नव्हे, पण अशा प्रार्थना प्रामाणिक असल्या पाहिजेत व हा कांही धर्म नव्हे याची त्यांना जाणीव असली पाहिजे. श्रीकृष्णांनी गीतेंत म्हटलें आहे, "चार प्रकारचे लोक मला भजतात. आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी व ज्ञानी."—गीता, ७-१६. जे आर्त वा दुःखी असतात ते दुःखनिवारणार्थ ईश्वराची प्रार्थना करतात. ते जर आजारी असतील तर रोगमुक्त होण्यासाठी त्याला भजतात; त्यांची संपत्ति नष्ट झाली असेल तर ती परत मिळावी म्हणून ते त्याची प्रार्थना करतात. इतर कांहीजण असे असतात की जे ईश्वराजवळ सर्व प्रकारच्या गोष्टी मागतात—नांव, कीर्ति, पैसा, प्रतिष्ठा, इत्यादि; कारण ते अत्यंत वासनायुक्त असतात. ते म्हणतील, "हे मेरी माते, मला पाहिजे तें जर मिळेल तर मी तुला नवस करीन. माझी प्रार्थना पूर्ण करण्यांत जर तुला यश आलें तर मी ईश्वराची पूजा करीन आणि प्रत्येक वस्तूचा कांही भाग तुला देईन." जे लोक एवढे जडवादी नसतात, पण तरीहि ज्यांची ईश्वरावर श्रद्धा नसते, त्यांचा ईश्वराविषयी जाणून घेण्याकडे कल असतो. ते तत्त्वज्ञानांचा अभ्यास करतात, धर्मग्रंथ वाचतात, भाषणें ऐकतात, वगैरे. ते जिज्ञासु होत. शेवटचा वर्ग अशांचा की जे ईश्वराची उपासना करतात व त्याचें ज्ञान प्राप्त करून घेतात. या चारहि वर्गांतील लोक चांगलेच होत, वाईट नव्हत. ते सर्वच ईश्वराला भजतात. पण आपण शिष्य होण्याचा प्रयत्न करीत

आहोंत. सर्वोच्च सत्य जाणून घेणें हेंच आपलें एकमेव उद्दिष्ट आहे. आपलें ध्येय अत्यंत उदात्त आहे. आपण स्वत:शीं ब्रह्मज्ञान व इतर मोठमोठ्या गोष्टींचा विचार केला आहे, ते सारे विचार आपण प्रत्यक्ष कृतींत आणूं या. आत्म्यांत अधिष्ठित होऊन आत्म्याची आत्मा म्हणून आपण उपासना करूं या. आपल्या उपासनेचा पाया, मध्य व कळस आत्माच असूं द्या. त्यांत कोठेहि जग राहूं नये. तें अवकाशांत जाऊन विलीन होऊं द्या--कुणाला त्याची पर्वा आहे ? तूं आत्म्यांत अधिष्ठित हो. तेंच ध्येय आहे. त्याच्याप्रत अद्याप आपण पोहोचूं शकत नाहीं हें आपल्याला माहीत आहे. कांही हरकत नाही. निराश होऊं नका आणि ध्येयाला खाली ओढूं नका. तुम्ही आपल्या शरीराचा किती कमी विचार करतां, स्वत:चा जड म्हणून--मृत, निस्तेज, अचेतन जड म्हणून किती कमी विचार करतां, आणि त्याचबरोबर तुम्ही स्वत:चा तेजस्वी, अविनाशी आत्मा म्हणून किती अधिक विचार करतां हीच महत्त्वाची गोष्ट आहे. तुम्ही स्वत:ला तेजस्वी, अविनाशी आत्मा म्हणून जेवढें अधिक समजाल तेवढें तुम्ही जडापासून, शरीर व इंद्रियें यांच्यापासून पूर्णत: मुक्त होण्यास अधिक उत्सुक व्हाल. हीच आहे मुमुक्षा--मुक्त होण्याची उत्कट इच्छा.

शिष्यत्वाची चौथी व शेवटची अट म्हणजे 'नित्यानित्यवस्तुविवेक' होय. एकच वस्तु नित्य आहे, सत्य आहे आणि ती म्हणजे ईश्वर. सर्वकाल मन त्याच्याकडेच ओढलें गेलें पाहिजे त्यालाच तें वाहिलेलें असलें पाहिजे. ईश्वरच सत्य आहे, इतर कांहीहि सत्य नाही. प्रत्येक वस्तु उत्पन्न होते आणि नष्ट होते, जगाविषयीची कोणतीहि वासना भ्रामक आहे, कारण जग मिथ्या आहे. मनाला केवळ ईश्वराचीच अधिकाधिक जाणीव होत गेली

पाहिजे--इतकी की बाकी सारेंकांही, तें जसें आहे तसें अर्थात् मिथ्या प्रतीत होईल.

ज्याला शिष्य होण्याची इच्छा असते त्याने पूर्ण करावयाच्या या चार अटी आहेत. या पूर्ण केल्याशिवाय त्याला यथार्थ गुरूचा लाभ होणार नाही. आणि यदाकदाचित् त्याच्या भाग्याने त्याला गुरु लाभले, तरी गुरु जी शक्ति त्याच्यांत संचारित करतील तिच्याने त्याच्यांत जागृति होणार नाही. या अटींच्या बाबतींत कसलीहि तडजोड शक्य नाही. या अटी पूर्ण झाल्यानंतर--या सर्व साधनेनंतर--शिष्याचें हृदयकमल विकसित होईल आणि भ्रमर त्याच्याकडे आकर्षिला जाईल. तेव्हा शिष्याला हें ज्ञान होईल की गुरु त्याच्या शरीरांतच होते, त्याच्या अंतर्यामींच होते. त्याचा मग पूर्ण विकास होतो, त्याला साक्षात्कार होतो, तो भव-सागर तरून पलीकडे जातो. तो हा भयंकर सागर पार करतो आणि मग लाभ किंवा स्तुति यांची मुळीच इच्छा न बाळगतां करुणार्द्र होऊन तो इतरांना पार होण्याला साहाय्य करतो.

---

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों दि: ....................

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों: दि: ........................

# वेदान्त हा भावी जगाचा धर्म आहे काय?

( सॅन् फ्रॅन्सिस्को येथे ८ एप्रिल १९०० रोजीं दिलेलें भाषण )

तुमच्यापैकी जे गेल्या सुमारें महिनाभर माझीं व्याख्यानें ऐकत आहेत ते आतापर्यंत वेदान्त तत्त्वज्ञानान्तर्गत विचारांशीं परिचित झाले असतील. वेदान्त हा जगांतील प्राचीनतम धर्म आहे, पण तो कधी लोकांचा धर्म झाला होता असें म्हणतां येणार नाही. असें असल्यामुळे 'तो भावी जगाचा धर्म होणार आहे काय ?' या प्रश्नाचें उत्तर देणें कठीण आहे.

प्रारंभींच मी असें म्हणेन की, वेदान्त हा कधी तरी बहुसंख्य मानवांचा धर्म होईल की नाही हें मला सांगतां यावयाचें नाही. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांसारख्या एका संपूर्ण राष्ट्राची तो कधी पकड घेऊं शकेल काय ? कदाचित् घेईल. तें कसेंहि असलें तरी हाच प्रश्न आज आपण चर्चेला घेणार आहोंत.

वेदान्त काय नाही हें सांगण्यापासून मी प्रारंभ करीन आणि मग वेदान्त काय आहे हें मी सांगेन. पण तुम्हीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, वेदान्ताचा भर व्यक्तिनिरपेक्ष सिद्धान्तावर असला तरी, आणि जरी सत्याच्या बाबतींत तो तडजोड करीत नाही किंवा मूलभूत सत्यांचा तो त्याग करींत नाही तरी, तो कशालाहि विरोधी नाही.

तुम्ही सर्वजण जाणतांच की, एखादा धर्म हा धर्म होण्यासाठी त्याला कित्येक विशिष्ट गोष्टींची आवश्यकता असते. सर्वप्रथम, धर्मासाठी एखादा ग्रंथ असणें आवश्यक आहे. ग्रंथाचें

सामर्थ्य खरोखर अद्‌भुत आहे ! तें कसें का असेना, ग्रंथ हा एक असा मध्यवर्ती आधार आहे की ज्यावर लोकांची श्रद्धा केंद्रित होते. आज असा एकहि धर्म अस्तित्वांत नाही की ज्याला एखादा शास्त्रग्रंथ नाही. मानव कितीहि बुद्धिवादी झाला किंवा त्याने केवढयांहि लंब्या चवडया बाता मारल्या तरी तो ग्रंथांचा आधार घेतोच. ग्रंथाशिवाय एखादा धर्म सुरू करण्याचा तुमच्या देशांतील प्रत्येक प्रयत्न असफल ठरला आहे. भारतांत अनेक धर्मपंथ अत्यंत यशस्वीपणें उदयाला येतात, पण कांही थोडया वर्षांच्या काळांतच ते नष्ट होतात, कारण त्यांना आधारभूत असा कोणताहि ग्रंथ नसतो. असेंच इतर देशांतहि घडतें.

युनिटेरियन चळवळीच्या उदयाचा व अस्ताचा विचार करा. ती तुमच्या राष्ट्राच्या सर्वोत्तम विचारांची प्रतिनिधिस्वरूप आहे. तथापि मेथॉडिस्ट, बॅप्टिस्ट आणि इतर ख्रिस्ती संप्रदायां-प्रमाणे ती कां पसरली नाही ?--कारण तिला ग्रंथाचा आधार नव्हता. याच्या उलट यहुद्यांचें पाहा. मूठभर लोक, एका देशांतून दुसऱ्या देशांत हाकलले गेलेले,--पण तरीहि एकत्र टिकून आहेत, कारण त्यांना धर्मग्रंथ आहे. पारशी लोकांचा विचार करा--जगांतील त्यांची संख्या केवळ कांही लाखच आहे. भारतांत जैनहि सुमारें दहा लाखच राहिले असतील. आणि तुम्हांला हें माहीत आहे का की हे मूठभर पारशी व जैन केवळ आपापल्या धर्मग्रंथां-मुळेच अद्याप टिकून आहेत ? आजच्या काळांत जे धर्म अस्तित्वांत आहेत त्यांच्यापैकी प्रत्येकाला स्वतःचा धर्मग्रंथ आहे.

धर्मासाठी दुसरी आवश्यक गोष्ट म्हणजे एखाद्या व्यक्तीवर श्रद्धा असणें ही होय. तिची उपासना जगाचा स्वामी म्हणून किंवा थोर उपदेशक म्हणून केली जाते. मनुष्याला उपासनेसाठी कोणती-

तरी मानवदेहधारी व्यक्ति लागते. अवतार किंवा प्रेषित किंवा थोर नेता, कोणी तरी त्यांना हवा असतो. आज प्रत्येक धर्मांत तुम्हांला हें आढळेल. हिंदु व ख्रिस्ती यांचे अवतारी पुरुष आहेत; बौद्ध, मुसलमान व यहुदी यांचे प्रेषित आहेत. पण हें सर्व सारखेंच आहे. कोणत्यातरी व्यक्तीवर अगर व्यक्तींवर त्यांची श्रद्धा केंद्रित होत असते.

धर्मासाठीं तिसरी आवश्यक गोष्ट ही दिसते की, एखादा धर्म शक्तिशाली होण्यासाठी व त्याचें अस्तित्व टिकण्यासाठी तोच केवळ सत्य आहे असा त्याचा विश्वास असला पाहिजे. तसें, नसेल तर तो लोकांवर प्रभाव पाडूं शकणार नाही.

उदारमतवाद नष्ट होतो, कारण तो रुक्ष असतो, तो धर्मवेड उत्पन्न करूं शकत नाही, तो आपल्याशिवाय इतर प्रत्येक गोष्टीविषयी द्वेष उत्पन्न करूं शकत नाही. त्यामुळे उदारमतवाद हा वारंवार ऱ्हास पावणारच. तो फार थोडया लोकांना प्रभावित करूं शकतो. याचें कारण लक्षांत येणें कठीण नाही. उदारमतवाद आपल्याला निःस्वार्थी करण्याचा प्रयत्न करतो. पण आपण निःस्वार्थी होऊं इच्छीत नाहीं--निःस्वार्थी होण्यांत कोणताहि तात्कालिक लाभ आपल्याला दिसत नाही; स्वार्थी होण्याने आपला अधिक लाभ होतांना दिसतो. जोंपर्यंत आपण दरिद्री असतों, आपल्याजवळ कांही नसतें तोंपर्यंत आपण उदारमतवाद स्वीकारतों. ज्या क्षणीं आपल्याला सत्ता व संपत्ति हीं प्राप्त होतात त्याच क्षणीं आपण पुराणमताभिमानी बनतों. गरीब मनुष्य हा लोकशाहीवादी असतो. सर्वांना सारखे अधिकार असावेत असें त्याचें मत असतें. तो जेव्हा श्रीमंत होतो, तेव्हा तो अमीरउमरावांपैकी एक बनून जातो--स्वतःला इतरांहून श्रेष्ठ समजूं

लागतो. धर्माच्या बाबतींतहि माणसाची प्रवृत्ति अशीच असते.

एखादा प्रेषित उद्भवतो, जे त्याला अनुसरतील त्यांना सर्व प्रकारचीं पारितोषिकें मिळतील असें आश्वासन तो देतो व जे त्याला अनुसरणार नाहीत त्यांचा कायमचा विनाश होईल असें तो जाहीर करतो. अशा रीतीने तो आपल्या विचारांचा प्रसार करतो. जे जे विद्यमान धर्म आज पसरत आहेत ते ते अत्यंत कट्टर आहेत. त्यांचे अनुयायी अत्यंत धर्मवेडे आहेत. एखादा पंथ इतर पंथांचा जितका जास्त तिरस्कार करीत असेल तितकें त्याचें यश मोठें, आणि तितक्या अधिक लोकांना तो आपल्या कळपांत ओढतो. बहुतांश जगाचा प्रवास केल्यानंतर व पुष्कळ जातींमधे राहिल्यानंतर आणि जगांतील आजची परिस्थिति पाहून मी या निष्कर्षाप्रत आलों आहें की विश्वबंधुत्वाची भाषा कितीहि वापरली जात असली तरी आहे ती अवस्था चालूंच राहणार आहे.

वेदान्ताचा यांपैकी एकाहि गोष्टीवर विश्वास नाही.-- प्रथमतः त्याचा ग्रंथावर विश्वास नाही, आणि हीच प्रारंभींची मोठी अडचण आहे. कुण्याहि एका ग्रंथाचा दुसऱ्या ग्रंथावरील श्रेष्ठत्वाधिकार वेदान्त मान्य करीत नाही. कोणत्याहि एकाच ग्रंथांत ईश्वर, आत्मा, अंतिम तत्त्व याविषयीचीं सगळींच्या सगळीं सत्यें साठविलेलीं आहेत ही गोष्ट वेदान्त ठामपणें नाकारतो. तुमच्यापैकी ज्यांनी उपनिषदें वाचलीं असतील त्यांना हें स्मरत असेल की "ग्रंथांच्या वाचनाने आत्म्याची प्रतीति येऊं शकत नाही" असें तीं वारंवार बजावतात. तसेंच एखाद्या विशिष्ट व्यक्तीवरील श्रद्धेचें समर्थन करणें वेदान्ताला अधिकच जड जातें. तुमच्यापैकी जे वेदान्ताचे विद्यार्थी आहेत--वेदान्त म्हणजे नेहमी उपनिषदेंच समजावयाचीं--त्यांना हें माहीत आहे की वेदान्त

हाच एक असा धर्म आहे की जो कोणत्याहि एका व्यक्तीला कवटाळून राहिलेला नाही. कोणत्याहि एखाद्या विशिष्ट स्त्रीला अगर पुरुषाला वेदान्त्यांनी कधीहि उपास्य मानलें नाही. तसें होऊं शकत नाही. एखादा कीटक किंवा एखादा पक्षी जेवढा उपास्य आहे तेवढाच माणूस देखील उपास्य आहे. आपण सर्व बांधव आहोंत. आपल्यामधे फ़रक केवळ ब्रह्माभिव्यक्तीच्या प्रमाणाचा आहे. नीचतम कीटक व मी सारखेच आहोंत. एखाद्या माणसाने आमच्यापेक्षा उच्च स्थानीं उभे राहावें, आम्हीं त्याच्याकडे जाऊन त्याची पूजा करावी, त्याने आम्हांला वर ओढावें व आमचा उद्धार करावा या साऱ्या गोष्टींना वेदान्तांत कसें स्थान नाही हें तुम्हीं पाहिलेंच आहे. वेदान्त हें कांही तुम्हांला देत नाही. ग्रंथ नाही, उपास्य व्यक्ति नाही, कांही नाही.

याहून अधिक अडचण ईश्वराच्या बाबतींत आहे. तुम्हीं या देशांत लोकशाहीवादी होऊं इच्छितां. लोकशाहीला अनुरूप अशा ईश्वराचीच वेदान्त शिकवण देतो.

तुमचें शासन करणारें सरकार आहे, पण तें व्यक्तिनिरपेक्ष आहे. तुमचें सरकार एकसत्ताक नाही. पण तरीहि तें जगांतील कोणत्याहि राजसत्तेपेक्षा अधिक सामर्थ्यशाली आहे. कोणालाहि हें कळत नाहीसें दिसतें की खरी सत्ता, खरें चैतन्य, खरें सामर्थ्य हें अदृश्याच्या ठायीं, अव्यक्ताच्या ठायीं, जें व्यक्तिनिरपेक्ष आहे त्याच्या ठायीं असतें. इतरांपासून वेगळी काढलेली केवळ एक व्यक्ति या दृष्टीने तुम्हांला कांही महत्त्व नाही, पण एका स्वयंशासित राष्ट्राचे एक निर्विशेष घटक म्हणून तुम्ही प्रचंड शक्तिशाली आहांत. शासनांत तुम्ही सर्व एक आहांत--एक प्रचंड शक्ति आहांत. पण शक्ति नेमकी कुठे आहे ? प्रत्येक मनुष्यच ती

शक्ति आहे. तेथे कोणी राजा नाही. प्रत्येकजण समानच आहे असें मला दिसतें. मला कोणापुढेहि शिर नमवावें लागत नाही. पण तरीहि प्रत्येक माणसांत प्रचंड शक्ति आहे.

वेदान्त हा नेमका असाच आहे. त्याचा ईश्वर हा पूर्णतः वेगळा, एखाद्या सिंहासनावर बसलेला राजा नाही. कांही लोक असे आहेत की त्यांना आपला ईश्वर तसा असलेला आवडतो-- ज्याला भ्यावें व ज्याला संतुष्ट करावें असा. ते त्याच्यासमोर मेणबत्त्या पेटवतात आणि धुळींत लोळण घेतात. त्यांना आपल्यावर राज्य करणारा एक राजा हवा असतो--सर्वांवर सत्ता गाजवणारा व स्वर्गांत राहणारा एक राजा ते मानतात. निदान या देशांतून तरी राजा निघून गेला आहे. आता स्वर्गांतील राजा कुठे आहे ? जिथे पृथ्वीवरचा राजा आहे तिथेच तोहि आहे-- दोघेहि नाहीसे झाले आहेत. या देशांत, तुमच्यापैकी प्रत्येकांत राजा प्रविष्ट झाला आहे. येथे तुम्ही सर्व राजे आहांत. वेदान्त-धर्माचेंहि असेंच आहे. तदनुसार तुम्ही सर्व ईश्वर आहांत. एक ईश्वर पुरेसा नाही. वेदान्त म्हणतो की तुम्ही सर्व ईश्वर आहांत.

यामुळे वेदान्त फार कठीण वाटतो. तो ईश्वराची जुनी कल्पना मुळीच शिकवीत नाही. मेघांच्याहि वर बसणारा आणि आमची परवानगी न घेतां जगाचा कारभार करणारा, शून्यांतून ज्याने आम्हांला केवळ त्याला तसें वाटलें म्हणून निर्माण केलें व केवळ त्याची तशी इच्छा म्हणून ज्याने आम्हांला हीं दुःखें भोगायला लावलीं, अशा ईश्वराऐवजी वेदान्त आम्हांला असा ईश्वर उपदेशितो की जो प्रत्येकांत आहे, जो प्रत्येकाच्या रूपाने नटला आहे आणि जो सर्वकांही झाला आहे. सर्वसत्ताधारी राजा या

देशांतून गेला आहे; स्वर्गांतील राज्यकर्ता शेकडो वर्षांपूर्वीच वेदान्तांतून गेला आहे.

भारत पृथ्वीवरील सम्राटांचा त्याग करूं शकत नाही, आणि म्हणूनच वेदान्त हा भारताचा धर्म होऊं शकत नाही. तुमच्या देशांत लोकशाही असल्यामुळे वेदान्त तुमच्या देशाचा धर्म होण्याचा संभव आहे. पण जर तुम्ही स्पष्टपणें वेदान्त जाणूं शकाल व जाणाल, जर तुम्ही खरेखरे पुरुष व स्त्री व्हाल, अस्पष्ट विचार व भ्रामक कल्पना डोक्यांत असलेले असे जर तुम्ही राहणार नाही, आणि जर तुम्हांला यथार्थपणें आध्यात्मिक व्हावयाचें असेल तरच वेदान्त तुमचा धर्म होण्याचा संभव आहे, कारण वेदान्ताचा संबंध केवळ आध्यात्मिकतेशींच आहे.

स्वर्गांतील ईश्वराची कल्पना म्हणजे काय आहे?——जडवाद. वेदान्ताची शिकवण अशी आहे की अनंत ईश्वरीतत्त्व हें आपल्यापैकी प्रत्येकाच्या ठायीं विद्यमान आहे. मेघावर बसलेला ईश्वर! यांत केवढी घोर ईश्वरनिंदा आहे! हा जडवाद आहे——निखालस जडवाद आहे. लहान मुलें जर अशा प्रकारें विचार करीत असतील तर तें योग्य दिसेल, पण प्रौढ माणसें जेव्हा अशा गोष्टी शिकविण्याचा प्रयत्न करतात तेव्हा तें अत्यंत किळसवाणें होतें. हा सर्व जडवाद आहे, या सर्व पार्थिव, देहवादी कल्पना आहेत, स्थूल कल्पना आहेत, इंद्रियनिष्ठ कल्पना आहेत. ह्यांतील प्रत्येक अंश मृण्मय आहे, जड आहे, दुसरें कांही नाही. हा काय धर्म आहे? आफ्रिकेंतील 'मंबो-फंबो' धर्म जसा, तसाच हा. ईश्वर हा चैतन्यस्वरूप आहे. आणि त्याची उपासना चैतन्यरूपांत, सत्यस्वरूपांतच केली पाहिजे. चैतन्य वा आत्मा हा केवळ स्वर्गांतच राहतो काय? आत्मा काय आहे? आपण सर्वजण आत्मा

आहोंत. आपल्याला त्याची प्रतीति कां येत नाही ? तुमच्यामधे व माझ्यामधे भेद कशामुळे निर्माण होतो ?——शरीरामुळेच, दुसऱ्या कशाहिमुळे नाहीं. शरीराला विसरा, मग सर्वत्र आत्माच दिसेल.

दा. क्र. ७२२९६

वेदान्तापाशी देण्यासाठी ज्या गोष्टी नाहीत त्या ह्या अशा आहेत. त्याच्यापाशी ग्रंथ नाही. बाकीच्या मनुष्यजातीपासून वेगळा असा कुणी पुरुष नाही——“तुम्ही कीटक आहांत आणि आम्ही प्रभु आहोंत” असलें कांही नाही. तुम्ही जर ईश्वर असाल तर मीहि ईश्वरच आहें. म्हणून, वेदान्त पाप मानीत नाहीं. वेदान्त चुका मानतो, पण पाप मानीत नाही. आणि कालान्तराने सर्वकांही ठीक होणार आहे असें वेदान्त म्हणतो. वेदान्तांत सैतान नाही——असलें अर्थशून्य कांही नाही. वेदान्त फक्त एकच——जगांत फक्त एकच पाप मानतो, आणि तें हें की, स्वत:ला अगर दुसऱ्याला पापी मानणें. त्यापासूनच इतर साऱ्या चुका किंवा सामान्यत: ज्याला पाप म्हटलें जातें तें उत्पन्न होतें. आपल्या आयुष्यांत पुष्कळ चुका झाल्या आहेत तरी पण आपण पुढे जात आहोंत. आपण चुका केल्या म्हणून आपण धन्य आहोंत. गत आयुष्याचें सिंहावलोकन करा. तुमची वर्तमान स्थिति जर चांगली असेल तर ती गतकालीन सर्व चुका आणि यश यांच्यामुळेच आहे. यशाचा जयजयकार असो ! चुकांचा जयजयकार असो ! जें होऊन गेलें त्याच्याकडे पाहूं नका. पुढे जा ! पुढे चला !

वेदान्त हा पाप किंवा पापी यांपैकी कांहीहि मानीत नाही. ज्याचें भय बाळगावें अशा ईश्वराचेंहि तो प्रतिपादन करीत नाही. ईश्वर हा असा आहे की ज्याचें भय आपल्याला कधीच वाटणार नाही, कारण तो आपला आत्माच आहे. ज्याला आपण कधीहि

भिऊं शकणार नाहीं असा एकच जण आहे आणि तो म्हणजे ईश्वर. तेव्हा जो मनुष्य ईश्वराचें भय बाळगतो तो खरोखरीच अत्यंत भ्रांत नव्हे काय ? एखादा मनुष्य असा असेल की जो आपल्या सावलीला भितो, पण तो देखील स्वत:ला भिणार नाही. ईश्वर हा मनुष्याचा प्रत्यक्ष आत्माच आहे. तोच एक असा आहे कीं ज्याची तुम्हांला भीति वाटण्याची शक्यता नाही. ईश्वराचें भय मनुष्यांत संचरणें व त्यामुळे त्याचा थरकांप वगैरे उडणें हा किती मूर्खपणा आहे बरें ! आपण सर्वजण वेड्याच्या इस्पितळांत नाही ही ईश्वराची कृपाच होय ! पण आपल्यापैकी अधिकांश जर वेडे नाहीत तर ईश्वराचें भय इत्यादींसारख्या कल्पना आपण कां शोधून काढाव्यात ? भगवान बुद्ध म्हणाले होते की संपूर्ण मानवजात ही कमीअधिक वेडी आहे. त्यांचें हें म्हणणें पूर्णतः बरोबर आहे असें दिसतें.

ग्रंथ नको, इतर सगळ्यांहून अगदी वेगळी अशी विशिष्ट व्यक्ति नको, सगुण ईश्वर नको. या सर्व गोष्टी गेल्या पाहिजेत. तसेंच इंद्रियनिष्ठ जीवनाचा आपण त्याग केला पाहिजे. आपण इंद्रियांना बांधलेले राहूं शकत नाहीं. सध्या आपण इंद्रियबद्ध आहोंत--हिमनदींत थंडीने मरणाऱ्या माणसाप्रमाणे आहोंत. या माणसांना झोपण्याची इतकी तीव्र इच्छा होते की जेव्हा त्यांचे मित्र मृत्यूच्या धोक्याची सूचना देऊन त्यांना जागविण्याचा प्रयत्न करतात तेव्हा ते म्हणतात, "आम्हांला मरूं द्या. आम्ही झोपूं इच्छितों." क्षुद्र इंद्रियविषयांना चिकटून राहिल्याने आपला सर्वनाश झाला तरी आपण त्यांना सोडीत नाहीं; आपण हें विसरतों की जगांत अधिक श्रेष्ठ गोष्टीदेखील आहेत.

हिंदु पुराणांत एक कथा आहे की, ईश्वराने एकदा पृथ्वीवर

डुकराच्या रूपाने अवतार घेतला होता. त्याला एक डुकरी सहचरी होती आणि कालान्तराने त्यांना अनेक लहान पिल्लें झालीं. तो आपल्या कुटुंबासह फार सुखांत होता. स्वतःचा दिव्य महिमा व प्रभुत्व विसरून तो चिखलांत राहत असे आणि आनंदाने किंकाळत असे. सर्व देवांना अत्यंत काळजी उत्पन्न झाली आणि 'हें डुकराचें शरीर टाकून तूं स्वर्गाला परत ये' अशी त्याला विनंती करण्यासाठी ते पृथ्वीवर आले. पण ईश्वराने त्यांचें कांहीच ऐकून घेतलें नाही आणि त्या सर्वांना हाकून दिलें. तो म्हणाला की, मी फार सुखी आहें आणि यांत व्यत्यय येणें मला आवडणार नाहीं. दुसरा कांही उपाय नाही असें पाहून देवांनी ईश्वराचें तें डुकराचें शरीर नष्ट केलें. तात्काळ त्याला त्याचें पूर्वीचें ऐश्वर्य प्राप्त झालें आणि आपल्याला डुक्कर होण्यांत आनंद वाटत होता याचें त्याला आश्चर्य वाटलें.

लोक अशाच तऱ्हेने वागत असतात. जेव्हा जेव्हा ते निर्गुण ईश्वरासंबंधी ऐकतात तेव्हा तेव्हा ते म्हणतात, "माझ्या व्यक्तित्वाचें काय होईल?——माझें व्यक्तित्व नष्ट होईल!" पुन्हा तुमच्या मनांत असा विचार येईल तेव्हा त्या डुकराची आठवण करा आणि मग विचार करा की तुमच्यापैकी प्रत्येकाजवळ आनंदाची अनंत खाण आहे. तुम्ही आपल्या वर्तमान स्थितीवर किती खुष आहांत! पण जेव्हा तुम्हांला तुमच्या खऱ्या स्वरूपाची प्रतीति येईल तेव्हा तुम्हांला याचें आश्चर्य वाटेल की तुम्ही आपलें हें इंद्रियनिष्ठ जीवन सोडण्याला तयार नव्हतां! तुमच्या व्यक्तित्वांत असें काय आहे? तें त्या डुकराच्या जीवनाहून अधिक चांगलें आहे का? आणि तें तुम्ही सोडूं इच्छीत नाही! केवढें हें आश्चर्य!

वेदान्त आपल्याला काय शिकवतो ? प्रथमत: तो हें शिकवितो की सत्य जाणण्यासाठी तुम्हांला स्वत:च्या बाहेर देखील जायला नको. समस्त भूतकाल आणि समस्त भविष्यकाल इथे या वर्तमानांतच आहे. कोणींहि कधींहि भूतकाल पाहिला नाही. तुमच्यापैकी कोणींतरी भूतकाल पाहिला आहे काय ? जेव्हा तुम्हांला असें वाटतें की आपण भूतकाल जाणत आहोंत तेव्हा वस्तुत: तुम्ही भूतकालाची वर्तमान क्षणांतच कल्पना करतां. भविष्यकाल पाहण्यासाठी तुम्हांला त्याला वर्तमानांत आणावें लागतें--वर्तमानच केवळ सत्य आहे. अन्य सर्व कल्पनाविलास आहे. वर्तमानच काय तो सारेंकांही आहे. तोच एममेव आहे. सर्वकांही इथे व या क्षणीं आहे. अनंत कालांतील एक क्षण हा इतर प्रत्येक क्षणाइतकाच पूर्ण व सर्वसमावेशक आहे. जें जें आहे, जें जें होतें व जें जें होईल तें सर्व इथे वर्तमानांतच आहे. कोणींहि वर्तमानाच्या बाहेर कशाचीहि कल्पना करण्याचा प्रयत्न करावा, त्याला यश येणार नाही.

कोणता धर्म असा स्वर्ग चित्रित करूं शकतो की जो या पृथ्वीसारखा नाही ? ही सर्व केवळ चित्रित करण्याची कला आहे, फक्त ही कला आपल्याला क्रमश: ज्ञात होत आहे, एवढेंच. पांच इंद्रियांनी युक्त असे आपण या जगाकडे पाहतों आणि तें स्थूलत्व, रंग, रूप, शब्द, इत्यादींनी युक्त असें आपल्याला आढळतें. समजा, मला नवें विद्युत्-इंद्रिय प्राप्त झालें. मग सर्वकांही बदलेल. समजा माझीं इंद्रियें सूक्ष्म झालीं, तर तुम्ही सर्व मला निराळे दिसाल. मी बदलेन तर तुम्हीहि बदलाल. मी जर इंद्रियांच्या सामर्थ्यापलीकडे जाईन तर तुम्ही मला आत्मा, ईश्वर दिसाल. वस्तु जशा दिसतात तशा नसतात.

हें सर्व आपल्याला हळूहळू समजेल आणि मग आपल्याला दिसेल की सर्व स्वर्ग--सर्वकांही इथे व या क्षणीं आहेत आणि वस्तुत: ते ईश्वरी सत्तेवर होणारे आभास आहेत, यापलीकडे कांही नाही. ही सत्ता सर्व पृथ्वी व स्वर्ग यांपेक्षा फार श्रेष्ठ आहे. लोक समजतात की हें जग वाईट आहे, आणि कल्पना करतात की स्वर्ग इतरत्र कुठेतरी आहे. हें जग वाईट नाही. तुम्ही जर त्याला यथार्थपणें जाणाल तर जग म्हणजे स्वत: ईश्वरच आहे. हें नुसतें समजून घेण्यालाहि कठीण आहे, त्यावर विश्वास ठेवण्यापेक्षाहि तें कठीण आहे. उद्या फासावर लटकणार असलेला खुनी इसमहि ईश्वर आहे, पूर्ण ईश्वर आहे. खचितच हें समजण्यास फार कठीण आहे, पण तें समजलें जाऊं शकतें.

म्हणूनच वेदान्त आपल्यासमोर विश्वबंधुत्व मांडीत नाही, तर वैश्विक एकात्मता मांडतो. चांगला, वाईट, कसाहि, कोणीहि मनुष्य किंवा कोणीहि पशु व मी एकच आहोंत. इथून-तिथून एकच शरीर, एकच मन, एकच आत्मा आहे. आत्मा कधीच मृत्यु पावत नाही. मृत्यु कुठेच नाही, शरीराला देखील मृत्यु नाही. मन देखील मरण पावत नाही. शरीर देखील कसें बरें मरेल ? एखादें पान गळून पडेल, पण म्हणून वृक्ष मरतो काय ? हें विश्व हेंच माझें शरीर आहे. पाहा तें कसें सतत टिकून आहे. सर्व मनें माझींच आहेत. सर्व चरणांनी मीच चालतों. सर्व मुखांनी मीच बोलतों. प्रत्येक शरीरांत मीच वास करतों.

याची अनुभूति मला कां होऊं शकत नाही ? माझ्या ह्या व्यक्तित्वामुळे--भ्रमामुळे. या मनाशीं तुम्ही बांधले गेलां आहांत आणि म्हणून तुम्ही इथेच राहूं शकतां, अन्यत्र नाही. अमरत्व काय आहे ? 'ते ह्या इथेच आहे--आपल्या सत्स्वरूपाचें ज्ञान

हेंच अमरत्व होय' असें किती थोडे लोक उत्तर देतात! अधिकांश लोक समजतात की, हें सर्व नश्वर वा जड आहे--आणि ईश्वर इथे नाही, आणि आपण स्वर्गाला जाण्यानेच अमर होऊं. त्यांची कल्पना असते की मृत्यूनंतरच ते ईश्वराला पाहतील. पण ते जर त्याला इथे आणि आता पाहणार नाहीत तर मृत्यूनंतरहि तो त्यांना दिसणार नाही. त्या सर्वांचा जरी अमरत्वावर विश्वास असला तरी ते हें जाणत नाहीत की मरणानंतर स्वर्गाला जाण्याने अमरत्व प्राप्त होत नाही, तर ह्या भ्रामक क्षुद्र व्यक्तित्वाचा त्याग केल्याने, एका लहानशा शरीराशीं स्वतःला बांधून न घेण्याने तें प्राप्त होतें. सर्वांशीं एकात्मतेची जाणीव होणें, सर्व शरीरांत वास करणें, सर्व मनांच्या द्वारा अनुभव घेणें हेंच अमरत्व आहे. ह्या आपल्या शरीराखेरीज इतर शरीरांतहि आपण असल्याची अनुभूति येणें शक्य आहे--ती आपल्याला येईलच येईल. सहानुभूति म्हणजे तरी काय? या सहानुभूतीला, दुसरीं शरीरें देखील आपलींच आहेत अशा या सह-अनुभूतीला कांही मर्यादा आहे काय? अशी एक वेळ येणें शक्य आहे की जेव्हा मला संपूर्ण विश्वांत स्वतःची अनुभूति येईल.

यापासून काय लाभ आहे? या भ्रामक व क्षुद्र शरीराचा त्याग करणें कठीण आहे. या एका लहानशा भ्रामक शरीराचा उपभोग सोडण्याचें आम्हांला दुःख होतें! 'हें सोडून द्या' असें वेदान्त सांगत नाही; वेदान्त म्हणतो, 'त्याच्या पलीकडे जा.' देहदंडाची, देहाला यातना देण्याची आवश्यकता नाही. दोन शरीरांचा उपभोग चांगला राहील. तीन शरीरांचा अधिक चांगला. एकाहून अधिक शरीरांत राहणें किती चांगलें! मी जेव्हा संपूर्ण विश्वाच्या द्वारा उपभोग घेऊं शकतों तेव्हा संपूर्ण विश्वच माझें

शरीर होऊन जातें.

पुष्कळ लोक असे आहेत की ज्यांना ही शिकवण ऐकून धडकी भरते. आपण जुलमी ईश्वराने निर्माण केलेलीं केवळ क्षुद्र शरीरें नाहीं हें सांगितलेलें ऐकणें त्यांना आवडत नाही. मी त्यांना म्हणतों, "वर या ! उन्नत व्हा !" ते म्हणतात, "आम्ही पापांत जन्मलों आहोंत--आम्ही कोणाच्या तरी कृपेशिवाय वर येऊं शकत नाहीं." मी म्हणतों, "तुम्हीं ईश्वरी स्वरूपाचे आहांत." ते उत्तरतात, "हे ईश्वरनिंदका ! असें बोलण्याचें धाडस तुला कसें होतें ? दीनदुबळा असा प्राणी ईश्वर कसा असूं शकेल ? आम्ही पापी आहोंत !" कांही वेळां मी अत्यंत निरुत्साहित होतों. शेकडो स्त्रीपुरुष मला सांगतात, "नरक जर नसेल तर कोणताहि धर्म तरी कसा राहूं शकेल ?" हे लोक स्वेच्छेने जर नरकाला जाणार असतील तर त्यांना कोण रोखूं शकेल ?

ज्याचें तुम्ही स्वप्न पाहतां, अगर ज्याचा तुम्ही विचार करतां, तेंच तुम्ही निर्माण करतां. तें स्वप्न नरकाचें असेल तर तुम्ही मृत्यूनंतर नरकच पाहाल. तें जर वाइटाचें व सैतानाचें असेल तर तुम्हांला सैतान भेटेल. भूतपिशाच्चाचें असेल तर भूतपिशाच्च तुम्हांला दिसतील. ज्या कशाचा तुम्ही विचार कराल, तें तुम्ही व्हाल. तुम्हांला जर विचार करायचाच असेल तर चांगले विचार, थोर विचार करा. आपण दुबळे क्षुद्र जंतु आहोंत असें आपण गृहीतच धरतों ! आपण दुबळें आहोंत असें म्हटल्याने आपण दुबळें होऊं, चांगले होणार नाहीं. समजा, आपण दिवा मालवला, खिडक्या बंद केल्या आणि मग खोली अंधारी आहे असें म्हटलें. किती हा मूर्खपणा ! मी पापी आहें असें म्हटल्याने माझें कोणतें भलें होणार आहे ? मी जर अंधारांत आहें तर

मला दिवा लावावयास हवा, सर्व अंधार नाहीसा होईल. पण माणसाचा स्वभाव कसा चमत्कारिक आहे पाहा ! जरी त्याला नेहमी जाणीव असते की आपल्या जीवनाच्या पाठीमागे विश्वात्मा आहे, तरी तो सैतान, अंधार, असत्य यांचाच अधिक विचार करतो. तुम्ही त्याला सत्य सांगा--तो तें पाहणार नाही. त्याला अंधार अधिक प्रिय असतो.

वेदान्ताने विचारलेला हाच एक मोठा प्रश्न आहे. लोक इतके कां भितात ? याचें उत्तर असें की, लोकांनी स्वतःला असहाय व परावलंबी बनविलें आहे. आपण इतके आळशी आहोंत की आपल्याला स्वतः कांही करण्याची इच्छा नसते. आपल्यासाठी सर्वकांही करावयास आपल्याला एखादा सगुण ईश्वर, एखादा त्राता किंवा एखादा प्रेषित हवा असतो. फार श्रीमंत मनुष्य कधी चालत नाही, नेहमी गाडींतून फिरतो; पण कांही वर्षांच्या अवधींत एखाद्या दिवशीं त्याचें सर्व शरीर लुळें पडलें असल्याचें त्याच्या लक्षांत येतें. तेव्हा त्याला वाटायला लागतें की आपण ज्या रीतीने जगलों ती मुळीच चांगली नव्हती ! माझ्यासाठी कोणी चालूं शकणार नाही. माझ्याकरिता जेव्हा जेव्हा दुसरा कोणी चालला, तेव्हा तेव्हा तें माझ्या अनिष्टालाच कारणीभूत झालें. एखाद्यासाठी सर्वकांही जर दुसऱ्याने केलें तर तो स्वतःच्या अवयवांचा उपयोग करण्याचें सामर्थ्य घालवून बसेल. जी गोष्ट आपण स्वतः करतों तीच खरी खरी आपण केली असें म्हणतां येईल. जें कांही आपल्यासाठी दुसऱ्या कोणीं केलेलें असतें तें कधीहि आपलें होऊं शकत नाही. तुम्ही माझ्या व्याख्यानावरून आध्यात्मिक सत्यें शिकूं शकणार नाही. तुम्ही जर कांही शिकलां असाल, तर मी केवळ तें प्रज्वलित करणारा

एक स्फुलिंग आहें. प्रेषित व आचार्य फक्त एवढेंच करूं शकतात. मदतीसाठी कुणाच्या मागे धावणें हें मूर्खपणाचें आहे.

तुम्हांला माहीत असेल की भारतांत बैलगाड्या आहेत. सामान्यत: दोन बैल गाडीला जुंपले जातात आणि कधी कधी बैलांच्या समोर, पण त्यांचें तोंड पोहोचणार नाही एवढ्या अंतरावर एका दांड्याच्या टोकाला गवताची पेंढी लटकावलेली असते. बैल पेंढी खाण्याचा सतत प्रयत्न करीत असतात, पण त्यांना कधीच यश मिळत नाही. अगदी याचप्रमाणे आपल्याला इतरांची मदत होत असते ! आपण असें समजतों की, आपल्याला बाहेरून संरक्षण, सामर्थ्य, शहाणपण, सुख मिळणार आहे. आपण नेहमी अशी आशा करतों; पण ती कधीच पूर्ण होत नाही. केव्हाहि कोणतीहि मदत बाहेरून मिळत नाही.

मनुष्याला कोणीहि मदत करीत नाही--कधी केली नव्हती, आता करीत नाही आणि पुढेहि करणार नाही. आणि ती कां करावी ? तुम्ही 'माणसें' नाही काय ? पृथ्वीच्या स्वामींना इतरांनी मदत करायची असते का ? तुम्हांला याची लाज वाटत नाही ? तुम्हीं क्षुद्र बनाल तरच तुम्हांला मदत मिळेल. पण तुम्ही आत्मा आहांत. स्वत:च स्वत:ला संकटांतून बाहेर काढा ! स्वत:च स्वत:चा उद्धार करा ! तुम्हांला मदत करण्याला कोणीहि नाही--कधी नव्हतें. असें कोणी आहे असें समजणें हा गोड भ्रम आहे. यांतून कांही चांगलें निष्पन्न होणार नाही.

एकदा एक ख्रिस्ती माणूस मजकडे आला आणि म्हणाला, तुम्ही भयंकर पापी आहांत. मीं उत्तर दिलें, "होय, मी आहें. पुढे बोला." तो एक ख्रिस्ती मिशनरी होता. तो मला स्वस्थता

मुळीच लाभूं देईना. तो मला दिसतांच मी तेथून पसार होतों. तो म्हणाला, "माझ्याजवळ तुमच्यासाठी पुष्कळ चांगल्या गोष्टी आहेत. तुम्ही पापी आहांत आणि नरकांत जाणार आहांत." मी उत्तरलों, "फार उत्तम. आणखी काय ?" मीं त्याला विचारलें, "तुम्हीं कुठे जाणार आहांत ?" "मी स्वर्गाला जाणार आहें" ---त्याने उत्तर दिलें. मी म्हणालों, "मी नरकांत जाईन." त्या दिवशीं त्याने माझा पिच्छा सोडला.

एक ख्रिस्ती मनुष्य येतो आणि म्हणतो, "तुमचा सर्वनाश होणार आहे. पण तुमचा जर या सिद्धान्तावर विश्वास असेल तर ख्रिस्त तुम्हांला वर येण्यास मदत करील." हें जर खरें असतें--पण अर्थात् हा नुसता भ्रमच आहे--तर ख्रिस्ती देशांत पाप व दुष्टपणा राहिलाच नसता. समजा आपण त्याच्यावर विश्वास ठेवला--कारण विश्वास ठेवण्यांत कांहीच खर्च होत नाहीं--पण त्याचा कांही परिणाम कां होत नाही ? मीं जर विचारलें की, इतके पापी व दुष्ट लोक मग कां आहेत ? तर ते म्हणतात, "आपल्याला अधिक कार्य केलें पाहिजे." ईश्वरावर श्रद्धा ठेवा पण स्वतः प्रयत्न करण्यास तयार राहा ! ईश्वराची प्रार्थना करा व त्याला येऊं द्या व तुम्हांला मदत करूं द्या ! पण मीच झगडतों, मीच प्रार्थना करतों, मीच उपासना करतों; मीच माझे प्रश्न सोडवितों--आणि श्रेय ईश्वराकडे जातें. हें चांगलें नाही. मी असें कधी करीत नाहीं.

एकदा मला भोजनाचें निमंत्रण होतें. यजमानणीने भोजनाच्या प्रारंभीं ईश्वराला धन्यवाद देऊन त्याची प्रार्थना करण्यास मला सांगितलें. मीं म्हटलें, "बाईसाहेब, मी तुम्हांला धन्यवाद देईन. मी तुमचाच आभारी आहें." मी जेव्हा काम

करतों तेव्हा मी स्वतःचीच प्रार्थना करून स्वतःलाच धन्यवाद देतों. मीं खूप परिश्रम करून, जें कांही माझ्याजवळ आहे तें मिळविलें. यांत माझीच स्तुति आहे, माझाच गौरव आहे !

सर्वकाळ तुम्ही कष्ट करतां आणि दुसऱ्या कोणालातरी धन्यवाद देतां, कारण तुम्ही धर्मभोळे आहांत, तुम्ही भित्रे आहांत. हजारो वर्षें पोसले गेलेले हे भ्रामक विचार आता पुरे! आध्यात्मिक होण्यासाठी थोडे परिश्रम आवश्यक आहेत. धर्मभोळ्या भ्रामक समजुती म्हणजे जडवाद होय; कारण त्या सर्व शरीराच्या--केवळ शरीराच्याच जाणिवेवर आधारलेल्या आहेत. त्यांत आत्म्याचा विचार नाही. आत्म्याच्या ठायीं भ्रामक समजुती नाहीत--तो शरीराच्या असार वासनांच्या पलीकडे आहे.

पण कांही ठिकाणीं या वासना आध्यात्मिक क्षेत्रांतहि घुसविल्या जात आहेत. मी अशा अनेक बैठकींना उपस्थित राहिलों आहें की जिथे परलोकविद्येचे प्रयोग केले जात. एका बैठकींत नेतृत्व एका स्त्रीकडे होतें. ती मला म्हणाली, "तुमची आई व आजोबा माझ्याकडे येतात." ते तिला अभिवादन करत व तिच्याशीं बोलत असें ती म्हणाली. पण माझी आई तर अद्याप जिवंत आहे! आपले नातेवाईक मरणानंतरहि त्याच शरीरांत वास करतात हा विचार लोकांना आवडतो, आणि हे परलोकविद्यावादी त्यांच्या भोळ्या समजुतीचा फायदा घेतात. माझे वडील मरणानंतरहि अद्याप आपलें ओंगळ शरीर धारण करून आहेत हें जाणून मला खेद होईल. आपले पूर्वज हे जडांत आबद्ध आहेत या कल्पनेने लोकांचें समाधान होतें. दुसऱ्या एका ठिकाणीं अशाच लोकांनी येशू ख्रिस्तांना माझ्याकडे आणलें. मीं म्हटलें, "प्रभो! आपलें कसें चाललें आहे?" हें सारें पाहून मी निरुत्साही

होतों. तो महापुरुष जर अद्याप शरीर धारण करून असेल तर आम्हां दीन प्राण्यांचें कसें व्हावें ? या परलोकविद्यावाद्यांनी मला त्यांनी बोलाविलेल्या कोणत्याहि प्रेतात्म्याला स्पर्श करूं दिला नाहीं. ते जरी खरोखरच असते तरी ते मला नको होते. मी विचार करतों, 'हे जगन्माते लोक खरोखरी नास्तिक आहेत ! केवळ या पंचेंद्रियांची वासना ! इहलोकीं जें त्यांना उपलब्ध आहे त्यावर ते संतुष्ट नाहीत, तर त्यांना तसलेंच कांही मृत्यूनंतरहि पाहिजे आहे !'

वेदान्ताचा ईश्वर काय आहे? तो तत्त्व आहे, व्यक्ति नाही. तुम्ही आणि मी--आपण सर्व व्यक्तिरूपांतील ईश्वर आहोंत. विश्वाचा सर्वेश्वर--उत्पत्ति, स्थिति आणि प्रलय यांचा कर्ता हा निर्गुण, निराकार तत्त्व आहे. तुम्ही आणि मी--मांजर, उंदीर, सैतान, भूत, हीं सारीं त्याचीं रूपें आहेत--हीं सर्व व्यक्तिरूपांतील ईश्वर आहेत. तुम्हांला व्यक्तिरूपांतील ईश्वराची उपासना करणें आवडतें. ती तुमच्या स्वतःचीच उपासना आहे. तुम्ही माझा सल्ला ऐकाल तर तुम्ही कोणत्याहि चर्चमध्ये जाणार नाही. बाहेर या आणि स्वतःचें प्रक्षालन करा. शेकडो वर्षांत तुम्हांला ज्या भ्रामक कल्पना जडल्या आहेत त्या पूर्णपणें धुऊन जाईपर्यंत स्वतःचें वारंवार प्रक्षालन करा. कदाचित् असें करणें तुम्हांला रुचणार नाही, कारण या देशांत तुम्ही स्वतःचें अंग वरचेवर धूत नाही--वारंवार प्रक्षालन ही भारतीय रीत आहे, तुमच्या समाजाची नाही.

मला पुष्कळ वेळां विचारण्यांत आलें आहे; "तुम्ही इतके हसतां कां आणि इतका विनोद कां करतां ?" मी कांही वेळेला गंभीर होतों--जेव्हा माझें पोट दुखत असतें तेव्हा ! ईश्वर हा पूर्ण आनंदस्वरूप आहे. जें कांही अस्तित्वांत आहे त्याची आधारभूत

सत्ता तोच आहे. प्रत्येक वस्तूंतील शिव व सत्य तोच आहे तुम्ही त्याचे अवतार आहांत. हेंच तुमचें ऐश्वर्य आहे. तुम्ही त्याच्या जितके निकट असाल तितके रडण्याओरडण्याचे कमी प्रसंग तुमच्यावर येतील. त्याच्यापासून आपण जेवढें अधिक दूर असूं तेवढे उदास चेहरे होण्याचे प्रसंग अधिक येतील. त्याच्यासंबंधी आपल्याला जितकें अधिक ज्ञान होईल तितकें दुःखदैन्य अधिकाधिक नाहीसें होईल. ईश्वरांत स्थित असणारा जर दुःखी झाला तर त्याच्यांत स्थित राहण्याचा काय उपयोग ? अशा ईश्वराचा काय उपयोग ? त्याला पॅसिफिक महासागरांत फेकून द्या ! आपल्याला त्याची जरूर नाही.

पण ईश्वर म्हणजे अनंत निर्गुण सत्ता आहे--नित्यवर्तमान, अपरिवर्तनशील, अविनाशी, भयशून्य असा तो आहे; आणि तुम्ही सर्व त्याचे अवतार, त्याचीं सगुण रूपें आहांत. वेदान्ताचा ईश्वर हा असा आहे आणि या ईश्वराचा स्वर्ग सर्वत्र आहे. या स्वर्गांत सर्व व्यक्त देव अर्थात् तुम्ही स्वतः वास करतां. देवळांत प्रार्थना करणें व फुलें वाहणें सोडून द्या !

तुम्ही कशासाठी प्रार्थना करतां ?--स्वर्गाला जाण्यासाठी, कांहीतरी प्राप्त करण्यासाठी आणि दुसऱ्या कोणालातरी तें मिळूं नये यासाठी. "ईश्वरा, मला अधिक अन्न पाहिजे ! दुसरा कोणी तरी खुशाल उपाशी राहूं दे !" जो सत्स्वरूप, अनंतस्वरूप आहे, जो अखंड असून ज्यांत कांहीहि दोष नाही, जो नित्यमुक्त, नित्यशुद्ध, नित्यपूर्ण आहे त्या परमेश्वराविषयीची काय ही कल्पना ! आपण त्याला आपल्यासारखे सर्व मानवी गुण, कार्यें व मर्यादा चिकटवितों. त्याने आपल्याला अन्न आणून द्यावें व आपल्याला वस्त्रें द्यावीं ! वस्तुतः सर्व गोष्टी आपल्याला स्वतःलाच कराव्या

लागतात. या गोष्टी केव्हाहि कोणींहि आमच्याकरिता केल्या नाहीत. हें अगदी उघड सत्य आहे.

पण तुम्ही क्वचितच याचा विचार करतां. तुम्ही अशी कल्पना करतां की, असा एक ईश्वर आहे की ज्याचे तुम्ही विशेष लाडके आहांत आणि जो तुमच्यासाठी तुम्ही म्हणाल तें सर्वकांही करतो. आणि तुम्ही त्याच्याजवळ सर्व माणसांसाठी, सर्व प्राण्यांसाठी इष्ट गोष्टींची मागणीं करीत नाही, तर फक्त तुमच्यासाठी, तुमच्या कुटुंबासाठी, तुमच्याच लोकांसाठी त्या मागतां. जेव्हा हिंदु उपाशी असेल तेव्हा तुम्ही पर्वा करीत नाही; त्या वेळीं तुम्ही असा विचार करीत नाही की ख्रिस्त्यांचा ईश्वर हाच हिंदूंचाहि ईश्वर आहे. ईश्वराविषयीची आपली सर्व कल्पना, आपली प्रार्थना, आपली उपासना इत्यादि सर्वकांही आपल्या अज्ञानामुळे, आपल्या स्वतःविषयीच्या मूढ देहबोधामुळेच विकृत झालें आहे. मी जें सांगतों आहें तें तुम्हांला कदाचित् आवडणार नाही. तुम्ही मला आज शापहि द्याल, पण उद्या तुम्ही मला आशीर्वाद द्याल.

आपण चिंतनशील, विवेकी झालें पाहिजे. प्रत्येक जन्म हा दुःखपूर्ण आहे. आपण जडवादांतून बाहेर पडलें पाहिजे. महामाया तिच्या पकडींतून आपल्याला सुटूं देणार नाहीं; पण तरीहि आपण प्रयत्न केला पाहिजे. हा प्रयत्न म्हणजेच आपली सर्व उपासना होय. बाकी सारेंकांही असार आहे. तुम्ही व्यक्त ईश्वर आहां; या क्षणीं मी तुमची पूजा करीत आहें. ही सर्वांत थोर उपासना आहे. सर्व जगाची पूजा या अर्थानें करा--जगाची सेवा म्हणजेच जगाची पूजा होय. या उंच व्यासपीठावर उभें राहणें पूजा करण्यासारखें दिसत नाही हें मी जाणतों; पण ती जर 'सेवा'

असेल तर ती पूजा आहे.

अनंत सत्य हें कधीच 'मिळवायचें' नसतें. तें शाश्वत सत्य सर्वकाळ इथेच आहे. विश्वाचा तो स्वामी प्रत्येकांत आहे. देऊळ फक्त एकच आहे आणि तें म्हणजे शरीर. अस्तित्वांत असलेलें तेंच एकमेव देऊळ आहे. या शरीरांत तो राजाधिराज परमात्मा वास करतो हें आपल्याला दिसत नाही, म्हणून आपण त्याच्या दगडी प्रतिमा करतों व त्यावर देवालयें उभारतों. वेदान्त सर्वकाळ भारतांत होताच, पण भारतांत अशीं देवळें सर्वत्र आहेत--आणि नुसतीं देवळेंच नव्हेत तर कोरीव प्रतिमा असलेल्या गुहाहि आहेत. "गंगेच्या कांठीं राहत असूनहि मूर्ख मनुष्य पाण्यासाठी विहीर खणतो"--असें आहोंत आपण ! ईश्वरांतच वास करीत असूनहि बाहेर प्रतिमा करायच्या ! प्रतिमांच्या रूपांत आपण त्याला बाहेर पाहतों, पण तो तर सर्वकाळ आपल्या शरीराच्या देवळांतच असतो. आपण वेडे आहोंत, आणि हा आपला मोठा भ्रम आहे.

सर्वकांही ईश्वरच आहे असें समजून त्याची उपासना करा --प्रत्येक रूप हें त्याचें मंदिर आहे. बाकी सारेंकांही मिथ्या आहे. नेहमी आंत पाहा, बाहेर कधी पाहूं नका. वेदान्त उपदेशितो तो ईश्वर हा असा आहे, आणि त्याची पूजा ही अशी आहे. साहजिकच वेदान्तांत पंथ, संप्रदाय, जाति, कांही नाही. हा धर्म अवघ्या भारताचा धर्म कसा होऊं शकेल ?

शेकडो जाति ! एकाने दुसऱ्याच्या अन्नाला स्पर्श केला तर तो ओरडतो, 'अरे देवा ! मला विटाळ झाला ! धांव !' मी जेव्हा पाश्चात्त्य देशांचा प्रवास संपवून परत भारतांत गेलों तेव्हा पुष्कळशा पुराणमतवादी हिंदूंनी, मी पाश्चात्त्यांशीं मिसळल्याबद्दल व जुन्या रूढी भंग केल्याबद्दल ओरड केली. मीं पाश्चात्त्य

लोकांना वेदांतील सत्यांची शिकवण दिली ही गोष्ट त्यांना आवडली नाही.

पण हे भेद सत्य कसे असूं शकतील ? आपण सर्वजण जर आत्मा आहोंत, एकरूप आहोंत तर श्रीमंताने गरिबाला नाक मुरडणें व विद्वानाने अज्ञांचा तिरस्कार करणें कसें शक्य आहे ? जोंपर्यंत समाज बदलत नाही तोंपर्यंत वेदान्तासारख्या धर्माचा प्रभाव कसा पडेल ? खऱ्या अर्थाने विचारी व बुद्धिमान असे बहुसंख्य लोक निर्माण होण्यासाठी हजारो वर्षें लागतील. लोकांसमोर नव्या गोष्टी मांडणें, त्यांना थोर विचार देणें ही फार कठीण गोष्ट आहे. जुन्या भ्रामक समजुती नष्ट करणें हें त्याहून कठीण आहे, फार कठीण आहे; त्या सहजासहजी नाहीशा होत नाहीत. शिक्षित मनुष्य देखील, इतकें शिक्षण मिळूनहि, अंधारांत भितो--बालपणीं ऐकल्या-वाचलेल्या गोष्टी त्याला आठवतात आणि त्याला भुतें दिसायला लागतात.

वेदान्त हा शब्द ज्यापासून निघाला आहे त्या वेद या शब्दाचा अर्थ ज्ञान असा आहे. सर्व ज्ञान हें वेद असून तें ईश्वराइतकेंच अनंत आहे. कोणीहि कधीहि ज्ञान निर्माण करीत नाही. ज्ञानाची निर्मिति झालेली कधी तुम्हीं पाहिली आहे ? ज्ञानाचा फक्त आविष्कार होतो--जें झाकलेलें होतें तें उघड केलें जातें. तें सदा इथे, आपल्या आंतच आहे, कारण तें स्वयं ईश्वर आहे. भूत, भविष्य, वर्तमान, सर्व प्रकारचें ज्ञान आपणां सर्वांमध्येच विद्यमान आहे. आपण त्याचा आविष्कार करतों, इतकेंच. हें सर्व ज्ञान म्हणजे स्वयं ईश्वर आहे. वेद हे थोर संस्कृत ग्रंथ आहेत. आमच्या देशांत वेदपाठकासमोर आम्ही नतमस्तक होऊन जातों, आणि पदार्थविज्ञानाचा अभ्यास करणाऱ्याकडे आम्ही लक्ष देत नाहीं.

हा आमचा भ्रम आहे; हा वेदान्त नव्हे. हा शुद्ध जडवाद आहे. ईश्वराला सर्वच ज्ञान पवित्र आहे. ज्ञान हेंच ईश्वर आहे. अनंत ज्ञान प्रत्येकांत पूर्णतः विद्यमान आहे. तुम्ही जरी अज्ञ दिसत असलां तरी वस्तुतः तुम्ही तसे नाही. तुम्ही सर्वजण ईश्वराचे अवतार आहांत. सर्वशक्तिमान, सर्वव्यापी, दिव्यस्वरूप अशा परमात्म्याचे तुम्ही अवतार आहांत. आता तुम्ही मला हसाल, पण एक वेळ अशी येईल की जेव्हा तुम्हांला हें उमजेल. तुम्हांला तें उमजलेंच पाहिजे, कोणीहि वगळला जाणार नाही.

तर मग लक्ष्य काय आहे ? ज्या वेदान्तासंबंधी मीं सांगितलें तो कांही नवा धर्म नाही, तो कितीतरी प्राचीन आहे-- स्वतः परमेश्वराइतकाच तो प्राचीन आहे. तो कोणत्याहि स्थलकालापुरता मर्यादित नाही, तो सर्वत्र आहे. प्रत्येकांत हें सत्य विद्यमान आहे. आपण सर्वजण त्या सत्याची प्राप्ति करून घेण्याचा प्रयत्न करीत आहोंत. सर्व विश्वाचें लक्ष्य हेंच आहे. हें बाह्य प्रकृतीलाहि लागू आहे--प्रत्येक अणु त्याच लक्ष्याकडे धांव घेत आहे. आणि तुमची अशी कल्पना आहे का की अनंत व शुद्ध अशा आत्म्यांपैकी एखाद्याच्याहि ठायीं हें सर्वश्रेष्ठ सत्याचें ज्ञान स्वरूपतः नाही ? तें ज्ञान सर्वांच्या ठायीं वसत आहे. आपल्या मूळ, दिव्य स्वरूपाचा साक्षात्कार करून घेण्याच्या त्या ध्येयाकडेच सर्वजण जात आहेत. वेडा, खुनी, धर्मभोळा व ज्याचें शरीर या देशांत तुम्ही जिवंतपणीं सोलतां तो देखील त्याच लक्ष्याकडे प्रवास करीत आहे. आवश्यकता याच गोष्टीची आहे की जें आपण अजाणतां करतों तें आपण जाणीवपूर्वक व अधिक चांगल्या रीतीने केलें पाहिजे.

सर्व वस्तूंच्या ऐक्याचें अधिष्ठान असा जो आत्मा तो

मूलतः तुम्हां सर्वांच्या ठायीं आहेच. तो ज्याच्या ठायीं नाही असा कोणीहि कधी जन्मला नाही. तुम्ही कितीहि नाकारा, तो सर्वदा आहेच. मानवी प्रेम काय आहे ? तें म्हणजे कमीअधिक प्रमाणांत त्या ऐक्यरूप आत्म्याचीच अभिव्यक्ति होय--'माझी पत्नी, माझें मूल, माझा मित्र यांच्याशीं मी एकरूप आहें' या सत्याचीच ती अभिव्यक्ति आहे. इतकेंच की हें ऐक्य तुम्ही अजाणतां कबूल करीत आहांत. "पतीसाठी पतीवर कोणींच कधी प्रेम केलें नाहीं, तर त्याच्यांत असणाऱ्या आत्म्यासाठीच प्रेम केलें जातें." पत्नी ही आपल्या पतींत आत्म्यालाच पाहते. पति आपल्या आत्म्याला पत्नींत पाहतो--हें तो सहजप्रवृत्तीमुळे करतो, पण ज्ञानपूर्वक, जाणीवपूर्वक तो तसें करूं शकत नाही.

संपूर्ण विश्वांत एकच एक सत्ता आहे. त्यांत दुसरें कांहीच असूं शकत नाही. अनेकत्वांतून आपण सर्व याच एकमेव सत्तेकडे जात आहोंत. कुटुंबें कुलांत, कुलें जातींत, जाति राष्ट्रांत, राष्ट्रें मानवतेंत लीन होत आहेत--सर्वांचीच एकत्वाकडे जाण्याची इच्छा असते ! सर्व ज्ञान, सर्व शास्त्रें म्हणजे या ऐक्याचा साक्षात्कारच होय.

एकता म्हणजे ज्ञान, अनेकता म्हणजे अज्ञान. हें ज्ञान हा तुमचा जन्मसिद्ध हक्क आहे. त्यासंबंधी मीं तुम्हांला शिकविण्याची जरूरी नाही. जगांत केव्हांहि भिन्न भिन्न धर्म नव्हते. आपण सर्व मुक्त होणारच--मग तशी आपली इच्छा असो अगर नसो. दीर्घकालाने का होईना पण तुम्ही मुक्ति मिळवालच, कारण मुक्ति हा तुमचा स्वभावच आहे. आपण आधीचेच मुक्त आहोंत --आपल्याला त्याची जाणीव नाही, एवढेंच. आपण काय करीत असतों हें आपल्याला कळत नाही. सर्व धर्म आणि सर्व आदर्श

यांच्यांत एकच नीति आहे; त्यांनी फक्त एकच गोष्ट उपदेशिली आहे, आणि ती म्हणजे 'स्वार्थरहित व्हा, इतरांवर प्रेम करा.' एक म्हणतो, "कारण जिहोवाची तशी आज्ञा आहे." महंमदाने उद्घोष केला, "अल्लाने तसें सांगितलें आहे." दुसरा ओरडून सांगतो, "येशूचें तसें म्हणणें आहे." ती जर केवळ जिहोवाची आज्ञा असती तर जे जिहोवाला जाणत नाहीत त्यांच्यापर्यंत ती कशी आली असती ? केवळ येशूने ही आज्ञा दिली असती तर ज्या कोणाला येशू कधी माहीत नाही त्याला ती कशी मिळाली असती ? जर ती फक्त विष्णूची असती तर ज्यांना विष्णु म्हणजे कोण हें कधी ठाऊक नाही त्या यहुद्यांना ती कशी मिळाली असती ? या सर्वांहून श्रेष्ठ असें तिचें एक निराळेंच उगमस्थान आहे. तें कुठे आहे ? ईश्वराच्या त्या चिरंतन देवळांत--निकृष्ट प्रतीच्या जीवांपासून तों श्रेष्ठ प्रकारच्या जीवांपर्यंत, सर्वांच्या आत्म्यांत तें आहे. तो अनंत निःस्वार्थपणा, तो अनंत त्याग, एकतेकडे परत जाण्याची ती अनंत ओढ हीं सारीं आत्म्यांतच आहेत.

आपल्या अज्ञानामुळे आपण विभागलेले आणि समर्याद असे दिसतों. यामुळेच आपण जणुकांही संकुचित व्यक्तित्व असलेले 'श्रीयुत अमुक' व 'श्रीमती अमुक' असें झालों आहोंत. पण संपूर्ण प्रकृति हें प्रतिक्षणी खोटें ठरवीत आहे. इतर सर्वांपासून तोडलेला असा एक क्षुद्र पुरुष किंवा क्षुद्र स्त्री मी नाहीं, तर मीच ती सर्वव्यापक अशी एकमेव सत्ता आहें. आत्मा आपल्या ऐश्वर्याने प्रतिक्षणीं प्रकट होत आहे, आणि आपलें मूळ दिव्य स्वरूप उद्घोषित करीत आहे.

हा वेदान्त सर्वत्र आहे, इतकेंच की, तुम्हांला त्याची

जाणीव झाली पाहिजे. असंख्य वेडगळ समजुती व भ्रामक कल्पना आपल्या प्रगतींत अडथळा उत्पन्न करतात. शक्य असेल तर या समजुतींना आपण फेकून देऊं या, आणि ईश्वर हा आत्मतत्त्व आहे आणि त्याची उपासना आत्मस्वरूपांत व सत्यस्वरूपांत करावयाची आहे हें जाणूं या. जडवादी होऊं नका. सर्व जडाचा त्याग करा. ईश्वराची कल्पना ही खऱ्या अर्थानें आध्यात्मिक असली पाहिजे. ईश्वराविषयीच्या कमीअधिक प्रमाणांत जडवादी असणाऱ्या सर्व कल्पना नाहीशा झाल्या पाहिजेत. मनुष्य जसजसा अधिकाधिक आध्यात्मिक होत जातो तसतशा त्याला या कल्पना टाकाव्याच लागतात, मागे सोडाव्याच लागतात. खरें पाहिलें असतां प्रत्येक देशांत सर्वकाळीं असे थोडेच लोक झाले आहेत कीं, ज्यांच्याठायीं सर्व जडाचा त्याग करून, ज्ञानयुक्त होऊन आत्म्याची आत्म्याच्या द्वारा पूजा करण्याचें सामर्थ्य होतें.

सर्वकांही एकच आत्मतत्त्व आहे हा बोध--हा वेदान्त--जर प्रसार पावेल तर सर्व मानवजात आध्यात्मिक होऊन जाईल. पण हें शक्य आहे काय ? मला माहीत नाही. कांही हजार वर्षांत तरी शक्य नाही. जुन्या खुळचट समजुती नाहीशा झाल्या पाहिजेत. त्या चिरकाल तशाच कशा चालूं राहतील हेंच तुम्हांला हवें आहे. तसेंच पुन्हा कुल, ज्ञाति, राष्ट्र अशा अनेक कल्पना आहेत. या सर्व कल्पना वेदान्ताच्या साक्षात्काराच्या मार्गांत विघ्नस्वरूप आहेत. धर्माकडे धर्म या दृष्टीने फारच थोडे लोक पाहत असतात.

जगांत धर्माच्या क्षेत्रांत ज्यांनी कार्य केलें त्यांच्यापैकी बहुतेकजण खरोखरी राजकीय कार्यकर्ते होते. मानवाचा इतिहास हा असा आहे. सत्याच्या बाबतींत तडजोड न करतां जीवन जगण्याचा

प्रयत्न त्यांनी क्वचितच केला आहे. 'समाज' नामक देवाची उपासनाच त्यांनी नेहमी केली आहे. त्यांनी सर्वसाधारण लोकांच्या समजुती, अंधश्रद्धा, त्यांचे दोष यांनाच उचलून धरण्याची काळजी बहुधा वाहिलेली आहे. ते प्रकृतीला जिंकण्याचा प्रयत्न करीत नाहीत, तर प्रकृतीशीं मिळतें घेण्याचाच ते प्रयत्न करतात, दुसरें कांही नाहीं. भारतांत जा आणि एखाद्या नव्या पंथाचा उपदेश करा--ते तो ऐकणार नाहीत. पण तुम्ही जर त्यांना सांगाल कीं हें सारें वेदांतील आहे, तर ते म्हणतील, 'हें फार चांगलें आहे.' इथे मी या सिद्धान्ताचा उपदेश देत आहें, पण तुम्ही--तुमच्या-पैकी कितीजण माझ्या म्हणण्याचा गंभीरपणें विचार करतां ? पण संपूर्ण सत्य यांतच आहे आणि मला तुम्हांला तें सांगितलेंच पाहिजे.

या प्रश्नाला दुसरींहि एक बाजू आहे. प्रत्येकजण असें म्हणतो की उच्चतम, शुद्ध सत्याची प्रतीति एकदम अशीं सर्वांनाच घेतां येत नाही. लोकांना उपासना, प्रार्थना आणि इतर प्रचलित धार्मिक विधि यांच्या द्वारा त्याच्यापर्यंत क्रमाक्रमाने न्यावें लागतें. ही योग्य पद्धत आहे की नाही याबद्दल मला खात्री नाही. भारतांत मी दोन्ही पद्धतींनी कार्य करतों.

कलकत्त्यांत आमचें असें एक स्थान आहे की जिथे ईश्वर, वेद, बायबल, येशू ख्रिस्त व बुद्धदेव यांच्या प्रतिमा आणि देवळें आहेत. या पद्धतीचाहि प्रयोग होऊं द्या. पण हिमालयाच्या उंच शिखरावर असें एक स्थळ मीं ठेवलें आहे की जिथे शुद्ध सत्या-शिवाय कशाचाहि प्रवेश होऊं द्यायचा नाही असा मीं निश्चय केला आहे. तिथे, तुमच्यासमोर आज जी कल्पना मीं बोलून दाखविली ती प्रत्यक्षांत आणण्याची माझी इच्छा आहे. तेथील

देखरेखीसाठी एक इंग्रज पुरुष व एक इंग्रज स्त्री आहे. सत्याच्या शोधकांना शिक्षण-वळण देणें आणि भय व भ्रम यांपासून मुक्त ठेवून युवकांचा विकास घडवून आणणें हें माझें उद्दिष्ट आहे. त्यांच्या कानावर ख्रिस्त आणि बुद्ध, शिव आणि विष्णु यांच्यापैकी कुणाविषयीहि कांहीहि पडणार नाही. आरंभापासूनच स्वतःच्या पायावर उभे राहण्यास ते शिकतील. बालपणापासूनच ते शिकतील की ईश्वर हा आत्माच आहे आणि त्याची उपासना आत्मरूपांत व सत्यरूपांतच केली पाहिजे. प्रत्येकजण आत्माच आहे या दृष्टीने सर्वांकडे पाहिलें पाहिजे. हाच आहे आदर्श. तो कितपत यशस्वी होईल हें मला ठाऊक नाही. मला आवडणाऱ्या गोष्टीचा आज मी उपदेश करीत आहें. सर्व द्वैतात्मक भ्रमावांचून, संपूर्णपणें याच प्रकाराने माझा विकास झाला असता तर बरें झालें असतें असें मला वाटतें.

कांही वेळेला मी हें मान्य करतों की द्वैत पद्धतींतहि कांहीं चांगलें आहे; जे दुर्बल आहेत अशा पुष्कळांना त्याची मदत होते. एखाद्या माणसाने ध्रुवाचा तारा दाखविण्यासंबंधी तुम्हांला म्हटलें तर तुम्ही प्रथम त्याला ध्रुवाजवळचा एखादा तेजस्वी तारा दाखवितां, मग एक कमी तेजस्वी तारा, नंतर एक मंद तारा आणि मग ध्रुवाचा तारा तुम्ही त्याला दाखवितां. या पद्धतीमुळे त्याला तो ध्रुवाचा तारा पाहणें सोपें जातें. सर्व भिन्न भिन्न विधि व अनुष्ठानें, बायबल व देवदेवता हे सर्व धर्मांचे प्रारंभिक धडे होत, धर्मांचीं बालकमंदिरें होत.

पण पुन्हा मी दुसऱ्या बाजूचा विचार करतों. जग या मंद, क्रमवार पद्धतीचा अवलंब करील तर सत्यापर्यंत पोहोचण्याला किती काळ वाट पाहावी लागेल? किती काळ? आणि बऱ्याच

प्रमाणांत कधीतरी तें यशस्वी होईल याची तरी हमी काय ? जगाला असें यश अद्याप तरी मिळालें नाही. क्रमयुक्त असो की नसो, दुबळच्या माणसाला सुलभ असो की नसो, तें कांहीहि असलें तरी द्वैतमार्ग हा असत्यावर आधारलेला नाही काय ? सर्व प्रचलित धार्मिक साधना नेहमी दुर्बल करणाऱ्या व म्हणून चुकीच्या नाहीत काय ? त्या चुकीच्या कल्पनेवर, मनुष्याविषयीच्या चुकीच्या दृष्टि-कोनावर आधारलेल्या आहेत. दोन चुका मिळून एक बरोबर गोष्ट होऊं शकेल काय ? असत्य हें सत्य होईल काय ? अंधार हा प्रकाश होईल काय ?

ज्यांनी हा इहलोक सोडला आहे अशा एका महापुरुषाचा मी दास आहें. मी केवळ त्यांचा संदेशवाहक आहें. मी प्रयोग करूं इच्छितों. वेदान्ताच्या ज्या शिकवणींसंबंधी मीं तुम्हांला सांगितलें त्यांचा खरोखरी पूर्वी कधी प्रयोग झाला नाही. वेदान्त जरी जगांतील सर्वांत प्राचीन तत्त्वज्ञान आहे तरी भ्रामक कल्पना व तसल्याच इतर गोष्टी यांची त्यांत नेहमीच भेसळ होत आली आहे.

येशू ख्रिस्तांनी म्हटलें, "मी व माझा पिता एकच आहोंत", आणि तुम्हीहि त्या वाक्याचा पुनरुच्चार करतां. पण त्याचा मानव-जातीला उपयोग झाला नाही. १९०० वर्षें झालीं तरी अजून मानवजातीला त्या म्हणण्याचा अर्थ समजला नाही. ते ख्रिस्तांना मानवाचा त्राता, रक्षणकर्ता बनवितात. ते ईश्वर आहेत आणि आम्ही जंतु आहोंत ! असेंच भारतांतहि आहे. प्रत्येक देशांत या प्रकारची समजूत हीच प्रत्येक पंथाचा आधार आहे. हजारो वर्षें जगभर कोटयवधि माणसांना विश्वाच्या स्वामीची, अवतारांची, रक्षणकर्त्यांची, प्रेषितांची उपासना करण्यास शिकविण्यांत आलें

आहे. त्यांना स्वतःला दीनदुबळे, असहाय प्राणी मानण्याला व स्वतःच्या मुक्तीसाठी कोणातरी व्यक्तीच्या अथवा कांही व्यक्तींच्या दयेवर अवलंबून राहण्यास शिकविण्यांत आलें आहे. अशा समजुतींमध्ये पुष्कळ उत्कृष्ट गोष्टी आहेत यांत शंका नाही. पण सर्वोत्कृष्ट रूपांतहि तीं केवळ धर्माचीं बालकमंदिरेंच होत, व त्यांचा फार थोडा उपयोग झाला आहे. माणसें अजूनहि संमोहित होऊन शोचनीय अवनतीकडे जातात. तथापि कांही बलसंपन्न आत्मे असे आहेत की जे या भ्रांतीवर विजय मिळवितात. अशी वेळ येईल की जेव्हा महान पुरुष निर्माण होतील आणि धर्माच्या या बालकमंदिरांना बाजूला सारून 'आत्म्याची आत्म्याच्या द्वारा उपासना' हा जो सत्यधर्म आहे त्याला ते स्पष्ट रूप देऊन प्रभावी बनवितील.

---

मराठी ग्रंथ ... ठाणें. स्थळप्रत.

# धर्म : त्याच्या पद्धति आणि उद्देश

जगांतील धर्मांचा अभ्यास करतांना सामान्यतः दोन प्रकारची विचार-प्रक्रिया दिसून येते. एक आहे ईश्वराकडून मानवाकडे येण्याची प्रक्रिया. उदाहरणार्थ सेमिटिक गटांतील धर्म असे आहेत की ज्यांत ईश्वराविषयीचीं कल्पना अगदी प्रारंभापासून आलेली दिसते, परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की आत्म्याची कांही कल्पना त्यांत दिसत नाही. प्राचीन हिब्रु लोकांत ही गोष्ट विशेषत्वाने आढळते की त्यांच्या इतिहासाच्या अगदी अलीकडच्या कालखंडापर्यंत त्यांनी मानवी आत्म्याची कसलीच कल्पना विकसित केली नव्हती. मनुष्य हा एकप्रकारचें मन आणि कांही जड कण हीं दोन्हीं मिळून बनलेला आहे, एवढेंच ते मानीत. त्यांच्या मतें मृत्यूने सर्वकांही संपतें. परंतु याच्या उलट याच लोकांनी ईश्वराविषयी अत्यंत आश्चर्यकारक अशी कल्पना विकसित केली होती. ही एकप्रकारची विचारप्रक्रिया आहे. दुसरी विचारप्रक्रिया मानवाकडून ईश्वराकडे जाण्याची आहे. ही विशेषत्वाने आर्यांची आहे, आणि पहिली विचारप्रक्रिया विशेषत्वाने सेमिटिक लोकांची आहे. आर्यांनी प्रथम आत्म्यापासून प्रारंभ केला. त्यांचे ईश्वराविषयीचे विचार अंधुक, अस्पष्ट असे होते. पण जसजसे आत्म्याविषयीचे त्यांचे विचार स्पष्ट व्हायला लागले तसतशी ईश्वराविषयीची त्यांची कल्पनाहि त्याच प्रमाणांत स्पष्ट होत गेली. याप्रमाणे वेदांतील शोध नेहमी आत्म्यामधूनच होत असलेला दिसतो. आर्यांनी ईश्वराविषयी संपादिलेलें सर्व ज्ञान आत्म्याच्या

द्वाराच प्राप्त झालेलें होतें. आणि म्हणून त्यांच्या एकंदर तत्त्वज्ञानावर जो विशेष ठसा उमटला आहे तो ईश्वराच्या अंतर्मुख होऊन केलेल्या शोधाचा होय. आर्य माणूस नेहमी ईश्वराला स्वतःच्या आत्म्यांत शोधीत होता. कालान्तराने आर्यांच्या स्वभावाचें हें एक वैशिष्टच बनलें. त्यांच्या कलांतून आणि सर्वसामान्य व्यवहारांतून हें स्पष्टपणें दिसून येतें. आधुनिक काळांत देखील आपण जर एखाद्या धार्मिक वृत्तीच्या माणसाचें पाश्चात्त्य चित्र घेतलें तर त्यांतील व्यक्तीची दृष्टि वर लागलेली चित्रकारांनी दाखविलेली असते. स्वतःच्या व निसर्गाच्या बाहेर वर आकाशांत ती व्यक्ति ईश्वराचा शोध घेत असलेली दिसते. याउलट भारतांत एखाद्या व्यक्तीची धार्मिक वृत्ति चित्राद्वारें व्यक्त करावयाची झाल्यास ती व्यक्ति डोळे मिटून बसलेली नेहमी दाखविण्यांत येते. जणुकांही ती व्यक्ति आपल्या आंत पाहत असते.

बाह्य आणि आंतर प्रकृति हे मानवाच्या अनुशीलनाचे दोन विषय आहेत. सकृद्दर्शनीं जरी ते एकमेकांना विरोधी दिसत असले तरी सामान्य मनुष्याच्या दृष्टीने बाह्य विश्व हें पूर्णतः अंतर्विश्वाने --मनाने--बनलेलें असतें. प्रत्येक देशांतील, विशेषतः पश्चिमेकडील, बहुसंख्य तत्त्वज्ञानें हें गृहीत धरून सुरू झालीं आहेत की जडद्रव्य आणि मन ह्या परस्परविरोधी वस्तु आहेत. पण आपल्याला हें दिसेल की अखेर या वस्तु एकमेकींच्या जवळ येत आहेत आणि शेवटीं त्या एक होऊन त्यांची एकच अनंत पूर्ण वस्तु बनत आहे. या विश्लेषणाने मला असें म्हणायचें नाही की प्रस्तुत विषयाच्या संबंधीचे श्रेष्ठ किंवा कनिष्ठ असे हे दृष्टिकोन आहेत. जे कोणी सत्याचा शोध बाह्य विश्वाच्या द्वारा करूं इच्छितात ते चूक आहेत असें मला म्हणायचें नाही. किंवा जे कोणी अंत-

विश्वाच्या द्वारा सत्याचा शोध घेऊं इच्छितात ते श्रेष्ठ आहेत असेंहि मला म्हणायचें नाही. या दोन विचारपद्धति आहेत; त्या दोन्ही राहतीलच; त्या दोन्हींचें अनुशीलन केलें पाहिजे; आणि शेवटीं आपल्याला दिसेल की त्या एकमेकीला येऊन मिळतात. जरी 'हें शरीर म्हणजे कांहीच नव्हे' असें मानणारे पुष्कळ लोक असले तरी आपल्याला हें दिसून येईल की शरीर हें मनाला विरोधी नाही किंवा मनहि शरीराला विरोधी नाही. प्राचीन काळीं प्रत्येक देशांत असे पुष्कळ लोक होते की जे हें शरीर म्हणजे एक विकृति आहे, पाप आहे किंवा असेंच कांहीतरी आहे असें मानीत असत. पुढे मात्र, वेदांत प्रतिपादन केल्याप्रमाणे, आपल्याला दिसून येतें की हें शरीर मनांत लीन होतें आणि मन शरीरांत लीन होतें.

सर्व वेदांमधे आढळणारें एक सूत्र आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे : "ज्याप्रमाणे मातीचें एक ढेकूळ जाणल्याने विश्वांतील सर्व मातीचें ज्ञान होतें त्याप्रमाणे असें काय आहे की जें जाणल्याने इतर सर्व जाणलें जातें ?" सर्व मानवी ज्ञानाचें हेंच सूत्र आहे. कधी तें कमी स्पष्टपणें व्यक्त केलेलें असतें, तर कधी तें अधिक स्पष्टपणें व्यक्त केलेलें असतें. हें सूत्र म्हणजे ज्या एकत्वाकडे आपण सर्वजण जात आहोंत त्याचा शोध आहे. आपल्या जीवनांतील प्रत्येक क्रिया, मग ती अत्यंत स्थूल वा भौतिक स्वरूपाची असो किंवा अत्यंत सूक्ष्म, उच्च वा आध्यात्मिक स्वरूपाची असो, ती आपल्याला त्या एकाच ध्येयाकडे नेणारी असते. तें ध्येय म्हणजे एकत्वाचा शोध हें होय. मनुष्य हा आधी एकटा असतो. तो लग्न करतो. बाह्यात्कारी ही स्वार्थी क्रिया असेल, पण त्याबरोबरच तिच्या पाठीमागची प्रेरणा तें एकत्व शोधण्याची असते.

त्याला मुलें असतात, त्याला मित्र असतात, तो आपल्या देशावर प्रेम करतो, तो जगावर प्रेम करतो आणि शेवटीं सर्व विश्वावर प्रेम करण्यांत त्याच्या प्रेमाची परिणति होते. अनिवार्यपणें आपण त्या पूर्णतेकडे प्रवृत्त होतों. हें पूर्णत्व एकत्वाच्या शोधांत, या संकुचित 'स्व'चा नाश करून स्वत:ला अधिकाधिक व्यापक करण्यांत आहे. हेंच तें ध्येय आहे की ज्याच्याकडे हें विश्व द्रुत गतीने जात आहे. प्रत्येक अणु हा शेजारच्या अणूशीं संयुक्त होण्याचा प्रयत्न करीत आहे. अणूमागून अणु संयुक्त होतात आणि पृथ्वी, सूर्य, चंद्र, तारे, ग्रह इत्यादि प्रचंड गोल तयार होतात. हे सर्व गोल परत एकमेकाकडे धावण्याचा प्रयत्न करीत आहेत, आणि शेवटीं हें संपूर्ण आंतर व बाह्य, मानसिक व भौतिक विश्व एक होणार आहे हें आपण जाणतों.

ब्रह्मांडांत मोठ्या प्रमाणावर चालूं असलेली प्रक्रिया पिंडांत लहान प्रमाणावर चालूं असलेल्या प्रक्रियेसारखीच आहे. ज्याप्रमाणे या विश्वाला अलग, वेगळें असें अस्तित्व आहे आणि तें सर्वकाळ एकत्वाकडे, अभेदाकडे धावत आहे त्याचप्रमाणे आपल्या बाबतींतदेखील प्रत्येक जीवात्मा हा जणुकांही इतर जगापासून वेगळा असा जन्मला आहे. जीव जितका अज्ञानी, अविकसित तितका तो स्वत:ला इतर विश्वाहून वेगळा समजतो. मनुष्य जितका अज्ञ तितका तो 'मी मरण पावतों,' 'मी जन्मतों' इत्यादि कल्पना करीत असतो. या कल्पना म्हणजे भेदबुद्धीचे आविष्कार होत. पण आपण पाहतों की मनुष्याला जसजसें ज्ञान प्राप्त होत जातें तसतसा तो उन्नत होत जातो, त्याच्या नैतिकतेचा विकास होतो आणि अभेदबुद्धि उदयास येते. माणसांना कळो की न कळो, पण त्यांच्या पाठीशीं असलेली ती शक्ति

त्यांना स्वार्थरहित होण्यास प्रेरित करते. सर्व नैतिकतेचा हा पाया आहे. जगांतील कोणत्याहि धर्माच्या धर्मोपदेशकाने कोणत्याहि भाषेंत उपदेशिलेल्या नीतिशास्त्राचें तें सार आहे. "तूं स्वार्थ-रहित हो", "'मी' नव्हे, तर 'तूं'"––ही सर्व नीतिशास्त्रांची पार्श्वभूमि आहे. आणि याचा अर्थ काय ? प्रत्येकाला स्वतंत्र वा वेगवेगळें व्यक्तित्व नाही––तूं माझा अंश आहेस, आणि मी तुझा अंश आहे हें ओळखणें हाच याचा अर्थ आहे. तुला दुखविणें म्हणजे मलाच दुखविणें आहे, तुला साहाय्य करणें म्हणजे मलाच साहाय्य करण्यासारखें आहे, तूं जिवंत असतांना मला मृत्यु येणें शक्य नाही, हें ओळखणें हाच याचा अर्थ आहे. एखादादेखील जंतु या विश्वांत जोंवर जिवंत आहे तोंवर मला मृत्यु कसा येणार ?––कारण त्या जंतूच्या जीवनांत माझेंच जीवन आहे. तसेंच ही अभेदबुद्धि आपल्याला शिकवते की आपण आपल्या प्रत्येक बांधवाला साहाय्य केलें पाहिजे, त्याच्या भल्यांतच आपलें भलें आहे.

संपूर्ण वेदान्तांत हेंच सूत्र सर्वत्र विद्यमान आहे आणि तेंच इतर प्रत्येक धर्मांतहि आहे. तुम्हांला हें माहीत असेल की धर्माचे सामान्यत: तीन भाग पडतात. पहिला भाग तत्त्वज्ञानाचा; प्रत्येक धर्माच्या सारभूत तत्त्वांचा हा भाग असतो. या तत्त्वांचा आवि-ष्कार पुराणांतून––संतांच्या, वीरांच्या, देवदेवतांच्या चरित्रांतून झालेला असतो. या सर्व पुराणकथांमधून शक्तीचेंच वर्णन केलेलें असतें. प्राथमिक अवस्थेंतील लोकांच्या पुराणकथांतून या शक्तीचा आविष्कार शारीरिक बळाच्या रूपाने झालेला असतो. त्या कथांचे नायक प्रचंड बलशाली असे असतात. एकच वीर पुरुष सर्व जगाला जिंकतो असें त्यांत वर्णन असतें. मनुष्याची जसजशी

प्रगति होते तसतसा त्याच्या शक्तीचा आविष्कार शारीरिक बलाहून उच्चतर शक्तीच्या रूपाने होतो. म्हणून त्याच्या पुराणकथांमधील नायकांच्या शक्तींचा आविष्कारदेखील अधिक वरच्या पातळीचा असतो. उच्च प्रतीच्या पुराणकथांतून प्रचंड नैतिक शक्तीने युक्त असे पुरुष नायक म्हणून आढळतात. त्यांचें सामर्थ्य नीतिमान व पवित्र बनण्यांत व्यक्त होतें. स्वार्थाच्या व अनीतीच्या उसळणाऱ्या लाटांशीं टक्कर घेऊन त्यांना परतवून लावण्याचें सामर्थ्य त्यांच्या ठायीं असतें. सर्व धर्मांचा तिसरा भाग प्रतीकांचा--ज्यांना तुम्ही विधिअनुष्ठानें म्हणतां त्यांचा--असतो. पुराणांमधून, थोर पुरुषांच्या चरित्रांमधून धर्मांतील सारभूत तत्त्वांचा होणारा आविष्कारहि सर्वांना उपयोगी नसतो. त्याहून आणखी खालच्या पातळीवर कांही माणसें असतात. लहान मुलांप्रमाणे त्यांना धर्माचे अगदी प्राथमिक पाठ हवे असतात. आणि म्हणून हीं विभिन्न प्रतीकें निर्माण करण्यांत येतात. हीं प्रतीकें स्थूल व मूर्त स्वरूपाचीं असतात. त्यांना ते एखाद्या जडवस्तूप्रमाणे पाहूं शकतात, स्पर्श करूं शकतात, हाताळूं शकतात, ग्रहण करूं शकतात आणि समजूं शकतात.

अशा रीतीने प्रत्येक धर्मांत या तीन अवस्था तुम्हांला दिसतील : तत्त्वज्ञान, पुराणें आणि विधि-अनुष्ठानें. वेदान्ताच्या बाबतींत एक सोयीची गोष्ट अशी आहे की भारतांत सुदैवाने या तीन अवस्था काटेकोरपणें वेगवेगळ्या मांडल्या गेल्या आहेत. इतर धर्मांमधे मूलतत्त्वें पुराणांमधे अशा रीतीने मिसळलीं गेलीं आहेत की मूलतत्त्वें व पुराणें हीं एकमेकांपासून वेगळीं काढणें फार कठीण आहे. या तत्त्वांना पुराणें गिळंकृत करतात व तींच प्रमुख होऊन बसतात, आणि कांही शतकांनंतर हीं तत्त्वें

दृष्टिआड होतात, त्यांचें विस्मरण होतें. तत्त्वांचें स्पष्टीकरण वा उदाहरण असलेल्या व्यक्ति ह्याच तत्त्वांना गिळंकृत करतात आणि लोक नुसते त्या व्यक्तींकडे, त्या प्रेषितांकडे, त्या उपदेशकांकडेच लक्ष देतात आणि तत्त्वांचा प्रायः लोप होऊन जातो-- इतका की आजदेखील एखाद्याने येशू ख्रिस्ताला वगळून ख्रिस्ती धर्माच्या तत्त्वांचा उपदेश करण्याचें धाडस केलें तर ख्रिस्ती लोक त्याच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करतील आणि असें समजतील की तो चुकलेला आहे आणि ख्रिस्ती धर्मावर आघात करीत आहे. त्याचप्रमाणे एखादा माणूस याच पद्धतीने इस्लाम धर्माच्या तत्त्वांचा उपदेश करूं इच्छील तर मुसलमानहि तसेंच समजतील. कारण, स्थूल रूपांत मांडलेले विचार आणि थोर पुरुषांचीं व प्रेषितांचीं चरित्रें यांनी मूल तत्त्वांना पूर्णपणें झाकून टाकलें आहे.

वेदान्ताचें मुख्य वैशिष्टय हें आहे की तो कोणाहि एकाच माणसाचें कार्य नाही, आणि म्हणून साहजिकच बौद्ध, ख्रिस्ती किंवा इस्लाम या धर्मांत प्रेषिताने किंवा उपदेशकाने मूलतत्त्वांना जसें पूर्णपणें झाकून टाकलें किंवा गिळंकृत केलें तसें वेदान्ताच्या बाबतींत घडलें नाही. वेदान्तांतील मूलतत्त्वांचें अस्तित्व कायम राहिलें आणि प्रेषितांचा जणुकांही एक दुय्यम गट तयार झाला, पण या गटाला वेदान्तांत महत्त्व नाही. उपनिषदें कोणाहि एका विशिष्ट प्रेषिताबद्दल बोलत नाहीत, तर तीं अनेक प्रेषित स्त्री-पुरुषांचा उल्लेख करतात. प्राचीन हिब्रू लोकांचे विचार कांही अंशीं असेच होते, पण तरी हिब्रू वाङमयाचा बहुतेक भाग मोझेसने व्यापलेला दिसतो. अर्थात् या प्रेषितांनी एखाद्या राष्ट्राच्या धर्माची पकड घेणें यांत कांही वाईट आहे असें मला म्हणावयाचें नाही, परंतु सगळींच मूलतत्त्वें जर दृष्टिआड झालीं तर तें खचितच

अत्यंत हानिकारक आहे. तत्त्वांच्या बाबतींत आपलें पुष्कळसें एकमत होऊं शकतें, परंतु व्यक्तींच्या बाबतींत फारसें होऊं शकत नाही. व्यक्तींचें आवाहन आपल्या भावनांना असतें; आणि तत्त्वांचें त्याहून उच्चतर अशा आपल्या स्थिर व शांत अशा विवेकाला असतें. कालान्तराने तत्त्वांचा विजय झालाच पाहिजे, कारण मनुष्याचें मनुष्यत्व त्यांतच आहे. भावना पुष्कळ वेळां आपल्याला पशूंच्या पातळीवर ओढून आणतात. भावनांचा संबंध तर्कबुद्धीपेक्षा इंद्रियजन्य संवेदनांशीं अधिक असतो. आणि म्हणून जेव्हा तत्त्वें पूर्णतः दृष्टिआड होतात आणि भावनांचें वर्चस्व होतें तेव्हा धर्मांचें अधःपतन होऊन त्यांतून धर्मवेड व संकुचित पंथाभिमान हीं निर्माण होतात. पक्षीय राजकारण किंवा तसल्याच गोष्टींहून असले धर्म अधिक श्रेष्ठ ठरत नाहीत. अत्यंत भयावह अशा अज्ञपणाच्या समजुती घेऊन त्यांच्यासाठीं हजारो लोक आपल्या बांधवांचे गळे कापण्यास उद्युक्त होतात. याच कारणासाठी, हे थोर पुरुष आणि प्रेषित कल्याणकारक गोष्टींना प्रेरणा देणाऱ्या प्रचंड शक्ति असल्या तरी त्याबरोबरच त्यांचीं जीवनें ज्या तत्त्वांचीं प्रत्यक्ष उदाहरणें आहेत त्याच तत्त्वांकडे त्यांच्या अनुयायांचें दुर्लक्ष होण्यांत जर या जीवनाचें पर्यवसान होत असेल तर तीं फारच धोक्याचीं आहेत असें म्हणावें लागेल. मूळ तत्त्वांकडे दुर्लक्ष होण्याचें पर्यवसान नेहमीच धर्मवेडांत झालेलें आहे, आणि त्यामुळे जगांत रक्ताचे पाट वाहिले आहेत. वेदान्त ही अडचण टाळूं शकतो, कारण त्याचा कोणीहि एखादा विशिष्ट असा प्रेषित नाही. वेदान्ताचे पुष्कळ द्रष्टे असून त्यांना 'ऋषि' म्हणतात. ते द्रष्टे आहेत, कारण त्यांना हीं सत्यें, हे मंत्र प्रत्यक्ष दिसले आहेत.

'मंत्र' शब्दाचा अर्थ 'विचार केलेले' 'मनन केलेले' असा आहे. आणि ऋषि हे त्या विचारांचे द्रष्टे आहेत. या मंत्रांवर विशिष्ट व्यक्तींचाच खास असा अधिकार नाही, ते कोणाहि विशिष्ट स्त्रीची वा पुरुषाची मिरास नव्हत--मग ती स्त्री वा पुरुष कितीहि थोर का असेना. बुद्ध किंवा ख्रिस्त यांच्यासारख्या महान् आत्म्यांचीदेखील ती मिरास नव्हे. त्यांच्यावर जेवढा हक्क बुद्धांचा आहे तेवढाच कनिष्ठांतील कनिष्ठाचा आहे आणि जितका हक्क येशू ख्रिस्तांचा आहे तितकाच सरपटणाऱ्या क्षुद्र अशा एखाद्या कीटकाचाहि आहे, कारण हीं सर्व सार्वजनीन वा वैश्विक स्वरूपाचीं सत्यें आहेत. तीं केव्हातरी निर्मिलेलीं नाहीत. हीं सत्यें अनादि काळापासून अस्तित्वांत आहेत आणि तीं तशींच राहतील. विज्ञान आज आपल्याला जे नियम शिकवितें त्यांपैकी एकानुसारहि तीं सृष्ट झालेलीं नाहीत. तीं झाकलेलीं राहतात आणि पुढे व्यक्त होतात. परंतु सर्व काळीं तीं अस्तित्वांत असतातच. न्यूटन जन्माला आला नसता तरीहि गुरुत्वाकर्षणाचा सिद्धान्त राहिलाच असता व त्याचें कार्य चालूं राहिलेंच असतें. न्यूटनच्या प्रतिभेने त्याचा शोध लावला, त्याला सूत्रबद्ध केलें, त्याला जाणिवेच्या क्षेत्रांत आणलें, आणि, मानवजातीसाठी ती एक ज्ञात गोष्ट झाली. या धर्मविषयक सिद्धान्तांचें, या थोर आध्यात्मिक सत्यांचेंहि असेंच आहे. सर्व काळ त्यांचें कार्य चालूंच असतें. वेद, बायबल, कुराण हे सर्व जरी अस्तित्वांत नसते, ऋषि आणि प्रेषित हे जरी कधी जन्मले नसते तरीहि हे सिद्धान्त अस्तित्वांत राहिले असते. ते कांही काळ अव्यक्त राहतात आणि हळूहळू पण निश्चितपणें मानवजातीला, मानवी चारित्र्याला उन्नत करण्याचें कार्य करतात. ज्यांना हे दिसतात, जे यांचा शोध लावतात ते द्रष्टे होत ; हे

द्रष्टे म्हणजे अध्यात्माच्या क्षेत्रांतील शोध लावणाऱ्या व्यक्ति होत. न्यूटन आणि गॅलिलिओ हे जसे भौतिक शास्त्राच्या क्षेत्रांतील सत्यद्रष्टे होते तसेच हे अध्यात्माच्या क्षेत्रांतील सत्यद्रष्टे होत. ते यांपैकी कोणत्याहि सिद्धान्तावर आपला एकट्याचा हक्क सांगूं शकत नाहीत. या सिद्धान्तांवर सर्व जगाचा समान हक्क आहे.

हिंदूंच्या मतें वेद हे सनातन आहेत. ते वेदांना सनातन कां म्हणतात हें आता आपल्या लक्षांत येईल. ज्याप्रमाणे प्रकृतीला आदि व अंत नाहीत त्याचप्रमाणे या सिद्धान्तांनाहि आदि व अंत नाहीत. पृथ्वीमागून पृथ्वी, ग्रहमालेमागून ग्रहमाला उदयाला येतील, कांही काळ अस्तित्वांत राहतील आणि पुन्हा अव्यक्तांत विलीन होतील. परंतु विश्व कायमच राहतें. लक्षावधि ग्रहमाला अस्तित्वांत येत आहेत व तितक्याच नष्टहि होत आहेत, पण विश्व तसेंच कायम राहतें. एखाद्या ग्रहाच्या बाबतींत त्याच्या प्रारंभाचा काळ आणि त्याच्या अंताचा काळ सांगतां येऊं शकतो. परंतु विश्वाच्या बाबतींत काळाला कांही अर्थ नाही. प्रकृतीमधील भौतिक, मानसिक व आध्यात्मिक सिद्धान्तांचेंहि असेंच आहे. ते अनादि व अनंत आहेत ; आणि अनंत काळाच्या तुलनेने पाहिलें तर कांही थोड्या वर्षांपासून, फार तर कांही हजार वर्षांपासूनच मनुष्य त्यांचा शोध लावण्याचा प्रयत्न करीत आहे. अनंत क्षेत्र आपल्या समोर पडलें आहे. यावरून वेदांपासून आरंभींच एक मोठा धडा आपण शिकतों. तो हा की धर्माला आता कुठे प्रारंभ झाला आहे. आध्यात्मिक सत्याचा अनंत महासागर आपल्या समोर पसरलेला आहे. त्याचा शोध आपल्याला घ्यायचा आहे. आपल्या जीवनांत तीं आध्यात्मिक सत्यें आणायचीं आहेत. जगाने

आजवर हजारो द्रष्टे पाहिले आहेत आणि त्याला अद्याप लक्षावधि पाहावयाचे आहेत.

पूर्वी असा काळ होता की जेव्हा प्रत्येक समाजांत अनेक द्रष्टे होते. असा काळ यायचा आहे की जेव्हा जगांतील प्रत्येक शहराच्या रस्त्यारस्त्यावर द्रष्टे आढळतील. पूर्वीच्या काळीं सामाजिक नियमांमुळे कांही विशिष्ट प्रकारचेच लोक द्रष्टे होऊं शकत. असा काळ येणार आहे की जेव्हा धार्मिक होणें म्हणजेच द्रष्टा होणें होय असें आपल्याला समजून येईल. कोणतीहि स्त्री किंवा पुरुष द्रष्टा झाल्याशिवाय धार्मिक होऊं शकणार नाही हें आपल्याला कळून येईल. आपण हें जाणून घेऊं की धर्माचें रहस्य विचार करण्याच्या व तें बोलून दाखविण्याच्या पात्रतेंत नाही, तर वेद म्हणतात त्याप्रमाणे, त्यांचा अनुभव घेण्यांत, पूर्वी अनुभविलेल्या विचारांहूनहि श्रेष्ठ विचारांचा अनुभव घेण्यांत, नवीनांचा शोध लावण्यांत व ते समाजाला देण्यांत धर्माचें रहस्य आहे. धर्माचें अनुशीलन हें द्रष्टा बनण्याची साधना व्हावयास हवें. विद्यालयें व महाविद्यालयें हीं द्रष्टे तयार करण्याच्या पाठशाळा बनलीं पाहिजेत. विश्वांतील प्रत्येकाने द्रष्टा बनलें पाहिजे. जोंपर्यंत मनुष्य हा द्रष्टा होत नाही तोंपर्यंत त्याच्या पक्षीं धर्म म्हणजे एक सोंग व एक पोकळ शब्दच असतो. आपल्याला धर्माचा प्रत्यक्ष अनुभव आला पाहिजे, त्याचा प्रत्यक्ष साक्षात्कार घडला पाहिजे. जितक्या स्पष्टपणें समोरची भिंत आपल्याला दिसते त्याहूनहि हजारपट उत्कटतेने आपल्याला धर्माचा प्रत्यक्ष साक्षात्कार झाला पाहिजे.

पण धर्माच्या या सर्व भिन्न भिन्न आविष्कारांच्या मुळाशीं एक तत्त्व आहे आणि तें आधीच आपल्यासमोर मांडलें गेलें आहे.

प्रत्येक शास्त्र एकत्वाचा शोध लागतांच तिथे थांबतें, कारण त्याच्या पलीकडे तें जाऊं शकत नाही. जेव्हा तें पूर्ण एकत्वाप्रत पोहोचतें तेव्हा तात्त्विक किंवा सैद्धान्तिक असें कांही आपल्याला सांगण्याचें त्या शास्त्राजवळ उरत नाही. तपशील तयार करणें हेंच एक कार्य आता धर्मासाठी उरलें आहे. कोणतेंहि शास्त्र, उदाहरणार्थ रसायनशास्त्र घ्या. समजा असें एक मूलद्रव्य आपल्याला सापडलें की ज्याच्यापासून इतर सर्व मूलद्रव्यें आपण तयार करूं शकूं. मग शास्त्र या दृष्टीने रसायनशास्त्र पूर्ण होऊन जाईल. त्यानंतर आपल्याला करावयाचें उरेल तें इतकेंच की दररोज त्या मूलद्रव्याचीं नवीन नवीन मिश्रणें शोधायचीं व त्यांचा उपयोग जीवनांतील कार्यासाठी करायचा. धर्माच्या बाबतींतहि असेंच आहे. फार प्राचीन काळीं जेव्हा मानवाला वेदांतील 'मी तो आहें' या महावाक्याचा शोध लागला, ज्यांत हें संपूर्ण अंतर्बाह्य विश्व एकत्वाप्रत पोहोचतें व ज्याला ईश्वर, ब्रह्म, अल्ला, जिहोवा किंवा आणखी कांही म्हणतात त्या 'एका'चा जेव्हा शोध लागला तेव्हाच धर्माचीं महान् तत्त्वें, धर्माचें क्षेत्र व धर्माची कार्यपद्धति यांचा आविष्कार झाला. याच्या पलीकडे आपण जाऊं शकत नाहीं. तें महान् तत्त्व आधीच आपल्यासमोर मांडलें गेलें आहे. आता आपलें काम त्याचा तपशील तयार करणें, तें कार्यान्वित करणें, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत तें प्रत्यक्षांत आणणें हें आहे. आपल्याला आता अशा रीतीने कार्य करावयाचें आहे की ज्यामुळे प्रत्येकजण द्रष्टा बनूं शकेल. आपल्यापुढे हेंच प्रचंड कार्य आहे.

प्राचीन काळीं द्रष्टा म्हणजे काय हें पुष्कळांना कळत नसे. ते समजत असत की एखादी व्यक्ति केवळ योगायोगाने द्रष्टा होत

असते. एखाद्या श्रेष्ठ शक्तीच्या किंवा अलौकिक बुद्धि असलेल्या एखाद्या देवतेच्या आज्ञेनुसार एखाद्या व्यक्तीला अलौकिक ज्ञान प्राप्त होतें असें ते मानत असत. आधुनिक काळीं आम्ही हें सप्रयोग सिद्ध करावयास तयार आहोंत की हें ज्ञान हा प्रत्येक जीवाचा--मग तो कोणीहि असो किंवा कोठेहि असो--जन्मसिद्ध हक्क आहे आणि या विश्वांत 'योगायोग' म्हणून कांहीहि नाही. एखाद्याला जें कांही योगायोगाने मिळालें असें आपण समजतों तें तसें नसून त्या व्यक्तीने युगानुयुगें त्यासाठी चिकाटीने व निश्चयाने प्रयत्न केलेला असतो. मुख्य प्रश्न हा की आपण द्रष्टे होऊं इच्छितों काय? आपली तशी इच्छा असेल तर आपण खचित द्रष्टे होऊं.

द्रष्टे निर्माण करण्याचें हें महान् कार्य आपल्यासमोर आहे; आणि कळत नकळत सर्व थोर धर्म मानवाला याच महान् ध्येयाकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न करितात. फरक इतकाच आहे की, पुष्कळशा धर्मांत असें म्हटलें आहे की ही आध्यात्मिक प्रत्यक्षानुभूति या जीवनांत प्राप्त व्हावयाची नाही. ते म्हणतात की, मनुष्याच्या मृत्यूनंतर एक वेळ अशी येईल की जेव्हा त्या दुसऱ्या जगांत त्याला आध्यात्मिक अनुभूति होईल, त्याला आध्यात्मिक गोष्टींचा साक्षात्कार घडेल--ह्या जन्मांत मात्र त्याने या गोष्टींवर केवळ विश्वासच ठेवला पाहिजे. पण असें म्हणणाऱ्या सर्व लोकांना वेदान्त विचारील की, "आध्यात्मिक गोष्टी अस्तित्वांत आहेत हें मग तुम्हांला कसें कळलें?" आणि त्यांना असें उत्तर देणें भाग आहे की सर्वकाळीं कांही थोडे विशिष्ट लोक असे असले पाहिजेत की ज्यांना त्यांच्या जीवितावस्थेंतच अज्ञात व अज्ञेय अशा गोष्टींचें ओझरतें दर्शन झालेलें आहे.

यामुळेहि एक अडचण उपस्थित होते. ते जर विलक्षण लोक असतील व त्यांना ही शक्ति केवळ योगायोगाने मिळालेली असेल तर मग आम्हीं त्यांच्यावर विश्वास ठेवणें बरोबर होणार नाही. जें केवळ योगायोगाने झालेलें आहे त्याच्यावर विश्वास ठेवणें हें पाप आहे, कारण अशा गोष्टी आपण जाणूं शकत नाहीं. ज्ञानाचा अर्थ काय ? विलक्षणपणाचा नाश. समजा एक मुलगा एखाद्या रस्त्यावर किंवा एखाद्या पशुसंग्रहालयांत गेला आणि एक विलक्षण प्रकारचा प्राणी त्याने पाहिला. तो कोणता प्राणी आहे याचें त्याला ज्ञान नसतें. मग तो अशा एखाद्या देशांत जातो की जेथे त्या प्राण्यासारखे शेकडो प्राणी आहेत. तेव्हा त्याचें समाधान होतें. त्याला त्या प्राण्याच्या जातीचें ज्ञान होतें. आमचें ज्ञान म्हणजे सामान्य तत्त्व जाणणें होय. आमचें अज्ञान म्हणजे सामान्य तत्त्वाच्या संदर्भाशिवाय विशिष्टाला पाहणें होय. जेव्हा आपण एक किंवा कांही थोडीं उदाहरणें त्यांमागील सामान्य तत्त्वाहून वेगळीं अशीं पाहतों, त्यांचा या सामान्य तत्त्वाशीं कांही संबंध जोडीत नाहीं तेव्हा आपण अज्ञानांत असतों, आपण कांही जाणत नाहीं. आता, हे द्रष्टे म्हणजे जर विलक्षण व्यक्ति असतील आणि केवळ त्यांनाच त्या इंद्रियातीत वस्तूंचें दर्शन घेण्याचा हक्क असेल व इतर कुणालाहि नसेल तर आपण त्यांच्यावर विश्वास ठेवूं नये, कारण असले द्रष्टे म्हणजे सामान्य तत्त्वाशीं संबंध नसलेलीं अशीं विशिष्ट वा विलक्षण उदाहरणें होत. आपण स्वत:च द्रष्टे झालों तरच आपण त्यांच्यावर विश्वास ठेवूं शकतों.

तुमच्यापैकी सर्वांनी वर्तमानपत्रांत येणारे सागरसर्पासंबंधीचे व्यंगपूर्ण विनोदी चुटके पाहिले असतील. असे चुटके वर्तमानपत्रांत कां यावेत ? कारण कांही थोडे लोक अधूनमधून येतात आणि

सागरसर्पासंबंधीच्या कथा सांगतात. इतर लोकांनी तो सागरसर्प कधीच पाहिलेला नसतो. ह्या सागरसर्पांचा ज्याच्याशीं संबंध जोडतां येईल असें कोणतेंहि विशिष्ट सामान्य तत्त्व नसल्यामुळे लोकांचा त्यांच्यावर विश्वास बसत नाही. एखादा मनुष्य जेव्हा माझ्याकडे येतो आणि म्हणतो की एक द्रष्टा हवेंत अदृश्य झाला आणि हवेंतून गेला, तेव्हा ही गोष्ट पाहण्याचा मला हक्क आहे; मी त्याला विचारतों, "तुझ्या वडिलांनी किंवा आजोबांनी हें पाहिलें काय ?" तो म्हणतो, "नाही. परंतु पांच हजार वर्षांपूर्वी अशी एक घटना घडली." आणि मी जर त्यावर विश्वार ठेवणार नाहीं तर मला अनंत काळपर्यंत नरकयातना भोगाव्या लागतील !

केवढी ही भ्रामक समजूत ! आणि तिचा परिणाम हाच होतो की मनुष्य आपल्या दिव्य स्वरूपापासून च्युत होऊन पाशवी अवस्थेंत येऊन पोहोचतो. केवळ विश्वासच ठेवावयाचा असेल तर आपल्याला तर्कबुद्धि कशाला दिली आहे ? तर्कबुद्धीच्या विरुद्ध एखाद्या गोष्टीवर विश्वास ठेवणें ही फार मोठी ईश्वरनिंदा नव्हे काय ? ईश्वराने दिलेल्या या श्रेष्ठतम देणगीचा उपयोग न करण्याचा आपल्याला काय हक्क आहे ? मला खात्री आहे की जो माणूस आपल्या तर्कबुद्धीचा उपयोग करतो पण त्याचा विश्वास नाही त्याला ईश्वर क्षमा करील, पण जो माणूस ईश्वराने दिलेल्या शक्तींचा उपयोग न करतां अंधपणें विश्वास ठेवतो त्याला ईश्वर क्षमा करणार नाही. अंधळेपणाने विश्वास ठेवणारा माणूस स्वतःचा अधःपात करून घेतो, पशूंच्या पातळीवर उतरतो, स्वतःच्या इंद्रियशक्तीचा अधःपात करतो आणि नष्ट होतो. आपण तर्कबुद्धीचा वापर अवश्य केला पाहिजे; आणि प्रत्येक देशांतील प्राचीन ग्रंथांत ज्यांचें वर्णन आलेलें आहे अशा द्रष्ट्यांच्या व थोर

पुरुषांच्या अस्तित्वाचा पडताळा जेव्हा आपल्या तर्कबुद्धीला येईल तेव्हाच आपण त्यांच्यावर विश्वास ठेवूं. असे द्रष्टे जेव्हा आपल्याला आपल्या समाजांतच दिसतील तेव्हा आपण त्यांच्यावर विश्वास ठेवूं. तेव्हा आपल्याला कळेल की ते कांही विलक्षण लोक नव्हत, तर ते कित्येक सामान्य तत्त्वांचीं उदाहरणें होत. त्यांनी प्रयत्न केला आणि तें सामान्य तत्त्व स्वभावतःच अभिव्यक्त झालें. तें तत्त्व आपल्या ठिकाणीं प्रकट होण्यासाठी आपल्यालाहि प्रयत्न केला पाहिजे. जेव्हा आपण द्रष्टे होऊं तेव्हा ते द्रष्टे होते यावर आपला विश्वास बसेल. ते दिव्य सत्यांचे द्रष्टे होते. ते इंद्रियांच्या मर्यादेपलीकडे जाऊं शकले आणि जें इंद्रियांच्या पलीकडे आहे त्याचें दर्शन घेऊं शकले. यावर आपण तेव्हाच विश्वास ठेवूं की जेव्हा आपण स्वतः तसें करण्यास समर्थ होऊं. त्यापूर्वी नाही.

वेदान्ताचें हें एक प्रमुख तत्त्व आहे. वेदान्त सांगतो की धर्म इथे आणि आताच आहे; कारण हें जीवन आणि परलोकांतील जीवन, जीवन आणि मृत्यु, इहलोक आणि परलोक, या गोष्टीं केवळ भ्रामक समजुती होत. काल हा अखंड आहे, त्यांत खंड आपणच कल्पीत असतों. दहा वाजणें व बारा वाजणें यांत निसर्गामधे होणारे कांही विशिष्ट बदल पाहून आपण जो भेद करतों त्याहून वेगळा असा काय भेद आहे ? काळाचा प्रवाह सतत चालूं आहे. म्हणून हा जन्म, पुढला जन्म यांचा अर्थ काय ? हा केवळ काळाचा प्रश्न आहे, आणि जो काळ आपण गमावूं तो कामाचा वेग वाढवून आपल्याला भरून काढतां येईल. म्हणून वेदान्त म्हणतो की धर्माचा अनुभव आता, या जन्मीं घ्यावयाचा आहे. आणि तुम्ही धार्मिक व्हायचें म्हणजे कोणत्याहि धर्माशिवाय प्रारंभ करावयाचा, स्वतःचा मार्ग स्वतः तयार करावयाचा आणि

स्वतःच सर्व गोष्टी पाहायच्या, अनुभवायच्या; आणि जेव्हा तुम्ही हें कराल तेव्हा, आणि तेव्हाच तुम्हांला धर्म प्राप्त होईल. त्यापूर्वी तुम्ही नास्तिकाहून अधिक चांगले नसतां, उलट अधिक वाईटच असतां, कारण नास्तिक हा प्रामाणिक असतो व तो स्पष्टपणें सांगतो की या गोष्टींविषयी मी कांही जाणत नाहीं." याउलट तुमच्यासारखे इतर लोक कांही जाणत नाहीत, पण जगाला सांगत सुटतात की "आम्ही मोठे धार्मिक लोक आहोंत." त्यांच्यांत काय धार्मिकता आहे, कोण जाणें! त्यांनी आजीबाईच्या कांही भाकडकथा ऐकलेल्या असतात आणि पुरोहितांनी त्यांना त्या गोष्टींवर विश्वास ठेवायला बजाविलेलें असतें. आणि ते जर विश्वास ठेवणार नाहीत तर आलीच त्यांची कंबक्ती! हें असेंच चाललें आहे.

धर्माचा साक्षात्कार, धर्माची प्रत्यक्षानुभूति हाच एकमेव मार्ग आहे. आपल्यापैकी प्रत्येकाला तो शोधून घ्यावा लागेल. तर मग या शास्त्रांचा, जगांतील या विभिन्न धर्मग्रंथांचा काय उपयोग आहे? एखाद्या देशाच्या नकाशाप्रमाणे ते फार उपयोगी आहेत. मीं येथे येण्यापूर्वी आयुष्यभर इंग्लंडचे नकाशे पाहिले, आणि इंग्लंडविषयी कांही कल्पना बनविण्याच्या दृष्टीने त्यांचा बराच उपयोग झाला. तरी पण जेव्हा मी या देशांत आलों, तेव्हा प्रत्यक्ष देश व त्यांचे नकाशे यांत किती अंतर दिसलें! धर्मग्रंथ आणि प्रत्यक्ष साक्षात्कार यांतील अंतर असेंच आहे. हे ग्रंथ म्हणजे केवळ नकाशे होत, पूर्वीच्या लोकांचे अनुभव होत, आणि तशाच प्रकारचे अनुभव घेण्याचा प्रयत्न करण्यास व तसलेच शोध लावण्यास त्यांच्यापासून आपल्याला प्रेरणा मिळते; कदाचित् याहूनहि अधिक चांगले शोध लावण्यास आपल्याला

त्यांच्यापासून प्रेरणा मिळूं शकेल.

वेदान्ताचें हें पहिलें तत्त्व आहे की आत्मासाक्षात्कार हाच धर्म आहे. आणि ज्याला हा आत्मासाक्षात्कार होतो तोच धार्मिक आहे; आणि ज्याला हा साक्षात्कार होत नाही तो माणूस "मी जाणत नाहीं" असें म्हणणाऱ्या माणसाहून कांही अधिक चांगला नाही. उलट तो अधिक वाईटच आहे, कारण हा दुसरा माणूस निदान "मी जाणत नाहीं" असें म्हणतो व तो प्रामाणिक असतो. या साक्षात्काराच्या बाबतींत या धर्मग्रंथांचा आपल्याला पुष्कळ उपयोग होतो. केवळ मार्गदर्शक म्हणूनच नव्हे, तर साधनेसंबंधीच्या सूचना व पाठ देण्याच्या दृष्टीनेहि आपल्याला त्यांचें साहाय्य होतें; कारण प्रत्येक शास्त्राची स्वतःची अशी एक संशोधनपद्धति असते. या जगांत तुम्हांला असे पुष्कळ लोक आढळतील की जे म्हणतात--"मी धार्मिक होऊं इच्छीत होतों, या गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची माझी इच्छा होती, पण मला तें शक्य झालें नाही. म्हणून मी कशावरच विश्वास ठेवीत नाहीं." सुशिक्षितांतदेखील असे लोक तुम्हांला आढळतील. बहुसंख्य लोक तुम्हांला असें सांगतील की "मीं आयुष्यभर धार्मिक बनण्याचा प्रयत्न केला आहे, पण त्यांत कांही अर्थ नाही." त्याचबरोबर तुम्हांला पुढील गोष्ट आढळून येईल : समजा एक थोर रसायनशास्त्रज्ञ आहे. तो तुमच्याकडे येतो आणि धर्माविषयी वरीलप्रमाणे बोलतो. तुम्ही जर त्याला म्हणाल, "मी रसायनशास्त्रावर मुळीच विश्वास ठेवीत नाहीं, कारण सर्व आयुष्यभर मीं रसायनशास्त्रज्ञ होण्याचा प्रयत्न केला, आणि त्यांत कांहीच अर्थ नाही असें मला आढळलें" तर तो विचारील, "तुम्हीं केव्हा प्रयत्न केला?" "झोपायच्या आधी मी 'हे रसायनशास्त्रा माझ्याकडे ये'

असें वारंवार म्हणत असे आणि तें शास्त्र माझ्याकडे कधीच आलें नाही." रसायनशास्त्रज्ञ धर्माविषयी जें बोलला होता तें अगदी असेंच होतें. तो शास्त्रज्ञ तुमचें बोलणें ऐकून हसेल आणि म्हणेल "रसायनशास्त्रज्ञ होण्याचा हा कांही मार्ग नव्हे. तुम्ही प्रयोगशाळेंत कां गेलां नाही आणि तेथील सर्व अम्लें व क्षार घेऊन अधूनमधून आपले हात कां भाजून घेतले नाहीत ? त्यानेच तुम्हांला रसायनशास्त्र शिकतां आलें असतें." धर्माच्या बाबतींत असेच परिश्रम तुम्ही घेतां काय ? प्रत्येक शास्त्र शिकण्याची एक एक पद्धति असते आणि धर्महि धर्माच्या पद्धतीनेच शिकावा लागतो. धर्माच्या स्वतःच्या अशा पद्धति आहेत. आणि ज्यांना कांही गवसलें आहे, ज्यांनी धर्माचा प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे, अशा सर्व प्राचीन द्रष्टयांपासून वा ऋषींपासून आपल्याला ह्या पद्धति शिकतां येतील व आपण त्या अवश्य शिकल्या पाहिजेत. ते आपल्याला विशिष्ट पद्धति सांगतील आणि त्यांच्या द्वाराच आपल्याला धर्मांतील सत्यांचा साक्षात्कार होऊं शकेल. त्यांनी आपल्या आयुष्यभर प्रयत्न केला, मानसिक विकासाच्या विशिष्ट पद्धति त्यांनी शोधून काढल्या, त्यांच्या द्वारा त्यांनी मनाला सूक्ष्म अनुभवाच्या अवस्थेपर्यंत आणलें आणि त्यायोगें त्यांनी धर्मांतील सत्यांचा साक्षात्कार करून घेतला. धार्मिक होण्यासाठी, धर्म जाणण्यासाठी त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी, द्रष्टा किंवा ऋषि बनण्यासाठी आपल्याला या पद्धतींचा अवलंब केला पाहिजे व त्याप्रमाणे प्रत्यक्ष आचरण केलें पाहिजे; आणि मग जर आपल्याला कांही आढळणार नाही, तर आपल्याला हें म्हणण्याचा हक्क राहील की "धर्मांत कांही अर्थ नाही, कारण मी प्रयत्न करून अयशस्वी झालों आहें."

सर्व धर्मांची ही व्यवहार्य बाजू आहे. जगांतील प्रत्येक धर्म-ग्रंथांत तुम्हांला ती दिसेल. हे द्रष्टे तुम्हांला केवळ तत्त्वें व सिद्धान्तच शिकवीत नाहीत, तर त्यांच्या जीवनांत तुम्हांला प्रत्यक्ष केलेल्या साधनाहि आढळतील. आणि जरी त्यांनी एखादी गोष्ट आचारविधि म्हणून उघडपणें सांगितलेली नसेल तरी तुम्हांला त्यांच्या जीवनांत नेहमी हें दिसेल की ते देखील कधी कधी आपल्या आहार-विहाराचें नियमन करीत असत. त्यांचें संपूर्ण जीवन, त्यांचें आचरण, त्यांची पद्धति, त्यांचें सर्वकांही त्यांच्या भोवतालच्या सर्वसामान्य जनतेहून निराळें होतें. आणि याच कारणांमुळे त्यांना तें श्रेष्ठ ज्ञान प्राप्त झालें, तो दिव्य आत्मसाक्षात्कार घडला; आणि आपल्याला जर हा आत्मसाक्षात्कार करून घ्यावयाचा असेल तर या पद्धतींचा अवलंब करावयास आपण तयार असलें पाहिजे. प्रत्यक्ष साधना, प्रयत्न यांनीच आपल्याला हा साक्षात्कार लाभेल. म्हणून वेदान्ताची योजना अशी आहे : प्रथम तत्त्वांची मांडणी करणें, आपल्यासमोर ध्येय ठेवणें, आणि मग ज्यांच्या योगें ह्या ध्येयाप्रत पोहोचतां येईल, धर्माचें ज्ञान व त्याचा साक्षात्कार होईल, अशा पद्धति आपल्याला शिकविणें.

तसेंच, या पद्धति अनेक प्रकारच्या असल्या पाहिजेत. आपल्या स्वभावांतील भिन्नता लक्षांत घेतां एकच पद्धति सारख्या रीतीने आपल्यापैकी कोणाहि दोघांना लागू करणें अशक्य आहे असें आपल्याला दिसून येईल. आपल्यापैकी प्रत्येकाच्या मनाची घडण वेगवेगळ्या प्रकारची आहे. म्हणून प्रत्येकासाठी पद्धति भिन्न भिन्न असलीच पाहिजे. तुम्हांला आढळून येईल की कांहीजण अत्यंत भावनाशील असतात; कांहीजण तत्त्वज्ञानी व

बुद्धिवादी असतात; कांहीजण सर्व प्रकारच्या कर्मकांडाचा आश्रय घेतात व त्यांना स्थूल गोष्टींची आवश्यकता असते. एखादा मनुष्य तुम्हांला असा दिसेल की ज्याला विधि-अनुष्ठानांची वा असल्या प्रकारच्या कोणत्याच गोष्टींची जरूरी नाही; त्या त्याला मृत्यूसारख्या वाटतात. आणि दुसरा एखादा मनुष्य सर्व शरीर-भर गंडेदोरे व ताईत वागवील; त्याला या चिन्हांची एवढी आवड असते! दुसरा एखादा भावनाशील मनुष्य दानधर्म करूं इच्छितो; तो रडतो, प्रेम करतो वगैरे. आणि या सर्वांना खचितच एकच पद्धति उपयोगी पडणार नाही. सत्याप्रत पोहोचण्याची एकच पद्धति असती तर तिच्याशीं जुळेल असा ज्यांचा स्वभाव नाही त्या सर्वांच्या पक्षीं ती पद्धति म्हणजे मृत्युच ठरली असती. म्हणून पद्धति वेगवेगळया असणें जरूर आहे. वेदान्त हें जाणतो, आणि ज्यांचा आपण अवलंब करूं शकूं अशा भिन्न भिन्न पद्धति तो आपल्यासमोर मांडतो. तुम्हांला जी पद्धति आवडेल ती तुम्ही घ्या; एखादी पद्धति जर तुम्हांला उपयुक्त वाटत नसेल तर दुसरी एखादी तुम्हांला उपयुक्त वाटेल. या दृष्टिकोनांतून पाहि-ल्यास आपल्याला दिसेल की जगांत इतके धर्म आहेत हें किती भाग्याचें आहे! इतके द्रष्टे व आचार्य आहेत हें किती चांगलें आहे! कांही लोक इच्छितात त्याप्रमाणे एकच धर्म व एकच प्रेषित असण्यापेक्षा हें कितीतरी चांगलें आहे! मुसलमानांना वाटतें की सर्व जग मुसलमान व्हावें; ख्रिस्ती लोकांना वाटतें की तें ख्रिस्ती व्हावें; बौद्धांना वाटतें की तें बौद्ध व्हावें. पण वेदान्त म्हणतो की, "तुमची इच्छा असेल तर जगांतील प्रत्येक व्यक्ति वेगवेगळी राहूं द्या, पण त्यांच्या पाठीशीं तें एकमेव तत्त्व--तें एकत्व राहील. जगांत जितके अधिक प्रेषित असतील, जितके

अधिक पंथ, जितके अधिक ऋषि, जितक्या अधिक पद्धति असतील तितकें जगाच्या हिताचेंच आहे." सामाजिक जीवनाच्या बाबतींत, प्रत्येक समाजांत जितके अधिक व्यवसाय असतील तितकें त्या समाजाच्या दृष्टीने चांगलें; त्यामुळे त्या समाजांतील प्रत्येकालाआपल्या उपजीविकेची अधिक संधि लाभेल. विचाराच्या व धर्माच्या क्षेत्रांतदेखील असेंच आहे. आज आपल्याला शास्त्रांच्या इतक्या विभिन्न शाखा उपलब्ध आहेत हें किती चांगलें आहे--या विविधतेमुळे आपल्यापैकी प्रत्येकाला स्वत:च्या मनाचा विकास करण्याची कशी अधिक शक्यता आहे ! भौतिक क्षेत्रांतदेखील आपल्यासमोर इतक्या विभिन्न वस्तु पसरलेल्या असणें हें किती चांगलें आहे. त्यामुळे त्यांच्यापैकी आपल्याला जी आवडेल ती व जी उपयुक्त वाटेल ती वस्तु आपण निवडून घेऊं शकतों. धर्माच्या क्षेत्रांतहि असेंच आहे. जगांत इतके धर्म आहेत ही ईश्वराची किती अत्युत्कृष्ट देणगी आहे ! ईश्वर करो आणि प्रतिदिन त्यांची वाढ होवो ! इतकी की प्रत्येक मनुष्याला वेगवेगळा धर्म लाभो !

वेदान्त हें जाणतो आणि म्हणून तो केवळ तत्त्वाचा उपदेश करतो व ह्या तत्त्वाप्रत पोहोचण्याच्या अनेक पद्धति आहेत हें तो मान्य करतो. तो कोणाच्याहि विरुद्ध कांही म्हणत नाही--तुम्ही ख्रिस्ती असां किंवा बौद्ध असां, यहुदी असां किंवा हिंदु असां, कोणत्याहि पुराणावर तुमचा विश्वास असो, तुमची निष्ठा नाझरेथच्या प्रेषितावर असो, किंवा मक्केच्या अथवा भारताच्या किंवा इतर कोठल्याहि प्रेषितावर असो, किंवा तुम्ही स्वत:च एक प्रेषित असां, तो कांहीहि म्हणत नाही. तो फक्त त्या अंतिम सत्याचा उपदेश करतो की जें सर्व धर्मांचा आधार आहे आणि

सर्व प्रेषित, द्रष्टे, संत व ऋषि हे ज्याचीं केवळ मूर्त उदाहरणें व आविष्कार आहेत. तुमच्या प्रेषितांची संख्या हवी तितकी वाढूं द्या, वेदान्ताची त्याला कांही हरकत नाही. तो फक्त तत्त्वाचा उपदेश करतो, कोणती पद्धति स्वीकारावी हें तो तुमच्यावर सोपवितो. तुम्हांला वाटेल त्या मार्गाचा अवलंब करा; तुम्हांला वाटेल त्या प्रेषिताचें अनुसरण करा; पण जी तुमच्या स्वभावाला जुळते तीच पद्धति स्वीकारा म्हणजे तुमची निश्चित प्रगति होईल.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ नों. दि: ............

## आत्म्याचें स्वरूप व त्याचें अंतिम लक्ष्य

अगदी आरंभींची कल्पना अशी आहे की, मनुष्य जेव्हा मरण पावतो तेव्हा तो पूर्णपणें नष्ट होत नाही, त्याच्या मृत्यू-नंतरहि कांहीतरी राहतें. इजिप्त, बाबिलोनिया आणि प्राचीन भारत ह्या तीन अत्यंत प्राचीन देशांतील लोकांच्या विचारांची तुलना करून त्या सर्वांचें या बाबतींत काय मत होतें हें पाहिल्यास उत्तम होईल. इजिप्त व बाबिलोनिया या देशांतील लोकांची आत्म्याविषयी एक विशिष्ट प्रकारची कल्पना आढळते. 'एखाद्याचा आत्मा म्हणजे त्याचीच एक अगदी हुबेहुब प्रतिमूर्ति असते' हीच ती कल्पना होय. त्यांच्या मतानुसार प्रत्येक मानवशरीरांत हुबे-हुब त्या माणसासारखाच आणखी एक पुरुष वसत असून तो तेथे कार्य करीत असतो. जेव्हा बाह्य शरीर मरण पावतें तेव्हा तो आंतला दुसरा पुरुष बाहेर पडतो आणि कांही काळ तसाच अस्तित्वांत राहतो. परंतु या दुसऱ्या पुरुषाचें जीवन बाह्य शरीरा-च्या सुरक्षिततेवर अवलंबून असतें. या पुरुषाने टाकलेल्या बाह्य शरीराच्या एखाद्या भागाला दुखापत झाली तर या पुरुषाच्याहि त्याच भागाला निश्चितच दुखापत होते. म्हणूनच प्राचीन इजिप्त-मधील लोकांनी माणसाच्या मृत शरीरांत मसाला वगैरे भरून त्या मृत शरीरावर पिरॅमिड बांधून, तें सुरक्षित ठेवण्याची इतकी काळजी घेतलेली दिसते. बाबिलोनिया व प्राचीन इजिप्त या दोन्ही देशांतील लोकांच्या समजुतीप्रमाणे ही प्रतिमूर्ति वा पुरुष चिरकाल अस्तित्वांत राहूं शकत नाही. फार तर कांही काळच तो अस्ति-

त्वांत राहूं शकतो, म्हणजे, त्याने सोडलेलें शरीर जोंपर्यंत सुरक्षित ठेवलें जाऊं शकतें तोंपर्यंतच तो अस्तित्वांत राहूं शकतो.

दुसरें वैशिष्टय हें की या प्रतिमूर्तीच्या कल्पनेशीं एकप्रकारचें भय निगडित असलेलें आपल्याला दिसून येतें. हा प्रतिमूर्तिस्वरूप पुरुष नेहमी दुःखीकष्टी असतो. तो सर्वदा घोर दुःखांत असतो. तो पुनःपुनः जे जिवंत आहेत त्यांच्याकडे येतो आणि त्याला आता न मिळणाऱ्या अन्न, पाणी व अन्य सुखाच्या गोष्टीं तो त्यांना मागत असतो. नाईल नदीचें ताजें पाणी तो मागतो, तें त्याला प्यावेसें वाटतें, पण त्याला तें पितां येत नाही. या जगांत असतांना ज्या अन्नाची त्याला आवड होती तें परत मिळावें अशी त्याची इच्छा असते आणि जेव्हा त्याला दिसून येतें की या वस्तु त्याला मिळूं शकत नाहीत तेव्हा तो उग्र रूप धारण करतो व त्याला जर या वस्तु पुरविण्यांत आल्या नाहीत तर तो जिवंत व्यक्तींना दुःख देण्याची व मारून टाकण्याची धमकी देतो.

आर्यांच्या विचारसरणीकडे येतांच आपल्याला फार मोठा भेद जाणवतो. बाह्य शरीर व आंतील प्रतिमूर्ति यांची कल्पना आर्य लोकांमधेहि आढळते. पण त्यांच्या मतानुसार प्रतिमूर्तिस्वरूप शरीर हें सूक्ष्म स्वरूपाचें असतें. आणि एक मोठा भेद हा आहे की या सूक्ष्म शरीराचें--त्याला तुम्ही आत्मा किंवा आणखी कांही म्हणा--जीवन त्याने टाकलेल्या शरीरावर अवलंबून नसतें; उलट त्याने त्या शरीरापासून सुटका करून घेतलेली असते आणि म्हणूनच मृताचें शरीर जाळण्याची विशिष्ट प्रथा आर्यांत दिसते. ते व्यक्तीने सोडलेल्या शरीराला नाहीसें करूं इच्छितात; याउलट इजिप्तमधील लोक त्या मृत शरीरांत मसाला भरून आणि त्यावर पिरॅमिड बांधून तें जतन करूं इच्छितात. मृत शरीरांची

विल्हेवाट लावण्याची अगदी रानटी स्वरूपाची पद्धत सोडली तर, ज्या देशांनी थोडीबहुत प्रगति केली आहे अशांच्या बाबतींत, मृतांच्या शरीराची विल्हेवाट लावण्याची पद्धत ही त्यांच्या आत्म्याविषयीच्या कल्पनेची सूचक असते. जेथे जेथे निघून गेलेल्या आत्म्याची कल्पना मृत शरीराशीं निगडित असलेली आढळते, तेथे तेथे शरीर जतन करून ठेवण्याची प्रवृत्ति दिसून येते; आणि कोणत्या ना कोणत्या प्रकारें मृत शरीर पुरण्याची पद्धतिहि तेथे आढळते. याच्या उलट, ज्यांच्या ठिकाणीं ही कल्पना विकसित झाली आहे की आत्मा हा शरीराहून भिन्न आहे आणि शरीराचा नाश झाला तरी त्याला इजा पोहोचत नाही, ते नेहमी मृत शरीर जाळण्याच्या पद्धतीचा अवलंब करतात. याप्रमाणे सर्व प्राचीन आर्यवंशाच्या लोकांमधे मृताला जाळण्याची पद्धति आपल्याला आढळते. पारशांनी मात्र ती बदलून मृत शरीर एखाद्या मिनारावर उघडें टाकून देण्याची पद्धति अवलंबिली. परंतु त्या मिनाराचें नांवच मुळी 'दख्म'—'दहनभूमि' असें आहे; यावरून हें दिसतें की प्राचीन काळीं ते देखील मृत शरीरें जाळीत असत. दुसरें वैशिष्टच हें की आर्यांच्या ठिकाणीं या दुसऱ्या शरीराच्या वा आत्म्याच्या संबंधांत भयाची भावना नव्हती. ते आत्मे अन्न वा कसलीहि मदत मागण्यासाठी खाली उतरत नाहीत आणि अन्न वा मदत मिळाली नाही म्हणून भयंकर रूप धारण करून जिवंत माणसांना नष्ट करण्याचाहि ते प्रयत्न करीत नाहीत. ते सुटकेमुळे कांहीसे आनंदीच असतात. चिताग्नि हा शरीराशीं संबंध तुटल्याचें प्रतीक आहे. निघून गेलेल्या आत्म्याला हळुवारपणें वर घेऊन जाऊन जिथे दुःख नसून निरंतर आनंदच आहे अशा पितृलोकाप्रत पोहोचवून देण्यास या प्रतीकाला विनविलें जातें.

दा. क्र. ९२३९६

या दोन कल्पनांच्या बाबतींत एक गोष्ट चटकन् आपल्या लक्षांत येते की त्या समान स्वरूपाच्या आहेत. त्यांत फरक एव-ढाच की एक आशावादी आहे व दुसरी प्राथमिक स्वरूपाची असल्यामुळे निराशावादी आहे. दुसरींतूनच पहिली उत्क्रांत झाली आहे. स्वत: आर्य लोकांमधे देखील फार प्राचीन काळीं इजिप्त-मधील लोकांच्या कल्पनेसारखी कल्पना असणें शक्य आहे. त्यांचे प्राचीनतम ग्रंथ अभ्यासतांना या कल्पनेची शक्यता आढळते. पण आर्यांच्या ग्रंथांत वर्णिलेला हा आत्मा दिव्य स्वरूपाचा आहे. जेव्हा मनुष्य मरतो तेव्हा त्याचा हा आत्मा पितृलोकांत जातो आणि तेथे आपल्या पितरांप्रमाणेच सुखांचा उपभोग घेत राहतो. हे पितर मोठ्या प्रेमाने त्याचें स्वागत करतात. आत्म्यासंबंधीची भारतांतील ही सर्वांत प्राचीन अशी कल्पना आहे. पुढे पुढे आत्म्यासंबंधींची ही कल्पना अधिकाधिक उच्च होत गेली. नंतर त्यांना कळून आलें की आधीं ज्याला ते आत्मा म्हणत असत तो वस्तुत: आत्मा नव्हता. तें दिव्य शरीर, तें सूक्ष्म शरीर--मग तें कितीहि सूक्ष्म असो--अखेर शरीरच होय; आणि सर्व शरीरें हीं स्थूल किंवा सूक्ष्म जडद्रव्याचींच बनलीं असलीं पाहिजेत. ज्याला म्हणून रूप वा आकार आहे तें मर्यादितच असणार व तें चिरंतन स्वरूपाचें असू शकत नाही. रूप असलेल्या प्रत्येक वस्तूंत परिवर्तन हें अंगभूतच असतें. जें परिवर्तनशील आहे तें चिरंतन कसें असूं शकेल ? म्हणून या दिव्य शरीराच्या पलीकडे मनुष्याचा 'आत्मा' म्हणून कांहीतरी आहे याचा शोध त्यांनी लावला. त्यानंतर ह्या आत्म्यासंबंधीचा विचार सुरू झाला. ह्या विचारांत देखील पुढे पुष्कळ परिवर्तनें झालीं. कांहींनी अशी कल्पना केली की हा आत्मा शाश्वत आहे, तो अत्यंत सूक्ष्म आहे,

अणूप्रमाणे सूक्ष्म आहे; शरीराच्या कोणत्यातरी भागांत तो राहतो, आणि जेव्हा मनुष्य मरतो तेव्हा हा आत्मा दिव्य शरीराला बरोबर घेऊन निघून जातो. कांही दुसरे लोक असे होते की ज्यांनी आत्मा हा अणूप्रमाणे सूक्ष्म आहे ही गोष्ट नाकारली; सूक्ष्म शरीर म्हणजेच आत्मा ही कल्पना त्यांनी ज्या कारणासाठी नाकारली होती त्याच कारणासाठी आत्मा अणूप्रमाणे सूक्ष्म असण्याची कल्पना त्यांनी अमान्य केली.

या सर्व भिन्न मतांतूनच सांख्य तत्त्वज्ञानाचा उदय झाला. इतर मतांहून त्यांत आपल्याला पुष्कळ फरक आढळतो. त्यांत हा विचार मांडला आहे की मनुष्याचें सगळ्यांत बाहेरचें असें स्थूल शरीर असतें; त्याच्या मागे सूक्ष्म शरीर असतें; त्याच्या द्वारें मन जणुकांही कार्य करीत असतें; आणि त्याच्याहि पलीकडे आत्मा असतो; त्याला सांख्य मनाचा 'द्रष्टा' असें म्हणतात, आणि तो सर्वव्यापी असतो. म्हणजे माझा आत्मा, तुमचा आत्मा, प्रत्येकाचा आत्मा हा एकाच वेळीं सर्वत्र असतो. तो जर निराकार आहे तर अवकाशांत तो सामावलेला आहे असें कसें म्हणतां येईल ? जें कांही अवकाशांत सामावलेलें असतें त्याला आकार असतो. जें निराकार आहे तें अनंतच असलें पाहिजे. म्हणून प्रत्येक आत्मा हा सर्वत्र आहे. सांख्यांचा दुसरा सिद्धान्त तर अधिक विस्मयकारक आहे. प्राचीन काळीं त्यांना आढळलें की माणसें-- निदान पुष्कळशीं माणसें प्रगतिशील आहेत. पावित्र्य, सामर्थ्य व ज्ञान यांच्या बाबतींत त्यांचा विकास झालेला त्यांना आढळला, आणि मग असा प्रश्न विचारला गेला की माणसांनी व्यक्त केलेलें हें पावित्र्य, हें सामर्थ्य, हें ज्ञान कोठून आलें ? बालक प्रारंभीं अजाण असतें. तें मोठें होतें आणि एक बलशाली, सामर्थ्यवान,

ज्ञानवान असा माणूस बनतें. त्या बालकाने ही ज्ञानाची व सामर्थ्याची संपत्ति कोठून प्राप्त केली ? याचें उत्तर मिळालें : ती आत्म्यांत होती; त्या बालकाच्या आत्म्यांत आरंभापासूनच ही शक्ति व हें ज्ञान होतें. ही शक्ति, हें पावित्र्य, हें सामर्थ्य त्या आत्म्यांत होतें, पण तें सर्व अव्यक्त होतें; तेंच व्यक्त झालें आहे. या 'व्यक्त' किंवा 'अव्यक्त'चा अर्थ काय ? प्रत्येक आत्मा हा सांख्यांच्या मताप्रमाणे शुद्ध, पूर्ण, सर्वशक्तिमान् आणि सर्वज्ञ आहे; पण स्वतःचा बाह्य आविष्कार मात्र त्याला प्राप्त झालेल्या मतानुसारच तो करूं शकतो. मन हें जणुकांही आत्म्याचें प्रतिबिंब पाडणारा आरसा आहे. माझें मन कांहीएका मर्यादेपर्यंत माझ्या आत्म्याच्या शक्तींना प्रतिबिंबित करूं शकतें. तसेंच तुमच्या व प्रत्येकाच्या मनाचेंहि आहे. जो आरसा अधिक स्वच्छ असतो त्याच्यांत आत्म्याचें प्रतिबिंब अधिक चांगलें पडतें. अशा रीतीने प्रत्येकाच्या मनाला अनुसरून आत्म्याची अभिव्यक्ति भिन्न भिन्न असते; पण आत्मे स्वरूपतः शुद्ध व पूर्ण आहेत.

एक संप्रदाय असा होता की ज्याला हें मत मान्य नव्हतें. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आत्मे स्वभावतः शुद्ध व पूर्ण असले तरी ही शुद्धता आणि पूर्णता कांही वेळां संकुचित होते व कांही वेळां विकसित होते. कांही विचार व कांही कर्मे अशीं असतात की तीं जणु आत्म्याच्या स्वरूपाला संकुचित करतात; आणि तद्वतच कांही इतर प्रकारचे विचार व कर्में अशीं असतात की जीं आत्म्याचा स्वभाव अभिव्यक्त करतात. याचेंहि स्पष्टीकरण दिलें आहे. आत्म्याच्या सामर्थ्याला व शुद्धतेला जे विचार व जीं कर्में संकुचित करतात ते वाईट विचार व वाईट कर्में होत आणि जे विचार व जीं कर्में आत्म्याला अभिव्यक्त करतात, त्याचें सामर्थ्य

प्रकट करतात तीं सर्व चांगलीं व नैतिक कर्में होत. या दोन मतांतील भेद फारच थोडा आहे, विकसित होणें व संकुचित होणें या शब्दांशीं तें खेळणें आहे. आत्म्याच्या आविष्कारांतील भेद हा त्याच्याशीं संलग्न असलेल्या मनावर अवलंबून असतो असें प्रतिपादणारें मत निःसंशय अधिक चांगलें स्पष्टीकरण आहे. परंतु संकोच व विकास प्रतिपादणारें मत या दोन शब्दांच्या पाठीशीं दडूं इच्छितें. त्यांना विचारलें पाहिजे की आत्म्याचा संकोच व विकास म्हणजे खरोखर काय ? आत्मा हा अ-जड आहे. जडद्रव्याच्या बाबतींत संकोच व विकास म्हणजे काय हा प्रश्न विचारला जाऊं शकतो, मग तें जडद्रव्य स्थूल असो की मनासारखें सूक्ष्म असो. परंतु त्याच्या पलीकडे, जें द्रव्य नाही, जें दिशा व काळ यांनी मर्यादित नाही त्याच्या संबंधांत संकोच व विकास हे शब्द कसे लागू पडतील ? म्हणून असें दिसतें की, आत्मा हा नित्य शुद्ध व नित्य पूर्ण आहे, फक्त त्याचें स्वरूप कांही मनांमधे इतर मनांपेक्षा अधिक स्पष्टपणें प्रतिबिंबित झालेलें असतें हें मत, हा सिद्धान्तच अधिक चांगला आहे. जसजसें मन बदलतें, त्याच्या गुणांचा विकास होतो व तें अधिकाधिक शुद्ध होतें तसतसें त्यांत आत्म्याचें अधिकाधिक चांगलें प्रतिबिंब पडतें. असें हें चालत राहतें. शेवटीं मन इतकें शुद्ध होतें की तें आत्म्याच्या स्वभावाचें परिपूर्ण प्रतिबिंब उमटवतें. तेव्हा आत्मा मुक्त होतो.

आत्म्याचें स्वरूप हें असें आहे. त्याचें अंतिम लक्ष्य काय आहे ? भारतांतील विविध संप्रदायांच्या मतें आत्म्याचें अंतिम लक्ष्य एकच असलेलें दिसतें. या बाबतींत सर्वांचें एकच मत आहे आणि तें म्हणजे मुक्ति हेंच आत्म्याचें अंतिम लक्ष्य होय. मनुष्य हा स्वरूपतः अनंत आहे, ज्या उपाधींनी तो सध्या मर्यादित

दिसतो तें त्याचें खरें स्वरूप नव्हे. पण या उपाधींतून तो प्रगतीचा व उन्नतीचा मार्ग आक्रमीत आहे. अशा रीतीने प्रगत होत होत शेवटीं तो आपल्या असीम अनंत स्वरूपाप्रत पोहोचेल. ह्या अनंत स्वरूपावर त्याचा जन्मसिद्ध हक्क आहे. आपल्या भोवती दिसणारे हे सर्व स्थूल आणि सूक्ष्म मिश्र पदार्थ, त्यांच्यांत होणारे बदल--हें कांही आपलें अंतिम गंतव्य स्थान नव्हे, ते सारे केवळ आनुषंगिक आहेत, नश्वर आहेत. पृथ्वी आणि सूर्य, चंद्र आणि तारे, उचित व अनुचित, चांगलें व वाईट, हास्य व अश्रु, हर्ष व खेद या साऱ्या परिवर्तनशील गोष्टी आपल्याला अनुभव प्राप्त करून देण्यासाठी आहेत. हे अनुभव प्राप्त करीत करीत शेवटीं आत्मा आपलें पूर्ण स्वरूप व्यक्त करतो, आणि उपाधींतून मुक्त होतो. मग तो आंतर किंवा बाह्य प्रकृतीच्या कोणत्याहि नियमांनी बद्ध राहत नाही. तो सर्व नियमांच्या, सर्व मर्यादांच्या, समस्त प्रकृतीच्या पलीकडे गेलेला असतो. प्रकृति ही आत्म्याच्या स्वाधीन झालेली असते. आणि सध्या तो समजत आहे त्याप्रमाणे, तो मग प्रकृतीच्या स्वाधीन राहत नाही. हेंच आत्म्याचें एकमेव लक्ष्य आहे. आणि ज्या पायऱ्यांनी तो अभिव्यक्त होतो, ज्या अनुभवांमधून तो या ध्येयाकडे--मुक्तीकडे जातो ते म्हणजे त्याचे निरनिराळे जन्म होत. आत्मा जणुकांही खालच्या श्रेणीचें एक शरीर घेतो आणि त्याच्या द्वारा स्वतःला अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न करतो. तें अपुरें आहे असें त्याला दिसून येतें, तो तें टाकून आणि त्याहून उच्च असें शरीर ग्रहण करतो. त्याच्या द्वारा स्वतःला अभिव्यक्त करण्याची तो धडपड करतो. तें देखील अपुरें आहे असें त्याला आढळतें. तेंहि तो टाकतो आणि त्याहूनहि अधिक उच्च असें शरीर घेतो. त्याला जोंपर्यंत एखादें असें शरीर लाभत नाही की ज्याच्या

द्वारा तो स्वत:च्या उच्चतम आकांक्षा व्यक्त करूं शकेल तोंपर्यंत हा क्रम असाच चालूं राहतो. असें शरीर लाभलें म्हणजे आत्मा मुक्त होतो.

आता प्रश्न असा आहे की आत्मा जर अनंत आहे आणि तो जर सर्वत्र आहे--तो जर अ-जड, अ-पार्थिव असेल तर तो सर्वव्यापी असलाच पाहिजे--तर मग त्याने देह धारण करणें आणि एकामागोमाग एक अशा शरीरांतून प्रवास करणें याचा अर्थ काय? खरी गोष्ट ही आहे की आत्मा येत नाही किंवा जात नाही, जन्मत नाही किंवा मरत नाही. जो सर्वव्यापी आहे त्याला जन्म कसा असेल? आत्मा हा एखाद्या शरीरांत राहतो असें म्हणणें अर्थशून्य आहे, मूर्खपणाचें आहे. जें अमर्याद आहे तें मर्यादित जागेंत कसें राहूं शकेल? जेव्हा एखादा मनुष्य हातांत पुस्तक घेऊन एखादें पान वाचतो, तें उलटतो, दुसरें वाचतो, तेंहि उलटतो, व याप्रमाणे पुस्तक वाचीत जातो, तेव्हा तें पुस्तकच उलटलें जातें, पानेंच पलटलीं जातात, वाचणारा माणूस नव्हे; तो जिथे आहे तिथेच राहतो. आत्म्याच्या बाबतींतहि असेंच आहे. ही संपूर्ण प्रकृति म्हणजे तें पुस्तक असून आत्मा तें वाचीत आहे. प्रत्येक जन्म हा जणु त्या पुस्तकाचें एक पान आहे. तें वाचून झालें की तें उलटलें जातें. मग दुसरें, मग तिसरें, अशा रीतीने अखेर तें संपूर्ण पुस्तक संपतें आणि प्रकृतीचे सर्व अनुभव प्राप्त करून घेऊन आत्मा पूर्णत्वास पोहोचतो. तरीहि तो स्वत: जागचा हालला नाही. तो आला नाही की गेला नाही. तो फक्त अनुभव गोळा करीत होता. पण आपल्याला असें भासतें की आपण चालत आहोंत. पृथ्वी फिरते आहे आणि तरीहि पृथ्वी फिरत नसून सूर्य फिरत आहे असें आपण समजतों. असें समजणें

चूक आहे, इंद्रियांना होणारा तो भ्रम आहे हें आपण जाणतों. त्याचप्रमाणे आपण जन्मतों व मरतों, येतों व जातों हाहि भ्रम आहे. आपण येत नाहीं किंवा जात नाहीं, किंवा आपला जन्महि झाला नाही. कारण आत्मा जाणार कुठे? त्याला जाण्याला कोणतेंहि ठिकाण नाही. असें कोणतें ठिकाण आहे की जिथे तो नाही ?

अशा रीतीने 'प्रकृतीचा क्रमविकास आणि आत्म्याची क्रमाभिव्यक्ति' या सिद्धान्ताप्रत आपण येतों. क्रमविकासाची प्रक्रिया, अधिकाधिक उच्च अशीं मिश्रणें होण्याची प्रक्रिया आत्म्यांत होत नाही. आत्मा जसा होता तसाच आहे. ही सर्व प्रक्रिया प्रकृतींत घडत असते. परंतु जसजशी प्रकृति विकसित व प्रगत होत जाते तसतसें आत्म्याचें ऐश्वर्य अधिकाधिक व्यक्त होत जातें. समजा इथे एक पडदा आहे आणि त्याच्या मागे आश्चर्यकारक असें दृश्य आहे. त्या पडद्याला एक लहान छिद्र आहे. त्यांतून आपण पलीकडच्या दृश्याचा एक लहानसा अंश पाहूं शकतों. समजा त्या छिद्राचा आकार मोठा झाला. तें छिद्र जसजसें मोठें होत जाईल तसतसा पाठीमागच्या दृश्याचा अधिकाधिक भाग दृष्टीच्या टप्प्यांत येईल आणि जेव्हा संपूर्ण पडदा नाहीसा होईल तेव्हा तुमच्या आणि त्या दृश्याच्या मध्ये कांहीच राहणार नाही. तुम्हीं तें दृश्य संपूर्णपणें पाहूं शकाल. हा पडदा म्हणजे माणसाचें मन आहे. त्याच्या मागे आत्म्याचें अनंत सामर्थ्य, त्याचें पावित्र्य, त्याचें ऐश्वर्य आहे. आणि जसजसें हें मन स्वच्छ व शुद्ध होत जातें तसतसें आत्म्याचें अधिकाधिक ऐश्वर्य प्रकट होतें. आत्मा बदलत आहे असें नव्हे, तर परिवर्तन त्या पडद्यांतच होत आहे. आत्मा हा अपरिवर्तनशील, अमर, शुद्ध आणि आनंदस्वरूप आहे.

तेव्हा अखेर हा सिद्धान्त पुढीलप्रमाणे ठरतो. उच्चतम माणसापासून नीचतम, दुष्ट अशा माणसापर्यंत, सर्वश्रेष्ठ मानवापासून पायाखाली सरपटणाऱ्या निकृष्टतम कीटकापर्यंत, प्रत्येकांत तोच शुद्ध, पूर्ण, अनंत आणि आनंदस्वरूप आत्मा वसत आहे. कीटकामधे त्या आत्म्याच्या शक्तीचा व शुद्धतेचा अत्यल्प अंश अभिव्यक्त होतो, आणि सर्वश्रेष्ठ पुरुषांत त्यांचा बराच मोठा अंश प्रकट होतो. या दोहोंमधील भेद फक्त अभिव्यक्तीच्या प्रमाणांत आहे, त्यांच्या मूळ स्वरूपांत कांहीच भेद नाही. अखिल भूतमात्रांत तोच शुद्ध आणि पूर्ण आत्मा वास करतो.

स्वर्ग व इतर लोक यांच्या संबंधीच्याहि कल्पना आढळतात, पण त्या गौण मानल्या जातात. स्वर्गाची कल्पना ही कमी प्रतीची मानली जाते. सुखोपभोगासाठी एखादें स्थान असावें या इच्छेंतून ही कल्पना उदय पावते. आपण अज्ञपणें आपल्या सध्याच्या अनुभवांनी संपूर्ण विश्वाला मर्यादित करूं इच्छितों. मुलें असें समजतात की सर्व विश्व मुलांनीच भरलें आहे. वेडयांना असें वाटतें की सर्व विश्व म्हणजे वेडयांचेंच इस्पितळ आहे. याप्रमाणे प्रत्येकजण आपल्या अनुभवाप्रमाणे विश्वाची कल्पना करीत असतो. ज्यांना हें जग केवळ विषयोपभोगासाठी आहे असें वाटतें, ज्यांचें सर्व आयुष्य खाण्या-पिण्यांत व मजा करण्यांत खर्च होतें, ज्यांच्यांत व पशूंत फारच थोडा भेद आहे, असे लोक साहजिकच अशा स्थानांची कल्पना करतांना दिसतात की जेथे त्यांना अधिक सुखोपभोग प्राप्त होतील; कारण हें आयुष्य अल्प आहे. त्यांची सुखोपभोगाविषयीची तृष्णा अमर्याद आहे, म्हणून जेथे त्यांना अनिर्बंध विषयोपभोग मिळतील, अशा स्थानांची कल्पना करणें त्यांना क्रमप्राप्त आहे; आणि आपल्याला असें दिसून येईल की

अशा ठिकाणीं जाण्याची ज्यांच्या ठायीं वासना आहे त्यांना तेथे जावेंच लागेल; ते स्वप्न पाहत राहतील, आणि हें स्वप्न संपलें की त्यांना दुसरें स्वप्न पडूं लागेल. त्या स्वप्नांत त्यांना विपुल विषयोपभोग प्राप्त होतील; जेव्हा तेंहि स्वप्न भंगेल तेव्हा त्यांना दुसऱ्या कशाचा तरी विचार करावा लागेल. अशा प्रकारें ते एका स्वप्नांतून दुसऱ्या स्वप्नांत जात राहतील.

यानंतर शेवटचा सिद्धान्त येतो, आत्म्याविषयीचा आणखी एक विचार येतो. आत्मा जर मूलतः व स्वभावतः शुद्ध व पूर्ण आहे आणि जर प्रत्येक आत्मा अनंत व सर्वव्यापी आहे तर पुष्कळ आत्मे कसे असूं शकतील ? एकाच वेळीं अनेक अनंत वस्तु असूं शकत नाहीत. दोन देखील अनंत वस्तु असूं शकत नाहीत, अनेकांची तर गोष्टच सोडा. जर दोन अनंत वस्तु असतील तर एक दुसरीला मर्यादित करील आणि दोन्ही सान्त बनतील. अनंत अशी वस्तु एकच असूं शकते, आणि धीटपणें शेवटचा निष्कर्ष काढला गेला--ती अनंत वस्तु एकच आहे, दोन नव्हेत.

सुंदर पिसारा असलेले दोन पक्षी एकाच झाडावर बसले आहेत. एक शेंड्यावर, तर दुसरा खाली. खालचा पक्षी फळें खातो आणि वरचा पक्षी--शांत व गंभीर, स्वतःच्याच ऐश्वर्यांत निमग्न असा बसलेला असतो. खालचा पक्षी बरीं व वाईट फळें खात आहे आणि विषयोपभोगाच्या मागे लागलेला आहे; आणि जेव्हा प्रसंगोपात्त एखादें कडू फळ तो खातो, तेव्हा तो थोड्या वरच्या फांदीवर चढतो आणि वर पाहतो. त्याला तो दुसरा पक्षी शांत व गंभीर बसलेला दिसतो, तो चांगल्या किंवा वाईट कोणत्याच फळाची पर्वा करीत नाही, तो आत्मसंतुष्ट असतो--स्वतःचा आनंद सोडून तो दुसऱ्या कोणत्याहि सुखाची आकांक्षा धरीत

नाही. तो स्वतःच जर आनंदस्वरूप आहे तर तो दुसऱ्या गोष्टींत आनंद कसा शोधील ? खालचा पक्षी वरच्या पक्ष्याकडे पाहतो आणि त्याच्याजवळ जाण्याची त्याला इच्छा होते. तो किंचित् वर जातो; पण आपल्या जुन्या संस्कारांच्या प्रभावामुळे तो तींच फळें खात राहतो. पुन्हा एक अत्यंत कडू फळ तो खातो, त्याला धक्का बसतो आणि मग तो पुनः वर पाहतो. तिथे त्याला तो वरचा पक्षी तसाच शांत व गंभीर बसलेला दिसतो. तो जवळ येतो, पण पुन्हा पूर्वकर्मांनी खाली ओढला जातो आणि त्याचें गोड व कडू फळें खाणें चालूं राहतें. पुन्हा अत्यंत कडू फळ त्याच्या खाण्यांत येतें. तो वर पाहतो आणि आणखी जवळ जातो, आणि तो जसजसा जवळजवळ येऊं लागतो, तसतसा त्या वरच्या पक्षाच्या पिसाऱ्यांतून निघणारा प्रकाश त्याच्यावर पडतो. त्याचा स्वतःचा पिसारा वितळूं लागतो आणि तो जेव्हा वरच्या पक्ष्याच्या अगदी जवळ येतो तेव्हा संपूर्ण दृश्य बदलतें. त्याला दिसून येतें की खालचा पक्षी कधी अस्तित्वांतच नव्हता, तो नेहमी वरचाच पक्षी होता; त्याला जो खालचा पक्षी भासला तें एक क्षुद्रसें प्रतिबिंब होतें.

आत्म्याचें स्वरूप हें असें आहे. हा मानवी आत्मा विषयोपभोगामागे व जगांतील असार गोष्टींमागे लागलेला असतो. पशूंप्रमाणे त्याचें जीवन केवळ इंद्रियांतच आबद्ध असतें, स्नायूंच्या क्षणिक सुखांत तो राहतो. जेव्हा एखादा आघात होतो तेव्हा क्षणभर डोकें गरगरतें आणि सर्वकांही अदृश्य होत आहे असें त्याला वाटूं लागतें. आणि त्याला असें आढळतें की तो समजत होता त्याप्रमाणे हें जग नाही, जीवन हें इतकें सरळ नाही. तो वर पाहतो आणि क्षणभर त्याला त्या अनंत ईश्वराचें दर्शन होतें,

त्या ईश्वराचें ओझरतें दर्शन त्याला होतें, तो थोडासा त्याच्या जवळ जातो, परंतु त्याच्या पूर्वकर्मांमुळे तो दूर ओढला जातो. आणखी एखादा आघात जेव्हा त्याच्यावर पडतो तेव्हा तो पुन्हा ईश्वराच्या जवळ जातो. त्याला पुन्हा त्या अनंताचें आणखी एक ओझरतें दर्शन होतें. तो ईश्वराच्या अधिक जवळ येतो आणि जसजसा तो अधिकाधिक जवळ येत जातो तसतसें त्याला कळायला लागतें की त्याचें व्यक्तित्व--त्याचें नीच, प्राकृत, अत्यंत स्वार्थी असें व्यक्तित्व--वितळत आहे, त्या लहानशा व्यक्तित्वाला सुखी करण्यासाठी संपूर्ण जगाला बळी देण्याची त्याची इच्छा नष्ट होत आहे. आणि हळूहळू तो जसजसा अधिकाधिक जवळ जातो तसतशी ही समस्त प्रकृति वितळायला लागते. जेव्हा तो ईश्वराच्या अगदी जवळ येतो तेव्हा संपूर्ण दृश्य बदलतें आणि त्याला आढळतें की आपण तो दुसरा पक्षी होतों; जो ईश्वर आपण दुरून पाहत होतों तो आपलाच आत्मा होता; ऐश्वर्याचें व भव्यतेचें आश्चर्यकारक असें जें दर्शन आपल्याला झालें तेंहि आपल्याच आत्म्याचें होतें आणि वस्तुतः आपण स्वतःच तो ईश्वर होतों. तेव्हा त्या आत्म्याला प्रत्येक वस्तूचें जें सत्यस्वरूप आहे त्याचें दर्शन होतें.

जें प्रत्येक अणूंत आहे, जें सर्वत्र आहे, सर्व वस्तूंचें जें मूल स्वरूप आहे, जो या विश्वाचा ईश्वर आहे तोच तूं आहेस हें जाण; तूं मुक्त आहेस हें जाण.

---

# मानसशास्त्राचें महत्त्व

पाश्चात्त्य देशांत मानसशास्त्राविषयीची कल्पना बऱ्याच खालच्या पातळीवरची आहे. मानसशास्त्र हें एक श्रेष्ठ शास्त्र आहे. परंतु पाश्चात्त्य देशांत तें इतर शास्त्रांच्याच दर्जाचें मानलें जातें, म्हणजे इतर शास्त्रांप्रमाणे उपयुक्ततेच्या निकषाने त्याचेंहि मूल्यमापन केलें जातें.

मानवजातीला त्याच्यापासून व्यावहारिक लाभ किती होण्यासारखा आहे ? आमच्या झपाट्याने वाढणाऱ्या सुखांत तें किती भर घालूं शकेल ? आमच्या वाढत्या दुःखांना तें कितपत कमी करील ? पाश्चिमात्त्य देशांत सगळ्या गोष्टींचें मूल्यमापन याच निकषाने केलें जातें.

लोक हें विसरल्यासारखे दिसतात की आपल्या सर्व ज्ञानापैकी शेकडा ९० टक्के ज्ञान स्वभावतःच असें आहे की त्याचा आपल्या भौतिक सुखाची वाढ करण्याकडे किंवा आपलें दुःख कमी करण्याकडे व्यावहारिक उपयोग करतां येत नाही. आपल्या शास्त्रीय ज्ञानाच्या अत्यल्प अंशाचाच अशा रीतीने आपल्या दैनंदिन जीवनांत व्यावहारिक उपयोग होऊं शकतो. याचें कारण असें की आपल्या जाणीवयुक्त मनाचा अत्यंत अल्प अंशच इंद्रियांच्या पातळीवर कार्य करीत असतो. आपल्या ठिकाणीं ऐंद्रिय ज्ञान हें अत्यंत अल्प प्रमाणांत असतें, आणि त्यानेच आपलें संपूर्ण मन व जीवन व्यापलें आहे अशी आपण कल्पना करून घेतों. परंतु वस्तुतः जाणिवेच्या पाठीमागील (नेणीवयुक्त) मनरूपी महासागरांतील

तें केवळ एका बिंदूप्रमाणे असतें. आपल्यांत जें कांही आहे तें सर्व ज़र इंद्रियांच्या अनुभवांच्याच स्वरूपाचें असतें तर आपल्याला मिळूं शकणाऱ्या सर्व ज्ञानाचा उपयोग आपण आपल्या इंद्रिय-सुखासाठी करूं शकलों असतों. परंतु सुदैवाने अशी स्थिति नाही. आपण जसजसें पाशवी अवस्थेपासून दूर जातों तसतशीं आपलीं इंद्रियसुखें कमी कमी होत जातात, आणि शास्त्रीय व मानस-शास्त्रीय ज्ञानाच्या वाढत्या बोधाबरोबर आपलें सुख अधिकाधिक उच्च आणि सखोल होत जातें; 'ज्ञानाकरिता ज्ञान' हा आदर्शच आपल्या मनाचें परमसुख बनतें, या आदर्शामुळे आपल्याला इंद्रियसुख कितपत लाभतें याकडे दृष्टि राहत नाही. पण उपयुक्त-तेची पाश्चात्त्य कसोटी स्वीकारली तरी त्याहि मापाने मानसशास्त्र हें श्रेष्ठ शास्त्र आहे. कां ? आपण सगळे आपल्या इंद्रियांचें दास आहोंत, स्वतःच्या जाणीवयुक्त व नेणीवयुक्त मनाचे दास आहोंत. गुन्हेगार हा गुन्हेगार होतो तें त्याची तशी इच्छा असते म्हणून नव्हे, तर याचें कारण हें की त्याचें मन त्याच्या ताब्यांत नसतें आणि म्हणून तो स्वतःच्या जाणीवयुक्त व नेणीवयुक्त मनाचा व इतर सर्वांच्याहि मनाचा दास असतो. स्वतःच्या मनांतील प्रबल प्रवृत्तीनुसार त्याला वागावेंच लागतें, तो तें टाळूं शकत नाही. स्वतःच्या सद्‌वासनांच्या विरुद्ध, स्वतःच्या सत्स्वभावाच्या विरुद्ध, स्वतःच्याच विरुद्ध त्याला हें करावें लागतें. आपल्या मनाच्या प्रबळ आदेशांचें त्याला पालन करावेंच लागतें. गरीब बिचारा, त्याचा कांही उपाय नसतो. स्वतःच्याच जीवनांत आपण हें सतत पाहत असतों. आपल्या स्वभावांतील उत्तम बाजूच्या विरुद्ध आपण सतत वागत असतों; आणि नंतर आपण स्वतःलाच तसें वागल्या-बद्दल दोष देतों आणि आपण असले विचार कसे करीत होतों व

अशी गोष्ट आपण कशी करूं शकलों याचें आश्चर्य करतों. तरी पण पुन:पुन्हा आपण तसें करतों; वारंवार त्याचे परिणाम भोगतों व स्वत:ला दोष देतों, त्या वेळीं कदाचित् आपल्याला वाटतें की, तसें करण्याची आपली इच्छा आहे. पण तशी इच्छा करण्याला आपल्याला भाग पाडलें जातें. आपण पुढे ढकलले जातों, आपण असहाय बनतों ! आपण सर्वजण स्वत:च्या व इतर सर्वांच्या मनाचे दास आहोंत; आपण चांगले आहोंत की वाईट यामुळे कांही फरक पडत नाही. आपण इकडेतिकडे खेचले जातों कारण आपला त्याला उपाय नसतो. 'आम्ही विचार करतों, आम्ही अमुक कार्य करतों' वगैरे आपण म्हणतों, परंतु तें खरें नाही. आपण विचार करतों, कारण आपल्याला विचार करणें भाग पडतें. आपण कर्म करतों तेंहि करावें लागतें म्हणूनच. आपण स्वत:चे व इतरांचे दास आहोंत. अंतर्मनांत खोल कुठेतरी केवळ याच जन्मांतले नव्हेत तर पूर्वीच्या सर्व जन्मांतले सर्व विचार व कर्में साठवलेलीं आहेत. अंतर्मनाचा हा अमर्याद महासागर पूर्वीच्या सर्व विचारांनी व कर्मांनी भरलेला आहे. यांपैकी प्रत्येकाची धडपड ज्ञात होण्याची, बाहेर व्यक्त होण्याची आहे, आणि त्यांच्या लाटां-मागून लाटा बाह्य मनावर, जाणीवयुक्त मनावर आदळत आहेत. या विचारांना, या संचित शक्तीला आपण स्वभावसिद्ध इच्छा, विशेष प्रकारचे गुण वा विशिष्ट क्षमता वगैरे वगैरे समजतों, कारण त्यांचें खरें मूळ आपल्याला ज्ञात होत नाही. आपण त्यांच्या आज्ञा अंधपणें, निमूटपणें पाळतों. आणि याचा परिणाम म्हणजे अत्यंत असहाय प्रकारचें दास्य आपल्याला भोगावें लागतें, आणि तरीहि आपण स्वत:ला स्वतंत्र म्हणवतों ! स्वतंत्र ! आपण क्षणभरहि आपल्या मनाचें नियंत्रण करूं शकत नाहीं, फार काय,

एखाद्या विषयावर आपलें मन क्षणभरहि स्थिर ठेवूं शकत नाहीं, इतर सर्व गोष्टी बाजूला सारून त्या विषयावर तें एकाग्र करूं शकत नाहीं ! आणि तरीहि आपण स्वतःला स्वतंत्र म्हणवतों ! याचा विचार तर करून पाहा ! जें केलें पाहिजे असें आपण जाणतों तें थोडा वेळ देखील आपण करूं शकत नाहीं. एखादी विषयवासना उफाळून येते आणि तात्काळ आपण तिचें ऐकतों. आपली सदसद्विवेक बुद्धि या दुबळेपणाबद्दल आपल्याला टोकते. पण पुनःपुनः आपण तसेंच करतों. आपण नेहमी असें करीत असतों. कितीहि प्रयत्न केला तरी आपण उच्च प्रकारचें जीवन जगूं शकत नाहीं, पूर्वविचारांचीं व पूर्वजन्मांचीं भुतें आपल्याला खाली धरून ठेवतात. इंद्रियांच्या या दास्यामुळे जगांतील सर्व दुःखें उद्भवतात. इंद्रियगत जीवनाच्या--शारीरिक सुखासाठी धडपडण्याच्या--वर उठण्याची आपली असमर्थता हीच जगांतील सर्व भयानक गोष्टींचें व दुःखाचें कारण आहे.

मानसशास्त्र हेंच आपल्याला मनाच्या बेताल भटकण्याला आवर घालण्यास, त्याला इच्छाशक्तीच्या ताब्यांत ठेवण्यास आणि अशा रीतीने मनाच्या जुलमी हुकमांपासून स्वतःला मुक्त करण्यास शिकवतें. म्हणून मानसशास्त्र हें श्रेष्ठ शास्त्र आहे. त्याच्यावांचून इतर सर्व शास्त्रें आणि इतर सर्व ज्ञान कवडी-मोलाचें आहे.

निग्रहशून्य व चंचल मन आपल्याला सदैव खाली ओढेल, आपल्याला फाडील, ठार करील; आणि निगृहीत व नियंत्रित मन आपल्याला वांचवील, मुक्त करील. म्हणून त्याचा निग्रह केला पाहिजे, आणि तो कसा करावा हें आपल्याला मानसशास्त्र शिकवितें.

कोणत्याहि भौतिकशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी व त्याचें विश्लेषण करण्यासाठी आधीं पुरेशी माहिती गोळा केली जाते. तिचा अभ्यास आणि तिचें विश्लेषण केलें जातें आणि परिणामतः त्या शास्त्राचें ज्ञान प्राप्त होतें. परंतु मनाच्या अभ्यासाच्या व विश्लेषणाच्या बाबतींत अशी माहिती, अशीं बाह्य घटनात्मक सत्यें मिळूं शकत नाहीत की जीं सर्वांना सारखींच उपलब्ध असतील. मनाचें विश्लेषण स्वतः मनाकडूनच होतें. म्हणून मनाचें शास्त्र--मानसशास्त्र--हें सर्वश्रेष्ठ शास्त्र आहे.

पाश्चात्त्य देशांत मनाच्या शक्ति, विशेषतः असामान्य शक्ति ह्या जादूटोण्यासारख्या आणि गूढ चमत्कारांसारख्या समजल्या जातात. गूढ विद्येचा अवलंब करणारे कांही हिंदु फकीर तथाकथित मानसिक शक्तींचे जे चमत्कार करून दाखवितात त्यांच्याशीं उच्च मानसशास्त्राची गल्लत केल्यामुळे या उच्च मानसशास्त्राच्या अभ्यासाची गति कुंठित झाली आहे.

सर्व जगांतील भौतिक शास्त्रज्ञ जवळपास एकाच प्रकारच्या निष्कर्षाप्रत पोहोचत असतात. सामान्य घटनांच्या बाबतींत किंवा त्यांच्यापासून स्वाभाविकरीत्या निष्पन्न होणाऱ्या सिद्धान्तांच्या बाबतींत त्यांच्यांत भेद आढळत नाही. याचें कारण हें की भौतिकशास्त्रासाठी जमविलेली सामुग्री सर्वांना उपलब्ध होण्यासारखी व सर्वांना मान्य होण्यासारखी असते. आणि त्यांचे सिद्धान्त हे या सर्वमान्य सामुग्रीवर आधारलेले असे तर्कसंगत निष्कर्ष असतात. मनाच्या क्षेत्रांत मात्र असें आढळत नाही. इथे बाह्य इंद्रियांना गोचर अशा गोष्टी वा घटना नसतात, आणि म्हणून इथे अशा प्रकारची सर्वमान्य सामुग्री नसते की जिच्यावर मनाचे सर्व अभ्यासक सारखेच प्रयोग करून मनाचें एक शास्त्र

निर्माण करूं शकतील.

खोल, अगदी खोल, अंतर्यामीं आत्मा आहे--तेंच माणसाचें खरें स्वरूप आहे. मनाला अंतर्मुख करा आणि आत्म्याशीं एकरूप व्हा; त्या स्थिर भूमिकेवरून मनाच्या सर्व हालचाली व सर्व व्यक्तींमधे समान रूपाने आढळणाऱ्या गोष्टी पाहतां व निरीक्षितां येतात. जे पुरेसे खोल जातात त्यांनाच अशीं सत्यें, अशी सामुग्री सापडूं शकते. जगांत स्वतःला गूढविद्याविशारद म्हणविणाऱ्या अनेक लोकांत मन, त्याचें स्वरूप व त्याच्या शक्ति इत्यादींबाबत फार मोठे मतभेद आहेत. याचें कारण असें की हे लोक पुरेसे खोल जात नाहीत. त्यांनी स्वतःच्या व इतरांच्या मनाचीं कांही थोडीं कार्यें पाहिलेलीं असतात आणि ह्या वर-वरच्या कार्यांच्या खऱ्या स्वरूपाविषयीं कांही ज्ञान नसतांच, या कार्यांना ते सर्वत्र लागू पडणाऱ्या गोष्टी म्हणून घोषित करतात. विक्षिप्त स्वभावाच्या धार्मिक किंवा गूढविद्यावादी प्रत्येक माणसाजवळ अशा प्रकारची पुष्कळ सामुग्री असते आणि हीं सामुग्री संशोधनाच्या दृष्टीने विश्वसनीय आहे असा त्याचा दावा असतो. परंतु वस्तुतः ही सर्व सामुग्री म्हणजे केवळ त्याच्या स्वतःच्या कल्पनाच असतात.

तुम्हांला मनाचा अभ्यास करण्याची इच्छा असेल तर तुम्हीं पद्धतशीर रीतीने अभ्यास केला पाहिजे; मनाला आपल्या ताब्यांत आणण्याचा तुम्हीं वारंवार प्रयत्न केला पाहिजे; तुम्हीं ज्ञानाच्या त्या भूमिकेवर जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे की जिथून मनाच्या कोणत्याहि बेताल हालचालींनी विचलित न होतां तुम्ही त्याचा अभ्यास करूं शकाल. नाही तर तुम्हीं निरीक्षिलेल्या घटना विश्वासार्ह राहणार नाहीत; सर्व लोकांना त्या लागू पडणार

नाहीत आणि म्हणून खऱ्या अर्थाने त्या संशोधनाची सामुग्री ठरणार नाहीत.

मनाचा अभ्यास करतांना जे खोल गेले आहेत त्या सर्वांना सारख्याच घटना आढळल्या आहेत--मग ते जगाच्या कोणत्याहि भागांत राहणारे असोत व कोणत्याहि धर्माचे असोत. जे मनांत पुरेसें खोल जातात त्या सर्वांनी काढलेले निष्कर्ष सारखेच असतात.

मनाचें कार्य ज्ञानात्मक व प्रतिक्रियात्मक अशा दोन स्वरूपांचें असतें. उदाहरणार्थ, प्रकाशाचे किरण माझ्या डोळयांत प्रवेश करतात, ज्ञानतंतु त्यांना मेंदूपर्यंत नेतात, आणि तरी मला प्रकाश दिसत नाही. मग मेंदू ही संवेदना मनाकडे पोहोचवितो, पण तरीहि मला प्रकाश दिसत नाही. मग मनाची प्रतिक्रिया होते आणि मला तो प्रकाश दिसतो. मनाची प्रतिक्रिया झाल्यानेच परिणामत: डोळयाला बाह्य वस्तूचें ज्ञान होतें.

मनाचा निरोध करण्यासाठी तुम्हांला नेणिवेंत वा अंतर्मनांत खोल खोल गेलें पाहिजे आणि तेथे साठवलेले विविध विचार, अनुभव इत्यादींचें वर्गीकरण करून त्यांची नीट मांडणी केली पाहिजे आणि त्यांच्यावर ताबा मिळविला पाहिजे. ही पहिली पायरी आहे. नेणीवयुक्त मनावर ताबा मिळविल्याने तुम्हांला जाणीवयुक्त मनाचें नियमन करतां येईल.

# प्रकृति आणि मानव

प्रकृतीसंबंधीच्या आधुनिक कल्पनेनुसार त्यांत फक्त भौतिक पातळीवर व्यक्त झालेला विश्वाचा भागच समाविष्ट होतो. सामान्यतः मन म्हणून जें ओळखलें जातें त्याचा प्रकृतींत अंतर्भाव केला जात नाही.

इच्छाशक्तीची स्वाधीनता सिद्ध करूं पाहणाऱ्या तत्त्वज्ञांनी मनाला प्रकृतींतून वगळलें आहे, कारण प्रकृति कडक अशा नियमांनी बद्ध व शासित आहे, आणि मनहि प्रकृतींत समाविष्ट आहे असें मानलें तर तेंहि नियमांनी बद्ध आहे असें ठरेल. अशा प्रतिपादनाने इच्छाशक्तीच्या स्वाधीनतेचा सिद्धान्त फोल ठरेल, कारण जें नियमांनी बद्ध आहे तें स्वाधीन कसें असूं शकेल ?

भारतीय तत्त्वज्ञांनी याच्या उलट भूमिका घेतली आहे. त्यांच्या मतें व्यक्त आणि अव्यक्त असें सर्व भौतिक जीवन नियमांनी बद्ध आहे. ते असें प्रतिपादितात की मन आणि बाह्य प्रकृति हीं दोन्हीं नियमांनी बांधलेलीं आहेत--एकाच प्रकारच्या नियमांनी बांधलेलीं आहेत. मन जर नियमांनी बद्ध नसेल, आपण जे विचार मनांत आणतों ते जर पूर्वीच्या विचारांचे क्रमप्राप्त परिणाम नसतील, मनाची एक अवस्था तिच्यामागून येणाऱ्या दुसऱ्या अवस्थेला जन्म देत नसेल तर मन हें तर्कबुद्धीच्या नियमांशीं विरोधी ठरेल, आणि तर्कबुद्धीचें कार्य नाकारून इच्छाशक्तीची स्वाधीनता कोण प्रतिपादूं शकेल ? आणि दुसऱ्या बाजूने मन हें कार्यकारणाच्या नियमाने शासित आहे हें स्वीकारल्यास इच्छा-

शक्तीची स्वाधीनता कशी मानतां येईल ?

नियम म्हणजेच कार्य व कारण यांची क्रिया होय. कांही गोष्टी पूर्वी होऊन गेलेल्या इतर कांही गोष्टींनुसार घडतात. प्रत्येक पूर्ववर्ती गोष्टीला अनुवर्ती अशी गोष्ट असते. प्रकृतींत हें असेंच असतें. नियमाचा हा व्यवहार मनांतहि जर आढळत असेल तर मन हें बद्ध आहे, आणि म्हणून तें स्वाधीन नाही. नाहीं, इच्छाशक्ति ही स्वाधीन नाही. ती स्वाधीन कशी असूं शकेल ? पण आपण सर्वजण जाणतों व आपल्याला वाटत असतें की आपण स्वाधीन आहोंत. आपण जर स्वाधीन नसूं तर जीवनाला कांही अर्थ उरणार नाही, तें जगण्यायोग्य राहणार नाही.

पौर्वात्य तत्त्वज्ञांनी हा सिद्धान्त स्वीकारला, किंबहुना त्यांनीच तो पुढें मांडला. तो सिद्धान्त हा की मन आणि इच्छाशक्ति हीं तथाकथित जडद्रव्याप्रमाणेच देश, काल व कार्यकारणभाव यांच्या मर्यादेंत आहेत. आणि म्हणून तीं कार्यकारणाच्या नियमाने बद्ध आहेत. आपण काळांत विचार करतों; आपले विचार काळाने मर्यादित असतात; जें कांही अस्तित्वांत आहे तें सर्व देश व काल यांच्या मर्यादेंत आहे. सर्वकांही कार्यकारणाच्या नियमाने बद्ध आहे.

आता, ज्याला आपण जडद्रव्य आणि मन असें म्हणतों तो एकच पदार्थ आहे. त्यांच्यांतील भेद फक्त स्पंदनाच्या कमीअधिक तीव्रतेचा आहे. अत्यंत मंद स्पंदन असलेलें मन हेंच ज्याला आपण 'जडद्रव्य' म्हणतों तें आहे. अत्यंत तीव्र संपदन असलेलें जडद्रव्यच 'मन' म्हणून ओळखलें जातें. ही दोन्हीं एकच पदार्थ आहेत. आणि म्हणून जडद्रव्य जसें देश, काल व कार्यकारणभाव यांनी बद्ध आहे तसेंच तीव्र स्पंदन असलेलें जडद्रव्य जें मन तेंहि त्याच

नियमांनी बद्ध आहे.

प्रकृति एकजिनसी आहे. भेद केवळ अभिव्यक्तींत आहे. 'Nature' साठी संस्कृत शब्द 'प्रकृति' असा आहे, आणि त्याचा शब्दशः अर्थ 'भेद' असा आहे. सर्व एकच पदार्थ आहे, पण तो विविध प्रकारें अभिव्यक्त होत असतो.

मन हें जडद्रव्य बनतें आणि उलट जडद्रव्य हें मन बनतें. तो केवळ स्पंदनाच्या कमीअधिक तीव्रतेचा प्रश्न आहे. एखादी लोखंडाची सळई घ्या आणि तिच्यांत कंपनें उत्पन्न होतील इतकी शक्ति तिच्यावर प्रयुक्त करा. तसें केल्यास काय होईल ? हें जर एखाद्या अंधाऱ्या खोलींत केलें तर प्रथमतः तुम्हांला एकप्रकारचा नाद ऐकूं येईल. त्या सळईवर अधिक शक्ति प्रयुक्त करा. मग ती सळई प्रकाशमान होईल. शक्ति आणखी वाढवा, मग तें लोखंड पूर्णपणें अदृश्य होईल. तें मन बनेल.

दुसरें उदाहरण घ्या. दहा दिवस मी जर कांही खाणार नाहीं तर मी विचार करूं शकणार नाहीं. कांही तुरळक विचार फक्त माझ्या मनांत राहतील. मी फार अशक्त होईन आणि कदाचित् मला माझें स्वतःचें नांवसुद्धा लक्षांत राहणार नाही. नंतर मीं थोडीशी भाकरी खाल्ल्यास थोडयाच वेळांत मी विचार करूं लागेन. माझ्या मनाची शक्ति परत येईल. भाकरीचें रूपान्तर मनांत होईल. त्याचप्रमाणे मनाच्या स्पंदनांची तीव्रता कमी झाल्यास तें शरीराच्या रूपाने अभिव्यक्त होतें, तें जडद्रव्य बनतें.

कोणतें आधी ? जडद्रव्य की मन ?—याविषयी मी एक उदाहरण देतों. कोंबडी एक अंडें घालते—अंडयांतून दुसरी कोंबडी बाहेर येते. ती कोंबडी दुसरें अंडें घालते. त्या अंडयांतून दुसरी कोंबडी बाहेर येते. ही अशी न संपणारी मालिका चालूं राहते.

आता कोणतें आधी आहे, अंडें कीं कोंबडी ? जें कोंबडीने घातलें नाही अशा अंड्याची किंवा जी अंड्यांतून बाहेर आली नाहीं अशा कोंबडीची तुम्ही कल्पना करूं शकत नाही. कोणतें आधी आहे यामुळे कांही फरक पडत नाही. प्रायः आपले सर्व विचार 'आधी कोंबडी की आधी अंडें' या प्रकारापर्यंत येऊन पोहोचत असतात.

महान् सत्यें हीं सरळ व सोपीं असल्यामुळेच विसरलीं गेलीं आहेत. महान् सत्यें हीं सरळ असतात, कारण तीं सर्वत्र लागू पडणारीं असतात. सत्य स्वरूपतः नेहमीच सरळ असतें. गुंतागुंत ही मनुष्याच्या अज्ञानामुळे निर्माण होत असते.

मनुष्याची स्वाधीनता त्याच्या मनामुळे नसते, कारण तें बद्ध आहे. त्याच्या ठायीं स्वाधीनता नाही. मनुष्य म्हणजे मन नव्हे, तो आत्मा होय. आत्मा हा नेहमी मुक्त, अनंत आणि शाश्वत आहे. ह्या आत्म्यांतच मनुष्याची स्वाधीनता आहे. आत्मा सदैव स्वाधीन आहे. परंतु मन आपल्या क्षणिक तरंगांशीं वा वृत्तींशीं एकरूप होऊन जातें व त्यामुळे त्याला आत्म्याची जाणीव राहत नाही. आणि मग तें देश, काल आणि कार्यकारणभाव यांच्या चक्रव्यूहांत म्हणजेच मायेंत अडकून पडतें.

आपल्या बंधनाचें कारण हें असें आहे. आपण नेहमी मनाशीं आणि मनाच्या दृश्यमान परिवर्तनांशीं एकरूप होऊन जातों.

मनुष्याची स्वाधीनता ही आत्म्यांत असते. आत्म्याला स्वतःच्या स्वाधीनतेचा अनुभव येत असतो आणि म्हणूनच तो, मन बंधनांत असतांनाहि, 'मी स्वाधीन आहें, हेंच माझें खरें स्वरूप आहे, हेंच माझें खरें स्वरूप आहे' या सत्याची नेहमी घोषणा करीत असतो. हीच आपली खरी स्वाधीनता आहे.

नित्यमुक्त, अनंत, शाश्वत असा आत्मा युगानुयुगें आपल्या साधनाच्या---मनाच्या---द्वारें स्वत:ला अधिकाधिक अभिव्यक्त करीत आहे.

तर मग मनुष्याचा प्रकृतीशीं कोणत्या प्रकारचा संबंध आहे? अगदी निकृष्ट जीवापासून तों मनुष्यापर्यंत आत्मा प्रकृतीमधून स्वत:ला अभिव्यक्त करीत आहे. आत्म्याची सर्वश्रेष्ठ अभिव्यक्ति ही अगदी निकृष्ट जीवाच्या रूपांत क्रमसंकुचित झालेली आहे आणि ती क्रमविकासाच्या प्रक्रियेद्वारा अधिकाधिक अभिव्यक्त होत आहे.

क्रमविकासाची संपूर्ण प्रक्रिया म्हणजे आत्म्याचा व्यक्त होण्याचा प्रयत्न आहे. प्रकृतीच्या विरुद्ध सतत चाललेला तो संघर्ष आहे. प्रकृतीशीं जुळतें घेऊन नव्हे, तर तिच्याशीं संघर्ष करूनच मनुष्य हा मनुष्य बनत असतो. प्रकृतीशीं जुळतें घेऊन राहावें, तिच्याशीं सुसंवादी होऊन राहावें असें आपण पुष्कळ ऐकतों. ही एक चूक आहे. हें टेबल, हें घर, खनिज पदार्थ, वृक्ष हे सर्व प्रकृतीशीं सुसंवादी आहेत. प्रकृतीशीं त्यांचा पूर्ण सुसंवाद आहे, विसंवाद मुळीच नाही. प्रकृतीशीं सुसंवादी होऊन राहणें म्हणजे जडवत् बनणें होय, मरून जाणें होय. मनुष्याने हें घर कसें बाधलें? प्रकृतीशीं सुसंवादी राहून? नाही. प्रकृतीविरुद्ध झगडून. प्रकृतीशीं सतत झगडा म्हणजेच मानवाची प्रगति होय. तिच्याशीं जुळतें घेणें म्हणजे कांही प्रगति नव्हे.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३४४५६ वि: निबंध
क्रमांक २४७४४ नों दि: २५-३-६३

# एकाग्रता आणि प्राणायाम

मनुष्य व पशु यांच्यांतील मुख्य भेद म्हणजे त्यांच्या एकाग्रतेच्या शक्तींतील भेद होय. कोणत्याहि प्रकारच्या कामांतील यश हें एकाग्रतेचें फल असतें. प्रत्येकाला एकाग्रतेसंबंधी थोडेंबहुत माहीत असतें. तिचे परिणाम आपण दररोज पाहतों. चित्रकला, संगीतकला इत्यादि कलांतील श्रेष्ठ प्रतीचें यश हें एकाग्रतेचा परिणाम असतें. पशूंच्या ठिकाणीं एकाग्रतेची शक्ति फार थोडी असते. ज्यांनी पशूंना शिकविलें आहे त्यांना या गोष्टीची मोठी अडचण वाटते की, पशूला सांगितलेलें तो सतत विसरत असतो. त्याला कशावरहि आपलें मन दीर्घकाल एकाग्र करतां येत नाही. हाच मनुष्य व पशु यांच्यांतील भेद आहे--मनुष्याच्या ठिकाणीं एकाग्रतेची शक्ति पशूहून अधिक असते. मनुष्यामनुष्यांतील भेद देखील त्यांच्यांतील एकाग्रतेच्या शक्तींतील भेदामुळे होतो. निकृष्ट मनुष्याची श्रेष्ठ मनुष्याशीं तुलना करून पाहा. त्यांच्यांतील भेद एकाग्रतेच्या शक्तींतील प्रमाणाचा आहे. त्यांच्यांत हाच काय तो भेद आहे.

कांही वेळां प्रत्येकाचेंच मन एकाग्र होतें. ज्या गोष्टींवर आपलें प्रेम असतें त्यांच्यावर आपण आपलें मन एकाग्र करतों आणि ज्यांच्यावर आपण आपलें मन एकाग्र करतों त्याच गोष्टींवर आपण प्रेम करीत असतों. अशी कोणती आई आहे की जिला आपल्या मुलाचा साधासुधा चेहरा आवडत नाही ? तो चेहरा तिच्या दृष्टीने जगांतील सर्वांत सुंदर चेहरा असतो. तो

तिला आवडतो याचें कारण हें की ती त्याच्यावर आपलें मन एकाग्र करीत असते. आणि प्रत्येकजण जर त्याच चेहऱ्यावर आपलें मन एकाग्र करूं शकला तर प्रत्येकालाच तो आवडेल. मग सर्वांनाच तो चेहरा अत्यंत सुंदर वाटेल. ज्या वस्तु आपल्याला आवडतात त्यांच्यावर आपण सर्वजण आपलीं मनें एकाग्र करतों. जेव्हा आपण मधुर संगीत ऐकतों, तेव्हा आपलीं मनें त्यांवर खिळून जातात आणि आपण तीं तिथून काढून घेऊं शकत नाहीं. जे लोक आपलीं मनें शास्त्रीय संगीतावर एकाग्र करतात त्यांना साधें संगीत आवडत नाही, आणि याचप्रमाणे जे लोक साध्या संगीतावर आपलीं मनें एकाग्र करतात त्यांना शास्त्रीय संगीत आवडत नाही. ज्या संगीतांत स्वर हे एकामागून एक द्रुतगतीने येत असतात तें संगीत मनाला चटकन् धरून ठेवतें. लहान मुलाला भावनोद्दीपक, उठावदार संगीत आवडतें, कारण त्यांतील स्वरांची द्रुतलय त्याच्या मनाला भटकण्याची संधिच देत नाही. ज्या मनुष्याला साधें संगीत आवडतें त्याला शास्त्रीय संगीत आवडत नाही, कारण तें अधिक गुंतागुंतीचें असतें आणि तें समजण्यासाठी अधिक एकाग्रतेची आवश्यकता असते.

अशा एकाग्रतेच्या बाबतींत मोठी अडचण ही आहे की आपण मनाचें नियमन करीत नसून मनच आपलें नियमन करीत असतें. आमच्याहून बाह्य असें कांहीतरी जणुकांही आमच्या मनाला स्वत:कडे ओढतें आणि स्वत:च्या इच्छेनुसार त्याला वाटेल तितका वेळ धरून ठेवतें. आपण मधुर स्वर ऐकतों किंवा सुंदर चित्र पाहतों आणि आपलें मन तिथे स्थिर होऊन जातें. आपण त्याला तेथून काढून घेऊं शकत नाहीं.

तुमच्या आवडीच्या एखाद्या विषयावर जर मीं चांगलें

भाषण दिलें तर तुमचें मन त्यावर एकाग्र होतें. मी तुमचें मन तुमच्यापासून ओढून घेतों आणि तुमची इच्छा नसतांहि त्याला भाषणाच्या विषयावर स्थिर करून ठेवतों. अशा रीतीने आपली इच्छा नसतांहि आपलें लक्ष वेधलें जातें, आपलीं मनें विविध विषयांवर एकाग्र होतात. आपला त्यावर कांही इलाज नसतो.

आता प्रश्न हा आहे : 'ही एकाग्रता वाढवितां येते काय आणि आपल्याला तिच्यावर पूर्ण ताबा मिळवितां येतो काय ?' योगी म्हणतात, 'होय, तसें करतां येतें.' योगी म्हणतात की आपण मनावर पूर्ण ताबा मिळवूं शकतों. एकाग्रतेच्या शक्तीची वाढ होण्यांत नैतिक दृष्टीने एक धोका आहे—एखाद्या विषयावर मन एकाग्र केल्यानंतर तेथून तें इच्छेनुसार न काढतां येणें हें धोक्याचें असतें. अशी अवस्था मोठीं तापदायक असते. आपल्या बहुतेक सर्व दुःखांचें कारण हेंच की एखाद्या विषयावरून इच्छे-नुसार मन काढून घेण्याची शक्ति आपल्या ठिकाणीं नसते. म्हणून एकाग्रतेच्या वाढीबरोबरच मन काढून घेण्याच्या शक्तीचीहि वाढ केली पाहिजे. एखाद्या विषयाशीं मन पूर्णपणें संलग्न कसें करावें हेंच केवळ नव्हे, तर एका क्षणांत त्याला त्या विषयापासून अलग करून दुसऱ्या एखाद्या विषयावर कसें स्थिर करावें हेंहि आपण शिकलें पाहिजे. या दोन्ही शक्ति एकाच वेळीं विकसित केल्या पाहिजेत, म्हणजे धोका राहणार नाही.

मनाचा पद्धतशीर विकास हा असा आहे. माझ्या दृष्टीनें शिक्षणाचें मुख्य सार म्हणजे मनाची एकाग्रता हें आहे, केवळ कांही गोष्टींची माहिती गोळा करणें नव्हे. मला जर माझें शिक्षण पुन्हा घ्यायचें झालें व त्यांत माझा जर कांही अधिकार चालला तर मी घटनांच्या माहितीच्या मागे मुळीच लागणार नाहीं. मी

मानसिक एकाग्रतेची व मन अलग करण्याची शक्ति विकसित करीन आणि मग अशा निर्दोष साधनाने (मनाने) मी इच्छे-नुसार घटनांची माहिती गोळा करीन. मुलामधे मन एकाग्र करण्याची शक्ति व तें वेगळें करण्याची शक्ति ह्या दोन्ही बरोबरच वाढविल्या पाहिजेत.

माझा विकास एकांगी झाला. मनाला इच्छेनुसार अलग करण्याची शक्ति न वाढवितां एकाग्रतेची शक्ति मीं वाढविली, आणि त्यामुळे माझ्या आयुष्यांतील तीव्रतम दुःख मला भोगावें लागलें. आता माझ्या ठायीं मनाला वेगळें करण्याची शक्ति आहे, पण तिचा विकास मला उत्तर आयुष्यांत करावा लागला.

आपण आपल्या इच्छेनुसार आपलीं मनें वस्तूंवर केंद्रित केलीं पाहिजेत; वस्तूंनी आपलीं मनें त्यांच्याकडे ओढूं नयेत. सामान्यतः आपल्याला मन केंद्रित करणें भाग पडतें. वस्तूंतील ज्या आकर्षणाचा आपण प्रतिकार करूं शकत नाहीं त्या आक-र्षणामुळे आपलीं मनें त्या वस्तूंवर केंद्रित करणें आपल्याला भाग पडतें. मनाच्या निरोधासाठी आणि त्याला आपल्या इच्छेनुसार कोठेहि नियुक्त करण्यासाठी विशेष प्रकारच्या अभ्यासाची आव-श्यकता असते. त्यावांचून ही गोष्ट साध्य होऊं शकत नाही. धर्माच्या साधनेसाठी मनाचा संयम अत्यंत आवश्यक आहे. या साधनेंत मनाला मागे वळवून त्याला स्वतःवरच स्थिर करावें लागतें.

मनाला वळण लावण्यासाठी पहिली पायरी आहे प्राणायाम. नियमित श्वासोच्छ्वासामुळे शरीर समतोल अवस्थेंत राहतें आणि मग मनापर्यंत पोहोचणें सोपें जातें. प्राणायामासंबंधी विचार करण्याची पहिली गोष्ट म्हणजे आसन होय. ज्या अवस्थेंत मनुष्य

आरामानें बसूं शकतो तेंच त्याच्यासाठी योग्य आसन होय. पाठीचा कणा मोकळा ठेवला पाहिजे आणि शरीराचें वजन बरगडयांवर तोलून धरलें पाहिजे. मनाला कृत्रिम साधनांनी आवरून धरण्याचा प्रयत्न करूं नका. या बाबतींत साधा प्राणायाम पुरेसा आहे. मनाची एकाग्रता साधण्यासाठी देहदंडात्मक तपश्चर्या ही चुकीची आहे. तिचा अवलंब करूं नका.

मनाचें कार्य शरीरावर आणि शरीराचें कार्य मनावर होतें. त्यांची एकमेकांवर क्रिया-प्रतिक्रिया होते. मनाची प्रत्येक अवस्था ही शरीरांत एक तदनुरूप अवस्था निर्माण करीत असते आणि शरीरांतील प्रत्येक कार्य हें मनावर तदनुरूप परिणाम करीत असतें. तुम्ही शरीर आणि मन यांना दोन स्वतंत्र वस्तु माना किंवा त्या दोन्ही एकच आहेत—एकाच वस्तूचा शरीर हा स्थूल भाग असून मन हा सूक्ष्म भाग आहे—असें माना. त्याने कांही फरक पडत नाही. तीं एकमेकांवर क्रिया-प्रतिक्रिया करतात. मन हें सतत शरीर बनत असतें. मनाला वळण लावतांना शरीराच्या द्वारा त्याच्यापर्यंत पोहोचणें सोपें असतें. शरीर हाताळणें हें मन हाताळण्यापेक्षा सोपें आहे.

साधन वा उपकरण जितकें सूक्ष्म, तितकें त्यांतील सामर्थ्य अधिक असतें. मन हें शरीरापेक्षा फार सूक्ष्म असून तें अधिक सामर्थ्यवान आहे. या कारणास्तव शरीरापासून प्रारंभ करणें अधिक सोपें आहे.

प्राणायामाचें शास्त्र म्हणजे मनापर्यंत पोहोचण्यासाठी शरीराच्या द्वारा कार्य करणें होय. या मार्गानें आपण शरीरावर ताबा मिळवतों आणि मग शरीरांतील सूक्ष्म कार्यांची जाणीव आपल्याला व्हायला लागते. अधिकाधिक सूक्ष्म आणि अधिक

आंतील अशा कार्यांची जाणीव होतां होतां आपण मनापर्यंत पोहोचतों. शरीरांतील सूक्ष्म क्रियांची जाणीव आपल्याला व्हायला लागतांच त्या आपल्या ताब्यांत येतात. कांही काळानंतर तुम्हांला शरीरावरील मनाच्या कार्याची जाणीव होऊं लागेल. त्याचप्रमाणे तुम्हांला मनाच्या अर्ध्या भागाचें त्याच्या दुसऱ्या अर्ध्या भागावरील कार्य जाणवायला लागेल व मन ज्ञानतंतूंच्या केंद्रांना शक्ति पुरवीत असल्याचेंहि जाणवेल, कारण मनच ज्ञानतंतूंचें नियमन व शासन करीत असतें. मन हें निरनिराळ्या ज्ञानतंतूंच्या द्वारें कार्य करीत असल्याचें तुमच्या अनुभवास येईल.

अशा रीतीने नियमित व पद्धतशीर प्राणायामाने प्रथम स्थूल शरीरावर व नंतर सूक्ष्म शरीरावर ताबा मिळवून मनाचें नियमन करतां येतें.

प्राणायामाच्या पहिल्या प्रक्रियेंत मुळीच धोका नसून ती अत्यंत आरोग्यदायक आहे. तिच्यामुळे तुम्हांला निदान चांगलें आरोग्य लाभून तुमचें स्वास्थ्य सामान्यपणें सुधारेल. प्राणायामाच्या इतर प्रक्रिया हळूहळू आणि काळजीपूर्वक सुरू केल्या पाहिजेत.

---

## ज्ञानयोगाची भूमिका

योगाची ही तार्किक व तात्त्विक बाजू आहे आणि ती फार कठीण आहे, पण मी तुम्हांला हळूहळू ती समजावून सांगेन.

योग म्हणजे मनुष्याला ईश्वराशीं जोडण्याची पद्धति. हें तुम्ही ध्यानांत घ्या आणि मग तुम्ही मनुष्य व ईश्वर यांच्या कोणत्याहि व्याख्या स्वीकारल्या तरी तुम्हांला आढळून येईल की तुमच्या प्रत्येक व्याख्येशीं हा 'योग' शब्द जुळणारा आहे. नेहमी लक्षांत ठेवा की भिन्न प्रकारच्या मनांसाठी भिन्न 'योग' आहेत, आणि एखादा 'योग' जर तुम्हांला मानवणारा नसेल तर दुसरा एखादा मानवेल. प्रत्येक धर्माचे तात्त्विक व साधनात्मक असे दोन भाग असतात. पाश्चात्त्यांनी स्वतःला तात्त्विक भागाला वाहून घेतलें आहे. आणि सत्कर्मं हीच केवळ धर्माची साधनात्मक वा व्यवहार्य बाजू आहे असें त्यांना वाटतें. पण वास्तविक दृष्टचा योग हींच धर्माची व्यवहार्य वा साधनात्मक बाजू आहे, आणि तो दर्शवून देतो की धर्म म्हणजे केवळ सत्कर्मं नव्हे, धर्म ही प्रत्यक्ष आचरणांत आणतां येण्यासारखी सत्कर्मांहून निराळी अशी एक शक्ति आहे.

---

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं मनुष्याने तर्कबुद्धीच्या द्वारा ईश्वराचा शोध घेण्याचा प्रयत्न केला; आणि त्याचा परिणाम म्हणजे बुद्धिनिष्ठ आस्तिकवाद ( Deism ) होय. या प्रक्रियेंत जो काय थोडाबहुत ईश्वर शिल्लक राहिला होता त्याची डार्विन व मिल यांच्या तत्त्वज्ञानांनी वाट लावली. त्यानंतर

माणसाला धर्माच्या ऐतिहासिक व तुलनात्मक अभ्यासाकडे वळावें लागलें. धर्म हा महाभूतांच्या उपासनेंतून निर्माण झाला असें लोक समजूं लागले. (सूर्याविषयीच्या पुराणकथा इत्यादीसंबंधीचें मॅक्स मूलर यांचें मत पाहा); इतर कित्येकजण असें समजूं लागले की पितरोपासनेंतून धर्माची उत्पत्ति झाली आहे. (हर्बर्ट स्पेन्सर यांचें मत पाहा.) परंतु एकंदरीने पाहतां धर्माच्या अभ्यासाच्या या पद्धति अयशस्वी ठरल्या आहेत. बाह्य विश्वाच्या अनुशीलनाने मनुष्य सत्याप्रत पोहोचूं शकत नाही.

"मातीच्या एका ढेकळाचें ज्ञान झालें की सगळ्या मातीचें ज्ञान होतें." अखिल विश्वाची उभारणी समान नियमांनुसार झाली आहे. व्यक्ति ही त्या मातीच्या ढेकळाप्रमाणे विश्वाचा केवळ एक अंश आहे. विश्वांतील केवळ एक अणुच असा जो मानवात्मा त्याचें जर आपल्याला ज्ञान झालें, त्याचा प्रारंभ आणि त्याचा सर्वसामान्य इतिहास जर आपण जाणला, तर आपल्याला अवघ्या प्रकृतीचें ज्ञान होईल. उत्पत्ति, वृद्धि, विकास, ऱ्हास व मृत्यु-- हाच क्रम सर्व प्रकृतींत आहे,--वनस्पतींत काय किंवा माणसांत काय हाच क्रम दिसून येतो. भेद फक्त कालावधीच्या बाबतींत आहे. एकाच्या बाबतींत संपूर्ण चक्र पूर्ण होण्यास कदाचित् एक दिवस लागेल, तर दुसऱ्याच्या बाबतींत कदाचित् साठ-सत्तर वर्षें लागतील, पण दोहोंच्याहि बाबतींत पद्धति मात्र तीच असते. विश्वाचें निश्चित स्वरूपाचें विश्लेषण करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे आपल्या स्वतःच्या मनाचें विश्लेषण करणें होय. धर्म जाणून घेण्यासाठी मनःशास्त्राचें यथायोग्य ज्ञान आवश्यक आहे. केवळ तर्कबुद्धीच्या साह्याने सत्याप्रत पोहोचणें अशक्य आहे, कारण अपूर्ण असलेली तर्कबुद्धि स्वतःच्याच मूल अधिष्ठानाचा

अभ्यास करूं शकत नाही. म्हणून मनाचें अनुशीलन करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे त्याच्यासंबंधीचीं तथ्यें गोळा करणें हा होय, मग बुद्धि या तथ्यांची मांडणी करील आणि त्याच्यांतून सामान्य सिद्धान्त काढील. बुद्धीला घर बांधायचें असतें, परंतु ती विटां-शिवाय तें बांधूं शकत नाही. आणि ती स्वतः विटा तयार करूं शकत नाही. उपर्युक्त सामग्री वा तथ्यें गोळा करण्याचा खात्रीचा मार्ग म्हणजे ज्ञानयोग हा होय.

प्रथमतः मनाच्या भौतिक रचनेचा विचार करूं. आपल्याला इंद्रियें आहेत. तीं ज्ञानेंद्रियें आणि कर्मेंद्रियें अशीं विभागलीं आहेत. बाहेरून येणारी संवेदना ग्रहण करणारें उपकरण म्हणजे इंद्रिय नव्हे. केवळ डोळा हा दर्शनेंद्रिय नसून मेंदूतील दर्शनकेंद्र हेंच खरें दर्शनेंद्रिय आहे. असेंच प्रत्येक इंद्रियाच्या बाबतींत आहे. खरी इंद्रियें हीं आंत आहेत. मनाची प्रतिक्रिया होते तेव्हाच खरोखर एखाद्या वस्तूचें ज्ञान होतें. ज्ञानवाहक आणि क्रियात्मक अशा-- दोन्ही मज्जातंतूंची बाह्य वस्तूंच्या ज्ञानासाठी गरज असते.

यानंतर येतें मन. मन हें एखाद्या शांत सरोवरासारखें आहे. सरोवराच्या पृष्ठभागावर जेव्हा आघात होतो, उदाहरणार्थ सरोवरांत जेव्हा खडा पडतो, तेव्हा त्यांत तरंग उत्पन्न होतात. ते सर्व तरंग एकत्र येतात आणि त्या दगडावर त्यांची प्रतिक्रिया होते. सरोवरभर ते पसरतात आणि त्यांचें अस्तित्व जाणवतें. मन हें सरोवरासारखें आहे. त्यांत सतत तरंग उत्पन्न होत अस-तात. त्या तरंगांचे मनावरील ठसे मागे उरतात. आणि त्यांचा परिणाम म्हणजेच अहंकार, 'स्व' किंवा 'मी' हा होय. म्हणून हा 'मी' म्हणजे केवळ अत्यंत जलद असें शक्तीचें स्पंदन होय, वस्तुतः त्याला अस्तित्व नाही.

मनोद्रव्य (चित्त) हें अत्यंत सूक्ष्म असें भौतिक साधन असून तें 'प्राण'शक्तीच्या ग्रहणासाठी उपयोगांत येतें. मनुष्य जेव्हा मरतो तेव्हा शरीर मरतें. शरीर जेव्हा नष्ट होतें तेव्हा मनाचा एक अल्पांश, त्याचें बीज शिल्लक राहतें. आणि हेंच नवीन शरीराचें--ज्याला सेंट पॉलने 'आध्यात्मिक शरीर' (Spiritual Body) म्हटलें आहे त्याचें--बीज असतें. मन जडद्रव्य आहे हा प्रस्तुत सिद्धान्त सर्व आधुनिक मतवादांशीं जुळणारा आहे. मठ्ठ मनुष्याच्या ठिकाणीं बुद्धिमत्तेचा अभाव असतो; याचें कारण म्हणजे त्याच्या मनोद्रव्याला धक्का पोहोचलेला असतो. बुद्धि (बुद्धिचैतन्य) ही जडद्रव्यांत असूं शकत नाही अथवा ती जडद्रव्याच्या कसल्याहि मिश्रणांनी निर्माण केली जाऊं शकत नाही. ही बुद्धि मग कुठे असते ? ती जडद्रव्याच्या पाठीमागे असते; बुद्धि म्हणजे जीवाने जडद्रव्याच्या माध्यमांतून केलेली क्रिया होय. शक्तीचें संक्रमण जडद्रव्याशिवाय शक्य नाही, आणि जीव एकटाच प्रवास करूं शकत नसल्यामुळे, मृत्यूने जेव्हा इतर सर्व नष्ट होतें तेव्हा मनाचा कांही अंश संक्रमणाचें माध्यम म्हणून शिल्लक राहतो.

वस्तूंचें ज्ञान कसें होतें ? माझ्या समोरची भिंत माझ्याकडे संवेदना पाठवते, परंतु जोंपर्यंत माझ्या मनाची प्रतिक्रिया होत नाही तोंपर्यंत मला भिंत दिसत नाही. याचाच अर्थ असा की मी केवळ डोळ्यांनी भिंतीला जाणूं शकत नाहीं. ज्या प्रतिक्रियेमुळे मनाला भिंतीचें ज्ञान होतें ती एक बौद्धिक प्रक्रिया आहे. अशा रीतीने संपूर्ण विश्व डोळे आणि मन (ज्ञानाचें साधन) मिळून जाणलें जातें. त्या विश्वाला अपरिहार्यपणें आपल्या वैयक्तिक प्रवृत्तींचा रंग प्राप्त होतो. खरी भिंत किंवा खरें विश्व हें मनाच्या

बाहेर आहे आणि तें अज्ञात व अज्ञेय आहे. या विश्वाला जर 'क्ष' म्हटलें तर आपल्याला असें म्हणतां येईल : आपल्याला दिसणारें विश्व म्हणजे क्ष+मन होय.

जें बाह्य जगाच्या बाबतींत खरें आहे तेंच अंतर्जगतालाहि लागू असलें पाहिजे. मन हें स्वत:लादेखील जाणूं इच्छितें, परंतु हा 'स्व' मनाच्या माध्यमाद्वाराच जाणला जाऊं शकतो आणि भिंतीप्रमाणेच तो अज्ञात आहे. या 'स्व'ला आपण 'य' म्हणूं आणि मग आपल्याला असें म्हणतां येईल : य+मन म्हणजे आपल्या अनुभवास येणारा अंत:स्थ 'स्व' होय. मनाच्या या विश्लेषणाप्रत येणारा कांट हा ( पाश्चात्त्य देशांतील ) पहिला तत्त्वज्ञ होय, पण तें फार पूर्वीच वेदांमधे आलेलें आहे. अशा रीतीने मन हें एक प्रकारें क्ष आणि य यांच्या मधे असून तें त्या दोहोंवरहि प्रतिक्रिया करीत असतें.

'क्ष' जर अज्ञात आहे तर त्याला जे कांही गुण आपण चिकटवितों ते केवळ आपल्या स्वत:च्या मनामधून निघालेले आहेत. देश, काल आणि कार्यकारणभाव यांच्या मर्यादांतून मनाला बाह्य विश्वाचें ज्ञान होतें. विचारांच्या संचारासाठी काल ही आवश्यक गोष्ट आहे; आणि स्थूलद्रव्याच्या कंपनांसाठी देश वा अवकाश ही आवश्यक गोष्ट आहे. कार्यकारणभाव हा त्या कंपनांतील क्रम आहे. मन हें या तीन गोष्टींमधूनच ज्ञान प्राप्त करूं शकतें. म्हणून जें कांही मनाच्या पलीकडे आहे तें देश, काल आणि कार्यकारणभाव यांच्याहि पलीकडे असलें पाहिजे.

आंधळ्या मनुष्याला जगाचें ज्ञान स्पर्श आणि शब्द यांच्या द्वारें होतें. आपण पांच इंद्रियांनी युक्त असल्यामुळे आपल्याला जग हें त्याहून वेगळेंच दिसतें. आपल्यापैकी एखाद्याला जर

विद्युत्-इंद्रिय प्राप्त झालें आणि विद्युत् तरंग अनुभवण्याची शक्ति त्याला लाभली तर त्याला हेंच जग निराळें भासेल. तरी पण खरें जग अर्थात् 'क्ष' हें या सर्वांच्या बाबतींत सारखेंच आहे. प्रत्येकाचें मन वेगवेगळ्या प्रकारचें असतें. म्हणून प्रत्येकजण स्वत:चें असें वेगवेगळें जग पाहतो. कुणाला क्ष+एक इंद्रिय असें जग दिसतें, कुणाला क्ष+दोन इंद्रियें असें जग दिसतें. याप्रमाणे पांच इंद्रियांपर्यंत मनुष्याला वेगवेगळें जग दिसतें. माणसाला दिसणारें जग जरी विविध प्रकारचें असलें तरी 'क्ष' हा नेहमी अपरिवर्तित राहतो. 'य' देखील आपल्या मनाच्या पलीकडे आहे; आणि म्हणून तो देश, काल व कार्यकारणभाव यांच्याहि पलीकडे आहे.

पण तुम्हीं विचाराल, "देश, काल व कार्यकारणभाव यांच्या पलीकडे 'दोन' वस्तु (क्ष आणि य) आहेत हें कसें?" तुमचें म्हणणें खरें आहे. काळच भेद उत्पन्न करतो, म्हणून ज्याअर्थीं क्ष आणि य हे दोन्ही काळाच्या पलीकडे आहेत त्याअर्थीं ते वस्तुत: एकच असले पाहिजेत. मन जेव्हा या 'एका'ला पाहतें तेव्हा तें त्याला वेगवेगळ्या नांवांनी संबोधतें--जेव्हा तें बाह्य जग असेल तेव्हा त्याला 'क्ष' म्हणतें आणि जेव्हा तें अंतर्जगत् असेल तेव्हा त्याला 'य' म्हणतें. एकच अखंड वस्तु अस्तित्वांत आहे आणि तिच्याकडे आपण मनाच्या भिगांतून पाहत असतों.

आपल्याला सर्वत्र दिसणारी पूर्ण स्वरूपाची सत्ता म्हणजेच ईश्वर वा ब्रह्म होय. मूळची जी अभेदावस्था आहे तीच पूर्णावस्था आहे. इतर सर्व अवस्था ह्या तिच्याहून खालच्या अवस्था आहेत आणि त्या शाश्वत नाहीत.

जें एक आहे, जें अभिन्न आहे तें मनाला भिन्न कशामुळे

भासतें ? स्वाधीन इच्छाशक्तीचें व वाइटाचें मूळ काय आहे या प्रश्नासारखाच हा प्रश्न आहे. हा प्रश्न मुळांतच स्वविरोधी व अशक्य कोटींतला आहे, कारण त्यांत कारण व कार्य हीं गृहीत धरलीं आहेत. त्या एकमेवाद्वितीय अभिन्न सत्तेंत कार्यकारणसंबंध नाही; हा प्रश्न असें गृहीत धरतो की, ती अद्वय सत्ता आणि हें द्वैतमय जगत् या दोहोंचीहि अवस्था एकच आहे, एकच नियम त्या दोहोंनाहि लागू आहे. 'कां' आणि 'कशामुळे' हे प्रश्न फक्त 'मनां'त आहेत. खरा 'स्व' वा आत्मा हा कार्यकारणभावाच्या पलीकडे आहे आणि तोच काय तो स्वाधीन आहे. प्रत्येक प्रकारच्या मनांतून त्याचाच प्रकाश व्यक्त होत असतो. प्रत्येक क्रियेंतून मी प्रस्थापित करूं जातों की मी स्वाधीन आहें, आणि तरीहि प्रत्येक क्रिया हें सिद्ध करते की मी बद्ध आहें. खरा 'स्व' वा आत्मा हा स्वाधीन आहे पण जेव्हा तो शरीर व मन यांच्याशीं तादात्म्य पावतो तेव्हा तो स्वाधीन नसतो. इच्छाशक्ति ही आत्म्याचा पहिला आविष्कार आहे; म्हणूनच ती आत्म्याची पहिली उपाधि आहे. इच्छाशक्ति ही आत्मा व मन यांचें मिश्रण आहे. कोणतीहि मिश्र वस्तु चिरंतन असूं शकत नाही; म्हणूनच ज्याअर्थी आपण जगण्याची 'इच्छा' करतों त्याअर्थी आपल्याला मृत्युहि आहेच. शाश्वत जीवन हा वदतो व्याघात आहे, हे स्वविरोधी शब्द आहेत. कारण जीवन हें मिश्रणाच्या स्वरूपाचें असल्यामुळे तें शाश्वत असूंच शकत नाही. खरा आत्मा हा 'एकमेवाद्वितीय' आणि शाश्वत आहे. हा पूर्ण आत्मा इच्छाशक्ति, मन, विचार प्रभृति अपूर्ण वस्तूंशीं कसा मिसळला ? तो त्यांच्याशीं कधीच मिसळला नाही. तुम्ही स्वरूपतः आत्मा आहांत (तो मागच्या विधानांतील 'य' आहांत); तुम्ही कधीच 'इच्छाशक्ति' नव्हतां;

तुमच्यांत कधीच परिवर्तन झालें नाही; व्यक्ति या नात्याने तुम्ही कधी अस्तित्वांतच नव्हतां; तो भ्रम आहे. तर मग, तुम्ही विचाराल की, हा भ्रम कशावर आधारलेला आहे? हा एक विसंगत प्रश्न आहे. भ्रम कधीच सत्यावर अधिष्ठित नसतो, तो केवळ भ्रमावरच अधिष्ठित असतो. प्रत्येक वस्तूची धडपड त्या पूर्वस्थितीला, या भ्रमाच्या पूर्वीच्या स्थितीला जाण्याची असते, --खऱ्या अर्थाने स्वाधीन होण्याची असते. तर मग आपल्या या जीवनाचें मूल्य काय? तें आपल्याला अनुभव प्रदान करण्यासाठी आहे हा दृष्टिकोन क्रमविकासवाद उडवून लावतो काय? नाही; उलट तो त्याला स्पष्ट करतो. वस्तुतः क्रमविकास म्हणजे जडाच्या शुद्धीकरणाची प्रक्रिया होय, आणि ह्या प्रक्रियेंतूनच आत्मा अधिकाधिक अभिव्यक्त होत जातो. तो जणुकांही आपण व दुसरी एखादी वस्तु यांच्यामध्ये असलेल्या पडद्यासारखा आहे. पडदा जसजसा हळूहळू दूर होत जातो तसतशी ती वस्तु स्पष्ट होत जाते, प्रश्न केवळ आत्म्याच्या अभिव्यक्तीचा आहे.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
दि: ..................

# वेदान्त तत्त्वज्ञान आणि ख्रिस्ती धर्म

( २८ फेब्रुवारी १९०० रोजीं कॅलिफोर्नियामधील ओकलंड येथील युनिटेरियन चर्चमधे दिलेल्या एका भाषणाचीं टिपणें )

जगांतील सर्व थोर धर्मांमधे साम्याचे पुष्कळ मुद्दे आहेत. अणिा कित्येक वेळां हें साम्य इतकें आश्चर्यकारक असतें की, त्यामुळे निरनिराळ्या धर्मांनी पुष्कळ गोष्टी एकमेकापासून उचलल्या आहेत अशी कल्पना सुचावी.

अनुकरणाचा हा आरोप निरनिराळ्या धर्मांवर करण्यांत आला आहे. पण तो वरवरचा आहे हें पुढील गोष्टीवरून सिद्ध होतें.

धर्म हा वस्तुत: मानवाच्या आत्म्यांतच वसत असतो. आणि ज्याअर्थी सर्व जीवन हें त्या अंत:स्थ आत्म्याचा विकास आहे त्याअर्थी धर्म हा विविध लोकांमधून व राष्ट्रांमधून अपरिहार्यपणें अभिव्यक्त होत असतो.

आत्म्याची भाषा एकच आहे, राष्ट्रांच्या भाषा अनेक आहेत, त्यांच्या जीवनाच्या पद्धति आणि प्रथा अत्यंत भिन्न आहेत. धर्म हा आत्म्याचा आहे आणि तो विविध राष्ट्रांच्या भाषा आणि चालीरीती यांच्या द्वारा व्यक्त होतो. यावरून हें निष्पन्न होतें की जगांतील धर्मांमधे असणारा भेद हा बाह्यच अभिव्यक्तीचा आहे, मूळ वस्तूचा नाही; आणि त्यांच्यांतील साम्याचे मुद्दे व ऐक्य हीं आत्म्याचीं आहेत, तीं मूलभूत आहेत; कारण कोणत्याहि लोकांच्या द्वारा आणि कोणत्याहि परिस्थितींत आत्मा अभिव्यक्त झाला

तरी त्याची भाषा एकच आहे. विविध व अनेक वाद्यांतून एकच सुसंवादी मधुर स्वर झंकृत व्हावा तसेंच हेंहि आहे.

जगांतील सर्व थोर धर्मांत समान असणारी पहिली गोष्ट म्हणजे प्रत्येकाचा प्रमाणभूत व अधिकृत असा एक एक ग्रंथ असतो. ज्या धर्मांचा असा ग्रंथ नव्हता ते नष्ट झाले आहेत. इजिप्तमधील धर्मांची हीच गत झाली. असा प्रमाणभूत व अधिकृत ग्रंथ हा प्रत्येक थोर धर्माचा जणुकांही मध्यवर्ती अग्नि असतो. त्याच्या भोवती त्या त्या धर्माचे अनुयायी गोळा होतात आणि त्याच्या-पासूनच त्या त्या धर्माच्या अनुयायांना शक्ति व जीवन हीं प्राप्त होत असतात.

तद्वतच, प्रत्येक धर्माचा असा दावा असतो की, त्याचा विशिष्ट ग्रंथ हाच केवळ ईश्वराचा अधिकृत शब्द आहे; इतर सर्व शास्त्रग्रंथ खोटे आहेत, आणि बिचाऱ्या भोळ्या मानवांवर ते लादले गेले आहेत; आणि दुसऱ्या धर्माचें अनुसरण करणें म्हणजे अज्ञानी आणि आध्यात्मिकदृष्टचा अंध राहणें होय.

असा हटवाद वा दुराग्रह हा सर्व धर्मांतील पुराणमताभिमानी लोकांचें वैशिष्टय आहे. उदाहरणार्थ, वेदांचे पुराणमताभिमानी वा 'सनातनी' अनुयायी असें मानतात की, केवळ वेदच या जगांत ईश्वराचे अधिकृत शब्द आहेत; वेदांच्या द्वाराच ईश्वर हा जगाशीं बोलला आहे; इतकेंच नव्हे तर स्वतः जगच वेदांच्यामुळेच अस्तित्वांत आहे. जगाच्या पूर्वीहि वेद होते. जगांतील प्रत्येक वस्तु अस्तित्वांत आहे याचें कारण ती वेदांत आहे ! गाय अस्तित्वांत आहे, कारण गाय हें नांव वेदांमधे आहे; म्हणजेच गाय म्हणून ज्या प्राण्याला आपण ओळखतों त्याचा उल्लेख वेदांत आहे. वेदांची भाषा ही ईश्वराची मूळ भाषा आहे, आणि इतर सर्व

भाषा या केवळ बोलभाषा असून त्या ईश्वराच्या नाहीत. वेदांतील प्रत्येक शब्दाचा, प्रत्येक अक्षराचा उच्चार शुद्ध रीतीने केला पाहिजे. प्रत्येक अक्षर योग्य त्या स्वरांत उच्चारलें पाहिजे आणि हें सारें कांटेकोरपणें पाळण्यांत थोडीशी जरी चूक झाली तरी तें महापाप होय आणि तें अक्षम्य मानलें जातें.

अशा रीतीने या प्रकारचा हट्टवाद सर्व धर्मांतील सनातनी वृत्तीच्या लोकांत प्रबळ आहे. परंतु केवळ शब्दांवरून होणाऱ्या भांडणांत अज्ञानी व आध्यात्मिकदृष्टया अंध असे लोकच पडत असतात. ज्यांनी थोडाबहुत धर्म खरोखरी आत्मसात् केला आहे ते, ज्या स्वरूपांत विभिन्न धर्म व्यक्त झाले आहेत त्या बाह्य स्वरूपांवरून कधीच भांडत नाहीत. ते जाणतात की सर्व धर्मांचा जीवनस्रोत एकच आहे, आणि म्हणून त्यांचा कोणाशींहि, तो त्यांचीच भाषा बोलत नाही यावरून झगडा नसतो.

वेद हे वस्तुतः जगांतील प्राचीनतम पवित्र ग्रंथ होत. ते केव्हा व कोणाकडून लिहिले गेले यासंबंधी कोणालाहि कांही माहिती नाही. त्यांचे अनेक खंड आहेत आणि कोणाहि एका माणसाने ते सर्व कधी वाचले असतील की नाही यासंबंधी मला शंका आहे.

वेदांचा धर्म हाच हिंदूंचा धर्म आहे आणि तो सर्व पौर्वात्य धर्मांचा पाया आहे. याचा अर्थ असा की इतर सर्व पौर्वात्य धर्म वेदांपासून निघालेले आहेत; सर्व पौर्वात्य धर्ममतें वेदांना प्रमाणभूत मानतात.

येशू ख्रिस्तांच्या शिकवणीवर विश्वास ठेवायचा आणि त्याच वेळीं असें मानायचें की त्यांच्या शिकवणीचा फार मोठा भाग सध्याच्या काळाला लागू नाही, हें तर्कविरोधी आहे. तुम्ही

जर असें म्हणाल की येशूंच्या उपदेशांवर विश्वास ठेवणाऱ्या लोकांना आज विभिन्न प्रकारच्या शक्ति प्राप्त होत नाहीत (येशू म्हणाले होते की अशांना त्या प्राप्त होतील) याचें कारण हें की या लोकांचा तेवढा विश्वास नाही व ते तेवढे शुद्ध नाहीत, तर तें बरोबर होईल. पण हे उपदेश सध्याच्या काळाला लागू नाहीत असें म्हणणें मात्र हास्यास्पद आहे.

मी असा माणूस कधी पाहिला नाही की जो निदान माझ्या बरोबरीचा नव्हता. मीं सर्व जगभर प्रवास केला आहे; मी अत्यंत वाईट प्रकारच्या लोकांत--नरभक्षकांतसुद्धा--राहिलों आहें. आणि असा मनुष्य मीं कधी पाहिला नाही कीं जो निदान माझ्या बरोबरीचा नाही. आज ते जसे वागतात तसेंच मी जेव्हा मूढ होतों तेव्हा वागत होतों. तेव्हा मला अधिक चांगलें कांही कळत नव्हतें; आता तें कळतें. आज त्यांना अधिक चांगलें कांही कळत नाही. कांही काळानंतर तें त्यांना कळेल. प्रत्येकजण आपल्या स्वभावानुसार वागत असतो. आपला सर्वांचा विकास क्रमशः होत आहे. या दृष्टीने, कुणी कुणाहून श्रेष्ठ नाही.

# उपासक आणि उपास्य

(९ एप्रिल १९०० रोजीं सॅन् फ्रॅन्सिस्को विभागांत दिलेलें भाषण)

आतापर्यंत आपण मानवी स्वभावाच्या विश्लेषणात्मक ज्ञानाचा जो पैलू आहे त्याचाच अधिक विचार केला. या व्याख्यान-मालेंत आपण भावनात्मक पैलूचा अभ्यास करूं . . . पहिला पैलू मनुष्याचा विचार 'अमर्याद व अनंत तत्त्व' या दृष्टीने करतो तर हा दुसरा पैलू त्याचा 'समर्याद जीव' या दृष्टीने विचार करतो. . . . पहिल्याला अश्रुबिंदु किंवा उसासे यांच्यासाठी थांबण्यास वेळ नाही, तर दुसरा अश्रु पुसल्यावांचून, दुःखाचें सांत्वन केल्यावांचून पुढे जाऊं शकत नाही. एक महान् आहे--इतका महान् की त्याच्या भव्यतेमुळे आपण कधी कधी विस्मयचकित होतों. दुसरा

---

हें आणि यापुढील दोन व्याख्यानें हीं इडा अॅन्सेल ह्यांनी टिपून घेतलीं होतीं. त्यासंबंधीं अॅन्सेल म्हणतात :

"स्वामी विवेकानंदांची पश्चिमेची दुसरी सफर १८९९-१९०० मध्ये झाली. १९०० च्या प्रथमार्धांत त्यांनी सॅन् फ्रॅन्सिस्कोमधे व या शहराच्या आवतीभोवती कार्य केलें. मी त्या शहरांत राहत असे; त्या वेळी माझें वय बावीस वर्षांचें होतें. सन १९०० च्या मार्च ते मे या महिन्यांच्या अवधींत मीं त्यांचीं सुमारें वीस व्याख्यानें ऐकलीं आणि त्यांपैकी सतरा व्याख्यानें मीं उतरून घेतलीं."

"दररोजच्या मुलाखती आणि अनौपचारिक वर्ग सोडून स्वामीजींनी मार्च, एप्रिल व मे या तीन महिन्यांत जवळजवळ तीस अथवा चाळीस तरी व्याख्यानें दिलीं."

(पुढे चालू)

सर्वसाधारण आहे, तरीहि तो आपल्याला अत्यंत प्रिय आणि अत्यंत सुंदर वाटतो. एक आपली पकड घेतो आणि आपल्याला अशा उंचीवर नेतो की जेथे आपली छाती फाटायला लागते. त्या वातावरणांत आपण श्वासोच्छ्वास करूं शकत नाहीं. दुसरा आपल्याला आपण जिथे आहोंत तिथेच राहूं देतो आणि जीवनांतील नित्य परिचयाच्या वस्तु पाहण्याचा प्रयत्न करतो, त्याचा दृष्टिकोन मर्यादित असतो. बुद्धीची स्पष्ट मान्यता मिळाल्याशिवाय एक कांहीहि स्वीकारीत नाही; दुसऱ्याजवळ श्रद्धा आहे आणि जें त्याला दिसत नाही त्याच्यावर तो विश्वास ठेवतो. मानवी स्वभावाचे हे दोन्ही पैलू आवश्यक आहेत. पक्षी केवळ एकाच पंखाने उडूं शकत नाहीं. . . .

---

"माझ्या टाचणांच्या अपुरेपणामुळे हीं व्याख्यानें लिहून काढण्याच्या आणि प्रकाशनार्थ उपलब्ध करून देण्याच्या बाबतींत मी पुष्कळ दिवस कांकूं करीत होतें. तीं उतरून घेतलीं तेव्हा मी एक नवशिकी लघुलेखिका होतें. स्वामीजींची अत्यंत वक्तृत्वशाली भाषणें संपूर्णपणें उतरून घेण्यासाठी मिनिटाला कमींत कमी तीनशे शब्दांचा वेग आवश्यक होता. माझा वेग त्याच्या अर्ध्याहूनहि कमी होता व त्या सुमारास या सामग्रीचे माझ्याव्यतिरिक्त कोणास कांही मोल असेल अशी कल्पनाच आली नाही. स्वामीजींच्या बोलण्याच्या जलद वेगाशिवाय आणखी एक गोष्ट सांगावयास हवी; ती म्हणजे ते फार उच्च कोटीचे नट होते. ते सांगत असलेल्या गोष्टी व इतरांच्या ते करीत असलेल्या नकला ह्या लेखन थांबवून त्यांच्याकडे पाहण्याचा आनंद घेण्यास भाग पाडीत. . . .माझीं टिपणें जरी कांहीशीं अपूर्ण होतीं तरी त्यांतील मजकूर मूल्यवान आहे व तो प्रकाशनार्थ दिलाच पाहिजे हें म्हणणें मीं कबूल केलें."

वर सांगितल्याप्रमाणे अपूर्ण टिपणांवरून हीं व्याख्यानें प्रकाशनार्थ तयार केलीं असल्यामुळे त्यांत बऱ्याच ठिकाणीं मजकूर गळल्यासारखा झाला आहे. अशा बहुतेक ठिकाणीं तीन टिंबें दिलेलीं आढळतील.

आपल्याला असा मनुष्य पाहिजे की ज्याच्या स्वभावाचे सर्व पैलू सारखेच विकसित झाले आहेत....हृदयाने विशाल, बुद्धीने थोर, कृतीने श्रेष्ठ....आपल्याला असा मनुष्य पाहिजे की ज्याचें हृदय जगाच्या दु:खांनी व क्लेशांनी कळवळतें.... आपल्याला असा मनुष्य हवा की जो केवळ भावनाशीलच नाही, तर त्याबरोबरच जो वस्तूंचा खराखुरा अर्थ समजून घेऊं शकतो. जो प्रकृतीच्या अंतर्यामीं शिरून तिचा अर्थ जाणून घेऊं शकतो. आपल्याला असा मनुष्य पाहिजे की जो एवढ्यावरच न थांबतां आपल्या भावना आणि आपल्याला गवसलेला अर्थ प्रत्यक्ष कृतींत आणूं इच्छितो. मेंदू, हृदय आणि हात यांचें अशा प्रकारचें संमीलन आपल्याला हवें आहे. या जगांत पुष्कळसे उपदेशक आहेत, परंतु त्यांच्यापैकी अधिकांश उपदेशक एकांगी आहेत असें तुम्हांला आढळेल. एकजण बुद्धीचा माध्यान्हींचा प्रखर सूर्य पाहतो, पण तो दुसरें कांहीच पाहत नाही. दुसरा प्रेमाचें सुंदर संगीत ऐकतो आणि इतर कांहीच ऐकत नाही. आणखी एखादा कर्मांत निमग्न असतो आणि भावनेला किंवा विचाराला त्याच्याजवळ अवसर नसतो. मानव सारखाच कृतिशील, ज्ञानवान आणि प्रेमळ कां असूं नये? तें अशक्य आहे काय? खचित नाही. हा भविष्यकालीन मानव आहे. त्यांच्यासारखीं उदाहरणें सध्या फार थोडीं आहेत. त्यांची संख्या वाढेल आणि शेवटीं सर्व जग अशा मानवांनी भरून जाईल.

आतापर्यंत मी तुमच्याशीं बुद्धि आणि तर्क यांच्याविषयी बोलत होतों. आपण संपूर्ण वेदान्त ऐकला आहे. मायेचा पडदा फाटतो, हिवाळी ढग दूर होतात आणि सूर्य आपल्यावर प्रकाशतो हें आपण पाहिलें. जेथे शिखरें ढगाआड अदृश्य होतात त्या उंच

हिमालयावर चढण्याचा प्रयत्न मी करीत आलों. आता मी तुमच्याबरोबर दुसऱ्या बाजूचा अभ्यास करण्याचें योजिलें आहे. या दुसऱ्या बाजूला अत्यंत सुंदर अशा दऱ्या आणि निसर्गांतील अत्यंत सुंदर व सर्वोत्कृष्ट अशीं दृश्यें आहेत. आता आपण प्रेमाचा अभ्यास करूं या. जगांत इतकीं दुःखें असूनहि ज्याच्यामुळे आपण येथे राहत आहोंत, ज्याने आपल्याला क्लेशांची शृंखला घडविण्यास भाग पाडलें आहे, ज्याच्यामुळे मनुष्य स्वखुशीने हें निरंतरचें हीतात्म्य पत्करतो त्या प्रेमाचा आता आपण अभ्यास करूं. ज्याच्यामुळे मनुष्याने स्वतःच्या हातांनी शृंखला घडविली आहे, ज्याच्यासाठी तो दुःख भोगतो, त्या शाश्वत प्रेमाचा आपल्याला अभ्यास करायचा आहे. याचा अर्थ असा नव्हे की आपण वेदान्ताची बाजू विसरून जावें. हिमालयांतील बर्फाची नदी काश्मीरांतील भाताच्या शेताला येऊन मिळाली पाहिजे, मेघगर्जनेचा गंभीर नाद पक्ष्यांच्या कूजनांत मिसळला पाहिजे.

या व्याख्यानमालेंत, जें कांही उत्कृष्ट व सुंदर आहे त्या सर्वांशीं आपला संबंध येईल. उपासना ही सर्वत्र आहे, उपासना करणें हा प्रत्येकाचा स्वभाव आहे. प्रत्येकजण ईश्वराची उपासना करतो. कोणत्याहि नांवाने असो, पण सर्वच लोक ईश्वराची उपासना करीत आहेत. सुंदर कमळाप्रमाणे, खुद्द जीवनाप्रमाणे उपासनेचा जन्म पृथ्वीवरच्या मातींत होतो. . . .भय, इहलोकींच्या लाभाविषयीची लालसा, कांहीतरी मागण्याची भिकारी वृत्ति-- जगांतील सर्व उपासनेचा प्रारंभ या साऱ्या गोष्टींतून होतो आणि तिची परिणति ईश्वरावर प्रेम करण्यांत आणि मनुष्यामधून ईश्वराची उपासना करण्यांत होते.

ईश्वर आहे काय ? ज्याच्यावर प्रेम करावें, जो प्रेमास

पात्र आहे असा कोणी आहे काय ? दगडावर प्रेम केल्याने कांही विशेष असें निष्पन्न होणार नाही. ज्याला प्रेम समजतें, जें आमचें प्रेम आकर्षून घेतें, त्याच्यावरच आपण प्रेम करतों. उपासनेचेंहि असेंच आहे. या जगांत असा एखादाहि मनुष्य नाही की ज्याने दगडाच्या तुकड्याची दगड म्हणून उपासना केली आहे. माणसाने नेहमी तो सर्वव्यापी ईश्वर त्या दगडांत आहे अशा भावनेनेच उपासना केलेली आहे.

आपल्याला कळून येतें की तो सर्वव्यापी ईश्वर आपल्यामधे आहे, परंतु त्याला आपल्यापासून वेगळा केल्याशिवाय आपल्याला त्याची उपासना कशी करतां येईल ? मी केवळ 'तुझी' उपासना करूं शकतों, 'माझी' नव्हे. मी फक्त 'तुझी' प्रार्थना करूं शकतों, 'माझी' नव्हे. असा कोणी 'तूं' आहे काय ?

तें 'एक'च 'बहु' होतें. जेव्हा आपण त्या 'एका'ला पाहतों तेव्हा मायेमुळे भासमान होणाऱ्या उपाधि नाहीशा होतात. परंतु हेंहि खरें आहे की या 'बहू'लाहि कांही मूल्य आहे. या 'बहू'च्या द्वाराच आपण त्या 'एका'पर्यंत पोहोचतों. . . .

सगुण ईश्वर आहे काय ? जो विचार करतो, जो सर्वकांही ध्यानांत घेतो, जो आपलें मार्गदर्शन करतो असा ईश्वर आहे काय ? होय, आहे. निर्गुण ईश्वराच्या ठायीं यांपैकी एकहि गुण असणें शक्य नाही. तुमच्यापैकी प्रत्येकजण एक व्यक्ति आहे : तुम्ही विचार करतां, तुम्ही प्रेम करतां, तुम्ही द्वेष करतां, तुम्ही रागावतां, तुम्ही दुःखी होतां इत्यादि; तरीहि तुम्ही व्यक्ति-भावरहित वा निर्गुण आणि अमर्याद आहांत. तुम्ही एकाच वेळीं सगुण आणि निर्गुण आहांत. सगुण आणि निर्गुण असे तुमचे दोन पैलू आहेत. तुमच्यांतील निर्गुणतत्त्व रागावूं शकत नाही, तें

दुःखी-कष्टी होऊं शकत नाही, तें दुःखांचा विचारदेखील करूं शकत नाही. तें विचार करूं शकत नाही, तें जाणूं शकत नाही. तें स्वतःच ज्ञानस्वरूप आहे. परंतु तुमच्यांतील सगुण अंश जाणतो, विचार करतो, मृत्यु पावतो इत्यादि. साहजिकच सर्वव्यापी ब्रह्माचे दोन पैलू असलें पाहिजेत. पहिला पैलू म्हणजे अनंत निर्गुण असें सर्व वस्तूंचें सत्स्वरूप होय आणि दुसरा सगुण पैलू होय. तो आपल्या आत्म्यांचा आत्मा आहे, सर्व प्रभूंचा प्रभु आहे. तोच हें विश्व निर्माण करतो, त्याच्याच आज्ञेनुसार हें विश्व चालतें. . . .

तो अनंत आहे, नित्य शुद्ध, नित्य मुक्त आहे. . . .तो न्यायाधीश नाही. ईश्वर न्यायाधीश असूं शकत नाही. तो एखाद्या सिंहासनावर बसून चांगलें-वाईट याचा निवाडा करीत नाही. . . . तो दंडाधिकारी नाही, सेनाधिकारी नाही अथवा मालक नाही. हा सगुण ईश्वर अनंत दयामय आणि अनंत प्रेममय आहे.

दुसऱ्या बाजूने याचा विचार करा. तुमच्या शरीरांतील प्रत्येक पेशींत त्या पेशीची जाणीव असलेला आत्मा आहे. त्याला स्वतंत्र अस्तित्व आहे. त्याला स्वतःची अशी अल्प इच्छाशक्ति आहे, त्याचें स्वतःचें एक लहानसें कार्यक्षेत्र आहे. या सर्व पेशी मिळून व्यक्ति बनते. त्याचप्रमाणे या अनेक व्यक्तींचा मिळून या विश्वाचा सगुण ईश्वर बनलेला आहे.

आणखी एका बाजूने पाहा. तुम्हांला पाहत असतांना तुमचें मूळचें निरपेक्ष स्वरूप मीं मर्यादित केलेलें असतें व तुमचें तें तेवढें मर्यादित स्वरूपच मला दिसत असतें. माझ्या डोळ्यांनी तुम्हांला पाहण्यासाठी आणि माझ्या इंद्रियांनी तुम्हांला अनुभवण्यासाठी मीं तुम्हांला मर्यादित करून टाकलें आहे. माझे डोळे

तुमच्या खऱ्या स्वरूपाचा जेवढा भाग पाहूं शकतात तेवढाच मी पाहतों. तुमच्या जेवढ्या भागाचें माझ्या मनाला आकलन होतें त्यालाच मी 'तुम्ही' असें समजतों, त्याहून अधिक नाही. तद्वतच, मी त्या निर्गुण अनंताला जाणण्याचा प्रयत्न करीत आहें आणि त्याला सगुण रूपांत पाहत आहें. जोंपर्यंत आपल्याला हें शरीर आणि मन आहे तोंपर्यंत आपल्याला 'ईश्वर, प्रकृति आणि आत्मा' ही त्रयी नेहमी दिसेल. आपल्याला नेहमी ही त्रयी अविभाज्यपणें एकत्र दिसेल....

प्रकृति आहे, हे जीवात्मे आहेत, आणि पुन्हा ज्यांत प्रकृति आणि हे जीवात्मे सामावलेले आहेत असें 'तें' आहे.

विश्वात्मा साकार झाला आहे. माझा आत्मा हाहि ईश्वराचा एक अंश आहे. तो आपल्या चक्षूंचा चक्षु, जीवनाचें जीवन, मनाचें मन, आत्म्याचा आत्मा आहे. सगुण ईश्वराचें आपल्या अनुभवास येऊं शकणारें हें सर्वोच्च रूप आहे.

तुम्ही द्वैती नसून अद्वैती असाल तरी तुम्ही सगुण ईश्वराचीं कल्पना करूं शकतां....तो 'एकमेवाद्वितीय'च सर्वदा विद्यमान आहे. त्याला स्वत:वर प्रेम करण्याची इच्छा झाली, म्हणून त्याने 'एकां'तून 'बहु' उत्पन्न केले....त्या महान् 'स्व'ची, त्या खऱ्या 'स्व'ची, लहान 'स्व' उपासना करीत आहे. अशा रीतीने सर्व तत्त्वज्ञानसंप्रदायांत तुम्ही सगुण ईश्वराची कल्पना करूं शकतां.

कांही लोक अशा परिस्थितींत जन्मतात की जिच्यामुळे ते इतरांच्यापेक्षा जास्त सुखांत असतात. न्यायी ईश्वराच्या राज्यांत असें कां व्हावें ? या जगांत नश्वरता आहे. सगुण ईश्वर मानण्याच्या बाबतींत या अडचणी आहेत. या प्रश्नांचीं उत्तरें कधी

दिलीं गेलीं नाहीत. कोणत्याहि द्वैती भूमिकेवरून त्यांचीं उत्तरें देतां येणार नाहीत. आपल्याला वस्तु जशा आहेत तशा पाहण्यासाठी तत्त्वज्ञानाकडे परत गेलें पाहिजे. आपण आपल्या कर्माचीं फळें भोगीत आहोंत. हा ईश्वराचा दोष नाही. आपण जी कांही चूक करतों ती आपलीच असते, आणखी कांही नाही. ईश्वराला आपण दोष कां द्यावा ?...

जगांत वाईट कां आहे ? ईश्वरच चांगलें व वाईट दोहोंचें कारण आहे असें म्हणणें हाच ही समस्या सोडविण्याचा एकमेव मार्ग आहे. सगुण ईश्वराच्या सिद्धान्तांतील मोठी अडचण ही आहे की, तुम्ही जर म्हणाल की तो केवळ चांगलाच आहे, वाईट नाही, तर तुम्ही स्वतःच्या युक्तिवादाच्याच सापळ्यांत सापडाल. ईश्वर आहे हें तुम्ही कसें जाणतां ? तुम्ही म्हणतां की तो या विश्वाचा पिता आहे आणि तो चांगला आहे. पण जगांत वाईटहि आहे, म्हणून मग ईश्वर हा वाईटहि असला पाहिजे....पुन्हा तीच अडचण !

वाईट किंवा चांगलें असें कांही नाही. ईश्वरच सर्वकांही आहे. एखादी गोष्ट चांगली आहे हें तुम्हांला कसें कळतें ? तुम्हांला तसें वाटतें म्हणून. त्याचप्रमाणे एखादी गोष्ट वाईट आहे हें तुम्हांला कसें कळतें ? ती वाईट आहे असें तुम्हांला वाटतें म्हणून. ...चांगलें व वाईट हें आपल्याला आपल्या भावनांमुळे कळतें. असा एकहि मनुष्य नाही की ज्याला केवळ चांगल्या, सुखद भावनाच अनुभवास येतात; असाहि कोणी नाही की ज्याला केवळ दुःखद भावनाच अनुभवास येतात....

गरज आणि चिंता याच सर्व दुःखांचें व सुखांचेंहि मूळ आहेत. गरजा वाढत आहेत की कमी होत आहेत ? जीवन साधें

होत आहे की गुंतागुंतीचें ? तें खात्रीने गुंतागुंतीचें होत आहे. गरजांची संख्या वाढत आहे. तुमच्या आजा-पणजांना तुमच्या-इतके कपडे व पैसे लागत नसत. त्यांच्याजवळ ट्रामगाड्या नव्हत्या, आगगाड्या इत्यादि नव्हत्या. त्यामुळे त्यांना कमी काम करावें लागत असे. या गोष्टी येण्याचाच अवकाश की गरजा वाढतात व तुम्हांला अधिक काम करावें लागतें. मग अधिकाधिक चिंता आणि अधिकाधिक स्पर्धा ह्याच आपल्याला दिसूं लागतात.

पैसा मिळविणें फार कष्टाचें आहे आणि तो सांभाळणें त्याहूनहि जास्त कष्टाचें आहे. थोडासा पैसा गोळा करण्यासाठी तुम्ही साऱ्या जगाशीं झगडा करतां आणि तो टिकविण्यासाठी आयुष्यभर धडपडतां. म्हणूनच श्रीमंतांच्या मागे गरिबांच्यापेक्षा अधिक काळजी असते. . . .असें हें चालूं आहे. . . .

या जगांत चांगलें व वाईट सर्वत्र आहे. कांही वेळां वाईट हें चांगलें होतें हें खरें, पण इतर कांही वेळां चांगलेंहि वाईट होतें. आपलीं इंद्रियें केव्हातरी वाईट निर्माण करतातच. एखादा माणूस मद्य पितो. पहिल्याप्रथम तें वाईट नसेल. पण जर तो सतत मद्य पिईल तर त्यांतून वाईट निष्पन्न होईलच. . . .एखादा मनुष्य श्रीमंत आईबापांच्या पोटीं जन्मतो. हें चांगलें आहे. तो पुढे मूर्ख निघतो, स्वतःचें शरीर किंवा मेंदू यांचा कधी तो उपयोग करीत नाही. हें चांगल्यांतून वाईट निर्माण होण्याचें उदाहरण आहे. जीवनाविषयीच्या आपल्या ह्या आसक्तीचा विचार करा : आपण इतस्ततः भटकतों, नाचतों बागडतों, कांही काळ जगतों; आपण काबाडकष्ट करतों. आपण पूर्णतः असमर्थ अशीं बालकें म्हणून जन्मतों. पुन्हा सर्व गोष्टी समजण्यास वर्षानुवर्षें लागतात. साठींत किंवा सत्तरींत आपले डोळे उघडतात, आणि तेव्हाच 'चला

चालते व्हा' हे शब्द कानावर येतात; आपली अवस्था ही अशी आहे.

आपण पाहिलें की चांगलें आणि वाईट हे सापेक्ष शब्द आहेत. जी गोष्ट मला चांगली असेल ती तुम्हांला वाईट असेल. मी जें जेवण घेतों तें तुम्ही घ्याल तर तुम्ही रडायला लागाल आणि मी हसेन....कदाचित् आपण दोघेहि नाचूं, पण मी आनंदाने नाचेन तर तुम्ही दुःखामुळे नाचाल....एकच गोष्ट आपल्या जीवनाच्या एका काळांत चांगली असते आणि दुसऱ्या काळांत वाईट असते. चांगलें आणि वाईट हीं दोन्हीं अगदी वेग-वेगळीं आहेत असें तुम्ही कसें म्हणूं शकाल ? अमुक गोष्ट पूर्ण-पणें चांगली आहे आणि अमुक गोष्ट पूर्णपणें वाईट आहे असें तुम्ही कसें म्हणूं शकाल ?

ईश्वर जर नेहमी चांगलाच आहे तर या चांगल्या आणि वाइटाला कोण जबाबदार आहे ? ख्रिस्ती आणि मुसलमान लोक म्हणतात की सैतान नांवाचा कुणी एक पुरुष आहे. या विश्वांत दोन पुरुष कार्य करीत आहेत असें तुम्ही कसें म्हणूं शकतां ? एकच पुरुष असला पाहिजे....जो अग्नि मुलाला जाळतो तोच अन्न शिजवितो. तुम्ही अग्नीला चांगला किंवा वाईट कसें म्हणूं शकाल ? आणि त्याला दोन वेगळ्या व्यक्तींनी निर्माण केलें असें तरी तुम्हांला कसें म्हणतां येईल ? सर्व तथाकथित वाईट कोण निर्माण करतो ? ईश्वर. यांतून दुसरा मार्ग नाही. तोच जीवन आणि मृत्यु, प्लेग आणि सांथीचे रोग आणि सर्वकांही पाठवितो. ईश्वर जर असा असेल तर तो चांगला आहे; तो वाईट आहे; तो सुंदर आहे; तो भयंकर आहे; तो जीवन आहे; आणि तो मृत्यु आहे.

अशा ईश्वराची उपासना कशी करावी ? अंतरात्मा

'भीषणा'ची उपासना करायला खरोखरी कसा शिकतो हें आपल्याला पुढे कळेल. जेव्हा तो 'भीषणा'ची उपासना करायला शिकेल तेव्हाच त्याला शांति लाभेल. . . .तुम्हांला शांति हवी आहे काय ? चिंतेपासून तुम्हांला सुटका करून घ्यावयाची आहे काय ? तर मग प्रथमत: वळून बघा आणि 'भीषणा'ला तोंड द्या. त्याचा मुखवटा फाडून दूर करा आणि त्यांत तोच ईश्वर असल्याचें पाहा. जें कांही चांगलें भासमान होतें आणि जें कांही वाईट भासतें तें सर्व तोच सगुण ईश्वर आहे, दुसरा कुणीहि नाही. ईश्वर जर दोन असते तर विश्व एक क्षणभर देखील टिकूं शकलें नसतें. या विश्वांत एक ईश्वर सोडून दुसरा आणखी कुणीहि नाही. या विश्वांत सर्वकांही सुसंवादी आहे. एका बाजूला ईश्वर आणि दुसऱ्या बाजूला सैतान असा जर खेळ चालला असता तर संपूर्ण विश्वांत गोंधळ माजला असता. नियमाचा भंग कोण करूं शकेल ? ही कांच जर मी फोडीन तर ती खाली पडेल. एखादा माणूस जर एक अणु त्याच्या स्थानाच्या बाहेर काढण्यांत यशस्वी होईल तर दुसऱ्या प्रत्येक अणूचें संतुलन बिघडून जाईल. . . .नियम केव्हाहि मोडला जाऊं शकत नाही. प्रत्येक अणु हा आपापल्या स्थानीं ठेवण्यांत आला आहे. प्रत्येक अणु तोलूनमापून योग्य स्थानीं ठेवण्यांत आला आहे आणि तो आपल्या ठिकाणीं आपलें कार्य करतो. ईश्वराच्या आज्ञेने वारे वाहतात, सूर्य प्रकाशतो, त्याच्या आज्ञेने विविध गोल आपापल्या जागीं आहेत. त्याच्या आज्ञेने पृथ्वीवर मृत्यूचा खेळ चालला आहे. दोन किंवा तीन ईश्वर या जगांत एकमेकाशीं कुस्ती खेळत आहेत अशी नुसती कल्पना तर करून पाहा ! तें अशक्य आहे.

आता हें आपल्या लक्षांत आलें असेल की आपण या विश्वाचा

निर्माता असा सगुण ईश्वर कल्पूं शकतों. तो दयाळू आहे आणि क्रूरहि आहे. . . .तोच चांगलें आहे, तोच वाईट आहे. तो हसतो आणि रागावतो, आणि कोणीहि त्याच्या नियमाच्या बाहेर जाऊं शकत नाही. तोच या विश्वाचा निर्माता आहे.

सृजन म्हणजे काय ? सृजन म्हणजे शून्यांतून कांहीतरी निर्माण होणें आहे काय ? सहा हजार वर्षांपूर्वी ईश्वर आपल्या स्वप्नांतून जागा झाला व त्याने जग निर्मिलें आणि त्यापूर्वी तेथे कांहीच नव्हतें काय ? तेव्हा ईश्वर काय करीत होता ? चांगली झोप घेत होता ? ईश्वर या विश्वाचें कारण आहे, आणि कार्याच्या द्वारा आपण कारण जाणूं शकतों. कार्य जर अस्तित्वांत नसेल तर कारणाला 'कारण' म्हणतां येणार नाही. कारण हें नेहमी कार्या-मधून आणि त्याच्या द्वारा जाणलें जातें--सृष्टि ही अनंत आहे. . . .देश आणि काल यांच्या मर्यादेंत तिचा प्रारंभ कुठे झाला याची कल्पना तुम्ही करूं शकत नाही.

ईश्वर सृष्टि कां निर्माण करतो ?--कारण त्याला तें आवडतें, कारण तो स्वाधीन आहे. . . .तुम्ही आणि मी नियमाने बांधलेले आहोंत, कारण आपण कांही विशिष्ट प्रकारेंच कार्य करूं शकतों, इतर रीतींनी नाही. "हात नसूनहि तो सर्वकांही धरूं शकतो, पाय नसूनहि तो वेगाने चालतो." अशरीरी असूनहि तो सर्वशक्तिमान आहे. "ज्याला चक्षु पाहूं शकत नाहीत परंतु जो प्रत्येक नेत्रांतील पाहण्याची शक्ति आहे तोच ईश्वर आहे असें जाण." तुम्ही दुसऱ्या कशाचीहि उपासना करूं शकत नाही. ईश्वर हाच सर्वशक्तिमान असा या विश्वाचा आधार आहे. ज्याला 'नियम' म्हणण्यांत येतें तो त्याच्या इच्छाशक्तीचा आविष्कार आहे. तो स्वतःच्या नियमांनी विश्वाचें नियमन करतो.

आतापर्यंत आपण ईश्वर आणि प्रकृति यांची चर्चा केली. ईश्वर शाश्वत आहे आणि प्रकृतिहि शाश्वत आहे. आत्मे कसे आहेत ? तेहि शाश्वत आहेत, कोणताहि आत्मा कधी निर्माण केला गेला नाही आणि तो मरणहि पावूं शकत नाही. कोणीहि स्वतःच्या मृत्यूची केवळ कल्पनाहि करूं शकत नाही. आत्मा हा अनंत, शाश्वत आहे. तो कसा मरूं शकतो ? तो शरीरें बदलतो. ज्याप्रमाणे मनुष्य आपलीं जुनीं जीर्ण वस्त्रें टाकून देतो आणि नवीन धारण करतो त्याचप्रमाणे जीर्ण शरीर फेकलें जातें आणि नवें ताजें शरीर धारण केलें जातें.

आत्म्याचें स्वरूप कसें आहे ? आत्मादेखील सर्वशक्तिमान व सर्वव्यापी आहे. आत्म्याला लांबी, रुंदी, जाडी, कांहीहि नसतात....आत्मा या किंवा त्या विशिष्ट 'ठिकाणीं' आहे असें कसें म्हणतां येईल ? हें शरीर गळून पडतें, आत्मा दुसऱ्या शरीराच्या द्वारा कार्य करतो. आत्मा हें एक असें वर्तुळ आहे की ज्याचा परीघ कोठेच नाही, परंतु ज्याचा मध्यबिंदु शरीरांत आहे. ईश्वर हें असें वर्तुळ आहे की ज्याचा परीघ कोठेच नाही, पण ज्याचा मध्यबिंदु सर्वत्र आहे. आत्मा हा स्वरूपतःच शुद्ध, पूर्ण आणि आनंदमय आहे. तो स्वरूपतः अशुद्ध असता तर तो कधीच शुद्ध होऊं शकला नसता....शुद्धता हाच आत्म्याचा स्वभाव आहे; म्हणूनच आत्मे शुद्ध होऊं शकतात. तो स्वरूपतः आनंदमय आहे म्हणूनच तो आनंदी होऊं शकतो. तो शांतस्वरूप आहे म्हणूनच तो शांत होऊं शकतो....

इहलोकांतील आपण सर्वजण शरीराकडे आकर्षिले जातों; जगण्यासाठी आपण कष्ट करतों; ईर्ष्या-द्वेष, झगडे-तंटे आणि हालअपेष्टा यांनी आपलें जीवन भरलेलें असतें, आणि मग आपण

मरून जातों. यावरून हें दिसतें की आपण जसे असायला पाहिजे तसे नाहीं. आपण स्वाधीन नाहीं, पूर्णपणें शुद्ध नाहीं, इत्यादि. आत्मा जणुकांही अधःपतित झाला आहे. म्हणून आत्म्याला जर कशाची गरज असेल तर ती म्हणजे विकसनाची. . . .

हें तुम्ही कसें करूं शकाल ? तुम्ही स्वतःच हें करूं शकाल काय ? नाही. एखाद्याचा चेहरा धुळीने भरला असेल तर तुम्ही तो धुळीनेच धुऊं शकाल काय ? मीं जर भूमींत एखादें बीज पेरलें तर त्याच्यापासून एक वृक्ष होतो, वृक्ष पुन्हा बीज उत्पन्न करतो, बीजाचा पुन्हा दुसरा वृक्ष होतो, इत्यादि. कोंबडी व अंडें, अंडें व कोंबडी—हें असें चालू आहे. चांगलें कर्म करा, त्याचें फळ आहेच; पुन्हा जन्म घ्यावा लागेल—संसारदुःख थांबणार नाही. एकदा या अनंत शृंखलेंत सापडलांत की मग तुम्ही ती थांबवूं शकत नाही. तुम्ही वर व खाली, स्वर्गांत व मृत्युलोकांत, आणि या सर्व शरीरांतून फिरत राहतां. . . .यांतून कांही सुटका नाही.

तर मग या सर्वांतून तुम्ही बाहेर कसे पडूं शकाल आणि इथे तुम्हीं कशासाठी आलां आहांत ? 'या दुःखांतून बाहेर पडण्यासाठी'—अशी एक कल्पना आहे. आपण सर्वजण या दुःख-क्लेशांतून सुटण्यासाठी रात्रंदिवस धडपडत आहोंत. . . .कर्माच्या द्वारें आपली दुःखांतून सुटका होऊं शकत नाही. कर्मापासून अधिक कर्म उत्पन्न होईल. जो स्वतः स्वाधीन आहे असा जर कुणी असेल आणि तो जर आपल्याला हात देईल तरच आपली दुःखां-तून सुटका होणें शक्य आहे. "हे अमृताच्या पुत्रांनो ! ऐका ! जे या लोकांत राहतात ते व जे वर स्वर्गांत राहतात तेहि ऐका ! मीं रहस्य जाणलें आहे"—असें एक ऋषि म्हणतो. "जो सर्व

अंधाराच्या पलीकडे आहे त्याचा मीं शोध लावला आहे. केवळ त्याच्या कृपेनेच आपण हा भवसागर तरून जाऊं शकतों."

आपलें ध्येय कोणतें आहे यासंबंधी भारतांतील कल्पना पुढीलप्रमाणे आहे : स्वर्ग, नरक, मृत्युलोक हे सर्व आहेत, पण ते शाश्वत नाहीत. मी जर नरकांत गेलों तर तें नेहमीसाठी नाही. जिथे कुठे मी असेन तिथे तोच संघर्ष चालू असतो. या संघर्षाच्या पलीकडे कसें जायचें हाच प्रश्न आहे. मी जर स्वर्गांत गेलों तर तिथे कदाचित् मला थोडीशी विश्रांति मिळेल. माझ्या दुष्कर्मांबद्दल मला जर शिक्षा झाली तर तीहि चिरकाल टिकणार नाही. . . .स्वर्गाला जाणें हें भारतीय ध्येय नाही. या मृत्युलोकांतून बाहेर पडा, नरकांतून बाहेर पडा आणि स्वर्गांतूनहि बाहेर पडा ! आपलें ध्येय कोणतें आहे ? तें आहे मुक्ति. तुम्ही सर्व मुक्त व्हायला पाहिजे. आत्म्याचा महिमा झाकलेला आहे. त्याच्यावरचें आवरण पुन्हा दूर करायला पाहिजे. आत्म्याचें अस्तित्व आहे. तो सर्वत्र आहे. तो कुठे जाईल ? . . .कुठे जाऊं शकेल ? जिथे तो नाही तिथेच तो जाऊं शकेल. तुम्ही जर हें जाणाल की तो सर्वत्र आहे. . .तर तुम्हांला चिरंतन असा पूर्ण आनंद प्राप्त होईल. पुन्हा जन्म आणि मृत्यु राहणार नाहीत. . . . रोग नाहीत, शरीर नाही. शरीर हाच एक मोठा रोग आहे. . . .

आत्मा स्वस्वरूपीं प्रतिष्ठित होईल; चैतन्य निजस्वरूपाने व्यक्त होईल. हें कसें साध्य करायचें ? आपल्या आत्म्यामधेच असणाऱ्या ईश्वराची उपासना करून. तो स्वभावत:च नित्य, शुद्ध आणि पूर्ण आहे. या जगांत दोन सर्वशक्तिमान पुरुष असूं शकत नाहीत. दोन किंवा तीन ईश्वरांची कल्पना करा; एकजण जग निर्माण करील, तर दुसरा म्हणेल कीं मी जगाचा नाश करीन;

असें कधीच होऊं शकत नाही. एकच ईश्वर असला पाहिजे. आत्मा पूर्णत्व प्राप्त करतो. तो जवळजवळ सर्वशक्तिमान आणि सर्वज्ञ होतो. हा उपासक आहे. उपास्य कोण आहे ?—तो सर्व-व्यापी, सर्वज्ञ असा ईश्वर. मुख्य गोष्ट म्हणजे तो प्रेमस्वरूप आहे. आत्म्याला हें पूर्णत्व कसें प्राप्त होईल ?—उपासनेने.

---

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३४७६६ वि: [illegible]
क्रमांक १४३५ नों दि १४-३-६३

# उपासनेचें प्राथमिक स्वरूप

(१० एप्रिल १९०० रोजीं सॅन् फ्रॅन्सिस्को विभागांत दिलेलें भाषण)

तुमच्यापैकी ज्यांनी बायबलचा अभ्यास केला आहे... त्यांना ठाऊक असेलच की यहुद्यांचा संपूर्ण इतिहास आणि त्यांचें संपूर्ण विचारधन पुरोहित आणि प्रेषित या दोन प्रकारच्या आचार्यांनी निर्माण केलेलें आहे. पैकी पुरोहित हे स्थितिशीलतेचे प्रतिनिधि असून प्रेषित हे गतिशीलतेचे प्रतिनिधि आहेत. खरी गोष्ट अशी आहे की धर्मामधे स्थितिनिष्ठ कर्मकांड शिरतें, बाह्य आचार सर्व गोष्टींना व्यापून टाकतात. प्रत्येक देशाच्या आणि प्रत्येक धर्माच्या बाबतींत हें खरें आहे. नंतर, कांही नवे द्रष्टे नवीन दृष्टीसह पुढे येतात; ते नवे आदर्श व नवे विचार उपदेशितात आणि समाजाला एक नवी गति देतात. कांही पिढ्यांतच अनुयायी आपल्या नेत्यांच्या विचारावर इतकी श्रद्धा ठेवतात की त्यांना दुसरें कांही दिसूं शकत नाही. वर्तमान युगांतील अत्यंत पुढारलेले आणि उदारमतवादी उपदेशक कांही वर्षांतच अत्यंत स्थितिनिष्ठ पुरोहित बनतात. हे पुढारलेले विचारवंत मग त्यांच्याहून थोडेसें पुढे जाणाऱ्या माणसाला अडथळा करायला लागतात. त्यांनी स्वतः जें प्राप्त केलें आहे त्याच्या पलीकडे ते कोणालाहि जाऊं देत नाहीत. आहे तशीच स्थिति त्यांना समाधानकारक वाटते.

प्रत्येक देशांतील प्रत्येक धर्मांत विधायक तत्त्वांच्या द्वारा कार्य करणारी शक्ति ही त्या त्या धर्माच्या बाह्य अनुष्ठानांमधून

व्यक्त होते. . . .सिद्धान्त आणि ग्रंथ, कांही विशिष्ट नियम आणि उठणें, बसणें यांसारख्या कांही विशिष्ट क्रिया या सर्व गोष्टी एकाच प्रकारच्या उपासनेंत मोडतात. आध्यात्मिक उपासनेला जें स्थूल स्वरूप प्राप्त होतें तें बहुसंख्य मानवांना ती उपासना ग्राह्य व्हावी म्हणून. प्रत्येक देशांतील बहुसंख्य लोक चैतन्याची चैतन्यरूपांत उपासना कधीच करूं शकत नाहीत, तें अद्याप शक्य झालें नाही. असा एखादा काळ येईल काय की जेव्हा तें त्यांना शक्य होईल? हें मला माहीत नाही. या शहरांतील किती सहस्र लोक ईश्वराची चैतन्यरूपांत उपासना करूं शकतात? फारच थोडे. त्यांना तें शक्य नाही, ते इंद्रियांच्या पातळीवर राहतात. त्यांना स्थूल वा मूर्त अशा कल्पना द्याव्या लागतात. 'वीस वेळां उभे राहा, वीस वेळां बसा' असें कांहींतरी शारीरिक त्यांना करायला सांगा. त्यांना तें समजेल. एका नाकपुडीने श्वास आंत घेण्यास व दुसरीने तो बाहेर सोडण्यास त्यांना सांगा. तें त्यांना कळेल. चैतन्यासंबंधीचा हा सगळा आदर्शवाद तें मुळीच ग्रहण करूं शकणार नाहीत. तो त्यांचा दोष नाही. . . .ईश्वराची उपासना चैतन्याच्या रूपांत करण्याची शक्ति तुमच्या ठिकाणीं असेल तर ठीक आहे. परंतु एक काळ असा होता की जेव्हा तुम्हांला तें शक्य नव्हतें. . . .लोक जर अडाणी असतील तर त्यांच्या धार्मिक कल्पनाहि ओबडधोबडच राहतील. आणि त्यांची बाह्य अनुष्ठानेंसुद्धा ओबडधोबड आणि स्थूल स्वरूपाचीं राहतील. लोक जर नागर आणि सुसंस्कृत असतील तर त्यांचीं बाह्य अनुष्ठानेंहि अधिक सुंदर राहतील. बाह्य विधि व अनुष्ठानें हीं राहणारच. फक्त तीं काळानुसार बदलतात.

एक आश्चर्यकारक गोष्ट अशी की जगांत इस्लाम धर्मापेक्षा

वैधी उपासनेला अधिक विरोधीं असा धर्म केव्हाहि निर्माण झाला नाही. . . .मुसलमान लोकांना चित्रहि चालत नाही, शिल्पहि चालत नाही व संगीतहि चालत नाही . . . .कारण त्यांतून वैधी उपासना निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यांचा काजी आपल्या श्रोत्यांकडे तोंड करून कधीच बसत नाही. त्याने जर तसें केलें तर तो इतरांहून वेगळा पडेल. असा वेगळेपणा ते असूं देत नाहीत. आणि तरीहि महंमद पैगंबराच्या मृत्यूनंतर अवघ्या दोन शतकांच्या आंतच संतांच्या पूजेचा प्रकार उत्पन्न झाला. या ठिकाणीं अमुक संताच्या पायाच्या अंगठा आहे ! त्या ठिकाणीं तमुक संताचें चर्म आहे !--असें हें चालूं झालें. वैधी उपासना ही एक अवस्था आहे आणि तिच्यांतून आपल्याला जावें लागतें. म्हणून तिच्याविरुद्ध झगडण्याऐवजी आपण तिच्यांतील जो उत्तमांश असेल तो घ्यावा आणि तिच्या मुळाशीं असलेल्या तत्त्वांचा अभ्यास करावा.

अर्थात् उपासनेचा सर्वांत कनिष्ठ प्रकार म्हणजे वृक्षाची किंवा दगडाची पूजा होय. प्रत्येक अडाणी, असंस्कृत मनुष्य कोणतीहि वस्तु घेईल आणि त्यांत स्वतःच्या अशा कांही कल्पनांची भर घालील. आणि त्याचा त्याला उपयोग होईल. तो एखाद्या हाडाच्या किंवा दगडाच्या तुकड्याची--कशाचीहि पूजा करील. उपासनेच्या या सर्व अडाणी अवस्थांत मनुष्याने कधीहि दगडाची दगड म्हणून किंवा झाडाची झाड म्हणून उपासना केली नाही. साध्या व्यवहारज्ञानाने हें तुम्ही जाणूं शकतां. विद्वान लोक कधी कधी असें म्हणतात की माणूस दगडांची व वृक्षाची उपासना करीत होता. त्यांच्या त्या म्हणण्यांत कांही अर्थ नाही. मानवजात ज्या विभिन्न अवस्थांतून गेली त्यांपैकी वृक्षाची उपासना ही एक अवस्था आहे. खरोखरी मनुष्याने केव्हाहि चैतन्याखेरीज इतर

कशाचीहि उपासना केली नाही. तो चैतन्यस्वरूप आहे आणि चैतन्याखेरीज इतर कशाचाहि त्याला अनुभव येऊं शकत नाही. मानवी मन चैतन्याची जडद्रव्य म्हणून उपासना करण्याची घोडचूक कधीहि करूं शकणार नाही. दगडाच्या व वृक्षांच्या उपासनेच्या बाबतींत मनुष्याने दगडाच्या ठिकाणीं किंवा वृक्षांच्या ठिकाणीं चैतन्याची कल्पना केली. त्याने अशी कल्पना केली की परमेश्वराचा कांही अंश दगडांत किंवा वृक्षांत राहतो. दगड किंवा वृक्ष यांना आत्मा आहे.

वृक्षपूजा आणि सर्पपूजा या नेहमी जोडीनेच असतात. ज्ञानवृक्षाची उपासना केली जाते. वृक्ष हा नेहमी असतोच आणि वृक्षाचा संबंध कोणत्यातरी रीतीने सर्पाशीं आहे. हे अत्यंत प्राचीन असे उपासनेचे प्रकार आहेत. पण त्यांतहि तुम्हांला दिसेल की विशिष्ट वृक्ष अथवा विशिष्ट दगड यांचीच पूजा केली जाते, जगांतील सर्व वृक्षांची किंवा दगडांची नाही.

वैधी उपासनेंतील याहून वरची अवस्था ही देवांच्या आणि पूर्वजांच्या प्रतिमांच्या उपासनेची आहे. लोक मृत मनुष्यांच्या प्रतिमा तयार करतात आणि ईश्वराच्या काल्पनिक प्रतिमा बनवितात. मग त्या प्रतिमांची ते उपासना करतात.

त्याहून अधिक वरची अवस्था म्हणजे दिवंगत पुरुषसंतांची व स्त्रीसंतांची उपासना होय. लोक त्यांच्या अवशेषांची उपासना करतात. त्यांना असें वाटतें की त्या अवशेषांत कोणत्यातरी प्रकारें संतांचें वास्तव्य आहे, आणि ते आपल्यास साहाय्य करतील. त्यांची अशी समजूत असते की संतांच्या अस्थीला जर स्पर्श केला तर आपली व्याधि दूर होईल--अस्थि स्वतः व्याधि दूर करतात असें नव्हे, तर अस्थींत वास करणारा संत तें कार्य करतो. . . .

या सर्व उपासनेच्या खालच्या अवस्था आहेत आणि तरीहि त्या उपासनाच आहेत. आपणां सर्वांना त्या अवस्थांतून जावें लागतें. केवळ बौद्धिक भूमिकेवरून पाहिल्यास त्या पुरेशा चांगल्या ठरत नाहीत. परंतु भावनेच्या दृष्टीने पाहतां आपण त्यांचा त्याग करूं शकत नाहीं. एखाद्या माणसापासून जर तुम्ही सर्व संत व प्रतिमा काढून घ्याल आणि त्याला देवळांत जाण्याची मनाई कराल तरी तो सर्व देवदेवतांची कल्पना करील. त्याला तशी कल्पना करावीच लागते. ऐंशी वर्षांच्या एका माणसाने मला सांगितलें की ढगावर बसलेल्या लांब दाढी असलेल्या वृद्ध माणसाच्या रूपांत कल्पिल्याशिवाय त्याला ईश्वराची कल्पनाच करतां येत नाही. यावरून काय दिसतें ? त्याचें शिक्षण पूर्ण झालेलें नाही. त्याला आध्यात्मिक शिक्षण लाभलेलें नाही, आणि तो मानवी रूपाशिवाय इतर कोणत्याहि रूपांत कशाचीहि कल्पना करण्यास असमर्थ आहे.

वैधी उपासनेचा याहूनहि उच्च असा आणखी एक प्रकार आहे--तो म्हणजे विभिन्न प्रतीकांची उपासना. त्यांतहि बाह्य रूपें आहेत, पण त्यांत झाडें, दगड किंवा प्रतिमा किंवा संतांचे अवशेष हे नाहीत. तीं प्रतीकें आहेत. जगभर नाना प्रकारचीं प्रतीकें आहेत. वर्तुळ हें अनंताचें एक महान् प्रतीक आहे . . . त्याचप्रमाणे चौकोन हें एक प्रतीक आहे, 'क्रॉस' हें एक सुप्रसिद्ध प्रतीक आहे, आणि S व Z या इंग्रजी अक्षरांसारख्या आकृति एकमेकांत मिसळलेलीं अशीं प्रतीकें आहेत.

प्रतीकांत कांहीच अर्थ नाही असें समजण्याचें वेड कित्येक लोक डोक्यांत घेतात. . . इतर लोकांना सर्व प्रकारचीं प्रतीकें लागतात. तुम्ही जर त्यांना साधीं सरळ सत्यें सांगाल तर तीं ते

स्वीकारणार नाहीत. . . मनुष्यस्वभाव असा आहे की त्यांना तुम्ही सांगितलेलें जितकें कमी समजेल तितकें चांगलें--तितक्याच प्रमाणांत ते तुम्हांला मोठे समजतात. प्रत्येक काळांतील व प्रत्येक देशांतील असे उपासक हे कांही विशिष्ट आकृतींच्या व विशिष्ट चित्रांच्या द्वारें फसविले जातात. भूमिति हें सर्व शास्त्रांत एक श्रेष्ठ शास्त्र होतें. बहुसंख्य लोकांना त्याची कांही माहिती नव्हती. त्यांची समजूत अशी होती की भूमितिशास्त्रज्ञाने नुसता एक चौकोन काढला आणि त्याच्या चारहि कोनांवर तो जर कांही अक्षरें पुटपुटला तर सगळें जग फिरायला लागेल, स्वर्गांचीं दारें उघडतील, देव खाली येईल आणि इकडेतिकडे उड्या मारून तो दास बनेल. आज फार मोठ्या संख्येने वेडगळ लोक रात्रंदिवस अशा गोष्टींचें चिंतन करीत असलेले आढळतात. या साऱ्या गोष्टी म्हणजे एकप्रकारचा रोगच आहे. तो दार्शनिकांच्या कक्षेंतला नाही, तो वैद्यांच्या कक्षेंतला आहे.

मी विनोद करीत आहें, पण याबद्दल मला वाईट वाटतें. ही समस्या भारतांत फार गंभीर झालेली मला दिसते. ही समाजाच्या ऱ्हासाचीं, अध:पाताचीं आणि समाजांतील अत्याचाराचीं चिन्हें आहेत. जोमाचें, जीवनाचें, आशेचें, आरोग्याचें, जें कांही चांगलें आहे त्या सर्वांचें चिन्ह बल हें आहे. जोंपर्यंत शरीर जिवंत आहे तोपर्यंत शरीरांत बल असलें पाहिजे, मनांत आणि हातांत बल असलें पाहिजे. अशा प्रकारच्या प्रतीकांच्या द्वारें आध्यात्मिक शक्ति प्राप्त करून घेऊं इच्छिणाऱ्या लोकांच्या ठिकाणीं भय असतें, जीवनाविषयीचें भय असतें. अशा प्रकारचा प्रतीकवाद मला अभिप्रेत नाही.

परंतु प्रतीकवादांत थोडेंबहुत सत्य आहे. कोणतेंहि असत्य

घ्या, त्याच्या पाठीमागे थोडेंतरी सत्य असतें; कोणतीतरी मूळ सत्य वस्तु असल्याशिवाय तिची नक्कल शक्य नाही.

विविध धर्मांत प्रतीकात्मक उपासनेचा प्रकार आहे. टवटवीत, जोमदार, काव्यमय, निरामय अशीं प्रतीकें आपल्यास दिसून येतात. क्रुसाच्या प्रतीकाच्या लक्षावधि लोकांवर पडलेल्या विलक्षण प्रभावाचा विचार करा ! चंद्रकोरीच्या प्रतीकाचा विचार करा ! ह्या एका प्रतीकांत किती आकर्षणशक्ति आहे ! जगांत प्रत्येक ठिकाणीं चांगलीं थोर प्रतीकें आहेत. चैतन्याचा अर्थ समजण्यासाठी तीं आपल्याला मदत करतात आणि त्यांच्या द्वारें मनाच्या कांही विशिष्ट अवस्था निर्माण होतात. बहुधा हीं प्रतीकें श्रद्धा व प्रेम यांचें विलक्षण सामर्थ्य उत्पन्न करतात असें आपल्याला नेहमी आढळतें.

प्रॉटेस्टंट संप्रदायाची कॅथॉलिक संप्रदायाशीं तुलना करा. गेल्या चारशे वर्षांच्या दोन्ही संप्रदायांच्या अस्तित्वाच्या काळांत कोणी अधिक संत व हुतात्मे निर्माण केले आहेत ? कॅथॉलिकांच्या बाह्य विधींचा व उपचारांचा--ते दीप, तो धूप, त्या मेणबत्या आणि धर्मगुरूंचे ते झगे या सर्वांचा--मनावर मोठा विलक्षण परिणाम होतो. प्रॉटेस्टंट संप्रदाय हा बराच रुक्ष व काव्यहीन आहे. कॅथॉलिक संप्रदायापेक्षा प्रॉटेस्टंट संप्रदायाने कांही विशेष गोष्टी करून घेतल्या आहेत, कांही बाबतींत कॅथॉलिकांच्यापेक्षा त्यांनी आपल्या अनुयायांना अधिक स्वातंत्र्य दिलें आहे, म्हणून त्यांची धर्मविषयक कल्पना अधिक स्पष्ट, अधिक व्यक्तिस्वातंत्र्याधिष्ठित आहे. हें सर्व ठीक आहे. पण त्यांनी बरेंचसें गमावलेंहि आहे. . . . चर्चमधलीं चित्रें पाहा. तो एक काव्याचाच प्रयत्न आहे. आपल्याला जर काव्याची भूक आहे तर तें कां नको ?

आत्म्याला जें पाहिजे. तें त्याला कां देऊं नये ? आपल्याला संगीत हें अवश्य पाहिजे. प्रेसबिटेरियन संप्रदायाचे लोक तर संगीताच्याहि विरुद्ध होते. ख्रिस्ती धर्मांतील ते जणु 'मुसलमान' होत. सर्व काव्याचा, सर्व विधि-अनुष्ठानांचा त्यांनी निषेध केला. पण अखेर आता ते संगीताचा उपयोग करतात. संगीत माणसाला आकर्षित करतें. व्यासपीठावर ते ईश्वरी प्रकाशाच्या लाभासाठी कशी संगीत सामुदायिक प्रार्थना करतात हें मीं पाहिलें आहे.

बाह्य पातळीवर प्रकट झालेला धर्म व काव्य यांचा आत्म्याला तृप्ति होईपर्यंत आस्वाद घेऊं द्या. त्याने हा आस्वाद कां घेऊं नये ? . . .तुम्ही वैधी उपासनेशीं लढा देऊं शकत नाही. ती वारंवार विजय मिळवील. . . .कॅथॉलिक जें करतात तें तुम्हांला पसंत नसेल तर तुम्ही अधिक चांगलें असें कांहीतरी करा. परंतु आपण अधिक चांगलें कांही करीत नाहीं किंवा अगोदरच अस्तित्वांत असलेलें काव्य आस्वादीत नाहीं. ही फार भयंकर गोष्ट आहे ! काव्य हें अत्यंत आवश्यक आहे. तुम्ही जगांतील सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञ असाल, परंतु तत्त्वज्ञान हें सर्वोच्च काव्य आहे. तें कांही शुष्क नाही, तें वस्तूंचें सार आहे. सत्य हें स्वतःच कोणत्याहि द्वैतवादापेक्षा अधिक काव्यमय आहे. . . .

विद्वत्तेला धर्मांत स्थान नाही. बहुसंख्य लोकांच्या पक्षीं विद्वत्ता ही मार्गांतील धोंड ठरते. . . .एखाद्या माणसाने जगांतील सर्व ग्रंथालयें वाचून काढलीं असतील आणि तरीहि तो मुळीच धार्मिक नसेल. आणि दुसरा एखादा कदाचित् स्वतःचें नांवहि लिहूं शकत नसेल आणि तरीहि त्याने धर्माचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेला असेल, त्याचा साक्षात्कार करून घेतला असेल. स्वतःच्या अंतर्यामीं प्रत्यक्ष अनुभूति प्राप्त करून घेण्यांतच सगळा धर्म आहे.

जेव्हा मी 'माणूस' घडविणारा धर्म असे शब्द वापरतों तेव्हा मला ग्रंथ किंवा ठराविक मतें किंवा सिद्धान्त अभिप्रेत नसतात. ज्याने स्वतःच्या हृदयांत त्या अनंताचा प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे त्याचें संपूर्ण दर्शन करून घेतलें आहे असा 'माणूस' मला अभिप्रेत आहे.

ज्या महापुरुषाच्या चरणापाशी आयुष्यभर मी बसलों आणि ज्यांचे कांही विचारच मी शिकविण्याचा प्रयत्न करतों त्यांना कष्टानेच स्वतःचें नांव लिहितां येई. मीं जरी जगभर प्रवास केला आहे तरी त्यांच्या तोडीचा दुसरा कुणीहि मला माझ्या जीवनांत आढळला नाही. मी जेव्हा त्या महापुरुषाचा विचार करतों तेव्हा मी स्वतःला मूर्ख समजतों, कारण मी ग्रंथ वाचूं इच्छितों आणि त्यांनी कधी ते वाचले नाहीत. इतर लोक खाऊन गेल्यावर त्या बशा चाटण्याची त्यांना कधी इच्छा झाली नाही. त्यामुळे ते स्वतःच स्वतःचा ग्रंथ होते. आयुष्यभर मी, रामने काय म्हटलें व श्यामने काय म्हटलें तेंच सांगत आलों, आणि स्वतःचें असें मी कांहीच सांगत नाहीं. रामने पंचवीस वर्षांपूर्वी काय सांगितलें आणि श्यामने पांच वर्षांपूर्वी काय सांगितलें तें जाणण्यांत कोणता गौरव आहे ? 'तुम्हांला' काय म्हणायचें आहे तें सांगा.

लक्षांत ठेवा, केवळ विद्वत्तेला कांही महत्त्व नाही. विद्वान् होण्याची तुम्हीं चूक केली आहे. ज्ञानाचें खरें मूल्य मनाला सामर्थ्यवान व शिस्तबद्ध करण्यांत आहे. या सर्व निरंतरच्या गिळण्याने आपण सर्व अपचनाचे रोगी कसे झालों नाहीं हें आश्चर्यच आहे. आपण थांबूं या, सर्व पुस्तकें जाळूं या आणि स्वतः विचार करूं या. तुम्ही सर्व स्वतःचें 'व्यक्तित्व' नाहीसें होत असल्याबद्दल नेहमी बोलतां व त्याबद्दल अस्वस्थ होतां, तुम्ही या सदाच्या

गिळण्याने प्रत्येक क्षणाला तें व्यक्तित्व गमावीत आहांत. मी जें शिकवितों त्यावर तुमच्यापैकी जर कोणी निव्वळ विश्वासच ठेवील तर मला वाईट वाटेल. स्वत:च विचार करण्याची शक्ति मी तुमच्यामधे जागृत करूं शकलों तर मला फार आनंद होईल. ...माझी इच्छा स्त्री-पुरुषांशीं बोलण्याची आहे, मेंढरांशीं नाही. स्त्री व पुरुष म्हणजे स्वतंत्र व्यक्तित्व असलेलीं माणसें असा अर्थ मला अभिप्रेत आहे. गल्लींतून सर्व घाणेरडया चिंध्या गोळा करून त्यांची बाहुली बनविण्यास तुम्ही कांही लहान मुलें नाही !

"हें शिक्षणाचें ठिकाण आहे ! तो माणूस विद्यापीठांत आहे ! त्याला मिस्टर ब्लॅन्कने म्हटलेलें सर्व माहीत आहे !" पण ब्लॅन्कने कांहीच म्हटलें नाही. मला जर संधि मिळाली असती...तर मीं त्या प्राध्यापकाला म्हटलें असतें, "बाहेर व्हा, तुम्ही कोणी नाही." कांही झालें तरी आपलें हें स्वतंत्र व्यक्तित्व लक्षांत ठेवा. वाटल्यास चुकीचा विचार करा, तुम्हांला सत्य सापडेल किंवा नाही याला महत्त्व नाही, मुख्य मुद्दा हा आहे की तुमच्या मनाला वळण लागलें पाहिजे. जें सत्य तुम्ही दुसऱ्या-कडून घेऊन गिळतां तें तुमचें होणार नाही. तुम्ही माझ्या मुखाने सत्य शिकूं शकत नाही किंवा माझ्या मुखाने सत्य शिकवूंहि शकत नाही. कोणीहि दुसऱ्याला शिकवूं शकत नाही. तुम्हांला सत्याचा स्वत:च अनुभव घेतला पाहिजे आणि आपल्या स्वभावानुसार तें स्वत:च कृतींत आणलें पाहिजे....सर्वांनी 'व्यक्ति' बनण्यासाठीं प्राणपणाने प्रयत्न केला पाहिजे--सामर्थ्यवान होण्याचा, स्वत:च्या पायावर उभें राहण्याचा, स्वत:च विचार करण्याचा, स्वत:च आत्मसाक्षात्कार करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. इतरांनी

तयार केलेले सिद्धान्त गिळणें हें उपयोगाचें नाही; तुरुंगांतील शिपायांप्रमाणे एकत्र उभे राहणें, एकत्र बसणें, सर्वांनी तेंच अन्न खाणें, सर्वांनी एकाच वेळीं आपलीं डोकीं हलविणें हें उपयोगाचें नाही. विविधता हें जिवंतपणाचें लक्षण आहे; सारखेपणा हें मृत्यूचें चिन्ह आहे.

एकदा मी भारतांतील एका शहरांत होतों तेव्हा एक वृद्ध मनुष्य माझ्याकडे आला व म्हणाला, "स्वामीजी, मला मार्ग सांगा." मीं असें पाहिलें की तो मनुष्य माझ्या समोरच्या टेबला-इतकाच मृत होता. मानसिक आणि आध्यात्मिक दृष्टया तो खरोखरीच मृत होता. मी म्हणालों, "मी जें तुम्हांला करायला सांगेन तें तुम्ही कराल काय ? तुम्ही चोरी करूं शकाल ? तुम्ही मद्य पिऊं शकाल ? तुम्हीं मांस खाऊं शकाल ?"

आश्चर्याने तो माणूस म्हणाला, "हें तुम्ही काय शिकवीत आहांत ?"

मी त्याला म्हणालों, "या भिंतीने कधी चोरी केली आहे? या भिंतीने कधी मद्य प्राशन केलें आहे ?"

"नाही महाराज."

"मनुष्य चोरी करतो, तो दारू पितो आणि तो देव बनतो. मित्रा, मला माहीत आहे की तूं भिंत नाहीस. कांहीतरी कर, कांहीतरी कर !" मला वाटलें त्या मनुष्याने चोरी केली तर त्याचा आत्मा मुक्तीच्या मार्गाला लागेल.

तुम्ही 'व्यक्ति' आहांत हें मला कसें कळावें ? तुम्ही सर्व-जण तीच गोष्ट बोलत आहां, तुम्ही सर्वजण एकत्र बसत आहां, एकत्र उठत आहां. हा मृत्यूचा मार्ग आहे ! आपल्या आत्म्यासाठी कांहीतरी करा ! तुम्हांला वाटेल तर चुकीचें करा, पण कांही-

तरी करा ! मी काय म्हणतों हें तुम्हांला आता कळत नसलें तरी हळूहळू कळेल. आत्म्याला जणु कांही म्हातारपण आलें आहे. तो जंगून गेला आहे. तो जंग घासून काढला पाहिजे म्हणजे मग आपण पुढे जाऊं शकूं. जगांत वाईट कां आहे हें आता तुम्हांला समजलें असेल. मीं जें सांगितलें त्यावर घरीं जाऊन विचार करा,——आपल्याला हा जंग काढून टाकावयाचा आहे.

आपण भौतिक गोष्टींसाठी प्रार्थना करतों. कांहीतरी मिळविण्यासाठी आपण ईश्वराची व्यापारी वृत्तीने उपासना करतों. अन्न व वस्त्र यांच्यासाठी प्रार्थना केली तरी चालेल ! उपासना ही चांगली आहे. कांही नसण्यापेक्षा कांहीतरी असणें हें नेहमीच चांगलें असतें. "मुळीच काका नसण्यापेक्षा आंधळा काका असणें बरें" अशी एक म्हण आहे. एखादा अत्यंत श्रीमंत मनुष्य आजारी होतो आणि मग आपल्या रोगापासून मुक्त होण्यासाठी तो गरिबांना दान द्यायला लागतो. तें चांगलें आहे, पण तरी तो धर्म नव्हे, आध्यात्मिक स्वरूपाचा धर्म नव्हे. तें सर्व भौतिक पातळीवरचें आहे. काय भौतिक आहे आणि काय नाही ? जेव्हा इहलोक हेंच साध्य असतें आणि ईश्वर हें त्या साध्याचें साधन असतें तेव्हा तें 'भौतिक' होय. जेव्हा ईश्वर हें साध्य असतें आणि जग हें केवळ तें साध्य प्राप्त करून घेण्याचें साधन असतें तेव्हा आध्यात्मिकतेला प्रारंभ होतो.

याप्रकारें ज्या माणसाला हें भौतिक जीवनच प्रचुर प्रमाणांत हवें असतें त्याचा स्वर्ग म्हणजे इहलोकांतील जीवनच पुढे चालूं ठेवणें होय. त्याला सर्व मृत माणसें पुन: पाहावीशीं वाटतात आणि पुन्हा एकदा त्यांच्यासह आनंदांत काळ घालवावासा वाटतो.

मृतांच्या आत्म्यांना खाली आणणारी एक स्त्री होती.

अशा व्यंक्तींना 'माध्यम' (Medium) म्हणतात. ती फार 'लठ्ठ' होती तरी तिला Medium (मध्यम) म्हणण्यांत येत असे! असो. ही बाई मला फार चाहत असे आणि तिने मला आपला प्रयोग पाहण्यासाठी आमंत्रण दिलें. तिने बोलावलेले सर्व आत्मे माझ्याशीं फार विनयाने वागले. मला फार विचित्र अनुभव आला. हे प्रयोग मध्यरात्रीं होत होते. त्या माध्यमाने म्हटलें,... "एक भूत इथे उभें असलेलें मी पाहत आहें. तें भूत मला सांगत आहे की 'त्या बाकावर एक हिंदु माणूस बसला आहे.'" मी उभा राहिलों आणि म्हणालों, "हें सांगण्याला तुम्हांला भुताची गरज नव्हती."

तिथे एक तरुण मनुष्य होता. तो विवाहित होता, बुद्धिमान आणि सुशिक्षित होता. तो तिथे आपल्या आईला पाहण्यासाठी बसला होता. माध्यम म्हणालें, "अमक्या अमक्याची आई आता इथे आली आहे." त्या तरुण मनुष्याने स्वत:च्या या आईविषयी मला सांगितलें होतें. ती जेव्हा मरण पावली तेव्हा ती फार कृश होती. परंतु त्या पडद्याच्या बाहेर आलेली ती आई! तुम्हीं तिला पाहायला हवें होतें! हा तरुण मनुष्य काय करतो हें मला पाहायचें होतें. आश्चर्य असें की त्याने उडी मारून त्या आत्म्याला आलिंगन दिलें आणि तो म्हणाला, "आई! आत्म्यांच्या जगांत जाऊन तूं किती सुंदर झाली आहेस!" मी म्हणालों, "मी इथे आहें हें माझें भाग्य आहे. यामुळे मला मनुष्यस्वभावाचें विशेष ज्ञान झालें."

आपल्या वैधी उपासनेच्या विषयाकडे आता परत वळूं या....जेव्हा तुम्ही इहलोक आणि हें जीवन यांनाच ध्येय मानून त्याचें एक साधन म्हणून ईश्वराची उपासना करतां तेव्हा ती

कनिष्ठ प्रतीची उपासना असते. . . .बहुसंख्य लोकांनी या देहाहून आणि इंद्रियजनित सुखाहून अधिक उच्च अशा कोणत्याहि गोष्टीची कधी कल्पना केलेली नसते. या जीवनांतदेखील हे बिचारे लोक जीं सर्व सुखें मिळवितात तीं पशूंच्या सुखांसारखींच असतात. . . .ते प्राण्यांचें मांस खातात, ते आपल्या मुलांवर प्रेम करतात. माणसाचा सर्व मोठेपणा यांतच आहे काय ? आणि आपण सर्वशक्तिमान ईश्वराची उपासना करतों ! कशासाठी ? त्याने केवळ या भौतिक वस्तु आपल्याला द्याव्यात आणि त्यांचें सर्वकाळ रक्षण करावें यासाठी. . . .याचा अर्थ असा की आपण पशुपक्ष्यांच्या अवस्थेपलीकडे गेलों नाहीं, आपण त्यांच्याहून कांही अधिक चांगलें नाहीं, त्यांच्याहून आपल्याला कांही अधिक ज्ञान नाही. ही केवढी दुर्दैवाची गोष्ट आहे ! आपल्याला अधिक ज्ञान असायला हवें. आपल्यांत व त्यांच्यांत भेद इतकाच आहे की आपल्याजवळ जसा ईश्वर आहे तसा त्यांच्याजवळ नाही. . . .आपल्याला पशूंच्या प्रेमाणेच पांच इंद्रियें आहेत, फक्त इतकेंच की त्यांचीं इंद्रियें अधिक चांगलीं आहेत. कुत्रा जितक्या चवीने हाड चघळतो तितक्या चवीने आपण अन्नाचा घांस खाऊं शकत नाहीं. जीवनांत त्यांना आपल्यापेक्षा अधिक सुख आहे. तेव्हा आपण त्यांच्याहून थोडेसे उणेच आहोंत.

आहांत त्यापेक्षा प्रकृतीच्या हातांतलें अमळ अधिक चांगलें यंत्र बनण्याची आकांक्षा तुम्हीं का बाळगावी ? तुम्ही विचार करावा असा हा एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. तुम्हांला काय हवें आहे ?—हेंच जीवन, हींच इंद्रियें, हेंच शरीर, की जें याहून अनंत पटीने उच्च व चांगलें आहे, ज्यापासून पुन्हा पतन नाही आणि ज्यांत परिवर्तन वा बदल नाही असें कांहीतरी ?

तेव्हा याचा अर्थ काय ? . . .तुम्ही म्हणतां, "ईश्वरा, मला भाकरी दे, संपत्ति दे ! माझे रोग बरे कर ! तूं माझ्यासाठीं हें कर आणि तें कर !" प्रत्येक वेळीं जेव्हा तुम्ही असें म्हणतां तेव्हा तुम्ही स्वत:ला 'मी जड आहें आणि हें जडद्रव्यच माझें अंतिम साध्य आहे' या कल्पनेच्या भ्रमांत पाडीत असतां. प्रत्येक वेळीं जेव्हा तुम्ही एखादी भौतिक वासना पूर्ण करण्याचा प्रयत्न करतां तेव्हा तुम्ही स्वत:ला सांगत असतां की 'मी शरीर आहें, मी आत्मा नाहीं.' . . .

ईश्वराचे उपकार आहेत की हें सारें स्वप्न आहे ! ईश्वराचे उपकार आहेत की तें नाहीसें होईल ! ईश्वराचे उपकार आहेत की जगांत मृत्यु आहे, तो थोर मृत्यु आहे. कारण तो या सर्व भ्रमाचा, या स्वप्नाचा, या मांसपिंडाचा व या यातनांचा शेवट करतो. कोणतेंहि स्वप्न चिरकाल टिकत नाही; लवकर किंवा उशीरा तें संपलेंच पाहिजे. जो आपलें स्वप्न नेहमीसाठी कायम ठेवूं शकेल असा कोणीहि नाही. असें आहे याबद्दल मी ईश्वराला धन्यवाद देतों ! तरीहि उपासनेचा हा प्रकार ठीकच आहे. तो चालूं द्या ! कशासाठी तरी प्रार्थना करणें हें मुळीच प्रार्थना न करण्यापेक्षा चांगलें आहे. उपासनेच्या या भिन्न भिन्न अवस्था आहेत आणि त्यांतून आपण जात असतों. हे पहिले पाठ आहेत. क्रमाक्रमाने, मन हें इंद्रियांपेक्षा, शरीरापेक्षा, ऐहिक सुखांपेक्षा उच्चतर अशा कांही गोष्टींचा विचार करूं लागतें.

हें कसें साधावयाचें ? माणूस प्रथम विचार करूं लागतो. तुम्ही जेव्हा एखाद्या समस्येचा विचार करतां तेव्हा त्यांत विषय-सुख नसतें, तर विचाराचा श्रेष्ठ आनंद असतो.' . . .यामुळेच मनुष्य 'मनुष्य' बनतो. . . .एखादा महान् विचार घ्या. तो

उत्कट होतो. मग एकाग्रता येते. तुम्हांला शरीराचें भान राहत नाही. तुमच्या इंद्रियांचें कार्य थांबतें. तुम्ही सर्व स्थूल इंद्रियांच्या पलीकडे जातां. आधी इंद्रियांच्या द्वारा जें व्यक्त होत होतें तें आता सर्व त्या एका विचारावर केंद्रित झालेलें असतें. त्या वेळीं तुम्ही पाशवी अवस्थेच्या पलीकडे असतां तुम्हांला असें दिव्य ज्ञान लाभतें की जें तुमच्यापासून कोणी हिरावून घेऊं शकणार नाही--शरीराहून श्रेष्ठ अशा कशाचेंतरी तें प्रत्यक्ष ज्ञान असतें. . . .तेंच मानवाचें अंतिम साध्य आहे, तें इंद्रियांच्या पातळीवर प्राप्त होऊं शकत नाही.

अशा रीतीने, इंद्रियांच्या पातळीवरून कार्य करतां करतां तुम्हांला ज्ञानाच्या इतर प्रदेशांतहि अधिकाधिक प्रवेश मिळतो, आणि मग हें जग तुमच्यापासून गळून पडतें. त्या आत्म्याचें ओझरतें दर्शन होतांच तुमचें इंद्रियज्ञान, तुमचें विषयसुख, तुमची देहासक्ति हीं सारीं लोप पावतील. एकामागून एक आध्यात्मिक अनुभव तुम्हांला लाभतील. तुम्ही योग संपविलेला असेल आणि आत्मा हा निजरूपांत प्रकट होईल. तेव्हा तुम्ही ईश्वराची आत्म्याच्या रूपांत उपासना करूं लागाल. तेव्हा तुम्हांला समजूं लागेल की उपासना ही कांहीतरी मिळविण्यासाठी नाही. आपल्या उपासनेच्या मुळाशीं सान्त भासणारें पण वस्तुतः अनंत असणारें प्रेम असतें आणि हें प्रेम म्हणजेच उपासकाने ईश्वराच्या चरणीं केलेलें पूर्ण आत्मसमर्पण होय. "मी नव्हे, तूंच आहेस; मी मेलों; तूं आहेस, मी नाहीं; मला धन नको, सौंदर्य नको, विद्वत्तादेखील नको. मला मुक्तिहि नको. तुझी इच्छा असेल तर मला कोटी कोटी नरकांत घाल; मला फक्त एकच गोष्ट हवी. माझें प्रेम तुझ्याच चरणीं असूं दे."

---

# दिव्य प्रेम

(१२ एप्रिल १९०० रोजीं सॅन् फ्रॅन्सिस्को विभागांत दिलेलें भाषण)

प्रेम हें एका त्रिकोणाकृतीने दर्शविलें जाऊं शकतें. या त्रिकोणाचा पहिला कोन हा की प्रेम हें कांहीच मागत नाही. तें याचक नाही . . . .याचकाचें प्रेम हें मुळी प्रेमच नव्हे. प्रेमाचें पहिलें लक्षण म्हणजे, प्रेम कांही मागत नाही, तें सर्वस्व देतें. प्रेमाच्या द्वारें केलेली उपासना हीच खरी आध्यात्मिक उपासना होय. ईश्वर दयाळू आहे की नाही हा प्रश्न विचारला जात नाही. तो ईश्वर आहे; तो माझा प्रेमास्पद आहे. ईश्वर हा सर्वशक्तिमान् आहे किंवा नाही, तो सान्त आहे की अनंत, असले प्रश्न विचारण्यांत येत नाहीत. तो चांगलें करीत असेल तर ठीकच आहे; तो अनिष्ट करीत असेल तरीहि हरकत नाही. तो अनंत प्रेमस्वरूप आहे याव्यतिरिक्त त्याचे सर्व गुण अदृश्य होतात.

एक प्राचीन भारतीय सम्राट् होता. तो एकदा शिकारीसाठी अरण्यांत गेला असतांना तेथे एका थोर साधूशीं त्याची गाठ पडली. त्या साधूला पाहून त्याला इतका आनंद झाला की त्याने साधूला राजधानीला येऊन कांही नजराणा घेण्याविषयी आग्रह केला. साधूने प्रथम नकार दिला, पण राजाने पुन:पुन: आग्रह केला आणि शेवटीं साधूने त्याची विनंती मान्य केली. जेव्हा साधु राजवाड्यांत गेला आणि राजाला त्याची वर्दी देण्यांत आली तेव्हा राजा म्हणाला. "माझी प्रार्थना आटोपेपर्यंत थोडेसें थांबा."

राजाने प्रार्थना केली, "प्रभो ! मला अधिक संपत्ति दे, अधिक भूमि दे, अधिक चांगलें आरोग्य दे, अधिक संतति दे." साधु उठला आणि चालायला लागला. राजा म्हणाला, "आपण अद्याप माझ्या-कडून कांहीच स्वीकारलें नाही." साधूने उत्तर दिलें, "मी याचकाजवळ याचना करीत नाहीं. इतका वेळ तुम्ही अधिक धन, अधिक भूमि आणि अशाच गोष्टींसाठीं प्रार्थना करीत होतां, तुम्ही मला काय देऊं शकाल ? प्रथम तुम्ही स्वतःच्या गरजा पूर्ण करा."

प्रेम कधी मागत नाही, तें नेहमी देतें. . . .जेव्हा तरुण मनुष्य आपल्या प्रेयसीला भेटायला जातो. . . .तेव्हा त्यांच्यांत कांही व्यापारी वृत्तीचे संबंध नसतात; त्यांचें नातें प्रेमाचें असतें, आणि प्रेम हें भिकारी नाही. अशा रीतीने आपल्या लक्षांत आलें असेल की याचना करणें सोडून दिल्यावरच खऱ्या आध्यात्मिक उपासनेचा प्रारंभ होतो. "ईश्वरा, मला हें दे आणि तें दे" असली सर्व याचना जेव्हा आपण टाकून देतों तेव्हाच धर्माला प्रारंभ होतो.

प्रेमाच्या त्रिकोणाचा दुसरा कोन हा की प्रेमाला भय माहीत नसतें. तुम्ही माझे तुकडे तुकडे करा, आणि तरीहि मी तुमच्यावर प्रेम करीन. समजा तुमच्यापैकी एक माता--एक दुबळी स्त्री--आपल्या मुलाला वाघ घेऊन जात आहे असें पाहते. ती त्या वेळीं काय करील तें मी जाणतों. ती वाघाला तोंड देईल. इतर वेळीं वाटेंत एखादा कुत्रा जरी तिला दिसला तरी ती पळून जाईल. पण ती वाघाच्या समोर उडी घेईल आणि आपलें मूल हिसकून घेईल. प्रेमाला भय ठाऊक नाही. तें सर्व अशुभावर जय मिळवितें. ईश्वराचें भय हा धर्माचा प्रारंभ आहे, तर ईश्वरावर प्रेम ही धर्माची

समाप्ति आहे. त्या अवस्थेंत सर्व भय पार नष्ट होतें.

प्रेमाच्या त्रिकोणाचा तिसरा कोन हा की प्रेम हें स्वतःच स्वतःचें साध्य आहे. तें कधीच अन्य कांही मिळविण्याचें साधन होऊं शकत नाही. जो मनुष्य म्हणतो की, "मी अशा अशा गोष्टी-साठी तुझ्यावर प्रेम करतों", तो खरें पाहतां प्रेम करीत नाही. प्रेम केव्हाच साधन होऊं शकत नाही, तें अंतिम साध्यच आहे. प्रेमाचा हेतु आणि उद्दिष्ट काय ? ईश्वरावर प्रेम करणें, इतकेंच. ईश्वरावर एखाद्याने प्रेम कां करावें ? येथे कां हा प्रश्न नाही, कारण प्रेम हें अन्य कांही मिळविण्याचें साधन नाही. एखादा जेव्हा यथार्थ प्रेम करूं शकतो, तेव्हा तीच मुक्ति आहे, तीच पूर्णता आहे, तोच स्वर्ग आहे आणखी दुसरें काय साध्य असूं शकतें ? प्रेमाहून श्रेष्ठ असें तुम्ही काय मिळवूं शकतां ?

तुम्ही-आम्ही सामान्यजन प्रेमाचा जो अर्थ करतों त्यासंबंधी मी बोलत नाहीं. आपल्या नित्याच्या परिचयाची क्षुद्र प्रेमभावना कदाचित् गोंडस असेलहि. पुरुष स्त्रीच्या प्रेमांत पडतो, आणि स्त्री पुरुषासाठी प्राण द्यावयास सिद्ध होते ! पण हेंहि शक्य आहे की पांच मिनिटांत प्रेमिक प्रेमिकेला लाथाडतो आणि ती त्याला. हा नुसता जडवाद आहे, प्रेम मुळीच नव्हे. प्रेमिक खरोखरीच जर आपल्या प्रियेवर प्रेम करूं शकला, तर तो त्याच क्षणीं पूर्णत्वाप्रत पोहोचेल. तो स्वभावतःच प्रेमस्वरूप आहे, पूर्णस्वरूप आहे. जरी प्रेमिकाला अध्यात्म, धर्म, मानसशास्त्र यांसंबंधी कांहीहि माहीत नसलें तरी जर तो आपल्या प्रियेवर यथार्थ प्रेम करील तर त्याला योगाच्या सर्व शक्ति प्राप्त होतील. माझा असा विश्वास आहे की जर स्त्री व पुरुष खरोखर प्रेम करूं शकतील तर त्यांना योग्यांच्या ठायीं असलेल्या सर्व शक्ति प्राप्त होऊं शकतील, कारण प्रेम

स्वतःच ईश्वरस्वरूप आहे. तो ईश्वर सर्वव्यापक आहे, आणि म्हणून तें प्रेम तुमच्या ठायीं आहे--मग तें तुम्हांला माहीत असो की नसो.

परवा मीं पाहिलें कीं एक तरुण एका तरुणीची वाट पाहत होता. . . .या मुलाचें निरीक्षण करणें हा एक चांगला प्रयोग होईल असें मला वाटलें. त्या तरुणाला प्रेमाच्या उत्कटतेमुळे दूर अंतरावरचें पाहण्याची व ऐकण्याची शक्ति प्राप्त झाली. साठ-सत्तर वेळां त्याने कधी चूक केली नाही. आणि ती तरुणी चांगली दोनशे मैल दूर होती. तो म्हणायचा, "तिने असा पोषाख केला आहे" किंवा "ती तिथे चालली आहे." मीं स्वतःच्या डोळ्यांनी तें पाहिलें आहे.

प्रश्न हा आहे : तुमचा पति ईश्वर नाही काय, तुमचें मूल ईश्वर नाही काय ? तुम्ही जर आपल्या पत्नीवर खरेंखुरें प्रेम करूं शकत असाल तर जगांतील सारा धर्म तुम्हांला प्राप्त झाला असें म्हणतां येईल. मग धर्माचें व योगाचें संपूर्ण रहस्य तुम्हांला प्राप्त होईल. पण तुम्ही यथार्थ प्रेम करूं शकतां काय ? हाच प्रश्न आहे. तुम्ही म्हणतां, "हे मेरी ! मी तुझ्यावर प्रेम करतों, मी तुझ्या-साठी प्राण देतों" पण तुम्ही जर मेरीला दुसऱ्या माणसाचें चुंबन घेतांना पाहाल तर तुम्ही त्याचा गळा कापावयास धावाल. मेरीने जर जॉनला दुसऱ्या मुलीशीं बोलतांना पाहिलें तर तिला रात्रभर झोप येणार नाही आणि ती जॉनचें जीवन नरकप्राय करून सोडील. हें कांही प्रेम नव्हे. असल्या स्त्री-पुरुषप्रेमांत खरेदी-विक्रीची भावना असते. त्याला प्रेम म्हणणें हा 'प्रेम' या शब्दाचा अपमान होईल. जग रात्रंदिवस ईश्वर व धर्म यांच्याविषयी बोलत असतें, तसेंच तें प्रेमासंबंधीहि बोलतें. प्रत्येक बाबतींत ढोंग--हेंच

तुम्ही करीत आहांत ! प्रत्येकजण 'प्रेमा'विषयी बोलतो, तरी पण वर्तमानपत्रांचे रकाने घटस्फोटांच्या बातम्यांनीं भरलेले असतात. जेव्हा तुम्ही जॉनवर प्रेम करतां तेव्हा तें त्याच्यासाठी की तुमच्यासाठी ? तुमच्यासाठी करीत असाल तर तुम्ही त्याच्यापासून कशाची तरी अपेक्षा करतां. जर तुम्ही त्याच्यासाठी करीत असाल तर तुम्ही त्याच्याकडून कांही अपेक्षीत नाही. तो त्याला वाटेल तें करील आणि तरी तुमचें त्याच्यावरील प्रेम कायम राहील.

प्रेमाच्या त्रिकोणाचे तीन कोन वरीलप्रमाणे आहेत. प्रेमाशिवाय तत्त्वज्ञान हें शुष्क होईल, मानसशास्त्र केवळ रुक्ष सिद्धान्त बनेल आणि कर्म म्हणजे केवळ काबाडकष्ट होईल. प्रेम असेल तर तत्त्वज्ञान हें काव्य होईल, मानसशास्त्र हें साक्षात्काराचें शास्त्र होईल आणि कर्म हें जगांतील अत्यंत रोचक अशी गोष्ट होईल. केवळ पुस्तकें वाचल्याने माणूस रुक्ष होतो. खरा विद्वान् कोण होतो ?--जो प्रेमाचा किंचित्‌देखील अनुभव घेऊं शकतो तो. ईश्वर प्रेमस्वरूप आहे आणि प्रेम ईश्वरस्वरूप आहे आणि ईश्वर सर्वव्यापक आहे हें अनुभवल्यानंतर माणसाला स्वत:चें भान राहत नाही, तो स्वत:च्या डोक्यावर उभा आहे की पायावर हें त्याला कळत नाही. मद्याचा पेला झोकलेल्या माणसाला आपण कुठे उभे आहोंत हें जसें कळत नाही तशी त्याची अवस्था होऊन जाते. . . .जर आपण दहा मिनिटें रडूं तर पुढील दोन महिने आपण कुठे आहोंत याचें आपल्याला भान राहणार नाही. . . .आपल्याला जेवणाच्या वेळेची आठवण राहणार नाही. आपण काय खात आहोंत याची जाणीव राहणार नाही. ईश्वरावर प्रेम करून तुम्ही बाहेरून नीटनेटके आणि व्यवहारी कसे राहूं शकाल? . . .

ही सर्वविजयी, सर्वशक्तिमान प्रेमशक्ति कशी प्राप्त होईल ? . . .

लोकांची परीक्षा करण्याची गरज नाही. ते सर्व वेडे आहेत. मुलांना त्यांच्या खेळांचें, तरुणांना तरुणींचें आणि वृद्धांना जुन्या स्मृति चघळीत बसण्याचें वेड असतें. कांहींना संपत्तीचें वेड असतें. कांहींना मग ईश्वराचें वेड कां नसावें ? स्त्रीच्या व पुरुषांच्या मागे तुम्ही जसे वेडे होतां त्याप्रमाणे ईश्वराच्या प्रेमाचें वेड लागूं द्या. ह्या ईश्वरप्रेमासमोर या स्त्री-पुरुषांची काय मातब्बरी ? लोक म्हणतात, "मी हें सोडूं काय ? मी तें सोडूं काय ?" एकाने विचारलें, "मी विवाह करूं नको काय ?" कशाचाच त्याग करूं नका ! या गोष्टीच तुम्हांला सोडतील. वाट पाहा, आणि तुम्ही त्या गोष्टी विसरून जाल.

पूर्णपणें ईश्वराच्या प्रेमांत लीन होणें हीच खरी उपासना आहे. अशा उपासनेचें ओझरतें दर्शन तुम्हांला अधूनमधून रोमन कॅथॉलिक संप्रदायांत होतें; या संप्रदायांतील कांही संन्यासी व संन्यासिनी दिव्य ईश्वरप्रेमाने वेडया झालेल्या दिसतात. तुमच्या हृदयांत असलें ईश्वरप्रेम असलें पाहिजे ! ईश्वराचें प्रेम हें असें असलें पाहिजे——कशाचीहि याचना नाही, कशाचीहि अपेक्षा नाही. . . .

एका व्यक्तीने प्रश्न विचारला, 'उपासना कशी करावी?' आपल्या सर्व संपत्तीहून अधिक प्रिय, सर्व नातेवाइकांहून अधिक प्रिय, स्वतःच्या मुलांहून अधिक प्रिय समजून ईश्वराची उपासना करा. त्याला तुमचा एकमेव प्रेमास्पद मानून, त्यालाच प्रेमस्वरूप समजून त्याची उपासना करा. 'अनंत प्रेमस्वरूप' हें त्याचें नांव आहे. तीच ईश्वराची एकमेव व्याख्या आहे.. हें विश्व नष्ट झालें तरी पर्वा करूं नका. . . .तो अनंत प्रेमस्वरूप आहे तोंपर्यंत

आम्हांला कशाची पर्वा आहे ? उपासना म्हणजे काय हें आता तुम्हांला कळलें काय ? इतर सर्व विचार दूर झाले पाहिजेत. ईश्वराशिवाय इतर सर्व नाहीसें झालें पाहिजे. माता किंवा पिता यांचें मुलावरील प्रेम, पत्नीचें पतीवरील प्रेम, पतीचें पत्नीवरील प्रेम, मित्राचें मित्रावरील प्रेम--हीं सर्व एकत्र करून तें प्रेम ईश्वराला अर्पण केलें पाहिजे. स्त्री जर एका पुरुषावर प्रेम करीत असेल तर ती दुसऱ्या पुरुषावर प्रेम करूं शकत नाही. पुरुष जर एका स्त्रीवर प्रेम करीत असेल तर तो दुसरीवर प्रेम करूं शकणार नाही. प्रेमाचें स्वरूप हें असें आहे.

माझे गुरुदेव म्हणत असत, "समजा या खोलींत एक सोन्याच्या मोहरांची पिशवी आहे, आणि बाजूच्या खोलींत एक चोर आहे. चोराला हें पक्कें माहीत आहे कीं इथे मोहरांची थैली आहे. त्याला झोप येईल काय ? खात्रीने नाही. सर्वकाळ तो जोराने विचार करीत राहील की त्या सोन्यापर्यंत कसें पोहोचावें."...तसेंच एखादा मनुष्य जर ईश्वरावर प्रेम करीत असेल तर तो दुसऱ्या कशावर कसें प्रेम करूं शकेल ? ईश्वरावरच्या त्या प्रबळ प्रेमापुढे दुसरें कांही कसें टिकूं शकेल ? त्याच्यापुढे इतर सर्व नाहीसें होतें. मन त्या प्रेमाच्या मागे, त्याला शोधण्यासाठी, त्याचा साक्षात्कार करण्यासाठी, त्याचा अनुभव घेण्यासाठी व त्यांत वास करण्यासाठी वेडें झाल्याशिवाय कसें राहील ?

ईश्वरावरील प्रेम पुढीलप्रमाणे असलें पाहिजे : "मला पैसा नको, मित्र नको, रूप नको, धनदौलत नको, विद्वत्ता नको, मुक्तिदेखील नको. तुझी तशीच इच्छा असेल तर मला खुशाल हजार वेळां जन्मास घाल. फक्त एवढेंच मला दे की मी तुझ्यावर

प्रेमासाठीच प्रेम करूं शकेन. विषयी लोकांचें ऐहिक विषयांवर जसें प्रेम असतें तसें उत्कट प्रेम माझ्या हृदयांत उदित होवो, पण तें फक्त त्या सौंदर्यस्वरूप ईश्वराच्या ठायींच असो. ईश्वराचा जयजयकार असो! प्रियकर ईश्वराचा जयजयकार असो!" ईश्वर हा असा आहे. पुष्कळसे योगी करतात तशा चमत्कारांची त्याला पर्वा नसते. क्षुद्र जादूगार लहान लहान चमत्कार करतात. ईश्वर हा महान् जादूगार आहे, तो सर्वंच प्रकारचे चमत्कार करतो. या ब्रह्माण्डांत कितीतरी विश्वें आहेत, त्यांची कोण गणती करतो? . . .

दुसराहि एक मार्ग आहे. प्रत्येक वस्तूवर विजय विळविण्याचा, प्रत्येकाचें दमन करण्याचा, शरीराला व मनाला जिंकण्याचा. . . .पण भक्त म्हणतो, "प्रत्येक गोष्ट जिंकण्याचा उपयोग काय? माझा संबंध ईश्वराशीं आहे."

एक योगी होता, तो मोठा भक्त होता. घशांतील कर्क रोगाने तो मरणोन्मुख झाला होता. त्याच्याकडे दुसरा एक योगी भेटायला आला, तो तत्त्वज्ञ होता. तो म्हणाला, "मित्रा, तुझें मन घशांतील त्या व्रणावर केंद्रित करून तो बरा कां करून घेत नाहीस?" तिसऱ्यांदा जेव्हा हा प्रश्न त्याने विचारला तेव्हा तो महान् योगी म्हणाला, "जें मन मीं पूर्णतः ईश्वराला अर्पण केलें आहे तें या रक्ता-मांसाच्या पिंजऱ्यावर केंद्रित करणें शक्य आहे असें तुला वाटतें काय?" येशू ख्रिस्तांना जेव्हा क्रुसावर खिळे ठोकून टांगण्यांत आलें तेव्हा देवदूतांची फौज स्वतःच्या मदतीला आणण्याचें त्यांनी नाकारलें. 'हें क्षुद्र शरीर इतकें थोर आहे काय की त्याला दोन किंवा तीन दिवस अधिक जगविण्यासाठी मीं हजारो देवदूत आणावेत?'

ऐहिक भूमिकेवरून पाहतां माझें शरीर हेंच माझें सर्वस्व आहे. हें शरीरच माझें जग आहे. हें शरीरच माझा ईश्वर आहे. मी शरीर आहें. तुम्ही माझ्या शरीराला चिमटा घेतल्यास तो मला बसतो. ज्या क्षणीं माझें डोकें दुखतें त्या क्षणीं मी ईश्वराला विसरतों. मी शरीर आहें ! ईश्वराने आणि सर्वांनी या उच्चतम ध्येयासाठीं——या शरीरासाठी——खाली उतरलें पाहिजे ! या दृष्टि-कोनांतून पाहतां, जेव्हा येशू ख्रिस्तांनी क्रुसावर मरण पत्करलें आणि आपल्या साहाय्यासाठी देवदूतांना आणलें नाही तेव्हा त्यांनी मूर्खपणा केला. त्यांनी देवदूतांना आणायला पाहिजे होतें आणि स्वत:ला क्रुसावर सोडवून घ्यावयास पाहिजे होतें ! पण ज्याला हें शरीर नगण्य आहे असा भक्त या निरर्थक गोष्टींची कशाला पर्वा करतो ? जें येतें व जातें अशा या शरीरासंबंधी विचार करण्याचे कष्ट कां घ्या ? येशू ख्रिस्तांचा क्रुसावर प्राण जात असतांना त्यांच्या ज्या कपड्यासाठी रोमन सैनिकांनी चिठ्ठ्या टाकल्या त्या कपड्याहून या शरीराला अधिक महत्त्व नाही.

ऐहिक दृष्टिकोन व भक्ताचा दृष्टिकोन यांत जमीनअस्मा-नाचा फरक आहे. प्रेम करीत राहा. एखादा मनुष्य तुमच्यावर रागावला असेल तरी तुम्हीं त्याच्यावर रागावण्याचें कांही कारण नाही; तो स्वत:चा अध:पात करून घेत असेल तरी त्यामुळें तुम्हीं आपला अध:पात करून घेण्याचें कांही कारण नाही. . . . ईश्वराचे भक्त म्हणतात——"दुसऱ्याने रागावण्याचा मूर्खपणा केला म्हणून मीं स्वत: कशाला रागावूं ? वाइटाचा तूं प्रतिकार करूं नकोस." जगाने कांहीहि केलें, तें कसेंहि वागलें तरी त्याचा भक्तांवर परिणाम होत नाही.

एका योग्याने अद्‌भुत सिद्धि प्राप्त करून घेतल्या होत्या.

तो म्हणाला, "माझी सिद्धि बघा ! तें पाहा आकाश; मी तें आता ढगाने झाकून टाकतों." त्याने तसें म्हणतांच पाऊस पडावयास प्रारंभ झाला. एकजण म्हणाला, "महाराज, आपली शक्ति किती अद्‌भुत आहे ! पण मला असें कांही शिकवा की जें जाणल्याने मी दुसरें कांहीं मागणार नाही."...सिद्धींचासुद्धा त्याग करणें, कोणतीहि सिद्धि जवळ न ठेवणें, सिद्धींचीहि अपेक्षा नसणें ! --याचा अर्थ काय हें केवळ बुद्धीने कळणार नाही....

हजारों पुस्तकें वाचूनहि तें तुम्हांला समजणार नाही.... जेव्हा आपल्याला तें समजूं लागेल तेव्हा सर्व जगाचें रहस्य आपल्यासमोर प्रकट होईल....मुलगी आपल्या बाहुल्यांशीं खेळत असते, प्रत्येक वेळीं बाहुलीसाठी नवा नवरा ती मिळवीत असते. पण तिचा खरा पति जेव्हा येतो तेव्हा सर्व बाहुल्या ती नेहमीसाठी टाकून देते... येथील प्रत्येक गोष्टीचें असेंच आहे. जेव्हा प्रेमाचा सूर्य उदय पावतो तेव्हा हे सिद्धींचे व वासनांचे खेळांतले सूर्य नाहीसे होतात. सिद्धि घेऊन आपण काय करणार ? तुमच्या जवळ असलेल्या सिद्धीपासून जर तुमची सुटका होऊं शकली तर ईश्वराचे उपकार माना. प्रेम करायला लागा. सिद्धींचा त्याग केला पाहिजे. माझ्या व ईश्वराच्या मधे प्रेमाशिवाय दुसरें कांहीहि नको. ईश्वर हा केवळ प्रेमस्वरूप आहे, अन्य कांही नाही. प्रारंभीं प्रेम, मध्ये प्रेम, अंतीं प्रेम--हेंच त्याचें स्वरूप आहे.

रस्त्यारस्त्यांतून ईश्वराच्या प्रेमाचा उपदेश करीत फिरणारी एक राणी होती. संतापलेल्या तिच्या नवऱ्याने तिचा छळ केला, आणि जिथे जिथे ती जाई तिथे तिथे तो तिचा छळ करी. ती आपल्या प्रेमाचें वर्णन करणारीं गीतें गात असे. तिचीं पदें सर्वत्र गायिलीं जातात. "डोळ्यांतील अश्रूंचें सिंचन करून मीं

प्रेमाची अमरवेल वाढविली. . . ." हें अंतिम व श्रेष्ठ असें ध्येय आहे, याहून श्रेष्ठ आणखी काय असूं शकतें ? लोकांना सगळ्याच गोष्टी हव्या असतात. सर्वच गोष्टींवर त्यांना स्वामित्व हवें असतें. म्हणूनच फार थोड्यांना प्रेम म्हणजे काय तें कळतें, फार थोडे प्रेमाकडे वळतात. म्हणून लोकांना जागे करा आणि प्रेमाविषयी सांगा ! त्यांना आणखी ज्ञान मिळेल.

प्रेम हें स्वभावतःच शाश्वत व अनंत स्वरूपाचा त्याग आहे. तुम्हांला प्रत्येक गोष्टीचा त्याग केला पाहिजे. तुमचें कशावरहि स्वामित्व असतां कामा नये. प्रेमाचा अनुभव आल्यावर तुम्हांला इतर कशाचीहि इच्छा राहणार नाही. . . ."तूंच निरंतर माझा प्रेमास्पद राहा !" हेंच काय तें प्रेमाला हवें असतें. "माझ्या प्रियतमा ! तुझ्या ओठाचें एक चुंबन ! तूं ज्याला चुंबिलेंस त्याचीं सर्व दुःखें लयास जातात. एकदा तूं चुंबिलें की मनुष्य आनंदी होतो आणि इतर सर्व वस्तूंवरील प्रेम विसरतो. तो तुझी एकट्याचीच स्तुति करतो, आणि तुला एकट्यालाच पाहतो." मानवी प्रेमाच्या स्वरूपांतहि दिव्यत्वाचा अंश दडलेला असतो. उत्कट प्रेमाच्या पहिल्या क्षणीं संपूर्ण जग आपल्या हृदयाशीं सुसंवादी आहे असा आपल्याला अनुभव येतो. जगांतील प्रत्येक पक्षी आपल्या प्रेमाचें गाणें गाऊं लागतो. फुलें आपल्यासाठीच फुलतात. त्या अनंत, शाश्वत प्रेमापासूनच मानवी प्रेमाची उत्पत्ति आहे.

ईश्वराच्या भक्ताने चोरांना, दुःखांना, मृत्यूला—कशालाहि कां भ्यावें ? . . .भक्त हा अत्यंत घोर अशा नरकांतहि जाईल, पण तो नरक त्याच्या दृष्टीने नरक राहील काय ? आपण सर्वांनी या स्वर्गनरकाच्या कल्पना सोडल्या पाहिजेत. आणि त्याहून अधिक

श्रेष्ठ अशा प्रेमाची प्राप्ति करून घेतली पाहिजे. . . .ज्या प्रेमापुढे ईश्वराशिवाय इतर सर्व गोष्टी नाहीशा होऊन जातात त्या प्रेमाने उन्मत्त होण्यासाठी शेकडो लोक प्रयत्न करीत आहेत.

शेवटीं प्रेमिक, प्रेमास्पद आणि प्रेम हीं तिन्हीं एक होऊन जातात. तेंच अंतिम लक्ष्य आहे. . . .मनुष्य व आत्मा यांच्यांत, जीव व ईश्वर यांच्यांत थोडा तरी भेद कां आहे ? . . .केवळ हा प्रेमाचा आनंद उपभोगण्यासाठी. ईश्वराला स्वतःवर प्रेम करण्याची इच्छा झाली, म्हणून तो स्वतःच 'बहु' झाला. . . ."सृष्टीचें हेंच एकमेव कारण आहे" असें भक्त म्हणतो. "आपण सर्व एक आहोंत. मी व माझा परमपिता एक आहोंत. आता मी वेगळा आहें, तें केवळ ईश्वरावर प्रेम करण्यासाठी. . . .साखर होणें चांगलें की साखर खाणें चांगलें ? साखर होण्यांत काय आनंद आहे ? साखर खाणें—यांत प्रेमाचा अमर्याद आनंद आहे."

ईश्वर हा आपला पिता, माता, सखा, पुत्र आहे अशा प्रकारचे प्रेमाचे सर्व आदर्श हे आपल्या हृदयांत भक्तिभाव दृढ करण्यासाठी व आपण ईश्वराच्या अधिक निकट आहोंत व त्याला आपण अधिक प्रिय आहोंत असा आपल्याला अनुभव येण्यासाठी निर्माण केलेले आहेत. हें स्त्री-पुरुषांत असणारें प्रेम हेंच सर्वांत उत्कट असें प्रेम असतें. ईश्वरावर तसें उत्कट प्रेम करावें. स्त्री आपल्या पित्यावर प्रेम करते, मातेवर प्रेम करते; आपल्या मुलावर प्रेम करते, आपल्या मैत्रिणींवर प्रेम करते. पण ती पित्याजवळ, किंवा मातेजवळ किंवा मुलाजवळ वा मैत्रिणीजवळ स्वतःचे सर्व भाव व्यक्त करूं शकत नाही. एकच व्यक्ति अशी असते की जिच्यापासून ती कांहीहि लपवीत नाही. पुरुषांचेंहि असेंच आहे. . . .पतिपत्नीचें नातें हें सर्वांगपूर्ण आहे. स्त्री-पुरुषप्रेमांत इतर

सर्व प्रकारचें प्रेम एक होऊन केंद्रित झालेलें असतें. पतीमधे स्त्रीला पिता, मित्र, मूल हीं सर्व मिळतात. पत्नींत पतीला माता, कन्या आणि त्याशिवाय आणखी कांहीतरी प्राप्त होतें. तें स्त्री-पुरुषांतील अत्युत्कट व परिपूर्ण प्रेम ईश्वराच्या संबंधांत उत्पन्न झालें पाहिजे. ज्या प्रेमाने रक्तसंबंध नसलेल्या पुरुषाजवळ स्त्री स्वत:ला पूर्णपणें, निर्भयपणें आणि नि:संकोचपणें व्यक्त करते तेंच प्रेम ईश्वराविषयी निर्माण झालें पाहिजे. अशा प्रेमांत मुळीच लपवाछपवी नसते ! ती स्वत:पासून जसें कांही लपवीत नाही तसेंच आपल्या प्रियकरापासूनहि कांही लपवीत नाही. असेंच प्रेम ईश्वरासंबंधी उत्पन्न झालें पाहिजे. हें प्रेम समजण्याला कठीण आहे. तुम्हांला तें हळूहळू कळूं लागेल आणि मग 'स्त्री-पुरुष' भेदाचा सर्व विचार गळून पडेल. "नदीकाठच्या वाळवंटावर ग्रीष्मदिनीं पडलेल्या पाण्याच्या थेंबाप्रमाणे हें जीवन व त्यांतील सर्व नातीं क्षणभंगुर आहेत." 'ईश्वर सृष्टिकर्ता आहे' यासारखे सर्व विचार हे लहान मुलांना शोभण्याजोगे आहेत. तोच माझा प्रेमास्पद आहे, तोच माझा प्राण आहे असें माझ्या हृदयाने आक्रंदून म्हटलें पाहिजे. . . .

"मला एक आशा आहे. लोक तुला जगदीश्वर म्हणतात, आणि चांगला किंवा वाईट, मोठा किंवा लहान असा मी त्य जगाचा एक अंश आहें, आणि तूं माझा प्रियकरहि आहेस. माझें शरीर, माझें मन आणि माझा आत्मा हीं सर्व मीं तुझ्या वेदीवर अर्पण केलीं आहेत. प्रियतमा ! माझ्या या उपायनाचा अव्हेर करूं नकोस !"

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १२२८५

---

# आमचें अन्य प्रकाशन

## मराठी विभाग

| | | |
|---|---|---|
| १-२. | श्रीरामकृष्ण-चरित्र — प्रथम भाग (चवथी आवृत्ति) | रु.न.पै. |
| | पृ. सं. ३५४+३० | ४.२५ |
| | द्वितीय भाग (दुसरी आवृत्ति) पृ. सं. ३४२+१२ | ४.३७ |
| ३. | श्रीरामकृष्ण-वचनामृत -- (अंतरंग शिष्यांशीं व भक्तांशीं झालेलीं भगवान श्रीरामकृष्णांचीं संभाषणें) | |
| | प्रथम भाग (द्वितीय आवृत्ति) पृ. सं. ५८१ | ५.५० |
| ४. | स्वामी विवेकानंद-यांचें चरित्र — श्री. सत्येंद्रनाथ मुजुमदारकृत (दुसरी आवृत्ति) | ७.२५ |
| ५. | स्वामी विवेकानंदांचीं पत्रें -- पृ. सं. ३३५ | ४.७५ |
| ६. | स्वामी विवेकानंदांच्या सहवासांत — संकलक — श्री. शरच्चंद्र चक्रवर्ती -- पृ. सं. ३९६ | ४.५० |
| ७. | ज्ञानयोग -- स्वामी विवेकानंद | ४.०० |
| ८. | राजयोग — स्वामी विवेकानंद | ३.०० |
| ९. | दैवी वाणी — स्वामी विवेकानंद | २.७५ |
| १०. | भारतीय नारी -- स्वामी विवेकानंद | २.०० |
| ११. | वेदान्ताचें स्वरूप आणि प्रभाव -- स्वामी विवेकानंद | १.७५ |
| १२. | महापुरुषांच्या जीवनकथा -- (सातवी आवृत्ति) — स्वामी विवेकानंद | १.६२ |
| १३. | कर्मयोग — (दुसरी आवृत्ति) — स्वामी विवेकानंद | १.६२ |
| १४. | स्वामी विवेकानंदांशीं संवाद आणि संभाषणें | १.६० |
| १५. | भक्तियोग — स्वामी विवेकानंद | १.२५ |
| १६. | वेदान्त आणि जीवन — स्वामी विवेकानंद | १.२५ |

१७. पूर्व आणि पश्चिम -- स्वामी विवेकानंद १.२५

१८. सार्वजनीन धर्म — स्वामी विवेकानंद १.००

१९. विवेकानंद-वाणी -- (तिसरी आवृत्ति) ०.९०

२०. माझें जीवन आणि कार्य -- स्वामी विवेकानंद ०.६५

२१. माझें गुरुदेव — (तिसरी आवृत्ति) -- स्वामी विवेकानंद ०.६२

२२. शिकागो व्याख्यानें -- (तिसरी आवृत्ति) —
स्वामी विवेकानंद ०.६२

२३. पुनर्जन्म आणि आत्म्याचें अमरत्व -- स्वामी विवेकानंद ०.६०

२४. हिंदुधर्माचें नव-जागरण --(दुसरी आवृत्ति) --
स्वामी विवेकानंद ० ५६

२५. शिक्षण — (दुसरी आवृत्ति) — स्वामी विवेकानंद ०.५६

२६. पवहारी बाबा -- (दुसरी आवृत्ति) -- स्वामी विवेकानंद ०.५०

२७. हिमालयाच्या कुशींत -- स्वामी अखंडानंद २.५०

२८. रामकृष्ण-संघ -- ध्येय व इतिहास — स्वामी तेजसानंद ०.७५

२९. स्वामी विवेकानंदांच्या आठवणी १.२५

३०. श्रीरामकृष्ण-वाक्सुधा -- (चवथी आवृत्ति) --
(भगवान श्रीरामकृष्णांच्या निवडक उपदेशांचें त्यांच्याच
एका अंतरंग शिष्याने केलेलें संकलन) ०.६२

३१. साधु नागमहाशय-चरित्र -- (भगवान श्रीरामकृष्णांचे
सुप्रसिद्ध शिष्य) -- (दुसरी आवृत्ति) --
-- अनु. श्री. वा: सोमण २.००

याशिवाय आमच्या आश्रमाने हिंदी भाषेंतूनहि समग्र रामकृष्ण-विवेकानंद साहित्य प्रकाशित केलें आहे. त्यासाठी विस्तृत सूचीपत्र मागवावें.

**श्रीरामकृष्ण आश्रम, धंतोली, नागपूर-१.**

REFBK-0012296